 राज्यातील विकास कामांसाठी बाराव्या वित्त आयोगाकडून 

## प्राप्त झालेला निधी संपूर्णपणे खर्च न झाल्यामुळे नागरिकांना मूलभूत सोयी सुविधांपासून वचिंत राहावे लागणे

[ निवेदन ]

खर्च करण्यास दिनांक ३१ मार्च २०११ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली असून विहित मुदतीत उर्वरीत रुपये ३.७३ कोटी निधी १०० टक्के खर्च करण्याच्या सूचना सर्व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत व उर्वरीत अखर्चीत निधी खर्च करण्याची कार्यवाही पंचायत राज संस्थांच्या स्तरावर चालू आहे.

**श्री. जितेंद्र आव्हाड :** अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री महोदयांनी लक्षवेधी सूचनेला लेखी निवेदनात जे उत्तर दिलेले आहे. त्यामुळे माझे समाधान झाले आहे.

**अध्यक्ष** : ठीक आहे.

## पॉईंट ऑफ ऑर्डरसंबंधी

**श्री. बाळा नांदगावकर :** अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे. आता अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा सुरू होणार आहे. काल सभागृहात तीन दिवस अर्थसंकल्पावर चर्चा करावी अशा प्रकारचा प्रस्ताव आला होता. यापूर्वी आपले तसे ठरविले होते. सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांबरोबरच विरोधी पक्षाच्या अनेक सन्माननीय सदस्यांना चर्चेत सहभागी होऊन अर्थसंकल्पासंबंधी अनेक महत्वाच्या सूचना करायच्या आहेत. आज अर्थसंकल्पावरील चर्चेचा दुसरा दिवस आहे. आता प्रथेनुसार माननीय विरोधी पक्षनेते सदर चर्चेला सुरूवात करतील. अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेसाठी तीन दिवसांची मर्यादा होती. परंतु कालचा दिवस वाया गेलेला आहे. अध्यक्ष महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेसाठी अजून एका दिवसाचा कालावधी वाढविल्यास सर्व सन्माननीय सदस्यांना सन्मान दिल्यासारखे होईल.

**अध्यक्ष** : आपल्याकडे आज, उद्या व परवा असे तीन दिवस भरपूर वेळ आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी काही काळजी करू नये.

**श्री. बाळा नांदगावकर :** ठीक आहे.

काही सन्माननीय सदस्य : अध्यक्ष महोदय, आज व उद्या मॅच आहे...

**अध्यक्ष** : मॅच वगैरे काही नाही. आपल्याला अर्थसंकल्पावर चर्चा करावयाची आहे. मला सद्धा बघायचे आहे की, आपण सर्व जण या बाबतीत किती गंभीर आहात ?

---

## सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**अध्यक्ष** : आता सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला सुरूवात होईल. अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेसाठी आजचा दुसरा दिवस आहे. या चर्चेसाठी एकूण तीन तास वेळ देण्यात येईल, या तीन तासांपैकी सत्तारुढ पक्षास निम्मा वेळ व विरोधी पक्षास निम्मा वेळ देण्यात येईल. सदस्य वेळेचे बंधन पाळून मला सहकार्य करतील अशी मी अपेक्षा करतो....

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) :** अध्यक्ष महोदय, या चर्चेसाठी वेळ वाढवून द्यावा.....

**अध्यक्ष** : या चर्चेसाठी वेळ वाढवून देण्यास माझी काही हरकत नाही. या चर्चेसाठी किती तासांचा वेळ ठरवावयाचा ?

अनेक सन्माननीय सदस्य : या चर्चेसाठी ६ तासांचा वेळ ठरवावा.

**अध्यक्ष** : ठीक आहे. आजच्या दिवसासाठी या चर्चेकरिता ६ तासांचा वेळ ठरविण्यात येत आहे. परंतु आपण सर्वांनी सभागृहात कोरम ठेवावा.

**श्री. देवेंद्र फडणवीस :** हा सल्ला दोन्ही बाजूंसाठी आहे का ?

**अध्यक्ष** : होय.

आता माननीय विरोधी पक्ष नेते प्रथेप्रमाणे चर्चेला सुरूवात करतील....

**पॉईंट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी**

**श्री. बाळा नांदगावकर :** अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. माझ्याकडे महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडील पत्र आहे. कदाचित, सदरहू पत्र आपल्या नजरेखालून गेले असावे असे मी गृहित धरतो. सन्माननीय डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव यांच्याकडून सदरहू पत्र सर्व खाजगी दूर वाहिन्यांचे संपादकाना पाठविण्यात आले आहे. त्यात ४-५ बाबींचा उल्लेख केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, आपणासहीत सर्व सन्माननीय सदस्य सार्वभौम सभागृहात वेगवेगळ्या विषयावर व्यथा मांडून त्या सोडविण्याचा प्रयत्न करीत असतात. अशा वेळेस दूरचित्रवाणीचे प्रतिनिधी किंवा लोकशाहीचा चौथा स्तंभ अतिशय सूक्ष्म पद्धतीने पाहणी करीत असतो. यासंदर्भातील सर्व माहिती लिखित करून महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात पोहचविण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यामुळे आपली प्रतिमा समाजात पोहचत असते. सभागृहात काय कामकाज झाले त्याची माहिती सर्वसामान्य जनतेला कळते.

**अध्यक्ष** : सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात आपले म्हणणे मांडावे.

**श्री. बाळा नांदगांवकर :** अध्यक्ष महोदय, खाजगी दूरचित्रवाहिन्यांना जे पत्र दिलेले आहे, त्यामध्ये बरीचशी बंधने घालण्यात आलेली आहेत.

**अध्यक्ष** : सन्माननीय सदस्यांनी ते पत्र माझ्याकडे पाठवून द्यावे.

**श्री. बाळा नांदगांवकर :** अध्यक्ष महोदय, सदर पत्र मी माननीय अध्यक्ष महोदयांकडे पाठविणार आहे. पत्रातील अनुक्रमांक एकमध्ये असे नमूद केले आहे की....

**अध्यक्ष** : सन्माननीय सदस्यांनी ते पत्र माझ्याकडे पाठवून द्यावे.

**श्री. बाळा नांदगांवकर :** अध्यक्ष महोदय, पत्रामध्ये असे नमूद केले आहे की, काही बाबींशी आम्ही सहमत होऊ. कोणताही प्रश्न येत नाही. पण काही बाबी या फोर्सफुल्ली होत आहे असे मला स्वत:ला वाटते. त्या बाबी वाचून मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. माननीय अध्यक्षांनी मला वेळ दिला तर त्या मी वाचून दाखवू शकतो.

**अध्यक्ष** : सन्माननीय सदस्यांनी ते पत्र माझ्याकडे पाठवून द्यावे. सन्माननीय सदस्यांनी सभागृहाचा वेळ घेऊ नये. आता अर्थसंकल्पावर चर्चा सुरू होईल.

**श्री. बाळा नांदगांवकर :** अध्यक्ष महोदय, ठीक आहे.

**अध्यक्ष** : सन्माननीय सदस्यांनी ते पत्र माझ्याकडे पाठवून द्यावे. त्या पत्रात काय नमूद केले आहे हे मी तपासून घेतो.

**श्री. गिरीष बापट :** अध्यक्ष महोदय, आपल्या परवानगीशिवाय हे पत्र गेले आहे काय एवढे आम्हाला रेकॉर्डवर आणावयाचे आहे.

**अध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री. बाळा नांदगांवकर यांच्याकडे कोणते पत्र आहे, ते प्रथम मला तपासावे लागेल.

**श्री. गिरीष बापट :** अध्यक्ष महोदय, आपल्या संमतीशिवाय हे पत्र दिलेले आहे काय ?

**अध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री. बाळा नांदगांवकर यांच्याकडे कोणते पत्र आहे ते मला माहित नाही. ते पत्र मला प्राप्त झाल्यानंतर तपासले जाईल आणि त्यानंतर तुम्हाला माहिती दिली जाईल.

**श्री. गिरीष बापट :** अध्यक्ष महोदय, इलेक्ट्रॉनिक मिडियावर बंधने आणली असा विषय सन्माननीय सदस्य श्री. बाळा नांदगांवकर यांनी मांडलेला आहे.

**अध्यक्ष** : ठीक आहे. आता मी विरोधी पक्ष नेत्यांना बोलण्याची संधी दिलेली असल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. गिरीष बापट यांनी खाली बसावे.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) :** अध्यक्ष महोदय, विधिमंडळाच्या कामकाजाच्या संदर्भात बाईट देण्यासंदर्भात आम्ही इलेक्ट्रॉनिक मिडियाकडे गेलो असता त्यांनी सांगितले की, आता तुमचे बाईट आम्ही घेणार नाही. या ठिकाणच्या बातम्या आम्ही आता प्रकाशित करणार नाही. आमच्या बातम्या प्रसारित का केल्या जाणार नाही अशी विचारणा केली असता इलेक्ट्रॉनिक मिडियाने आमच्या हातात एक पत्र दिले होते. त्या पत्रातील काही बाबींशी आम्ही सहमत आहोत. परंतु काही बाबी या त्यांच्यावर अधिक बंधने आणणाऱ्या आहेत. मला वाटते की, सभागृहात विपरित घोषणा देणे किंवा अशा संदर्भातील चित्रीकरण करू नये यासंदर्भात आम्ही सहमत आहोत. पण अन्य ठिकाणी जर कोणी बोलत असेल किंवा कोणी बाहेर बाईट देऊ इच्छित असेल तर त्या न घेणे हे त्यांच्यावर अन्याय करण्यासारखे आहे. यासंदर्भातील हे पत्रक माननीय अध्यक्षांनी मागे घेतले पाहिजे. या विषयाच्या संदर्भात सर्वांशी चर्चा करून सुधारित पत्रक निगर्मित केले तर सभागृहाची प्रतिष्ठा जोपासण्यास मदत होणार आहे. परिणामी दूरचित्रवाहिन्यांना काम करण्यास सोपे जाईल. या विषयाच्या संदर्भात माननीय अध्यक्षांनी गट नेत्यांशी दहा मिनिटे चर्चा करण्याची गरज आहे. आपल्या मताशी सर्वजण सहमत होतील असा मला विश्वास आहे. तरी यासंदर्भातील परिपत्रक मागे घेण्याची गरज आहे. संबंधितांना बोलावून काय केले पाहिजे अशा प्रकारची समज त्यांना दिली पाहिजे.

**अध्यक्ष** : ठीक आहे. मी सर्व प्रतिनिधींना बोलावून घेऊन चर्चा करतो. प्रिंट मिडिया, इलेक्ट्रॉनिक मिडिया किंवा व्हिजीटर्सना विधिमंडळात येण्याची परवानगी दिली जाते. त्यावेळी ज्या काही अटी असतात, त्या अटींचे पालन सगळ्यांनीच करणे गरजेचे असते. कोणत्याही प्रकारे लोकशाहीमध्ये मिडियावर बंधने आणणे हा काही उद्देश नाही. परंतु कधी कधी काही गोष्टींचा अतिरेक होत असतो.

**[ अध्यक्ष ]**

तो अतिरेक होऊ नये याकरिता सर्व इलेक्ट्रॉनिक मिडियाच्या प्रतिनिधींना मी बोलावून घेतो. अशा प्रकारचे पत्र सचिवांना पाठविण्याची वेळ का आली आणि त्यामध्ये काय सुधारणा करणे आवश्यक आहे यासंदर्भात चर्चा केली जाईल. तसेच आवश्यकता भासल्यास गट नेत्यांना देखील बोलाविले जाईल. यासंदर्भात योग्य तो निर्णय घेतला जाईल. आता माननीय विरोधी पक्ष नेते श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) अर्थसंकल्पावरील चर्चेस सुरूवात करतील.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) :** अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पावरील चर्चा आता सुरू होणार आहे. या वेळी माननीय वित्तमंत्री किंवा वित्त राज्यमंत्री यांनी सदर चर्चेकरिता सभागृहात उपस्थित राहावे या करिता त्यांना आपण बोलावले पाहिजे. त्यांच्या उपस्थितीत चर्चा करण्यास आम्हाला समाधान वाटेल.

**अध्यक्ष :** आपण आता चर्चा सुरू करू.

**श्री. गिरीष बापट :** अध्यक्ष महोदय, किमान वित्त राज्यमंत्री यांनी तरी सदर चर्चेच्या वेळी उपस्थित रहावे.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) :** अध्यक्ष महोदय, माननीय वित्त मंत्री सभागृहात येई पर्यंत आपण ५ ते १० मिनिटे थांबू.

**अध्यक्ष :** आता मुख्यमंत्री महोदय सभागृहात आलेले आहेत. या चर्चेत भाग घेण्यासाठी माझ्याकडे बऱ्याच सन्माननीय सदस्यांची नावे आलेली आहेत. यामुळे गट नेत्यांनी माझ्याकडे पुन्हा सुधारीत नावे द्यावीत. आता आपण चर्चेला सुरूवात करू.

---

## सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

(चर्चा पुढे सुरू)

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील)** (विरोधी पक्षनेता) : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, या अर्थसंकल्पामध्ये नवीन काय योजना आहेत, हे मी शोधत होतो. राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये आव्हानांना सामोरे जाण्यासाठी या अर्थसंकल्पात काही नवीन तरतुदी असतील अशी आमची अपेक्षा होती. तसेच माननीय वित्त मंत्री तथा उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी मांडलेला हा पहिला अर्थसंकल्प असल्यामुळे, स्वाभाविकच यामध्ये काही नाविन्य असेल, असे आम्हास वाटत होते. मात्र या अर्थसंकल्पामध्ये काहीही नवीन बाबी दिसून आल्या नाहीत. अर्थसंकल्पामध्ये जुन्या योजनांचा पाठपुरावा करू, असे शब्द वापरण्यात आलेले आहेत. अर्थसंकल्पामध्ये राज्यातील अनेक विकास प्रकल्पाच्या संदर्भात फार मोठ्या प्रमाणात तरतुदी केल्याचे दिसून आले नाही. तसेच यामध्ये ज्या तरतुदी दाखविण्यात आलेल्या आहेत, त्या फसव्या आहेत.

अध्यक्ष महोदय, मी या ठिकाणी आकडेवारी देऊन सांगू इच्छितो. अर्थसंकल्पाचे एकूण आकारमान १ कोटी ५४ लाख १२४ रुपये आहे. राज्य योजनेचे आकारमान ४१ हजार ५०० कोटी रुपये आहे.

**[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]**

वर्षअखेर नाममात्र ५८ कोटी २१ लाख रुपयांचे अधिक्य दाखविले आहे. हे कसे फसवे आहे, ते मी आपणास नंतर सांगणार आहे. राज्यावर २ लाख ३१ हजार ९२६ कोटी रुपयांचे कर्ज आहे. महसुली जमेपैकी ६४.३९ टक्के खर्च केवळ वेतन, निवृत्ती वेतन व व्याज या सारख्या विकासेतर बाबींवर होत आहे. कर्जे व दायित्वाचे प्रमाण कमी न होता राजकोषीय तूट २२ हजार ८०४ कोटी ८५ लाख एवढी झालेली आहे. एकूण खर्चापैकी विकासेतर खर्चाचे प्रत्यक्ष प्रमाण सन २००९-१० मध्ये ३०.७७ टक्के होते, सुधारित अंदाजानुसार सन २०१०-११ मध्ये ३२.४२ टक्के होते तसेच सन २०११-१२ मध्ये ३४.५८ टक्के झाल्याचे अर्थसंकल्पामध्ये आपणास दिसून येते. हा खर्च दिवसेंदिवस वाढत जाणार आहे.

अध्यक्ष महोदय, भांडवली खर्चापैकी विकासेतर खर्चाचे प्रमाण सन २००८-०९ या तुलनेत प्रत्यक्ष खर्चाचे प्रमाण १६.५५ टक्के होते. सन २००९-१० मध्ये हे प्रमाण १८.२६ टक्के होते व सन २०१०-११ मधील प्रमाण २२.४६ टक्के होते. तसेच अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये सन २०११-१२ करिता २८.५९ टक्के खर्च दाखविण्यात आलेला आहे. हा खर्च देखील वर्षागणिक वाढत जाणार आहे.

अध्यक्ष महोदय, आपण संपूर्ण अर्थसंकल्प पाहिला तर आपणास दिसून येईल की, अर्थसंकल्पातील जवळपास ८० टक्के भाग केंद्रीय योजनांच्या मॅचींग रकमेचा आहे. राज्याचे उत्पन्न मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे शासनाकडून सांगितले जाते. माननीय वित्त मंत्र्यांनी अर्थसंकल्पात केंद्रीय योजनेचा आढावा घेतला आहे. केंद्राकडून निधी मिळावा या करिता राज्य शासनाने केलेल्या तरतुदींचा उल्लेख अर्थसंकल्पात केलेला आहे. राष्ट्रीय कृषी पीक विमा योजना, राष्ट्रीय कृषी विकास योजना, तेलबिया योजना, कापूस विकास तंत्रज्ञान योजना, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, रोजगार हमी योजना, ग्रामीण पायाभूत विकास निधी, एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम, राष्ट्रीय सहकार विकास निगम, वेगवर्धित सिंचन लाभाचा कार्यक्रम, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, केंद्रीय मार्ग निधी, महावितरणला केंद्र शासनाकडून मिळालेला निधी, जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान, मुंबई मेट्रो रेल, पोलीस दल आधुनिकीकरण, क्राईम अँड क्रिमीनल ट्रॅकिंग नेटवर्क सिस्टिम अशा २० पेक्षा अधिक विविध योजना केंद्र शासनाच्या आहेत. अध्यक्ष महोदय, या ज्या योजना तसेच, जाहीर करण्यात आलेल्या नवीन योजनांसाठी किती तरतूद करण्यात आली आहे, याचा जर अभ्यास केला तर, असे दिसून येईल की, ज्या नवीन योजना जाहीर केलेल्या आहेत, त्यासाठी आर्थिक तरतुदी स्पष्ट केलेल्या नाहीत. या योजनांसाठी शासन खरोखर किती निधी उपलब्ध करून देणार आहे याचे प्रतिबिंब या अर्थसंकल्पामध्ये पडलेले दिसायला पाहिजे होते. परंतु, त्याबाबत या अर्थसंकल्पामध्ये स्पष्टता नाही.

अध्यक्ष महाराज, कळवण, नाशिक येथे डाळिंब, द्राक्ष आणि कांदा पिकांकरिता, राहता, अहमदनगर येथे फळे व भाजीपाल्याकरिता, यावल, जिल्हा जळगाव येथे केळीसाठी निर्यात सुविधा केंद्र व प्रत्येकी ५ फार्म हाऊस उभारण्यात येतील असे म्हटले आहे. परंतु, त्यासाठी आवश्यक तरतूद शून्य आहे. यवतमाळ येथील वैद्यकीय महाविद्यालयाच्या नूतन इमारतीच्या बांधकामासाठी आवश्यक निधी दिला जाईल असे सांगितले आहे. परंतु, त्यासाठीची तरतूद दाखविलेली नाही. हिंद केसरी, महाराष्ट्र केसरी यांच्या मासिक मानधनामध्ये वाढ करण्याचे सांगितले आहे. परंतु, त्यासाठी तरतूद दिसत

[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]

नाही. अंगणवाडी बांधकामासाठी यावेळी भरीव रक्कम ठेवली आहे असे सांगितले आहे. परंतु, ती किती याचा आकडा दिलेला नाही. महिलांवर होणाऱ्या अत्याचारांना प्रतिबंध करून त्यांचे संरक्षण देण्यासाठी जिल्हा स्तरावर समुपदेशन व मदत केंद्र सुरू करण्यासाठी आवश्यक नियत व्यय उपलब्ध करून देण्यात येईल असे म्हटले आहे, परंतु, तो किती ते दिलेले नाही. हजरत ख्वाजा सामना महंमद पीरसाहेब दर्गा या श्रद्धास्थानास भेट देणाऱ्या भाविकांच्या सोयीसवलतीसाठी निधी उपलब्ध करून देऊ असे म्हटले आहे, तो किती ते सांगितलेले नाही. क्राईम अँड क्रिमिनल ट्रॅकिंग नेटवर्क सिस्टम या केंद्र शासनाच्या योजनेसाठी राज्य शासनही आवश्यक तरतूद उपलब्ध करून देईल असे म्हटले आहे. परंतु, त्यासाठीच्या तरतुदीची माहिती दिलेली नाही. मराठीच्या सर्वांगीण समृद्धीसाठी स्थापन करण्यात आलेल्या मराठी भाषा विभागामार्फत विविध योजना राबविण्यासाठी आवश्यक तरतूद करण्यात आलेली आहे असे म्हटले आहे. परंतु, किती तरतूद करण्यात आली आहे त्याची माहिती दिलेली नाही. अशाप्रकारे आम्ही हे करणार आहोत अशा केवळ घोषणा केलेल्या दिसतात परंतु, त्यासाठी प्रत्यक्ष तरतूद केलेली दिसत नाही..

अध्यक्ष महाराज, अर्थसंकल्प सादर करत असताना हा अर्थसंकल्प ५८ कोटी रुपयांच्या अधिक्याचा असेल असे सागितले आहे. मागच्या कालखंडामधील ५८०० कोटी रुपयांची तूट आहे. याचा अर्थ जवळपास ६ हजार कोटी रुपयांची तूट धरुन ५८ कोटी रुपये दाखविले जात आहेत. मुळामध्ये हे कशाच्या आधारावर दाखविले जात आहेत याचे चित्र अर्थसंकल्पावरुन स्पष्ट होत नाही. जे राज्य मुळातच कर्जबाजारी आहे, ज्याचे दायित्व मोठे आहे अशा परिस्थितीत ५८०० कोटी रुपयांची तूट भरुन काढणार असे सांगितले जात आहे. परंतु, माझे असे म्हणणे आहे की, एवढया योजनांची घोषणा केली गेली, परंतु, त्यासाठी करण्यात आलेल्या तरतुदीचे प्रमाण शून्य आहे. त्यामुळे या योजनांसाठी तरतुदी केल्यानंतर त्यासंबंधातील भाष्य केले असते तर ते अधिक उचित झाले असते.

अध्यक्ष महाराज, राजकोषीय उत्तरदायित्वाबाबतचे जे विवरण दिलेले आहे. त्यामध्ये असे नमूद आहे की, दोन लाख हेक्टरंपेक्षा अधिक सिंचन क्षमता तयार केली जाणार आहे. परंतु, आपल्याच अहवालामध्ये असे नमूद आहे की, प्रति हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्यासाठी जो खर्च आहे तो हेक्टरी ७ लाखांहून अधिक आहे. आपण जी अपेक्षित सिंचन क्षमता धरलेली आहे. ती २ लाख हेक्टरपेक्षा अधिक आहे. एका हेक्टरसाठी जर ७ लाख रुपये इतका खर्च येत असेल तर २ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्यासाठी लागणारी जवळपास १५ हजार कोटी रुपये एवढी तरतूद तुमच्या अर्थसंकल्पामध्ये असायला पाहिजे. १५ हजार कोटी रुपये एवढी तरतूद जर असेल तरच तुम्ही २ लाख हेक्टर इतकी सिंचन क्षमता निर्माण करू शकता. पण ६७०० कोटी रुपये इतकी एकंदर सिंचनासाठीची तरतूद करण्यात आलेली आहे. या निधीतून २ लाख हेक्टर सिंचन क्षमता कशाप्रकारे निर्माण केली जाणार आहे हे सांगितले जावे. १५० प्रकल्प पूर्ण करून २ लाख हेक्टर पेक्षा अधिक जमीन सिंचना खाली आपण कशी काय आणणार आहात ? ७ लाख रुपये हेक्टरी खर्च आहे. १५ हजार कोटी रुपयेंची आपल्याला तरतूद करायची आहे. आपली तरतूद ६७०० कोटी रुपयेंची आहे. म्हणजे सिंचनासाठी आपण पूर्णपणे निधी देऊ शकणार नाहीत. आपण येथे जे काही दिलेले आहे ते अत्यंत फसवे आहे, दिशाभूल करणारे आहे. येथे फक्त कागदी घोडे नाचविण्याचे काम केलेले आहे.

**[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]**

अध्यक्ष महोदय, राज्याच्या शेतीच्या उत्पन्नामध्ये वाढ झाली पहिजे. सरकार म्हणते की, आमचा जीडीपी वाढतो आहे. राज्याच्या एकत्रित उत्पन्नामध्ये वाढ करीत असताना शेती उत्पन्नाचा फार मोठा भाग आहे. शेती उत्पन्नाचा हिस्सा वाढवायचा असेल तर सिंचनाची क्षमता वाढली पाहिजे. त्यामुळे सिंचनाचे असलेले प्रकल्प पूर्ण झाल्याशिवाय काहीही होणार नाही. तसेच शेती पर्यंत पाणी गेल्या शिवाय शेतीच्या उत्पन्नामध्ये वाढ होणार नाही. त्यामुळे आपण तारेवरची कसरत कशी करणार आहात ? त्याचे प्रतिबिंब या अर्थसंकल्पात दिसत नाही. १५० प्रकल्प पूर्ण करून २ लाख हेक्टर पेक्षा अधिक सिंचन क्षमता निर्माण करीत असताना ६० लाख अब्ज घन फूट पाणी साठा निर्माण करण्याचे नियोजन करण्याचे ठरविले आहे असे आपण म्हटले आहे. ६० लाख अब्ज घन फूट सिंचन क्षमता निर्माण करत असताना १५० प्रकल्पांची आजची स्थिती काय आहे ? आपल्या आर्थिक पाहणीत असे दिसून येते की, अनेक धरणांच्या क्षेत्रात बांधकामे पूर्ण झालेली आहेत. काही धरणांमध्ये पाणी साठा उपलब्ध आहे. आपण मागे म्हटले होते की, अमूक एवढे पाणी उपलब्ध करून देण्यात येईल. पण तेवढी सिंचन क्षमता आज निर्माण झालेली नाही. जेवढे पाणी अडवू असे सांगितले होते तेवढे ते मागच्या वर्षी अडवले गेले नाही. अनेक ठिकाणी पाणी साठा केला, पण ते पाणी वाहून नेण्यासाठी आवश्यक असलेल्या चाऱ्या, पोटचाऱ्या, कालवा यांची निर्मिती झाली नाही. धरणामध्ये नुसते पाणी अडून आहे. ते शेतीला जात नाही. त्यामुळे शेती उत्पन्नामध्ये जी अपेक्षित वाढ धरली आहे, ती यामध्ये अपेक्षितपणे झालेली नाही.

सन २००८-२००९ मध्ये १ लाख ५० हजार हेक्टर सिंचन योजना साध्य करण्यासाठी ६४२९ कोटी रुपये १८ लाख एवढी गुंतवणूक करण्यात आली. याचा अर्थ असा की, प्रत्यक्ष सिंचन क्षमता निर्माण करण्यासाठी ६४२९ कोटी भागिले १.५ लाख हेक्टर म्हणजे ४ लाख २८ हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्माण व्हायला पाहिजे होती. एवढी सिंचन क्षमता प्रत्यक्षात निर्माण झाली नाही असा आपला रिपोर्ट सांगतो आहे. अर्थसंकल्पा बरोबर राजकोषीय धोरणाचे विवरण सादर करण्यात आले होते. यातील पान क्र.१८ वर सिंचन क्षमतेच्या वाढीसाठी प्रति हेक्टर ७ लाख २ हजार एवढा खर्च झाल्याचे नमूद केले आहे. त्यानुसार आपण जो अंदाज बांधला आहे, तो अत्यंत फसवा आहे. पोलिसांसाठी सहा हजार घरे बांधण्याची आपली घोषणा फसवी आहे. प्रति चौरस मीटरला १७००० रुपये खर्च येतो, असे आपण म्हणत आहात. पोलिसांच्या निवासी इमारती बांधकामासाठी ११५ कोटी ३४ लाखाची तरतूद केली आहे व या निधीतून सुमारे ६००० पोलीस कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थान उपलब्ध करून देण्याची घोषणा वित्त मंत्र्यांच्या भाषणात आहे. हे फसव्या घोषणेचे उदाहरण आहे. प्रत्यक्षात स्क्वेअर मीटर अधिक सहा हजार याचा जर गुणाकार केला तर एवढे बांधकाम तेथे होऊच शकत नाही, अशी स्थिती आहे. फक्त सहा हजार घरे बांधणार आहोत असे आपण सांगितले आहे. १७ हजार रुपये प्रति स्क्वेअर मीटर खर्च येत असेल तर त्यामध्ये आपले गणित बसणार आहे काय, असे मला वित्त मंत्र्यांना विचारावयाचे आहे. या तरतुदीतून सहा हजार घरांचा इष्टांक पूर्ण होणार आहे काय ? त्यामुळे ही देखील आपली फसवी घोषणा आहे. अर्थसंकल्पाबरोबर सादर केलेल्या राजकोषीय विवरणपत्राच्या नुसार प्रति चौरस मीटरला १७ हजार खर्च येतो. याचा अर्थ ६७८४७ चौरस मीटरचे बांधकाम होईल. म्हणजे ११५.३४ कोटी रुपये भागिले १७ हजार एवढ्या बांधकामात ६ हजार घरे बसवायची आहेत.

[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]

म्हणजे एका घराचे आकारमान ६७८४७ चौरस मीटर भागिले सहा हजार म्हणजे ११.३ चौरस मीटर किंवा १२ पर्यंत मर्यादित राहणार आहे. माझे म्हणणे आहे की, त्यांना किमान एसआरए प्रमाणे २६४ चौरस फुटाचे घर मिळाले पाहिजे. हे त्यामधून होत नाही. एस.आर.ए. मधून ही योजना केली तर २७०० घरे होतील म्हणजे एकंदरीत ही योजना फसवी आहे.

अध्यक्ष महाराज, मेट्रो-रेल प्रकल्पाचा देखील भुलभलैय्या आहे. मागील वर्षी सांगितले होते की, यावर्षी मेट्रो रेल्वेच्या कामास सुरूवात होईल. मागील वर्षीच्या १५ ऑगस्टला स्काय बस सुरू होईल असे सांगण्यात आले होते. परंतु अद्यापपर्यंत त्या कामास सुरूवात झालेली नाही. प्रत्येक वर्षीच्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये पुढील वर्षी काम सुरू होईल असे सांगायचे, पण प्रत्यक्षात त्या कामाची कृती होत नाही असे चित्र आहे.

अध्यक्ष महाराज, बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या अधिकाराचा कायदा केला. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये व माननीय वित्त मंत्र्यांच्या भाषणामध्ये सदर कायद्याची अंमलबजावणी सुरू असल्याचे सांगून आमची दिशाभूल केली. प्रत्यक्षात या कायद्याची अंमलबजावणी सुरू झालेली नाही. राईट टू एज्युकेशनचा कायदा आपण पुढील वर्षी सुरू करणार आहात. त्या संदर्भातील नियम अद्यापपावेतो तयार करण्यात आलेले नाहीत. मग आपण हे कोणत्या आधारावर सांगत आहात ?

अध्यक्ष महाराज, माननीय वित्त मंत्र्यांनी ४० हजार कोटी रुपयांचे कर उत्पन्न आहे असे सांगितले. हे ४० हजार कोटी रुपयांचे उत्पन्न सरकारच्या परिश्रमाने आलेले नाहीत. सरकारने त्यासाठी फार काही कष्ट केले अशीही स्थिती नाही. मागील वर्ष हे महागाईचे वर्ष होते. या वाढत्या महागाईमुळे आपोआप सरकारच्या तिजोरीत कर जमा झाला. दहा रुपयाला मिळणारी वस्तू वीस रुपयाला मिळत होती. दहा रुपयांवर दोन रुपये कर मिळत होता तो चार रुपयांवर गेला. याठिकाणी सरकार ४० हजार कोटी रुपये टॅक्स जमा झाला असे सांगत आहे. परंतु सरकारने मागील तीन वर्षे रिफंड दिलेला नाही. या ४० हजार कोटी रुपयांपैकी ६ हजार कोटी रुपये रिफंड द्यावयाचा आहे. व्यापाऱ्यांनी रिफंड मिळण्यासाठी सरकारकडे वारंवार विनंती केली. परंतु सरकारने त्यांचे ६ हजार कोटी रुपये परत केले नाहीत. आम्हाला नियमाने मिळणारा परतावा मिळाला पाहिजे यासाठी मुंबई उच्च न्यायालयात दावा दाखल करण्यात आला. म्हणजे ४० हजार कोटी रुपयांपैकी ६ हजार कोटी रुपयांचे देणे आहे. पुढील वर्षी महागाई राहीलच याची आपण खात्री देऊ शकत नाही. ही महागाई राहणारच आहे, कारण या महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने कोणत्याही प्रकारची तरतूद केलेली नाही.

अध्यक्ष महाराज, विक्री कराचा आढावा घेत असताना असे दिसते की, विक्री कराचा महसूल कमी झालेला आहे. मागील वर्षी विक्रीकराची अपेक्षित आकडेवारी काढली त्यापैकी सरकारला १ हजार कोटी रुपये कमी मिळालेले आहेत. विक्री कराच्या संदर्भातील आपला पैसा वसूल करता येत नाही आणि आपल्याकडे जो निधी आहे तो परत द्यायचा आहे. तेव्हा सरकारकडे ४० हजार कोटी रुपये नाहीच आणि सरकारने पुढील वर्षी विक्री कराचे अपेक्षित उत्पन्न धरले आहे ते परत येण्याची दुरान्वयाने देखील शक्यता नाही.

[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]

अध्यक्ष महाराज, विक्री कर आयुक्तांनी दिनांक २ फेब्रुवारी २०११ च्या परिपत्रकाप्रमाणे ३५ हजार १७० कोटी रुपये निर्धारणेद्वारे मागणी केली होती. म्हणजे ३५ हजार १७० कोटी रुपये व्यापाऱ्यांकडून येणे आहे. त्यापैकी ३४ हजार ३२५ कोटी ९७ लाख अजून विविध स्तरावर प्रलंबित आहेत. म्हणजे विविध स्तरावर जी प्रलंबित अपिले आहेत त्या माध्यमातून व्यापाऱ्यांकडून ३५ हजार कोटी रुपये येणे आहे. आपण काही ठिकाणी निर्धारणा केली, परंतु काही ठिकाणी निर्धारणा बाकी आहे म्हणून महसूल जमा होत नाही.

अध्यक्ष महाराज, सन २००५ मध्ये व्हॅट कायदा लागू होऊन सहा वर्षे झाली. परंतु सरकार अजून त्यावर कार्यवाही करीत नाही. सन २००५ मध्ये व्हॅट कायदा लागू झाला. परंतु त्या अगोदर सेल्स टॅक्सचा कायदा होता. त्या कायद्याच्या अनुषंगाने जी निर्धारणा करावयाची आहे ती अजूनपर्यंत पूर्ण केलेली नाही. तेव्हा याठिकाणी जी आकडेवारी दिलेली आहे ती फसवी आहे. विक्रीकर विभागात वसुलीकरिता २०-२५ आयुक्त दर्जाचे अधिकारी कार्यरत असून सद्धा अपिलाची कार्यवाही होत नाही म्हणून आपले येणे प्रलंबित आहे.

अध्यक्ष महोदय, प्रलंबित अपिलांमुळे विशेषत: मोटारीच्या संदर्भात स्पिरीट ॲक्ट अंतर्गत ऑईल कंपन्या किंवा इतर कंपन्यांकडे ८०-९० प्रकरणांत ५ हजार कोटी रुपयांचा महसूल अडकून पडला आहे. विभागाच्या हलगर्जीपणामुळे ही रक्कम अडकून पडली आहे. परंतु हा आकडा राज्य सरकार जमेला धरत असेल तर ते योग्य नाही. कारण तो पैसा प्रत्यक्षात सरकारच्या तिजोरीत आलेला नाही. त्यामुळे अशा प्रकारची आकडेवारी ग्राह्य धरणे योग्य नाही. शासनाच्या तिजोरीत पैसा आल्यानंतरच, शासनाने त्या संदर्भातील नियोजन करणे आवश्यक आहे.

महोदय, अर्थसंकल्पामध्ये ई-गव्हर्नन्ससाठी राज्य सरकारने २ टक्के निधी राखून ठेवल्याचे नमूद केले आहे. सरकारने गेल्या वर्षी सद्धा अर्थसंकल्पात ई-गव्हर्नन्स लागू करणार असल्याचे नमूद केले होते. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, ई-गव्हर्नन्ससाठी २ टक्के निधी राखून ठेवला असताना, किती विभागात ई-गव्हर्नन्स पद्धत सुरू झाली, कोणत्या विभागात ही पद्धत कार्यरत झाली ? महोदय, ई-गव्हर्नन्सच्या माध्यमामून ई-टेंडरींगचे सूतोवाच करण्यात आले. आज राज्यात किती ठिकाणी ई-टेंडरींग होते ? आपण किती रकमेच्या वर ई-टेंडरींग करणार आहात ? महोदय, ई-टेंडरींग न केल्यामुळे आजपर्यंत परिपूर्ण व्यवहार झाले नाहीत. मी तर म्हणेन की, हे सरकार भ्रष्टाचाराला वाव देण्याचे काम करीत आहे.

आजच या सभागृहात निकृष्ट साडी पुरवठ्या संदर्भात लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून चर्चा झाली. २०० रुपयांची साडी निकृष्ट निघत असेल तर कसे होणार ? मला वाटते या खरेदी प्रक्रियेत ५, १०, २०, ५० टक्के रक्कम भ्रष्टाचाराच्या माध्यमातून जात असेल तर खरेदी करण्यात आलेल्या वस्तू नीट कशा निघतील ? माझी मागणी आहे की, राज्यात २५-५० लाखांच्या वरील टेंडरची प्रक्रिया ई-टेंडरींगच्या माध्यमातून झाली पाहिजे. माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांना मी विचारु इच्छितो की, खालच्या पातळीवर ई-टेंडरींग करू असे आपण सांगत आहात. माझ्या जळगाव जिल्ह्यात मिटरचे बिलिंग करताना अधिकारी सांगतात की, या संदर्भात आम्हाला ई-टेंडरींग करावयाचे आहे. महोदय, या सरकारकडून ज्या ठिकाणी मजुरांचा संबंध येतो त्या ठिकाणी ई-टेंडरींग केले

[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]

जाते. परंतु ट्रान्सफॉमर्स खरेदी किंवा मोठमोठ्या साहित्यांची खरेदी केली जात असताना, ई-टेंडरींगचा वापर का केला जात नाही ? ई-टेंडरींग ही योग्य पद्धत असताना, या पद्धतीचा पाहिजे त्या ठिकाणी वापर न करता, इतर ठिकाणी वापर करून, आपण का छळत आहात ? करोडो रुपयांच्या किंवा मोठ्या रकमेंच्या बाबतीत ई-टेंडरींग का केले जात नाही ? २ टक्के रक्कम ई-टेंडरींगसाठी ठेवली जात असेल तर एवढी वर्षे ई-टेंडरींगची पद्धत सुरू का केली नाही ?

महोदय, १०० रुपयांच्या गुंतवणुकीवर फक्त १३ पैसे परतावा राज्य सरकारला मिळतो. ९२४६ कोटी रुपये कराची रक्कम असताना त्या रकमेची वसुली शक्य झाली नाही. राज्याच्या तिजोरीवर १७३१९ कोटी रुपयांच्या हमीचा भार आहे. महामंडळांना वेगवेगळी कर्जे देत असताना त्यांच्यावर १७३१९ कोटी रुपयांचा हमी भार आहे. परंतु त्या हमीची रक्कम शासनाला मिळाली नाही. कर्जे घेत असताना महामंडळांना किंवा शासनाच्या उपक्रमांना राज्य सरकारच्या माध्यमातून २ टक्के हमीची रक्कम मिळावयास हवी असते, परंतु ती सद्धा मिळाली नाही. ही रक्कम त्यांच्याकडून मिळावी म्हणून राज्य सरकार, त्यांना आता कर्ज देत आहे. एखाद्या महामंडळाला १० हजार कोटी रुपयांचे कर्ज शासनाच्या हमीवर घ्यावयाचे असेल तर त्या महामंडळाकडून २ टक्के हमी फी घ्यावयास पाहिजे. हमी रकमेच्या वसुलीसाठी राज्य सरकार त्या महामंडळांना कर्ज देत आहे. हे कितपत योग्य आहे ? राज्य सरकारकडून कर्ज घेऊन हमी फी भरावी असे शासनाकडून सांगितले जात आहे. महोदय, जी महामंडळे दिवाळखोरीमध्ये गेलेली आहेत ती महामंडळे २ टक्के हमीची रक्कम कशी भरु शकणार ? कदाचित त्यामुळे या महामंडळांना हमीची रक्कम भरण्यासाठी शासन कर्ज देत असावे. या महामंडळांना देण्यात आलेल्या कर्जाची रक्कम कमी नाही. ५० हजार कोटी रुपयांच्या वर वेगवेगळ्या हमीच्या माध्यमातून सरकारने कर्ज दिलेले आहे. त्यांना वर्षानुवर्षे दिलेले कर्ज फेडले जात नाही. सूत गिरण्या, साखर कारखाने, रस्ते विकास महामंडळ किंवा इतर ज्या ज्या महामंडळांना शासनाने हमीवर जे कर्ज उपलब्ध करून दिले आहे, त्या कर्जाची हमी फी शासनाला मिळालेली नाही. त्याचे हप्ते किंवा हमीची रक्कम शासनाला मिळत नाही. अलीकडच्या कालखंडात साखर कारखान्याला भाग भांडवल आणि कर्ज दिले आहे. ते कर्जही बुडाले आहे. सूत गिरण्या किंवा कारखाने लिक्विडेशन मध्ये निघाले आहेत. त्यामुळे महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने, जिल्हा बँकेने ते कारखाने किंवा सूत गिरण्या लिलावात काढल्यामुळे शासनाचे भाग भांडवलाचे पैसे बुडाले आहेत. करोडो रुपयांची हानी आज या ठिकाणी होत आहे. आपण कशारितीने प्रतिबंध घालणार आहात, कशापद्धतीने वित्तीय शिस्त आणणार आहात, आपण या संदर्भात काय धोरणात्मक निर्णय घेणार आहात, याबाबत कोणताही उल्लेख अर्थसंकल्पात मला दिसत नाही. विविध ठिकाणी रस्ते विकास महामंडळाने खुल्या बाजारातून उभारलेल्या निधीसाठी राज्य शासनाने दिलेल्या हमीवरील हमी फी, त्यावरील व्याज आणि दंडात्मक व्याज यासाठी ३१४ कोटी ५६ लाख रुपये एवढ्या अंशदानापैकी १६७ कोटी ६७ लाख ८८ हजार कोटी रुपयांची मागणी तुम्ही केली आहे. सन २००७ च्या सदर महामंडळाच्या अहवालातील खालील परिच्छेदावरुन असे लक्षात येते की, हमी फीवरील व्याज भरण्यासाठी सद्धा त्यांनी शासनालाच गृहीत धरले आहे. अध्यक्ष महोदय, अशा स्वरुपाची वित्तीय अनियमितता, बेशिस्तपणा असेल तर या राज्याच्या विकासाचा कार्यक्रम जो तुम्ही घेतला आहे, तो पूर्ण करणे शक्य होणार नाही. आपण याही

[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]

वर्षी अर्थसंकल्पीय तत्वाच्या विरोधामध्ये ४९८६ कोटी रुपयांची ठोक तरतूद केली आहे. गेली ३-४ दिवस सभागृहात हाच विषय आम्ही मांडत आहोत की, गेल्या ६० वर्षांपैकी ५७ वर्षांचे बजेट आपण अनुभवले तर आपल्याला दिसेल की, अशा स्वरुपाच्या ठोक तरतुदी ५७ वर्षात कधी झालेल्या नाहीत. परंतु, अलिकडच्या कालखंडात बजेटपेक्षा वेगळे पैसे काढून ठेवायचे आणि मग ते पैसे आपल्या मनमर्जीप्रमाणे वाटायचे, हे उद्योग राज्यात सुरू झाले आहेत.

अध्यक्ष महोदय, मागील वर्षी सन २००९-१० मध्ये ३० हजार कोटी रुपयांची ठोक तरतूद केली. ३० हजार कोटी रुपये एका बाजूने घेत असताना हा पैसा निव्वल आपल्या पक्षाच्या आमदारांना, आपल्या बाजूच्या आमदारांना वाटण्याचे काम तुम्ही या ठिकाणी करीत आहात. बजेटवर या सभागृहातील प्रत्येक सन्माननीय सदस्यांचा अधिकार आहे. आपण अशा स्वरुपाच्या तरतुदी करून विरोधी पक्षाच्या आमदारांवर अन्याय करण्याचे काम या माध्यमातून करीत आहात. मला माननीय अर्थमंत्र्यांना विचारावयाचे आहे की, कोणत्या वित्तीय शिस्तीत हे बसत आहे. ३० हजार कोटी रुपयांची ठोक तरतूद करायची हे कसे काय ? ५ हजार कोटी रुपयांची ठोक तरतूद करीत आहात, हे कोणत्या नियमात बसत आहे ? ठोक तरतुदी मागील दरवाज्याने वापरुन घ्यायच्या आणि पुरवणी मागण्यांमध्ये आम्ही खर्च केला, असे निदर्शनास आणायचे हे योग्य नाही. राज्याचा समतोल वाढवित आहात असे समजून या ठिकाणी एका बाजूला अतिरिक्त पैसा द्यायचा आणि दुसऱ्या बाजूला कमी पैसा मिळवायचा हे ठीक नाही. आपण त्या भागांचा मागासलेला अधिक वाढविण्याचे पाप करीत आहात. आपण अशा ठिकाणी समन्यायी तत्वावर वाटप करण्याचे धोरण स्वीकारले पाहिजे. अशारितीने ३० हजार कोटी रुपये सत्ताधारी पक्षातील आमदारांच्या मतदारसंघात जात असतील आणि दुसऱ्या बाजूला ३० हजार कोटी रुपयांचा बॅकलॉग वाढत असेल तर ते योग्य नाही. अध्यक्ष महोदय, या संदर्भात माननीय राज्यपालांचे निदेश आहेत. देशाची घटना देखील या संदर्भात सांगत आहे.

अध्यक्ष महोदय, तुम्ही घटनेची शपथ घेतली आहे. तुम्ही शपथ घेताना म्हटले आहे की, आम्ही कोणावरही अन्याय होऊ देणार नाही. समानतेची आणि ममतेची भावना आम्ही ठेवू. परंतु, आपण त्याला हरताळ फासण्याचे काम करीत आहात. माझे म्हणणे आहे की, तुम्ही ५ हजार कोटी रुपयांची ठोक तरतूद ठेवली आहे, ती तुमच्या हातामध्ये न वापरता बजेटरी प्रोव्हिजमध्ये आली पाहिजे. आम्हाला या सभागृहात समजले पाहिजे की, हा पैसा कोणत्या कामाकरिता खर्च झाला.

अध्यक्ष महोदय, सभागृहाच्या संमतीशिवाय एक नवा पैसा खर्च होऊ शकत नाही. ३० हजार कोटी रुपये, ५ हजार कोटी रुपये ठेवायचे आणि नंतर आम्हाला सांगयचे की, ५ हजार कोटी रुपये खर्च करण्यात आले, मागणी मंजूर करा आणि आम्ही वेडेपणाने मंजूर करायचे, हे उद्योग बरोबर नाहीत. आपल्या माध्यमातून जे चालले आहे, ती वित्तीय अनियमितता आहे. मला माहीत आहे की, राज्य सरकार दिवाळखोरीमध्ये गेले आहे. राज्य सकरारकडे पैसा नाही. २ लाख ३१ हजार कोटी रुपयांचे कर्ज तुमच्यावर आहे. आता ते आणखी वाढलेले आहे. अध्यक्ष महोदय, तुम्ही आज फक्त दिवाळखोरीमध्ये आहात असे नाही तर तुमची कर्ज काढण्याची मर्यादा संपलेली आहे. तुम्ही राज्याच्या उत्पन्नाच्या २६ टक्के कर्ज काढू शकता. तुमची २६ टक्के कर्ज काढण्याची मर्यादा संपली आहे. भारतातील राज्यांचा निवडक सामाजिक व आर्थिक निर्देश माझ्या हातामध्ये आहेत. राज्य शासनाचे थकीत दायित्व म्हणजे

[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]

राज्यांतर्गत स्थूल उत्पनाची टक्केवारी दिलेली आहे. त्यामध्ये महाराष्ट्राच्या संदर्भात असे दिलेले आहे की, राज्याचा दरडोई महसूल ८०६१ रुपये आहे, महसुली जमेतील राज्याच्या स्वत:च्या कर वसुलीचा हिस्सा ५७.२ टक्के आहे, केंद्रीय दरडोई उत्पन्नाचा हिस्सा ७७५ रुपये आहे. केंद्राकडून प्राप्त दरडोई उत्पन्न १४१३ हजार कोटी रुपये आहे. यामध्ये शेवटी टक्केवारी दिलेली आहे. त्यानुसार कर्ज मर्यादेची टक्केवारी २६ टक्के एवढी आहे. राज्याच्या आर्थिक पहाणी अहवालामध्ये दिलेली ही आकडेवारी आहे. यावरुन असे दिसते की, या राज्याची कर्ज काढण्याची मर्यादा आता संपलेली आहे. म्हणजे एवढया कर्जाच्या ओझ्याखाली हे सरकार दबलेले आहे. आता सरकारला नवीन कर्ज उभे करता येणार नाही. कर्ज काढण्याची २६ टक्के कर्ज मर्यादा आता संपलेली आहे. हे राज्य कर्ज बाजारी झाले आहे. सरकारने हे राज्य गहाण ठेवलेले आहे. २६ टक्क्यांची मर्यादा ओलांडल्यानंतर एका नव्या पैशाचेही कर्ज आता सरकारला उभे करता येणार नाही. एका बाजूला राज्याच्या उत्पन्नामध्ये वाढ होत आहे, असे सांगितले जाते आणि उत्पन्न वाढत असतांना २६ टक्क्यांच्या कर्ज मर्यादेच्या वर हे राज्य जाणार आहे. अध्यक्ष महोदय, या राज्याने कर्ज मर्यादा ओलांडली असल्यामुळे आता सरकारला ओव्हरड्राफ्ट काढावा लागणार आहे. यापूर्वी या सरकारने ओव्हरड्राफ्ट काढलेला नाही, असे नाही. या सरकारने हे राज्य दिवाळखोरीमध्ये नेले आहे. हे जे राज्य चालले आहे, ते दिवाळखोरीमध्ये आहे. या सरकारने १ हजार कोटी रुपयांचा ओव्हरड्राफ्ट काढलेला आहे. या सरकारने दिवाळखोरीचे लक्षणच आमच्या पुढे ठेवलेले आहे. अर्थसंकल्पाच्या विविध पुस्तकांमध्ये घ्महाराष्ट्र राज्याचे मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण-राजकोषीय धोरणाच्या व्युहरचनेचे विवरणपत्र आणि प्रकटीकरणे-सन २०११-१२" हे पुस्तकही शासनाने आम्हाला दिलेले आहे त्यामध्ये "अर्थोपाय रकमाङ या शीर्षाखाली भारतीय रिझर्व्ह बॅंकेकडून घेतलेले अधिकर्ष म्हणून जी माहिती दिलेली आहे त्यानुसार सन २०१०-११ मध्ये १ हजार कोटी रुपयांचा ओव्हरड्राफ्ट या शासनाने घेतलेला आहे.

अध्यक्ष महोदय, या सरकारला वारंवार कर्ज काढावे लागत आहे. वारंवार ओव्हरड्राफ्ट घ्यावा लागत आहे. आमच्या कालखंडामध्ये फक्त एका दिवसासाठी आम्ही ओव्हरड्राफ्ट काढला होता. तेव्हा माननीय श्री. आर. आर. पाटीलसाहेब असे म्हणाले होते की, "या सरकारचे दिवाळे निघाले आहे. सरकारच्या तिजोरीत उंदीर फिरत आहेत." आता त्यांना काय म्हणावयाचे आहे ? अध्यक्ष महोदय, आम्ही ओव्हरड्राफ्ट काढला नव्हता. त्या कालखंडामध्ये आमच्या उत्पन्नाची टक्केवारी जीडी संदर्भात आम्ही राज्य उत्पन्नाच्या टक्केवारीशी जोडत नव्हतो तर रेव्हेन्यूच्या टक्केवारीशी जोडत होतो. आमच्या उत्पन्नाची कर्जाशी टक्केवारी फक्त ११.३ टक्के एवढी होती. कर्जाच्या बाबतीत २६ टक्क्यांची मर्यादा आहे. त्या कालखंडात आमची कर्जाची टक्केवारी ११ टक्के होती. तरी आम्हाला असे म्हटले जात होते की, च्हे सरकार दिवाळखोर आहे.छ आज तुम्ही काय करीत आहात ? हजारो कोटी रुपयांचा ओव्हरड्राफ्ट काढत आहात. हे राज्य गहाण ठेवले आहे. दररोज कर्ज काढून तुमचा संसार चालू आहे. पगार देण्यासाठी शासनाकडे पैसे नाहीत व त्यामुळे शासन नोकर भरती करू शकत नाही. ५० टक्के पदे रिक्त आहेत. कारण पगार देण्यासाठी सरकारकडे पैसे नाहीत. या सरकारने गेल्या १० वर्षामध्ये हे राज्य दिवाळखोरीकडे नेलेले आहे. भ्रष्टाचारामुळे राज्यामध्ये रेव्हेन्यू लिकेजेस आहेत. वरिष्ठ पातळीवर भ्रष्टाचार चालू आहे. हजारो कोटी रुपयांचे गैरव्यवहार चालू आहेत व त्यामुळे राज्याचे दिवाळे निघालेले आहे.

**[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]**

अध्यक्ष महोदय, १ हजार कोटी रुपयांचा ओव्हर ड्राफ्ट का काढला ? याबाबतचे उत्तर शासनाने दिले पाहिजे. वारंवार ओव्हरड्राफ्ट काढावयाचा, वारंवार अग्रिम घ्यायचा आणि सरकार चालवायचे. परंतु, आज सरकार चालविण्यासाठी २६ टक्के कर्ज मर्यादा देखील संपलेली आहे. उद्याच्या कालखंडामध्ये सरकारला एक रुपयाही कर्ज मिळणार नाही. उद्याच्या कालखंडामध्ये या सरकारला पगार देण्यासाठी पैसे मिळणार नाहीत. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे पगार तुम्ही देऊ शकणार नाही, अशी सरकारची स्थिती आहे. राज्य विकासाच्या दृष्टीने पुढे चालले आहे, असे म्हणावयाचे आणि या सरकारने २६ टक्क्यांची कर्ज मर्यादा ओलांडलेली आहे. या राज्यामध्ये हजारो कोटी रुपयांचा ओव्हरड्राफ्ट काढला जात आहे. राज्याच्या तिजोरीमध्ये ऊंदीर फिरत आहेत. माननीय श्री.आर.आर.पाटील साहेबांचेच हे शब्द आहेत. आता शासनाची अशी परिस्थिती आहे की, उंदीरच नाही तर घुशी फिरत आहेत. या दिवाळखोरीचे उत्तर सरकारने दिले पाहिजे. या सरकारने ओव्हरड्राफ्ट का काढला ? वारंवार ओव्हरड्राफ्ट काढला जाणे, हे राज्याच्या विकासाचे लक्षण नाही. राज्य आज अधोगतीकडे जात आहे. हे राज्य दिवाळखोरीमध्ये नेण्याचे पाप या सरकारने केले आहे.

अध्यक्ष महोदय महाराष्ट्राचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. या राज्याला ५० वर्षे झाली आहेत. ५० व्या वर्षी या सरकारचे काय कर्तृत्व आहे ? राज्य दिवाळखोरीकडे नेणे, हजारो कोटी रुपयांचा ओव्हरड्राफ्ट काढणे, २६ टक्क्यांची कर्ज मर्यादा ओलांडणे, हे या सरकारचे कर्तृत्व आहे.

अध्यक्ष महोदय, शेवटी ट्रान्स्परन्सीबाबत मी बोलणार आहे. माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण राज्यात मुख्यमंत्रीपदी आल्यानंतर आम्ही त्यांचे स्वागत केले आणि आजही करतो. त्यांनी या राज्याला असे सांगितले की, "राज्य कारभारामध्ये ट्रान्स्परन्सी आणू." राज्यामध्ये ट्रान्स्परंट व्यवहार झाले पाहिजेत, हा त्यांचा आग्रह त्यांनी त्या दिवशी बोलून दाखविला होता. पण आज राज्यात किती ट्रान्स्परन्सी आहे, याची आपल्याला माहिती आहे का ? बजेट Transparency किती आहे. Transparency in State Budget in India. अशा स्वरुपाचा एक सर्व्हे करण्यात आलेला आहे. हा सर्व्हे स्वयंसेवी संघटनांनी केलेला आहे. Transparency in State Budget of maharashtra. ओव्हर ऑल स्कोअरच्या संदर्भातील त्यांनी माहिती दिलेला आहे. यामध्ये उत्तर प्रदेशात ४४ टक्के Transparency आहे. राजस्थान राज्यात ४४ टक्के, ओरिसा राज्यात ५२ टक्के Transparency आहे. महाराष्ट्र राज्यात ४८ टक्के Transparency आहे. मध्यप्रदेशमध्ये ६० टक्के Transparency आहे. झारखंड राज्यात ४८ टक्के Transparency आहे. स्कोअर इन बजेट Transparency in selected States. यामध्ये महाराष्ट्र राज्याचा सातवा क्रमांक येत आहे. पहिल्या क्रमांकावर गुजरात राज्य, दुसऱ्या क्रमांकावर मध्यप्रदेश, तिसऱ्या क्रमांकावर छत्तीसगड, पाचव्या क्रमांकावर कर्नाटक राज्य आहे. महाराष्ट्र राज्य मात्र सातव्या क्रमांकावर आहे. भष्ट्राचाराच्या संदर्भात आघाडी सरकारने शेवटचे टोक गाठले आहे. बजेट Transparency बाबत पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या व पाचव्या क्रमांकावर भारतीय जनता पक्षाची सरकारे आहेत. महाराष्ट्र सरकार फक्त Transparency बाबत बोलत आहे. "अडथळा" छक्का तो सामने है, पढ़कर दिखाऊ क्या ? आपण आत्मचिंतन करा, नंतर याबाबत बोलावे. पन्नासाव्या वर्षात आघाडी सरकार सातव्या क्रमांकावर जात आहे, याबाबत आपणास काही वाटले पाहिजे, त्या संदर्भातील विचार करण्याची आवश्यकता आहे. खाओ, खाओ. महाराष्ट्र को खाओ, महाराष्ट्र को डूबाओ.

**[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]**

अध्यक्ष महोदय, आम्हाला माहिती आहे, सन्माननीय सदस्य श्री. कृपाशंकर यांच्याकडे चार कोटी रुपये कोठून आले आहेत, त्या प्रकरणाचा तपास चालू आहे. आपणाला माहिती आहे की, बलवाशी कोणाचे संबंध आहेत. हसन अली हा कोणाचा मित्र आहे "अडथळा".

**श्री. बाबा सिद्दिकी :** अध्यक्ष महोदय.....

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) :** सम्माननीय सदस्य श्री बाबा सिद्दिकी जी, हसन अली का नाम लिया तो आप इतने जागृत हो गए, यह बराबर नहीं है. आप मेरे दोस्त हो, हसन अली.....उसमें क्या है ? इसमें पैसे का संबंध है यार.... श्री कृपाशंकर जी का नाम लिया तो आपने उठना नहीं चाहिए था, तालियाँ बजानी चाहिए थी. मुझे मालूम है कि वे मेरे दोस्त है और आपके भी दोस्त है. लेकिन वे आपके कितने करीबी है ? वह मुझे मालूम है.

अध्यक्ष महोदय, Transparency संदर्भात महाराष्ट्र राज्य सातव्या क्रमांकावर आहे. सुरूवातीच्या काळात महाराष्ट्र राज्य प्रगतीच्या व Transparency च्या दृष्टीने वरच्या क्रमाकांवर होते. या राज्याने अनेक मुख्यमंत्री मागील कालखंडात पाहिले आहेत. त्यांच्या कालखंडात राज्याच्या प्रतिष्ठेला धक्का लागावा असे काम कधीच झाले नाही. मुख्यमंत्री कोणत्याही पक्षाचे असोत, कॉंग्रेस व राष्ट्रवादीचे असतील, त्यांच्याही विषयी माझ्या मनात आदर आहे. अगदी मंत्री महोदय श्री. नारायण राणे साहेबांपर्यंत असतील पण राज्याला प्रतिष्ठेला धक्का लागेल असे कोणतेही वर्तन झाले नाही. दहा वर्षातील राज्याच्या बजेटची चिरफाड केली तर सुवर्ण महोत्सवी वर्षात महाराष्ट्र राज्याची प्रगती कशात झाली आहे तर गैरव्यवहार, भ्रष्ट्राचार व माफिया राज यामध्ये.

अध्यक्ष महोदय, या राज्यात जे मंजूर प्रकल्प आहेत त्या प्रकल्पापैकी कार्यान्वित होण्याचे प्रमाण फक्त ४१ टक्के इतके आहे. मागच्या बजेटमध्ये जी आश्वासने दिली त्या पैकी किमान ५० टक्केच्या वर कामे व्हावयास पाहिजेत. बजेटमध्ये जी कामे घेण्यात येतात, ती १०० टक्के पूर्ण होतील अशी माझी मुळीच अपेक्षा नाही. परंतु ६० ते ७० टक्के प्रकल्प पूर्ण झाली पाहिजेत. मंजूर प्रकल्प कार्यान्वित होण्याचे प्रमाण फक्त ४१ टक्के इतके आहे. मंजूर प्रकल्पाच्या संदर्भात अनेक वेळा सांगण्यात येते की, एमओयू करण्यात आला आहे. या राज्यात आजपर्यंत किती एमओयू केले आहेत. यासंदर्भातील माहिती महिन्याभरात मिळणे अपेक्षित आहे. त्यापैकी किती एमओयू प्रत्यक्षात कार्यान्वित झाले आहेत. भांडवली गुंतवणूक या राज्यात किती आली आहे. अनेकदा एमओयू करीत असताना संबंधितांचा सत्कार करण्यात येतो, वर्तमानपत्रामध्ये बातम्या देण्यात येतात, त्यांच्यासोबत आपले फोटो छापण्यात येतात. परंतु एमओयूच्या संदर्भातील आश्चर्यकारण माहिती माझ्याकडे आहे. आजपर्यंत जेवढे एमओयू झाले त्यापैकी ९३ टक्के एमओयू हे कार्यान्वित झाले नाहीत. मग असे एमओयू कशासाठी करावयाचे ? इतकी-इतकी गुंतवणूक येणार आहे. ती येण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. त्यासाठी सवलती दिल्या पाहिजेत. परंतु एमओयू करून प्रत्यक्षात गुंतवणूक येत नाही. भांडवली गुंतवणूक आपल्या राज्यात का येत नाही, या बाबत सरकारने चिंतन करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र राज्यात विद्युत मंडळाचे खाजगीकरण करीत असताना अनेक एमओयू झाले आहेत. त्यासंदर्भातील माहिती या चर्चेच्या उत्तरात दिली पाहिजे.

[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]

अध्यक्ष महोदय, एसईझेडचा कायदा झाल्यानंतर शासनाने अनेक एसईझेड जाहीर केले. शासनाने एसईझेडच्या जागा आयडेंटीफाय करून उद्योजकांच्या ताब्यात दिलेल्या आहेत. शासनाने किती एसईझेडला मान्यता दिली, त्यापैकी किती एसईझेड कार्यान्वित झाले, त्यातून किती रोजगार निर्मिती झाली, त्यातून किती भांडवली गुंतवणूक झाली आणि राज्याच्या उत्पन्नात किती भर पडली याबाबतची माहिती माननीय अर्थमंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये द्यावी. माझ्या माहिती प्रमाणे एसईझेडसाठी शेतकऱ्यांच्या हजारो एकर जमिनी संपादित करण्यात आलेल्या आहेत. एका बाजूला शेतीचे उत्पन्न बुडाले आणि दुसऱ्या बाजूला उद्योग देखील सुरू झाला नाही. उद्योग सुरू झाला नसेल तर ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केलेल्या आहेत त्या त्यांना परत कराव्या. ज्या प्रयोजनासाठी जमिनी घेतलेल्या आहेत त्या प्रयोजनासाठी जर त्या जमिनी वापरल्या जात नसतील तर ते बरोबर नाही. शेतकऱ्यांनी वर्षानुवर्षे मेहनत करायची आणि शेवटी भूमिहीन व्हायचे काय ? यासंदर्भात माननीय अर्थमंत्री त्यांच्या उत्तराच्या भाषणामध्ये खुलासा करतील, अशी माझी अपेक्षा आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रातील मंजूर प्रकल्पांची गुंतवणूक ६,९५,५१६ कोटी रुपये आहे. आपल्या राज्यात गुंतवणूक का कमी होत आहे यासंदर्भात राज्य शासनाला चिंतन करण्याची गरज आहे. गुजरात राज्यामध्ये ८,५९,७८७ कोटी रुपये गुंतवणूक झालेली आहे. गुजरात छोटे राज्य आहे. महाराष्ट्र मोठे राज्य आहे. महाराष्ट्रामध्ये मुंबई, पुणे, नवी मुंबई, ठाणे अशी मोठी शहरे आहेत. असे असतांना सद्धा महाराष्ट्र राज्यात गुंतवणूक का कमी होत आहे यासंदर्भात राज्य शासनाने चिंतन केले पाहिजे. गुजरात राज्य आपल्या राज्यापेक्षा पुढे जात असेल तर गुजरात राज्यामध्ये असे आहे, तसे आहे असे म्हणून चालणार नाही. प्रगतीच्या दृष्टीने आपण गुजरात राज्याशी स्पर्धा केली पाहिजे. आपल्या राज्यातील १६,२४० मंजूर प्रकल्पांपैकी फक्त ६,६५७ प्रकल्प कार्यान्वित झालेले आहेत. यासंदर्भात सद्धा माननीय अर्थमंत्र्यांनी त्यांच्या उत्तरामध्ये खुलासा केला पाहिजे. ही आर्थिक पाहणीतील आकडेवारी आहे. राज्यात ६ लाख ९५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असतांना केवळ १,५२,७१६ कोटी रुपयांचीच गुंतवणूक झालेली आहे. म्हणजे उद्योजक आपल्या राज्यात गुंतवणूक करण्यास तयार नाहीत.

अध्यक्ष महोदय, राज्यात मागील वर्षी ३०,२४,७२८ इतकी रोजगार निर्मिती अपेक्षित होती. परंतु प्रत्यक्षात ८,४५,७२३ लोकांनाच रोजगार मिळालेला आहे. औद्योगिक घटकांमध्ये फक्त ५.२ टक्के वाढ झालेली आहे. बृहन्मुंबई विभागात गुंतवणुकीचे प्रमाण ७.७ टक्के आहे. परंतु रोजगारामध्ये मात्र वाढ होण्याऐवजी ११.१ टक्क्याने घट झालेली आहे. मुंबईमध्ये गुंतवणूक वाढलेली आहे. परंतु रोजगारामध्ये मात्र घट झालेली आहे. सर्व्हिस सेक्टरच्या माध्यामातून रोजगार मिळेल असे वाटले होते. परंतु ११.१ टक्क्याने रोजगार कमी झालेला आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्राचे एकत्रित उत्पन्न बघितले तर मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि पुणे या ४ शहरांमधील महसूल ४३ टक्के आहे. नाशिक शहर सोडले तर उर्वरित महाराष्ट्रातील जो महसूल आहे तो ४० टक्के आहे. ४३ टक्के महसूल या ४ जिल्ह्यांमध्ये आहे. हे जे असामन धोरण सुरू आहे त्यामुळे ग्रामीण भागावर अन्याय होत आहे. मराठवाडा, विदर्भ, खानदेश हा भाग अविकसित राहात आहे. त्या भागामध्ये उद्योजक येण्यास तयार नाहीत. माननीय अर्थमंत्र्यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय

[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]

भाषणात विशाल उद्योगाच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. विशाल उद्योगांना प्रोत्साहन देऊ असे तुम्ही तुमच्या अर्थसंकल्पीय भाषणात म्हटलेले आहे. परंतु आपण मला सांगावे की, किती विशाल उद्योग समूह प्रोत्साहित झालेले आहेत ? मागील काळामध्ये उद्योग वाढीसाठी, उद्योगाच्या विस्तारासाठी पॅकेज इन्सेन्टीव्ह स्कीम होत्या, सामुहिक प्रोत्साहन योजना होत्या. आम्ही उद्योगांना कमी दरामध्ये जमिनी उपलब्ध करून देऊ, कमी दरामध्ये वीज उपलब्ध करून देऊ, स्टॅम्प ड्युटी माफ करू, विक्रीकरामध्ये १२ वर्षाची सवलत देऊ अशा विविध योजना होत्या. वेगवेगळया सवलतीच्या माध्यमातून उद्योजक राज्यात आकर्षित होत होते. परंतु ते उद्योजक आता राज्यात यायला तयार नाहीत. तुमचे विशाल उद्योगाच्या संदर्भातील स्वप्न जरी असले तरी ते पूर्ण होऊ शकलेले नाही आणि दुर्दैवाची बाब अशी आहे की, जे काही उद्योजक राज्यात येत आहेत ते फक्त मुंबई, पुणे, कोकण परिसरामध्येच येत आहेत. औष्णिक विद्युत केंद्र उभे करायचेच असल्यास दुसरीकडे उभारावे. त्या बाबत त्याच ठिकाणी जागा का पाहिजे ? अशा प्रकारे मुंबईच्या आजूबाजूला अशा प्रकारचे उद्योग सुरू होणार असल्यास ही बाब योग्य नाही. उद्योगांची उभारणी करीत असताना राज्याच्या अविकसित भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर उद्योगधंदे कशा प्रकारे सुरू होऊ शकतील, यासंबंधी शासनाने काळजी घेणे आवश्यक आहे. तसेच भविष्यात मुंबई, पुणे सारख्या शहराच्या आजूबाजूला नवीन उद्योगांना परवानगी न देता, राज्याच्या अविकसित क्षेत्रांमध्ये उद्योगधंदे सुरू होण्यासाठी शासनाने उद्योजकांना मदत करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, विजेच्या संदर्भात एका बाजूला सांगितले जाते की, राज्यात विजेचा तुटवडा आहे आणि दुसऱ्या बाजूला मागेल त्याला वीज दिली जाईल असे सांगितले जाते. राज्यात विजेचा तुटवडा असताना, शासनाकडून मागेल त्याला विजेचा पुरवठा कशा प्रकारे केला जाणार आहे ? यासंबंधी शासन दुटप्पी धोरण स्वीकारीत आहे. सध्या राज्यात विजेचा तुटवडा असल्यामुळे शेती व उद्योगांवर फार मोठे संकट निर्माण झाले आहे. दिवसेंदिवस वीज महाग होत चालली आहे. विजेच्या संदर्भात २०१२ मध्ये महाराष्ट्र राज्य भारनियमन मुक्त करू अशी राज्य शासनाने घोषणा केली. परंतु ही बाब विश्वास बसण्या सारखी नाही. या बाबत सांगायचे झाल्यास शासनाकडून सन २००० साली असे सांगण्यात आले होते की, सन २००४ साली राज्याला भारनियमन मुक्त करू. त्यानंतर २००८ मध्ये व २००९ मध्ये राज्याला भारनियमन मुक्त करू असे शासनाकडून सांगण्यात आले होते. परंतु आता सन २०१२ मध्ये राज्याला भारनियमन मुक्त करू असे शासनाकडून सांगण्यात आले आहे. आता शासनाच्या हातात एका वर्षाचा कालावधी आहे. या कालावधीत आपल्याकडे पूर्णपणे वीज उपलब्ध होणार आहे का ? सध्या राज्यात ४५०० ते ५००० मेगावॅटपर्यंत विजेची तूट आहे. या कालावधीत ४५०० ते ५००० मेगावॅट वीज प्रकल्पाद्वारे नव्याने निर्माण केली जाणार आहे का ? उन्हाळ्यात आणखी २०० ते ४०० मेगावॅट विजेची मागणी वाढू शकते. अशा परिस्थितीत शासनाने फसव्या घोषणा करू नये. जे होणार आहे तेच सांगावे. "आठ तासांऐवजी दहा तासांची वीज नियमितपणे देऊ." अशा स्वरुपात शासनाने जनतेला आश्वासित करणे गरजेचे आहे. शासन जनतेला का फसवित आहे ?

शासनाने आता जलविद्युत प्रकल्पांच्या संदर्भात खाजगीकरणाचे धोरण स्वीकारले आहे. युतीच्या काळात निर्माण झालेले जलविद्युत प्रकल्प शासनाने खाजगीकरणासाठी देता कामा नये. नव्याने तयार

**[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]**

होणारे जलविद्युत प्रकल्प कोणी खाजगीकरणासाठी घेत असल्यास जरुर द्यावेत. परंतु जुने जलविद्युत प्रकल्प खाजगीकरणासाठी देऊ नयेत.

अध्यक्ष महोदय, जलविद्युत प्रकल्प आणि औष्णिक विद्युत प्रकल्पांमध्ये अंतर आहे. जलविद्युत प्रकल्पांमध्ये भांडवली गुंतवणूक केल्यानंतर त्याद्वारे टप्याटप्प्याने कमीत कमी खर्चात वीज निर्माण होते. आपल्याकडे उत्पन्नाची साधने असल्यामुळे जलविद्युत प्रकल्प खाजगीकरणासाठी देण्यास आमचा कडाडून विरोध राहणार आहे. साईट उपलब्ध असल्यास त्या ठिकाणी खाजगीकरणाच्या माध्यमातून नव्याने जलविद्युत प्रकल्प उभारावेत व त्या माध्यमातून राज्याला वीज उपलब्ध करून द्यावी. जलविद्युत प्रकल्पाद्वारे आपल्याला कमीत कमी खर्चात वीज उपलब्ध होत असते. कोयना सारख्या प्रकल्पाचा विचार केल्यास तेथील काही जलविद्युत प्रकल्पांच्या माध्यमातून राज्याला प्रति युनिट २२ ते २५ पैसे दराने वीज मिळते. म्हणून जलविद्युत प्रकल्पासंबंधी शासनाने खाजगीकरणाचे स्वीकारलेले धोरण आम्हाला मान्य नाही. यासंबंधी शासनाने फेर विचार केला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, गृह विभागाच्या संदर्भात मी सभागृहाला सांगू इच्छितो की, आबा, गृह विभागासाठी ५५ कोटी रुपयांची तरतूद करून आपली अवहेलना केली आहे. ही तरतूद केंद्र शासनाची आहे. या बाबत राज्य शासनाने तरतूद केली पाहिजे. गृह विभागासाठी मोठ्या प्रमाणावर निधी देण्याची आवश्यकता असताना सद्धा त्याकडे शासनाने दुर्लक्ष केले आहे. कदाचित, सरकार परत एकदा २६/११ ची वाट बघत असेन. २६/११ ची घटना घडल्यानंतर फोर्स-१ तयार केले, नवीन शस्त्रास्त्रे आणू, स्पीड बोट आणू असे सांगण्यात आले. परंतु या अर्थसंकल्पात त्याचे प्रत्यक्षात प्रतिबिंब दिसून आले नाही. या अर्थसंकल्पात, गृह विभागाच्या अनुषंगाने किमान सागरी सुरक्षा किंवा मोठे शहरे असो, तसेच ज्या शहरांना अतिरेक्यांच्या माध्यमातून वारंवार धोका निर्माण होण्याची शक्यता असते. तेथे अद्ययावत यंत्रणा, वाहने, स्पीड बोट उपलब्ध करून देणे, सागरी चौक्या तयार करणे, शस्त्रास्त्रे घेणे इत्यादी बाबींसाठी या अर्थसंकल्पात गृह खात्याला निधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. परंतु गृह खात्यावर अन्याय होत आहे. अशा परिस्थितीत आणखी घटना घडल्यास त्यासंबंधी येथे चर्चा सुरू होईल.

अध्यक्ष महोदय, स्टॅम्प ड्युटीच्या माध्यमातून शासनाचा महसूल वाढला असल्याचे शासनाकडून सांगण्यात येत असले तरी, स्टॅम्प ड्युटी किंवा विक्रीकर विभाग असो, प्रत्यक्षात शासनाने फार मोठी मेहनत केल्यामुळे यात वाढ झाली असे नाही. बाजारात असलेल्या जमिनी किंवा फ्लॅटच्या संदर्भात स्टॅम्प ड्युटी आकारली जाते, त्यासंबंधीचे व्यवहार वाढले आहेत. मालमत्तेची किंमत वाढल्यानंतर शासनाला आपोआपच स्टॅम्प ड्युटी मिळणार आहे. या बाबतची खरेदी विक्री वाढवावी असे आपल्याला सांगता येत नाही. मागच्या वेळी शेअर मार्केटमध्ये वाढ झाल्यामुळे या व्यवहारांमध्ये थोडी वाढ झाली होती. यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्याची गरज आहे. या अर्थसंकल्पातील आकडेवारी पाहिली तर आम्ही का म्हणून तुमचे कौतुक करावे असा प्रश्न आमच्या मनात येतो. जूना अर्थसंकल्प जसाचा तसा या ठिकाणी पुन्हा मांडलेला आहे. बजेटचे विश्लेशन केले तर काँग्रेस पक्षाला १० हजार ३०० कोटी रुपये आणि उर्वरित पैसा हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मिळालेला आहे. हे अन्याय करण्यासारखे आहे. याची माननीय श्री. अजितदादांनी नोंद घेतली पाहिजे. माननीय श्री. अजितदादा हे आपल्याच पक्षावर अन्याय करीत आहेत. आपण म्हणाल हे खाते ते खाते पण तसे

काही नाही. वेगवेगळ्या विभागाला पैसा दिला जाऊ शकतो. आदिवासी विकास विभागासाठी ९ टक्के बजेटमध्ये प्रोव्हिजन करायला पाहिजे होती. पण शासनाने तशा प्रकारची तरतूद केलेली नाही. शासनाने आदिवासी विकास विभागासाठी फक्त ७ टक्केच बजेटमध्ये प्रोव्हिजन केलेली आहे. समाज कल्याण विभागासाठी १३ टक्के बजेटमध्ये प्रोव्हिजन करायला पाहिजे होती. पण त्या उद्दीष्टापर्यंत शासन पोहचलेले नाही. शासनाने समाज कल्याण विभागासाठी फक्त ११ टक्केच प्रोव्हिजन बजेटमध्ये केलेली आहे. आजही आर्थिक दुर्बल धटकांना पैसे मिळत नाही, ही खरी वस्तुस्थिती आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्याकडे जानेवारीपर्यंत अर्थसंकल्पात कोणाला किती पैसे दिले त्यासंदर्भातील आकडेवारी आहे. बजेट प्लॅन जानेवारीपर्यंत केलेला आहे. त्यावेळी राज्याचा खर्च फक्त ४० टक्के झाला होता. यासंदर्भातील माहिती माननीय वित्त मंत्री महोदयांनी घेण्याची गरज आहे. राज्यामध्ये ४० टक्के प्लॅन बजेट डिसेंबरपर्यंत खर्च करण्यात आले होते. याचा अर्थ जानेवारी, फेब्रुवारीपर्यंत ६० टक्के खर्च शासनाचा झाला होता काय ? सन २०१०-११ साठी शासनाने ३७ हजार ९१६ कोटी रुपयांची योजना तयार केली. पहिल्या आठ महिन्यात फक्त २४ टक्के खर्च करण्यात आला. सन २०११-१२ च्या वार्षिक प्रकाशनाच्या योजनेनुसार वर्षअखेरपर्यंत ३४ हजार ७९४ कोटी म्हणजे ९१.८ टक्के खर्च झालेला दिसत आहे. शेवटच्या चार महिन्यात २५ हजार ६१५ कोटी रुपये खर्च झाले. याचाच अर्थ खर्चाचे आकडे फुगवून दाखविले जात आहे. सन २०११-१२ पर्यंत ४१ हजार ५०० कोटी रुपयांची योजना केली जात आहे. ग्रामविकास विभागासाठी गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी कमी तरतूद करण्यात आली. ३६८ कोटी रुपयांची तरतूद कोणत्याही स्पष्टीकरणाशिवाय करण्यात आली. राज्यामध्ये एक कायदा शासनाने तयार केला होता. या कायद्याच्या अनुषंगाने दर महिन्याला पैसा दिला गेला पाहिजे आणि तो विथ्ड्रॉ झाला पाहिजे अशी सिस्टिम शासनाने अंमलात आणली होती. शासनाने कॅश फ्लो तयार केला होता. त्यानंतर बजेट प्रोव्हिजन झाल्यानंतर १२ महिन्यामधील ९० कोटी प्रमाणे दर महिन्याला कॅश फ्लो आला पाहिजे असे बंधन कायद्यान्वये घालण्यात आले. असे असताना शेवटच्या महिन्यात २५ हजार कोटी रुपये कसे खर्च होतात ? यामधील खर्च करण्याची टक्केवारी कमी का आहे ? बजेटला अलिखित अशा स्वरुपाची कपात लावली जाते. यावर्षीच्या राज्याच्या बजेटला अलिखित १० टक्के कपात होती. प्लॅन ४१ हजार कोटी रुपयांचा तयार करावयाचा आणि अलिखित १० टक्के कपात लावायची आणि ४ हजार कोटी रुपये मिळणारच नाही अशी व्यवस्था केली जात आहे. परंतु माझ्या माहितीप्रमाणे ही कपात २० टक्यावर जात आहे. प्लॅनचा पूर्णपणे खर्च केला जात नाही. प्लॅन ४१ हजार ५०० कोटी रुपयांचा कशासाठी करावयाचा असा प्रश्न आमच्या मनात येत आहे. अशा प्रकारचा प्लॅन शासनाने आणलेला आहे. बजेटमध्ये तो मंजूरही केला जाणार आहे. त्याला केंद्र शासनाच्या प्लॅनिंग कमिशनने अजूनपर्यंत मान्यता दिलेली नाही. मान्यता न घेता अलिकडच्या तीन ते चार वर्षात असे बजेट सादर करण्याचे धाडस केले जात आहे. हे बरोबर नाही. राज्याच्या प्लॅनिंग कमिशनने मान्यता दिल्याशिवाय बजेट सादर करता कामा नये. यासंदर्भात सर्व वस्तुस्थिती नजरेसमोर आणली पाहिजे. यामध्ये किमान साईजला मान्यता दिली पाहिजे. केंद्रामध्ये आपलेच सरकार आहे. त्यामुळे प्लॅनची साईज मंजूर करून तो साईजमध्ये बसविला पाहिजे. उद्या ४१ हजार ५०० कोटीच्या बजेटला मान्यता न देता ३९ हजार कोटीच्या बजेटला मान्यता दिली तर हे बजेट फसवे राहणार आहे.

[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]

राज्यात वित्तीय अनियमितता वारंवार वाढत आहे. हे योग्य नाही. मला दु:ख होते की, राज्यातील वित्तीय अनियमितता वारंवार निदर्शनास आणून देखील शासन पुन्हा त्याच चुका करीत आहे. शासन या संदर्भात वारंवार चुका करीत आहे. शासनाची ही भूमिका योग्य नाही. यामुळे अनेक विभागांवर अन्याय होत आहे.

अध्यक्ष महोदय, ग्राम विकास विभागाच्या संदर्भात तरतुदी कमी झाल्या आहेत. हे मी समजू शकतो. ३६८ कोटी रुपये या वर्षी कमी करण्यात आले आहेत. त्या करिता काही ठोक तरतूद ठेवली असेल. माननीय मंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी तरतूद कमी करण्यासाठी काही माध्यमे शोधून काढली आहेत. संत गाडगे महाराज ग्राम स्वच्छता योजना, संत तुकडोजी महाराज अभियान, तंटामुक्ती अभियान अशा बिन पैशाच्या अनेक योजना त्यांनी राबविल्या होत्या. एक गाव स्वच्छ करण्याकरिता शासनाचा एक पैसा देखील खर्च होत नाही. त्यामुळे बजेटमध्ये एक पैशाची देखील तरतूद करावी लागत नाही. ग्राम विकास विभागाच्या तरतुदी कमी करणे योग्य नाही. ग्रामीण भागामध्ये यामुळे अन्याय होत आहे. केंद्र शासनाच्या अनेक योजना आहेत. त्याकरिता अर्थसंकल्पामध्ये जरूर निधी दिलेला आहे. राज्य शासनाने स्थानिक योजना देखील योग्य प्रमाणात राबवल्या पाहिजेत. या योजना योग्य प्रकारे न राबविल्यामुळे ग्रामीण भागामध्ये अन्याय होत आहे. राज्याचे उत्पन्न वाढवले पाहिजे, कर उत्पन्न वाढवले पाहिजे. त्या करिता जी मर्यादा निश्चित केलेली आहे, ती ओळखली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, शासनाने अर्थसंकल्पामध्ये दारु वरील कर वाढवला आहे. ही चांगली गोष्ट आहे. दारु पिणे आरोग्यास अपायकारक आहे. शेजारच्या राज्यामध्ये दारुवर किती कर लावला जातो, हे देखील पाहिले पाहिजे. तेथे किती कर लावला जातो, याची शासनाने तुलना केली पाहिजे. अन्यथा आपल्या राज्यामध्ये दारुवरील कर वाढवला जाईल व तेथे कर कमी केलेला असेल तर यामुळे स्मगलिंग होऊ शकते. टॅक्सिंगच्या संदर्भात राज्यांतर्गत व आंतरराज्यीय स्पर्धा टाळता आली तर सुसुत्रता येऊ शकेल, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, माननीय वित्त मंत्री महोदयांनी छान काम केले आहे. त्यांनी राज्यातील वडापाव वरील कर कमी केला आहे. राज्यात हॉटेल्समध्ये विकल्या जाणाऱ्या वडापाव वरील कर कमी केलेला आहे. सेनेला आनंद आहे त्याच प्रमाणे मला देखील आनंद होत आहे. वडापाव वरील कर कमी झाल्याबद्दल आम्हाला देखील आनंद होत आहे. मी देखील वडा पाव खाणाऱ्यांपैकी आहे. आम्ही आपल्या मंत्र्यांप्रमाणे फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये जाऊ शकत नाही. आमची तेवढी आर्थिक क्षमता नाही. आम्ही रस्त्यावरील माणसे आहेत. आमच्या जवळ भूखंड नाही, झोपडपट्टी विकास कार्यक्रम नाही, एसआरए नाही, एमएसएसआरडीसी नाही, सिडको नाही, रस्त्यांचा टोल घोटाळा नाही, वाळू माफिया नाही तसेच तेल माफिया देखील आमच्या कडे नाही. आमच्याकडे आहे तरी काय ? आमच्या जवळ आहे केवळ वडा. वडापाव वरील कर कमी केल्या बद्दल माननीय वित्त मंत्री श्री. अजित पवार यांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. मी त्यांना विचारु इच्छितो की, यापूर्वी वडापाववर किती कर लागू केलेला होता ? संपूर्ण राज्यामध्ये वर्षभरात वडापाव वरील कर केवळ १० लाख रुपयांच्या आत गोळा होतो. क्या हो गया ? दस लाख रुपया छोड दिया. १० लाख रुपये ही रक्कम देखील मी जास्तच

**[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]**

सांगितली आहे. या संदर्भात आपण आपल्या विभागाकडून आकडेवारी घेऊन सांगावे. आम्ही वारंवार आपल्या विभागाकडून आकडे घेत असतो. विभागाचे असे म्हणणे आहे की, वडापाव करिता वेगळा कर लागू केलेला नाही. तरी ओढून ताणून फार झाले तर वर्षभरात वडापाव वरील कर केवळ १० लाख रुपये किंवा ५ लाख रुपये होऊ शकतो. "राजा उदार झाला आणि आमच्या हाती वडा दिला." या संदर्भात माननीय वित्त मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये जरुर उल्लेख करावा.

अध्यक्ष महोदय, राज्य शासनाची आर्थिक परिस्थिती चांगली नाही. राज्य दिवाळखोरीत आहे, कर्जबाजारी आहे. शासनाने ओव्हरड्राफ्ट काढला आहे. शासनाच्या तिजोरीत घुशी फिरत आहेत. त्यामुळे शासनाकडून केवळ लहान वस्तुंवरील करच कमी होऊ शकतो इतर वस्तूंवरील कम कमी होणार नाही, हे मी समजू शकतो.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पाचे पुस्तक आपण बघा. मागील ३ ते ४ वर्षापासून अर्थसंकल्पाच्या भाग २ मध्ये ४ टक्के वरील कर ८ टक्के केला जातो, ४ टक्केवरील कर ० केला जातो. तर पुन्हा ४ टक्के वरील कर १२ केला जातो. या पलिकडे काहीही केले जात नाही. मिल गया तो बारह प्रतिशत का आठ प्रतिशत कर देंगे और नही मिल गया तो चार प्रतिशत का आठ प्रतिशत कर देंगे. कोणी भेटावयास आले, निवेदन आले तर कर कमी केला जातो. कराच्या संदर्भात अशाच प्रकारे केवळ फिरवा फिरवी केली जाते. वडापाव वर १२.५ टक्के कर लावला कोणी ? हा कर लावण्याचे पापही तुम्हीच केले आहे. मागच्या वर्षी १२.५ टक्के कर लावायचा व या वर्षी ४ टक्के कर लावायचा. असे पोरखेळ कशासाठी केले जात आहे ? काळे धंदे करणाऱ्या, काळा बाजार करणाऱ्या लोकांना पकडा. आपल्या यंत्रणेमध्ये लिकेजेस आहेत. जे राज्याचे उत्पन्न बुडवत आहेत, त्यांच्यावर कारवाई करा. राज्याचे उत्पन्न मोठ्या प्रमाणात घटवणारी अनेक माणसे आहेत. त्यांच्यावर कडक कारवाई करा. राज्याच्या तिजोरीत पैसे आणा. मात्र तिजोरीत पैसे आणण्यासाठी शासनाला कडक भूमिका घ्यावी लागेल, कणखर भूमिका घ्यावी लागेल. तो कणखरपणा तुमच्याकडे नाही. माननीय मुख्यमंत्री महोदयांना आम्ही सांगतो की, किमान शासनाचे जे नियम आहेत, आदेश आहेत त्यांचे पालन करा. आमचे काही म्हणणे नाही.. परंतु, ते म्हणाले की, आम्ही विचार करून सांगतो असे माननीय मुख्यमंत्र्यांनी आम्हाला सांगितले पाहिजे. आमचे आमदारांचे काय म्हणणे होते की, निधीचे समन्यायी तत्त्वावर वाटप केले जावे. आमचे हे म्हणणे नाही तर, जे आपण आदेश काढलेले आहेत, जे माननीय राज्यपालांचे निर्देश आहेत त्यांचे १०० टक्के पालन केले जावे असे माझे म्हणणे आहे. असे करून काही उपकार करीत नाही आपण. सरकारचे आदेश, सरकारचा निर्णय, राज्यपालांचा निर्णय, हायकोर्टाचे निर्देश यांचे पालन करून विरोधी पक्षांना न्याय दिला पाहिजे असा माझा आग्रह आहे. त्यासाठीही सरकार म्हणते की, "आम्ही या संदर्भात विचार करून निर्णय देऊ." शासनाच्याच निर्णयाचा विचार करण्याची वेळ तुमच्यावर येते तर मग ते शासकीय निर्णय वगैरे सगळे जाळून, फाडून टाकून मन मानेल तसे वागा. शासनाच्याच आदेशानुसार जर कार्यवाही करावयाची नसेल तर, बजेट कशासाठी मांडावयाचे आणि त्याच्यावर चर्चा तरी कशाला घडवून आणावयाची ? करा काय ते तुम्हाला मुक्तपणे वाव आहे.

[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]

माननीय आबा यासंदर्भामध्ये मी आपल्याला मुद्दाम सांगणार आहे, सन्माननीय सदस्य, श्री. विवेक पंडित यांनी मला त्यांनी लिहिलेली एक कविता दिली. या कवितेचे शिर्षक असे आहे की,

'दादा' हसले, 'आबा' रुसले अन् 'बाबा' फसले.

(सन्माननीय सदस्यांमध्ये हशा पसरतो व ते एकमेकांमध्ये बोलतात)

आणि मी तर बसलो. दादा हसले, आबा रुसले अन् घ्बाबाङ फसले आणि नाथाभाऊ भाषण करून बसले दुसरे काय ? आपल्या कवितेमध्ये त्यांनी म्हटले आहे की,

जमेचं अंदाजपत्रक हाती घेऊन 'वित्त' मंत्री उठले
विरोधकांच्या गदारोळातही त्यांचे घ्चित्तङ नाही ढळले.

आम्ही पाहिले होते. परंतु, आमची भूमिका आपण समजूनच घ्यायला तयार नव्हता, मग घोषणा नाही देणार तर काय करणार ? आम्ही पडलो विरोधी पक्षाचे, आम्ही वेलमध्ये आल्यावर आमच्याबाबत गोंधळ घातला असे म्हटले गेले, त्या मागच्या भावना आपल्या लक्षात आल्या नाहीत की, हा गोंधळ एका दिवसाचा नव्हता. आपणही आमदार आहात आणि आज कोणी सुपामध्ये तर कोणी जात्यामध्ये अशी परिस्थिती कुणावरही येऊ शकते. विनियोजन विधेयकाच्या वेळेस, पुरवणी मागण्यांच्या वेळेस आपण येथे येऊन आनंद साजरा केला. परंतु, आपण सत्ताधारी पक्षाचे असल्याने तो आनंद होतो आणि विरोधी पक्षांनी तसे केले की, तो गोंधळ होतो जाऊ द्या तो विषय. मी या कवितेतील पुढच्या ओळी सांगतो,

जमेचं अंदाजपत्रक हाती घेऊन घ्वित्तङ मंत्री उठले
विरोधकांच्या गदारोळातही त्यांचे घ्चित्तङ नाही ढळले
'मागेल त्याला वीज जोडणी' वदले दादा ऐटीने
आडात नाही पाणी, कृषिपंप मात्र शेकड्यांने
'दादां'नी स्वप्नामध्ये भारनियमनमुक्त महाराष्ट्र पाहिला
अन् वीज प्रकल्पांचा कागदी घोडा फायलींमध्येच थिजला
'दादा' म्हणे युवकांना, आता नवे धोरण जाहीर करू या
रोजगार संधी नाही तर निदान वडापावच्या गाड्या टाकू या

युवकांचे धोरण किती वर्षे झाले येत आहे असे म्हटले जात आहे. युवक व क्रीडा खातेही त्याची वाट पाहत आहे. परंतु, तेवढा वेळच नाही माननीय मुख्यमंत्र्यांना. निदान या अधिवेशनात तरी युवा व क्रिडा विषयक धोरण आणले पाहिजे. या धोरणाची वाट पाहत युवकांवर म्हातारे होण्याची वेळ आलेली आहे. तर मी काय म्हणत होतो,

'दादा' म्हणे युवकांना, आता नवे धोरण जाहीर करू या
रोजगार संधी नाही तर निदान वडापावच्या गाड्या टाकू या
उजाडल्यावरही आजकाल कोंबडाही आढेवेढे घेतो बांग द्यायला
कुक्कुटपालनावरच्या सबसिडीने तोही लेकाचा आळसावला
सामाजिक न्याय, ग्रामीण विकास कोणाला हो इथे साधायचाय ?
बड्या उद्योगांना वीज, पाणी अन् शेतकऱ्याला मात्र नाडायचाय
तीर्थक्षेत्रासाठी अर्थसंकल्प करोडींचे गंगाजल सोडतोय
हातात झाडू घेतलेला माझा गाडगेबाबा मात्र समाधीसाठी ताटकळतोय

**[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]**

अजून गाडगेबाबांची समाधी झालेली नाही. आधुनिक गाडगेबाबांचा मी केवळ उल्लेख केला.

(सन्माननीय सदस्यांमध्ये हशा पसरतो.)

करमुक्त अगरबत्ती ...... अगरबत्तीला करमुक्त केल्याबद्दल माननीय दादांचे अभिनंदन केले पाहिजे. माननीय वित्ती मंत्री अजितदादा पवार यांनी अगरबत्ती करमुक्त केल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

करमुक्त अगरबत्ती ओवाळीत 'दादा'वदले 'आबांना'

आपल्या दोस्तीशी इमान राखीत जुनीच शस्त्रं दिलीत मी पोलिसांना

पोलिसांसाठी नवीन शस्त्रे घेण्यासाठी पैसेच नाहीत. त्यामुळे आबा दोस्ती राखली.

अंदाजपत्रक मांडल्यावर च्दादाछ 'बाबां'कडे पाहून मिश्किल हसले
'दिल्लीची मर्जी सांभाळा मात्र महाराष्ट्राचं तेवढं माझ्यावर सोडा'

धन्यवाद.

**श्री. जितेंद्र आव्हाड** (मुंब्रा-कळवा) **:** अध्यक्ष महाराज, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पावर माननीय श्री.एकनाथराव खडसे यांच्या भाषणानंतर बोलण्याठी मला संधी मिळत आहे. या अर्थसंकल्पाचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

मी लहानपणी इतिहास वाचता वाचता एक पुस्तक वाचल्याचे आठवते. कार्ल मार्क्सचा १८४८ चा काळ होता. कार्ल मार्क्स कम्युनिझम आणि सोशालिझमवर लिहित होता. त्याच्यावर असुया असलेला त्याचा समकालीन होता. त्याने एक पुस्तक लिहिले होते. त्याने त्या पुस्तकाला नाव दिले "फिलॉसॉफी ऑफ पॉवर्टी." हे पुस्तक कार्ल मार्क्सला चिमटे काढणारे होते. कार्ल मार्क्सने त्याला उत्तर दिले नाही. कार्ल मार्क्सने एक पुस्तक लिहिले. "पॉवर्टी ऑफ फिलॉसॉफी." जे काही दिसले ते "पॉवर्टी ऑफ फिलॉसॉफी" होते. टिंगल जरूर करावी. पण ती करीत असताना विधायक सूचना देखील केली पाहिजे. कौतुकास्पद बाबी असतील तर त्याचे कौतुक केले पहिजे. यासाठी मनाचा मोठेपणा लागतो, तो काही दिसला नाही. इडा पिडा टळो आणि बळीचे राज्य येवो, असे म्हणण्याची महाराष्ट्राची अनेक वर्षाची परंपरा आहे. शेतकऱ्यांची बाजू घेणारा, अलुत्या-बलुत्यांचे दु:ख जाणणारा, गोरगरिबांचे, अडल्या-नडल्यांचे प्रश्न सोडविणारा एक राजा इतिहासामध्ये होऊन गेला. ज्यांना ही मानसिकता समजली नाही ते मानसिकतेच्या विरोधात उभे राहिले. त्याच लोकांनी अखेरीस बळीराजाचा घात करून जीव घेतला. हा इतिहास नवीन नाही. शिवाजी राजांनी सर्वसामान्यांसाठी राज्य स्थापन केले. सर्वांना बरोबर घेतले. जेव्हा राज्याभिषेकाची वेळ आली तेव्हा आपणास राजे बनण्याचा अधिकार नाही असे म्हणणाऱ्यांची पिल्लावळ आजही महाराष्ट्रामध्ये जीवंत आहे. ती आज येथे दिसते आहे.

**अध्यक्ष** : सन्माननीय सदस्यांनी बजेटवर भाषण करावे.

**श्री. जितेंद्र आव्हाड :** अध्यक्ष महाराज, मी बजेटवरच येत आहे. या अर्थसंकल्पात बळीराजाची भूमिका आहे. या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना देण्यासारखे, आदिवासींना देण्यासारखे तसेच आम्हा शेड्युल्ड कास्ट, शेड्युल्ड ट्राईबच्या लोकांना देण्यासारखे खूप काही आहे. याचा उल्लेख विरोधी

[ श्री. जितेंद्र आव्हाड ]

पक्षाच्या भाषणात कुठेही नाही. शेतकरी, दलित, आदिवासी, अल्पसंख्याक यांच्या विकासाठी भरीव अशा तरतुदी करण्यात आल्या असल्यामुळे माझ्या सारखा बहुजन समाजातील छोटा कार्यकर्ता अभिनदंन करण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महाराज, अर्थसंकल्पाच्या तरतुदींवर मी जरूर बोलणार आहे. मी येथे महाराष्ट्राची गेल्या काही वर्षातील परंपरा सांगू इच्छितो. मी इकॉनॉमिक्सचा विद्यार्थी आहे. एक काळ असा होता की, शासन यंत्रणेने मॉनेटरी व टॅक्सेशन पॉलिसिजमध्ये पडूच नये अशा प्रकारचे तत्त्वज्ञान ॲडम स्मिथने आणले. त्याला आपण लेसेई फेअर म्हणतो.

(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष)

या लेसेई फेअरचा अर्थसंकल्पावर प्रभाव होता. अशाप्रकारचे अर्थसंकल्प काही वर्षे सादर केले जात होते. १९२० च्या दरम्यान जग डिप्रेशनमध्ये सापडले तेव्हा जॉन मेनार्ड केन्स नावाच्या अर्थ तज्ज्ञांनी सांगितले की, शासनाने टॅक्सेशन आणि मॉनेटरींग पॉलिसीच्या माध्यमातून सर्वसामान्यांना आधार मिळेल अशाप्रकारच्या उपाय योजना केल्या पाहिजेत. हा आधार देत असताना शासनाचे रुप स्पष्ट झाले पाहिजे. अमेरिका जागतिक मंदीच्या काळामध्ये सापडली असताना आणि मिल्टन फ्रिडमन नावाच्या तत्त्वज्ञानाचा पाठपुरावा करीत असताना अमेरिकेला पुन: जॉन मेनार्ड केन्सची आठवण येते आणि आपल्यालाही जॉन मेनार्ड केन्सची आठवण येते. येथील "आहे रे" वर्गाकडून काढून "नाही रे" वर्गाला देण्याचे काम या महाराष्ट्रात होत असताना ज्यांचे प्रतिनिधीत्व विरोधी पक्ष करीत आहेत ते शांत कसे बसतील ? हाच मुळात प्रश्न होता आणि तेच चित्र येथे पहावयास मिळाले. याठिकाणी झाला तो राडा मोठा नव्हता, हा राडा "आहे रे" वर्गाकडून काढून "नाही रे" वर्गाला दिले जात आहे याचे दु:ख त्यांच्या तोंडावर दिसत होते म्हणून येथे तो राडा दिसत होता.

अध्यक्ष महाराज, राज्यातील असंघटीत कामगार,शेतकरी, शेतमजूर, कामगार या महागाईने पिचल्या गेलेल्या वर्गासाठी जीवनावश्यक वस्तुंमधील दरवाढ फार महत्वाची असते. या अर्थसंकल्पामध्ये या घटकासाठी गहू, तांदूळ, डाळ, मीठ, चिंच, हळद,गूळ, नारळ, धणे, मेथी इतकेच काय पण बारकाईन लक्ष देऊन सोलापूरी टॉवेल्स आणि चादर देखील करमुक्त केलेल्या आहेत. हे सर्व गरिबांसाठी होते, हे गरिबांचे प्रोटीन्स आहे. गरिबांचे अन्नधान्य यांच्याशी या बाबी संबंधित आहेत.

अध्यक्ष महाराज, मी या निमित्ताने माननीय उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांचेकडे मागणी करतो की, एकीकडे महागाई वाढत असताना गोरगरिबांना सवलती देण्यासाठी त्यांच्या मूळ अन्नधान्यावरील कर वाढ टाळली आहे किंबहुना ती नष्ट केलेली आहे. अशाठिकाणी आपण दोन गोष्टींवरील कर कसे रद्द करता येतील आणि त्यादृष्टीने गरिबांना कशी ताकद देता येईल याचा विचार करावयास हवा. एक म्हणजे अंडे आणि दुसरे म्हणजे केळी. प्रोटीन्सचे सर्वाधिक साधन म्हणून अंड्याचा विचार करता येईल. आम्ही कामगार वस्तीमध्ये वाढलेली मुले आहोत. आजही आपण या वस्त्यांमध्ये फिरला तर त्याठिकाणी आपणास आजही केळी विकणारी बाई दिसते. गरीब माणूस दोन केळी खावून आपले पोट भरतो. त्या केळ्यांवर लावलेला कर कमी करावा अशी माझी मागणी आहे.

[ श्री. जितेंद्र आव्हाड ]

माननीय वित्त मंत्र्यांनी वडापाव वरील कर कमी केल्यामुळे काही जणांना दु:ख झाले. अर्थात त्यांचा वडापावशी काही संबंध नाही. पण ज्या मराठी माणसाचे नाव घेत वडापावचे राजकारण झाले ते वडापाव आपण स्वस्त केले. येथील जो कष्टकरी, घाम गाळणारा माणूस आहे त्याचे खाद्य आपण स्वस्त करीत आहात त्याबद्दल मी माननीय वित्त मंत्र्यांचे अभिनंदन करतो.

अध्यक्ष महाराज, सर्वात महत्वाचे म्हणजे माननीय वित्त मंत्र्यांनी पंचतारांकित हॉटेल्समधील विक्री कर तब्बल २० टक्क्यांनी वाढविण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय गोरगरिबांच्या बाजूने नाही तर कोणाच्या बाजूने आहे ? सरकारने बियर, व्हीस्की वरील टॅक्स वाढविला आहे त्यामुळे समोरच्या बाकावरील सदस्यांच्या पोटात दुखणार कारण त्यांचे अशा लोकांशी संबंध आहेत ज्यांच्यावर आपण टॅक्स वाढविला आहे. त्यामुळे दादा वाईट वाटण्याचे कारण नाही.

अध्यक्ष महाराज, ४५-४६ डिग्री तापमानात आमच्या आया-बहिणी शेतात काम करतात. आता विदर्भामध्ये ५० डिग्रीवर तापमान जाईल. ज्यांना मर्सिडीज गाड्यांमध्ये काळ्या काचा असताना देखील गॉगल लावण्याची सवय आहे त्यांच्या गॉगलवर टॅक्स लावण्याची हिम्मत कशी दाखविता ? मग दादा आपणाला विरोध होणार नाही तर कोणाला होणार, हा विरोध त्यातून जन्माला आलेला आहे.

दादा, आमची आपल्याकडे मागणे आहे की, मल्टीप्लेक्स आणि थिएटर यातील अंतर ओळखले पाहिजे. शासन म्हणून एक गोष्ट विचारात घ्यायला पाहिजे की, भारताची जी सिनेमा सृष्टी आहे तिची जडणघडण मुंबई शहरामध्ये झाली. ती वाढली मुंबईमध्ये आणि रुजली महाराष्ट्रामध्ये. या थिएटरचा प्रभाव इतका मोठा होता की, त्यातून अमिताभ बच्चनजी,सुनील दत्त आणि इतर अभिनेते उदयाला आले. चित्रपटामध्ये अशा व्यक्तींची निर्मिती करण्यात आली की, ज्यांचा गोरगरिबांशी संबंध होता. गोरगरिबांच्या वेदना चित्रपटांच्या माध्यमातून व्यक्त करीत घ्हिरोङ निर्माण झाले. त्या काळात दिवसभर कष्ट करून घाम गाळल्यानंतर, आपल्या बायका-पोरांसोबत थिएटरमध्ये बसून १ रुपयात चित्रपट बघून, त्या चित्रपटामध्ये स्वत:ला शोधले जायचे. परंतु आता परिस्थिती बदलली आहे. मल्टीप्लेक्समध्ये चित्रपट पाहण्यासाठी जायचे असेल तर, किमान २५०० रुपये खिशात असल्याशिवाय जाता येत नाही. मल्ट्रीप्लेक्समध्ये गेल्यानंतर आपल्या मुलाला पॉपकॉर्न्, आईस्क्रीम घ्यावे लागते. आता घाम गाळणाऱ्यांसाठी चित्रपट गृहे राहिली नाहीत. आता चित्रपटातील हिरो हेलीकॉप्टरमधून येतो, तो पूर्वीसारखा टॅक्स्ी ड्रायव्हर राहिला नाही. चित्रपटातील मुलगा आणि मुलगी पायलट असतात, ते बसमधून प्रवास करीत नाहीत. महोदय, ज्या चित्रपट सृष्टीची निर्मिती गरिबांनी केली ते गरीब आज चित्रपट सृष्टीपासून दूर जात आहेत. पूर्वीची चित्रपट सृष्टी हे मानवी दर्शन आणि मानवी संबंध दाखविणारी होती. या निमित्ताने मी माननीय अर्थमंत्री यांना सांगू इच्छितो की, मल्ट्रीप्लेक्स आणि थिएटरवरील कर पद्धतीत काही तरी बदल करणे आवश्यक आहे.

महोदय, या शासनाच्या माध्यमातून शाहू, फुले, आंबेडकरांची परंपरा पुढे नेली जात आहे. दादोजी कोंडदेव यांच्याबद्दल कविता लिहिणारी माणसे या ठिकाणी आहेत. तसेच.....

(विरोधी पक्षाचे काही सदस्य भाषणात अडथळा आणतात.)

**श्री. अजित पवार :** महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेवर जवळजवळ १ तास १० मिनिटे आपले विचार व्यक्त केले. सत्ताधारी पक्षातील सदस्यांनी त्यांचे भाषण कवितेसह शांतपणे ऐकले. सन्माननीय सदस्य श्री. गिरष बापट आणि त्यांचे सहकारी गेले पाच दिवस विधान भवनाच्या पायऱ्यांवर बसल्यानंतर त्यांच्यामध्ये काही तरी फरक पडेल असे मला वाटले होते. परंतु त्यांच्यात काही फरक पडलेला दिसत नाही. मला वाटते त्यांना सत्ताधारी पक्षातील सदस्यांची भाषणे सद्धा ऐकून घ्यावयास सांगावे.

**श्री. नाना पटोल :** अध्यक्ष महोदय,...

**उपाध्यक्ष** : मी सन्माननीय सदस्यांना सांगेन की, कृपया आपण आता भाषणात व्यत्यय आणू नये. आपल्या भाषणाच्या वेळी, आपल्याला ५-७ मिनिटांचा वेळ वाढवून देण्यात येईल.

**श्री. जितेंद्र आव्हाड :** महोदय, इतिहासामध्ये नमूद आहे की, महात्मा ज्योतिबा फुलेंनी घ्शेतकऱ्यांचे आसूडङ हे पुस्तक लिहून त्यातून शेतकऱ्यांच्या वेदना न डगमगता, न घाबरता इंग्रजांसमोर मांडल्या. त्या काळात इंग्रजांसमोर भलेभले घाबरत होते. महोदय, शाहू, फुले आंबेडकरांचे विचार घेऊन, हे शासन पुढे जात आहे. महेदय, छत्रपती शिवाजी महाराजांवर वार करणाऱ्या कृष्णाजी भास्कर कुलकर्णी यांचे पूजन करणाऱ्यांची, दादोजी कोंडदेवाचे पूजन करणाऱ्यांची पिढी येथे आहे. ती पिढी "शेतकऱ्यांचे आसूड" या पुस्तकातील विचार आणि महात्मा ज्योतिबा फुलेंचे विचार कसे सहन करेल ?

महोदय, राज्य सरकारने अर्थसंकल्पामध्ये विविध विभागांच्या माध्यमातून ११ हजार कोटी रुपयांच्या योजना कृषी विकासासाठी सादर करून, राज्याच्या विकासाचा आलेख कृषी प्रधान, शेतकऱ्यांना समृद्ध करणारा आणि त्यांना ताकद देणारा असेल हे स्पष्ट होते. कोणताही अर्थसंकल्प विकासाचा केंद्रबिंदू काय असेल हे दाखविणारा असतो. या अर्थसंकल्पातून राज्याचा विकास शेती प्रधान असेल, शेती आणि शेतकऱ्यांना ताकद देणारा असेल असेच स्पष्टपणे दिसते.

महोदय, शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंतचे कर्ज "शून्य" टक्के व्याज दराने दिले जाणार असून, ३ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जावर २ टक्के व्याज आकारण्यात येणार आहे. माननीय अर्थ मंत्र्यांच्या या घोषणेचे शेतकऱ्याच्या मुलांनी स्वागत करायला नको तर काय करायला हवे ? ज्यांना द्राक्ष आणि आवळ्यातील फरक कळत नाही, भुईमुगाच्या रोपट्याला शेंगा कशा दिसत नाहीत, असे म्हणणारे आहेत, अशांकडून जनतेने काय अपेक्षा ठेवायची, हे महत्त्वाचे आहे. अध्यक्ष महोदय, कृषी पंपासाठी अडीच हजार कोटी रुपयांच्या योजनेची घोषणा करण्यात आली आहे. वातानुकुलित ठिकाणी बसणाऱ्या लोकांना हे कळणार नाही. ४५-४६ अंश डिग्री सेल्सिअसमध्ये काम करताना शेतकऱ्याचे हृदय कसे जळते, आमच्या आई-बहिणीचे हृदय कसे जळते, हे आपल्याला कळणार नाही. योजना जाहीर करताना प्रसंगी शासनाला वीज विकत घ्यावी लागली तरी चालेल, कोणतीही तडजोड न करता आमच्या शेतकरी बांधवाच्या पंपाना लागणारी वीज पूर्ण ताकदीने त्याच्या मागे उभे करावी, असे हक्काने आणि अधिकाराने आम्ही सांगत आहोत. राष्ट्रीय कृषी योजनेतील कांदा साठवण केंद्राचे बळकटीकरण, कडधान्य-तेलबिया यांच्या विकासासाठी विशेष मोहिमेच्या योजनेसाठी केलेली तरतूद नक्कीच स्वागतार्ह आहे.

[ श्री. जितेंद्र आव्हाड ]

अध्यक्ष महोदय, भारतातील प्रोटिन्सचे माध्यम कडधान्य आहे आणि यापुढे आपल्या शेतीमधून सायन्टिफिकरित्या शेती उत्पादन काढण्यावर भर असणार आहे. त्यामुळे कडधान्यांच्या विकासासाठी एखादी सायन्टिफिक एजन्सी काढून कडधान्य निर्मितीसाठी प्रयत्न झाले तर गोरगरिबांना आपण दिलेल्या करसवलतीत आणि वाढणाऱ्या कडधान्यांमुळे आधार मिळेल. परिणामी, लोकांच्या आरोग्याला त्याचा फायदा होईल. दादा, आदिवासी प्रकल्पांतील अंगणवाड्यांतील ६७ लाख ८८ हजार बालके आणि गरोदर स्त्रियांना आहार दरामध्ये केलेली वाढ आणि त्यासाठी आपण ठेवलेले २११ कोटी रुपये हे स्वागतार्ह आहेत. आदिवासी माता, गरीब घरातील बालके कुपोषित रहावी, हे मनुवाद्यांना वाटणार नाही तर कोणाला वाटणार ? कारण आदिवासींनी जगूच नये ही त्यांची वर्षानुवर्षांची भावना आहे. आदिवासी जगले नाहीत तर आमच्यातील मनुवाद जीवंत राहील. त्यामुळे मनुवादी बोंबाबोंब करणार नाहीत तर काय करणार, हे यातून दिसत आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यातील अल्पसंख्यांकांसाठी २७५ कोटी रुपयांची भरीव तरतूद आपण या अर्थसंकल्पात केली आहे. ज्या बहुजन समाजाला, बहुसंख्याक समाजाला, अल्पसंख्यांक हे दुय्यम दर्जाचे वाटतात, त्यांचा सब-ऑर्डिनेट सिटिझन, सेकंडरी सिटिझन म्हणून उल्लेख वारंवार केला जातो. आपल्या समर्थनाच्या घोषणा त्यांच्याकडून दिल्या जातील, असा विचार करणे हे देखील मूर्खपणाचे आहे. आपण मूर्ख आहोत की, आपण म्हणत आहोत ते समर्थन देतील.

अध्यक्ष महोदय, आदिवासींना ताकद देणे, एससी-एसटींना ताकद देणे, मुसलमानांना ताकद देणे याबाबत यांच्याकडून स्वागत आणि ते शांत बसून तुमचे भाषण ऐकतील, हे कदापि शक्य नव्हते. त्यामुळे त्यावेळी जे घडायचे ते घडले. माननीय अर्थमंत्र्यांना माझे निवेदन आहे की, येत्या सन २०११ च्या सेन्ससमध्ये अर्बनायझेशनच्या प्रोसेसमध्ये अर्बनायझेशन ५३ टक्क्यांवर गेलेले असेल. आपल्याला त्या प्रोसेसमध्ये अर्बन भागासाठी जास्त तरतूद ठेवण्याची गरज आहे. परंतु, तशी तरतूद या बजेटरी प्रोव्हिजनमध्ये दिसत नाही. वाढती लोकसंख्या बघता येणाऱ्या काळात शहरांना सोयीसुविधा देण्यासाठी जास्त रकमेची तरतूद करावी.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पामध्ये मेट्रो रेल, मोनो रेल संदर्भात बजेटरी प्रोव्हिजन केली आहे. मी शासनाला सांगू इच्छितो की, ठाण्याच्या आजुबाजूच्या परिसरातील रेल्वे ट्रान्सपोर्ट, वॉटर ट्रान्सपोर्ट व रोड ट्रान्सपोर्ट या तिन्ही समस्या दूर झाल्या पाहिजेत. मुंबई व ठाणे अशा २ जिल्ह्यांचा एकत्रितरित्या कम्पोझिट प्लॅन तयार करून या समस्या सोडवित नाहीत, तोपर्यंत काही खरे नाही.

अध्यक्ष महोदय, ठाण्यामध्ये जेएनपीटी हे मुख्य पोर्ट आहे, ठाण्यामध्ये मुख्य एअरपोर्ट येत आहे. या दोन्ही गोष्टींचा विचार केला तर ठाणे जिल्ह्यामध्ये वाहतूक वाढणार आहे. आपण नाशिकहून नॉर्थला जातो आणि पुण्याहून साऊथला जातो, अहमदाबादला जातो. अहमदाबादला जातात ते सगळे रस्ते ठाणे जिल्ह्यातून जातात. त्यामुळे या रस्त्यांवरील वाहतूक वाढणार आहे. केंद्र शासन व राज्य शासन यांनी या रस्त्यांचा विचार करून ठाणे महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका, मिरा-भाईंदर महानगरपालिका, भिवंडी महानगरपालिका या सगळ्यांसाठी भरीव आर्थिक तरतूद फक्त रस्ते, रेल्वे या प्रोजेक्टसाठी करून ठाणेकरांना जरा दिलासा द्यावा. ठाणेकर ठाणे स्टेशनवरुन घरी जाण्यासाठी निघतो, कल्याणहून निघून भिवंडीला जायला निघतो, १५ मिनिटांवर असलेल्या घरामध्ये

[ श्री. जितेंद्र आव्हाड ]

जायला त्यांना दीड तास लागतो. कारण पर्यायी रस्ते उपलब्ध नाहीत. सगळी वाहतूक एकत्रितपणे शहरातून जात आहे. आपण यासाठी कोणती तरी उपाययोजना किंवा कम्पोझिट मास्टर प्लॅन तयार करण्याची गरज आहे. आपण तशाप्रकारे प्लॅन तयार करावा.

अध्यक्ष महोदय, मी आपल्या माध्यमातून माननीय अर्थमंत्र्यांना विनंती करतो की, जीवनदायी योजनेला त्यांनी भरीव मदत करावी. कारण ही गोरगरिबांशी संबंधित असलेली योजना आहे. ही हेल्थ पॉलिसी आहे. महाराष्ट्राच्या आरोग्याला दिशा देणारी योजना आहे. माणसाच्या छातीत ब्लॉक निर्माण झाला तर माणसाने छातीत धडकी भरुनच जीव द्यावयाचा आहे. कारण काय तर स्ट्रेनची किंमत ८० हजार रुपये आणि ऑपरेशनची किंमत अडीच लाख रुपये आहे. सर्वसामान्यांना हा खर्च परवडणार आहे का ? यासाठी कोणत्या तरी योजनेच्या माध्यमातून आपण जर त्यांना दिलासा दिला तर या गरीब लोकांना कोठे तरी आपण जीवंत राहू शकू, बदललेल्या परिस्थितीत आपल्याला शासनाने ताकद दिलेली आहे, असे वाटेल.

अध्यक्ष महोदय, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी इंटरनॅशनल स्पोर्टस् युनिव्हर्सिटी निर्माण करण्याचे जाहीर केले आहे. त्यासाठी आपण जागाही दिलेली आहे. पण तरतूद केलेली नाही. यासाठी भरीव तरतूद करावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, कुस्तीगिरांच्या मानधनामध्ये वाढ केली आहे, ही स्वागतार्ह बाब आहे. पण मानधनात वाढ करीत असतांना इतर क्षेत्रामध्ये भरीव कामगिरी करणाऱ्यांना, आंतरराष्ट्रीय कामगिरी करणाऱ्यांना देखील थोडे फार मानधन द्यावे आणि ते मानधन सन्मानास्पद असावे, अशी मागणी मी या ठिकाणी करीत आहे.

अध्यक्ष महोदय, मुंब्रा येथे मागील वर्षी उर्दू युनिव्हर्सिटी जाहीर झाली होती. ती युनिव्हर्सिटी मुंब्रा येथेच ठेवावी, ही देखील माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. एकनाथराव खडसेसाहेबांनी आरएसएसने तयार केलेला एक अहवाल वाचून दाखविला आहे. ज्यामध्ये गुजरात राज्याला नंबर १ वर नेऊन ठेवलेले आहे. महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे. महाराष्ट्र राज्याचे आदर्श महात्मा गांधी आहेत. आम्हाला गुजरातचा आदर्श घेण्याची गरज नाही. जिथे गांधी विचारांचीच हत्या झाली, अशा गुजरातशी आम्हाला स्पर्धाही करायची नाही. आमच्या विकासाला मानवतेचा स्पर्श आहे. आमचा धर्म हा मनुष्य धर्म आहे. पण ज्या ठिकाणी माणसांची मानवतेचे नाते तोडून हत्या करण्यात आली, जिथे मानव धर्माची हत्या करण्यात आली, त्या गुजरातचा आदर्श आम्हाला कोठेही घ्यायचा नाही, हे मी या ठिकाणी स्पष्टपणे सांगणार आहे.

अध्यक्ष महोदय, जाता जाता मी एवढेच सांगू इच्छितो की, बळीराजा हा कृषक समाजासाठी झटत होता. त्या काळातील मनुवाद्यांना त्रास झाला म्हणून त्याची हत्या झाली. ज्या शिवाजी महाराजांनी गोरगरिबांसाठी योजना आणल्या, गरिबांना एकत्र केले, त्यांना हे "राजा" म्हणू शकले नाहीत, त्यांचा राज्याभिषेक करता आला नाही. ज्या महात्मा फुले यांची पत्नी सावित्रीबाई आम्हाला शिकविण्यासाठी बाहेर पडली, आमच्या सारखी मुले त्यांचीच निर्मिती आहे, त्यांना शेणगोटे मारणारी हीच जमात आहे.

[ श्री. जितेंद्र आव्हाड ]

ज्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वर्गापासून वंचित ठेऊन बाहेर काढण्याचा प्रयत्न केला आणि ज्यांनी नंतर देशाची घटना लिहिली, त्यांचे प्रतिनिधीत्व करणारी हीच जमात आहे. म्हणून आम्ही सांगू इच्छितो की, आता लोकशाही आहे. आता एकलव्याचा अंगठा मागितला म्हणून आम्ही एकलव्यासारखा अंगठा देणार नाही. तुकारामाच्या गाथा बुडविण्याचा प्रयत्न केला तर आम्ही त्या बुडवू देणार नाही. आम्ही लोकशाहीमधील जीवंत आदर्श आहोत. आम्ही तुमच्या दादागिरीला न घाबरता..... (गोंधळ) अध्यक्ष महोदय, गडबड झाली, गोंधळ झाला म्हणून आता बहुजन घाबरणार नाहीत. जो कोणी तुकारामाच्या गाथा बुडवेल, त्या गाथा बाजूला काढून, त्यालाच बुडविल्याशिवाय आता हा समाज शांत बसणार नाही. जो एकलव्याचा अंगठा मागेल त्याची बोटे काढल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही. म्हणून बळीराजाच्या हिताचा, या राज्याला दिशा देणाऱ्या अर्थसंकल्पाचे स्वागत करून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद. जय महाराष्ट्र.

**श्री. रवींद्र वायकर** (जोगेश्वरी पूर्व) **:** अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पावर मी माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय अर्थमंत्र्यांनी सभागृहात अर्थसंकल्प सादर केला त्या दिवसापासून आम्हाला विधान भवनाच्या पायऱ्यांवर बसावे लागले. (..अडथळा...) अध्यक्ष महोदय, आम्ही विधान भवनाच्या पायऱ्यांवर बसलो होतो. आम्ही दोन तासापूर्वीच सभागृहामध्ये आलेलो आहोत. त्यामुळे आम्हाला अर्थसंकल्पावरील भाषणाची तयारी करता आलेली नाही. परंतु आमच्या मनामध्ये एक प्रकारची चीड आहे. आम्ही ज्या मतदारसंघातून निवडून येतो त्या मतदारसंघात विकासाची कामे झाली पाहिजेत. परंतु आम्हाला जर न्याय मिळत नसेल तर आम्ही न्याय कोठे मागणार ? आम्ही या सभागृहामध्येच न्याय मागणार आहोत. आम्ही कोणाकडून अपेक्षा करणार आहोत ? आम्ही माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांच्याकडूनच अपेक्षा करणार आहोत. आम्ही जो अट्टाहास केला होता तो यासाठीच केला होता. दुसरे कोणतेही कारण नव्हते. मी सांगू इच्छितो की,

"आप्तगण सवंगडी स्वार्थी,
फक्त विचार करती आपुल्याच पुरता,
संवेदना झाल्या निर्विकारी,
नको गर्व तो अहंकारी,
हे माझे, तेही हवे मज न मिळे
तर पोटात येई शूळ द्वेष भावनेचा,
मी कोण, माझे काय नसे विचार त्याचा,
अनर्थातील मार्गात कसा सापडेल श्वास विश्वासाचा,
नाही स्थिर काहीच कोणाचा,
हे माझे, ते ही माझे विचारच स्वार्थचा."

अध्यक्ष महोदय, आम्ही मुंबई शहरातील ज्या विभागातील वॉर्डमध्ये राहतो त्या विभागामध्ये विकासाची कामे करणे....

**श्री. नवाब मलिक :** अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रवींद्र वायकर या सभागृहाचे सदस्य आहेत. ते भाषणामध्ये मी वॉर्डमधून निवडून आलो असे म्हणाले. मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. रवींद्र वायकर नगरसेवक नाहीत.

**श्री. रवींद्र वायकर :** अध्यक्ष महोदय, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडे असलेल्या विभागांच्या माध्यमातून विकास कामे करण्याकरिता २५ हजार कोटी रुपये आणि कॉंग्रेस पक्षाकडे असलेल्या विभागांच्या माध्यमातून विकास कामे करण्याकरिता १६ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु विरोधी पक्षातील आमदारांच्या मतदारसंघातील विकास कामांचे काय ?

अध्यक्ष महोदय, माननीय अर्थमंत्री महोदयांनी रुपया कसा येतो आणि कसा जातो याची संक्षिप्त रुपरेषा दिलेली आहे. मी आपल्याला रुपयाचे वर्गीकरण सांगतो. आपल्याला केंद्र शासनाकडून १.२१ टक्के इतका निधी प्राप्त होतो. राज्य शासनाकडून कर्जाच्या माध्यमातून १५.५७ टक्के, लोकलेखाच्या माध्यमातून ४.११ टक्के, शासनाची कर्ज व अग्रीमे यांची वसुली यांच्या माध्यमातून ०.३१ टक्के, केंद्र शासनाकडून सहाय्य ९.३२ टक्के निधी प्राप्त होतो. त्यात राज्याचा स्वत:चा महसूल मात्र जास्त आहे त्याचे प्रमाण ५४.२८ टक्के इतके आहे. केंद्रीय करामधील हिस्सा, जो कर या राज्यातून जातो त्यातील हिस्सा ८.९० टक्के इतका आहे. राज्याचा स्वत:चा करेत्तर महसूल (ओन नॉन टॅक्सेस) ६.३१ टक्के इतका आहे. अशा प्रकारे आपल्याकडे रुपया आल्यानंतर महसूल व भांडवली लेख्यावरील जमेचा तपशील १,५४,१८०.३९ कोटी रुपये इतका आहे. खर्चाचे विश्लेषण करायचे झाल्यास त्यात महसूली व भांडवली लेख्यांवरील विकास व विकासात्मक खर्च १,५४,१२४.८७ कोटी रुपये इतका दर्शविलेला आहे. जमेच्या रकमेमधून विकासात्मक खर्चाची रक्कम वजा केल्यास ५५.५२ कोटी रुपयांची रक्कम सरप्लस दाखविलेली आहे. ही सरप्लस रक्कम दर्शवितांना रुपया कसा खर्च होतो, ही बाब सद्धा दर्शविण्यात आली आहे. ज्या पद्धतीने रुपया येतो त्याच पद्धतीने तो खर्च होत असतो.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पात सन २०११-१२ मध्ये राज्य शासनाने दिलेली कर्जे व आगाऊ रकमा यासाठी ५८ टक्के रक्कम दर्शविली आहे. ४१ कोटी रुपयांच्या भांडवली खर्चामध्ये १४.५६ कोटी रुपयांचा खर्च दर्शविण्यात आला आहे. व्याजावरील पेमेंटसाठी १२.३ टक्के व जनरल सर्व्हीसच्या बाबतीत १६.४९ टक्के दर्शविलेली आहे. पेमेंट ऑफ पब्लिक डेबीटच्या बाबतीत ६.०६ टक्के व सोशल सर्व्हीसेसच्या माध्यमातून ३६.६९ टक्के दर्शविलेली आहे. इकोनॉमिक सर्व्हीसच्या बाबतीत १३.०३ टक्के आणि स्थानिक संस्थांना सहाय्य यासाठी ०.५५ टक्के दर्शविलेली आहे. अध्यक्ष महोदय, मुंबई महानगरपालिकेला शासनाकडून किती येणे बाकी आहे यासंबंधी मी नंतर बोलणार आहे. परंतु संपूर्ण अर्थसंकल्प व जिल्हा नियोजन वार्षिक अहवाल पाहिल्यानंतर मुंबई शहरासाठी अर्थसंकल्पात फार कमी तरतूद करण्यात आली आहे. असे दिसून येते.

अध्यक्ष महोदय, पृष्ठ क्रमांक ३९ वर मुंबई शहराकरिता पशु वैद्यकीय दवाखाने, त्यांची बांधकामे व त्यांना औषधी पुरविण्यासाठी एका रुपयाची देखील तरतूद करण्यात आलेली नाही. अशा प्रकारे पशु वैद्यकीय दवाखान्यांसाठी "शून्य" तरतूद करण्यात आली. माझ्या मतदार संघातील आरे कॉलनीत पशु वैद्यकीय दवाखाने आहेत...

**उपाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य, हे सर्व मुद्दे आपल्याला परफॉरमन्स बजेटवर चर्चा करताना उपस्थित करता येतील.

**श्री. रवींद्र वायकर :** अध्यक्ष महोदय, मी मुंबई शहर व उपनगरांच्या बाबतीत या ठिकाणी बोलत आहे व त्या अनुषंगाने माझ्या मतदार संघातील महत्वाच्या बाबी सांगत आहे. पशु संवर्धन विभागाच्या संदर्भात प्रचार व प्रसार कार्यक्रमासाठी निधीची उपलब्धता "शून्य" आहे.

पृष्ठ क्रमांक ४१ वर एकात्मिक कुकूट विकास कार्यक्रमाकरिता निधी दिलेला नाही, दुभत्या जनावरांसाठी निधी नाही. याचा अर्थ आरे कॉलनीत असलेल्या गायींसाठी शासनाने निधी उपलब्ध करून दिलेला नाही.

पृष्ठ क्रमांक ४४ वर पशु वैद्यकीय दवाखाना, प्रथमोपचार केंद्राची स्थापना इत्यादी गोष्टी दर्शविलेल्या आहेत. परंतु शासनाने त्यासाठी निधी उपलब्ध करून दिलेला नाही.

मला ही बाब दाखवून सभागृहाला दाखवून द्यावयाची आहे की, गेल्या ३ दिवसांपासून आम्ही सभागृहाच्या बाहेर होतो. शासनाने वार्षिक नियोजन अहवाल पुस्तकाच्या माध्यमातून आमच्या वार्डसाठी ज्या योजना आहेत, त्यांच्यासाठी काय दिले आहे ?

**अनेक सन्माननीय सदस्य :** अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य या ठिकाणी "वार्ड" असा उल्लेख करीत आहेत.

**श्री. रवींद्र वायकर :** अध्यक्ष महोदय, मत्स्यबीज केंद्राचे बांधकाम, सुधारणा, आधुनिकीकरण मुंबई शहरासाठी निधीची तरतुद नाही. पृष्ठ क्रमांक ६७, आदिवासी शेतकरी कुटूंबाला दारिद्र्यरेषेवर आणण्यासाठी सहाय्य निधीची तरतुद नाही. पृष्ठ क्रमांक ७०, शिवाजी महाराजांचा पुतळा समुद्रात उभारण्यात येईल. पण राष्ट्रपुरुष, थोर व्यक्ती, स्मारके, पुतळे यांच्यासाठी एकाही रुपयांची तरतूद नाही. गेल्या वर्षी अर्थसंकल्पामध्ये जी आश्वासने आम्हाला दिली होती, त्यासाठी आवश्यक ती तरतूद केलेली नाही. पृष्ठ क्रमांक ८३ जिल्हा ग्रंथालयाची स्थापना, बांधकाम, विकासासाठी मुंबई उपनगरात एकाही रुपयांची तरतूद करण्यात आलेली नाही. पृष्ठ क्रमांक ८५ जिल्ह्यांमध्ये मुलींची वसतीगृहे जोडणे, शहर आणि उपनगरास एकाही रुपयांचा निधी दिलेला नाही. पृष्ठ क्रमांक ९३, शासकीय तंत्रशाळा बांधणे यासाठी देखील शहर आणि उपनगरास एकाही रुपयांचा निधी दिलेला नाही. पूर नियंत्रणाची कामे करण्यासाठी निधीची तरतूद करण्यात आलेली नाही. दलित वस्ती पदपथ, स्ट्रीट लाईटासाठी देखील आवश्यक त्या निधीची तरतुद करण्यात आलेली नाही. अंगणवाडी इमारत बांधकामासाठी आवश्यक त्या निधीची तरतूद करण्यात आलेली नाही. महिलांचे बळकटीकरण आणि आर्थिक विकास करण्यासाठी मुंबई उपनगरास फक्त ५० हजार रुपयांचा निधी दिलेला आहे. सामुहिक विवाह सोहळ्यासाठी मुंबई उपनगरास कोणत्याही प्रकारे निधी दिलेला नाही. महिला व बालकल्याण समितीसाठी फक्त ५० लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. आयुर्वेद, युनानी दवाखान्याचे बांधकाम दुरुस्तीसाठी कोणत्याही प्रकारे निधीची तरतूद केलेली नाही. आरोग्य उप केंद्राचे बांधकाम विस्तारीत करण्यासाठी मुंबई उपनगरास आवश्यक त्या निधीची तरतूद करण्यात आलेली नाही. प्राथमिक आरोग्य केंद्राचे बळकटीकरण करण्यासाठी निधीची तरतूद करण्यात आलेली नाही. अशा पद्धतीने अर्थसंकल्पाच्या पुस्तकामध्ये निधीचे वाटप होणार असेल तर ते अत्यंत चुकीचे आहे.

अध्यक्ष महोदय, मार्च २०१० मध्ये १ लाख २९ हजार ४९९ रुपयांची मूळ पुरवणी मागणी होती. जुलैमध्ये १० हजार १६९ कोटी ३१ लाख ५१ हजार रुपयांची पुरवणी मागणी केली होती. डिसेंबरमध्ये

**[ श्री. रवींद्र वायकर ]**

७ हजार १६८ कोटी ४६ लाख रुपयांची पुरवणी मागणी केली होती. यावर्षी ५ हजार ८८५ कोटी ४५ लाख ९० हजार रुपयांची पुरवणी मागणी केली आहे. म्हणजेच शासनाने २३ हजार २२३ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या केलेल्या आहेत. यामध्ये मुंबई शहरासाठी काय केले असा प्रश्न आमच्यासमोर उपस्थित राहत आहे. त्यावेळी या विषयाच्या संदर्भात एक बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. गिरीष बापट सद्धा बैठकीला उपस्थित होते. त्यावेळी सांगितले होते की, एका नगरसेवकाला ६० लाख रुपयांचा निधी असेल आणि एका विधानसभेच्या वॉर्डमध्ये ७ नगरसेवक येत असतील तर त्यांचा निधी हा ४ कोटी २० लाखांचा होतो. त्याच ठिकाणी १ कोटी ५० लाखांचा निधी हा एका आमदाराचा असेल....

**उपाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री. प्रवीण दरेकर यांनी भाषणाला सुरूवात करावी.

**श्री. रवींद्र वायकर :** अध्यक्ष महोदय, अजून माझी भाषणाला सुरूवात झालेली नाही.

**उपाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री. रवींद्र वायकर यांच्या भाषणाला जवळ जवळ १४ मिनिटे झालेली आहेत. तरी सन्माननीय सदस्य श्री. रवींद्र वायकर यांनी भाषण लवकरात लवकर संपवावे.

**श्री. रवींद्र वायकर :** अध्यक्ष महोदय, मी जनरली अर्थसंकल्पावरच भाषण करीत आहे.

अध्यक्ष महोदय राज्याच्या वार्षिक योजनेचे आकारमान ४१ हजार ५०० कोटी रुपये आहे. मागील वर्षी जिल्हा योजना ४ हजार ३१९ कोटी ५० हजार रुपयांची होती. राज्याच्या योजनांमध्ये यंदा वाढ झालेली आहे. अर्थसंकल्पाच्या संदर्भात सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना तीव्र होत्या. त्या भावना मागील काही दिवसांमध्ये येथे उमटल्या. तीच भावना आता देखील आमच्या मनात आहे. त्यावेळी शासनाने काही सदस्यांना निलंबित केले होते. आता त्यांचे निलंबन मागे घेण्यात आले आहे. त्या बद्दल मी आपल्याला धन्यवाद देऊ इच्छितो. ज्या कारणासाठी सदस्यांना निलंबित केले होते, त्या कारणाच्या अनुषंगाने मी आपणास सांगू इच्छितो की, आज विरोधी पक्षातील कोणताही सदस्य खूष नाही, समाधानी नाही. अर्थसंकल्पावरील चर्चेच्या माध्यमातून माननीय वित्त मंत्री श्री. अजित पवार यांना मी विनंती करू इच्छितो की, आपल्या शहराचा विकास करण्याकरिता आमदारांना मदत दिली तर, तेथील विकासात्मक कामे सुरू करून विभागाला आम्ही अधिकाधिक न्याय देऊ शकू. मला या ठिकाणी बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले धन्यवाद व्यक्त करून माझे भाषण पूर्ण करतो.

**श्री. गोपालदास अग्रवाल** (गोंदिया) **:** अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण जी के नेतृत्व की लोकशाही आघाड़ी की सरकार की ओर से माननीय उपमुख्यमंत्री एवं वित्त मंत्री श्री. अजितदादा पवार ने यह पहला बजट प्रस्तुत किया है. यह बजट मानवीय चेहरे के साथ-साथ वास्तववादी बजट है, ऐसा मेरा मानना है. माननीय वित्त मंत्री जी ने पॉलिटिकली एवं इकॉनोमिकली इस तरह का एक परफेक्ट बजट पेश किया है. माननीय वित्त मंत्री जी ने अपने साहसवादी रवैये को त्याग कर पहली बार वास्तववादी बजट पेश किया है, ऐसा मैं मानता हूं नहीं तो २-४ हजार करोड़ रुपये अन्य प्रमुख योजनाओं के लिए दिखाकर और कर वृद्धि का बहुत बड़ा आराखड़ा तैयार करके यह बजट प्रस्तुत किया जा सकता था. माननीय वित्त मंत्री जी ने आर्थिक अनुशासन, खर्च पर नियंत्रण और आम आदमी को दिलासा दिये जाने को ही मुख्य केन्द्र बिन्दु मानकर इस बजट को पेश किया है इसलिए मैं उनका अभिनंदन करता हूं.

[ श्री. गोपालदास अग्रवाल ]

अध्यक्ष महोदय, दादा के बारे में कहा जाता है कि दादागिरी नहीं चलेगी, लेकिन इस राज्य में अगर आर्थिक नियंत्रण रखना है तो बिना दादागिरी के आर्थिक नियंत्रण नहीं रखा जा सकता है. अध्यक्ष महोदय, १० हजार करोड़ रुपये के राजस्व की अतिरिक्त वसूली हुई है. पिछले साल ९७ हजार करोड़ रुपये अनुमानित आय थी. बिक्री कर की २६ प्रतिशत ज्यादा वसूली हुई है. मुद्रांक शुल्क की ३० प्रतिशत ज्यादा वसूली हुई है. मैं यहां कहना चाहूंगा कि यह जो वसूली हुई है वह दादागिरी के बिना नहीं हुई है अन्यथा अपीलों पर स्टे देने का काम और आपसी जोड़ तोड़ करके टैक्स माफी का काम होता रहता है. इसके साथ ही अगर अधिकारियों पर नियंत्रण नहीं रखा जाता है तो वसूली के लक्ष्य को पूरा नहीं किया जा सकता है. अध्यक्ष महोदय, वर्ष २०१०-११ में १० हजार करोड़ रुपये की अधिक वसूली के कारण चालू वर्ष का घाटा ५ हजार ६०० करोड़ रुपये तक पहुंच पाया, वहीं इस वर्ष २०११-१२ का ५८ करोड़ रुपये का बचत का बजट हमारे वित्त मंत्री महोदय ने प्रस्तुत किया है. इस राज्य की आर्थिक परिस्थिति कभी न कभी सुधरेगी एवं इस राज्य में आर्थिक अनुशासन स्थापित होगा, ऐसी आशा की किरण इस बजट के माध्यम से लोगों को दिखाई देती है. मैं जानता हूं कि केन्द्र सरकार के बजट के आधार पर जो देश की आर्थिक परिस्थिति का अवलोकन होता है वैसा हमारे राज्य के बजट से परिलक्षित नहीं होता है लेकिन फिर भी एक ईमानदार कोशिश इस बजट के माध्यम से की गई है.

अध्यक्ष महोदय, इस बजट के माध्यम से आम आदमी को राहत देने के साथ-साथ जीवनावश्यक वस्तुओं के भावों पर नियंत्रण रखने की कोशिश की गई है. अध्यक्ष महोदय, इस बजट में १ लाख २१ हजार ५०३ करोड़ रुपये की राजस्व आय बताई गई है, वहीं १ लाख २१ हजार ४४५ करोड़ रुपये के खर्चे की जानकारी दी गई है. अध्यक्ष महोदय, इस बजट में ४१ हजार ५०० करोड़ रुपये का प्लान एस्टीमेट तैयार किया गया है जो अभी तक के पिछले तमाम् बजटों के मुकाबले में बहुत ज्यादा है. इसी प्रकार से जिला विकास निधि में करीब ५०० करोड़ रुपये की वृद्धि की गई है. डीपीडीसी के माध्यम से होने वाले कामों के लिए पिछले साल जो ३८०० करोड़ रुपये का प्रोवीजन किया गया था उसकी तुलना में इस बार ४३०० करोड़ रुपये का प्रोवीजन राज्य के ३५ जिलों के लिए किया गया है. इसी के साथ-साथ इस निधि में कई जिलों के लिए तो २०-२० प्रतिशत तक की वृद्धि की गई है. अध्यक्ष महोदय, मैं गोंदिया जिले के बारे में बताना चाहूंगा कि इस जिले के लिए जिला विकास निधि में मात्र ९ प्रतिशत की ही बढ़ोत्तरी की गई है, वहीं दूसरी ओर भंडारा, नागपुर, पुणे और मुंबई के लिए जिला विकास निधि में २० प्रतिशत की बढ़ोत्तरी की गई है. मेरी वित्त मंत्री महोदय से विनती है कि चूंकि गोंदिया और पुणे का हाल एक समान है तो गोंदिया जिले की जिला विकास निधि में भी २० प्रतिशत की बढ़ोत्तरी की जाय.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र राज्य की जनसंख्या ९ करोड़ ८० लाख से बढ़कर ११ करोड़ ८३ लाख हो गई है, वहीं दूसरी ओर नागरीय क्षेत्र की आबादी ५३ प्रतिशत हो गई है. हम जानते हैं कि कृषि की विकास दर के कारण ही हम इस विश्व मंदी के दौर का मुकाबला कर सके हैं. राज्य की ग्रामीण अर्थ व्यवस्था को सुधारने के लिए भरपूर मदद देने का काम इस बजट के माध्यम से हुआ है. केन्द्र सरकार की सहायता के माध्यम से और अनेक योजनाओं के माध्यम से ग्रामीण अर्थ व्यवस्था को

[ श्री. गोपालदास अग्रवाल ]

सुधारने के लिए १० हजार करोड़ रुपये से ज्यादा की योजनायें तैयार की गई हैं, चाहे वह ३ हजार करोड़ रुपये की बिजली के बिलों की माफी हो, चाहे वह २.५ हजार करोड़ रुपये बिजली की दरों में एवं ब्याज में कमी हो, चाहे वह ५० हजार रुपये तक मिलने वाले कर्ज की ब्याज माफी हो, चाहे वह ३ लाख रुपये तक मिलने वाले कर्ज की ब्याज २ प्रतिशत हो. इस प्रकार से इस बजट में १० हजार करोड़ रुपये की विभिन्न योजनाओं के माध्यम से कृषि के विकास के साथ-साथ ग्रामीण अर्थ व्यवस्था को सुधारने का काम किया गया है.

अध्यक्ष महोदय, वर्ष २०११-१२ पर्यटन वर्ष घोषित किया गया है और इसके लिए भरपूर प्रोवीजन इस बजट में किया गया है. इसका मैं स्वागत करता हूं. अध्यक्ष महोदय, मैं श्री अजितदादा के लिए विशेष उल्लेख करना चाहूंगा कि च्बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले.छ माननीय वित्त मंत्री जी ने बजट पेश करने के बाद कहा था कि वह बहुत कुछ करना चाहते हैं लेकिन जो वह कर सकते हैं उसी को बजट में लिया गया है. एक पक्के इरादे के साथ में उन्होंने यह बजट पेश किया है लेकिन मैं उन्हें याद दिलाना चाहता हूं कि पिछले साल पूर्व वित्त मंत्री जी ने तीन मेडीकल कॉलेज घोषित किये थे लेकिन उनका अभी कोई अता-पता नहीं है. हमारे गोंदिया जिले के लिए भी एक मेडीकल कॉलेज की घोषणा की गई थी परन्तु उसका भी कोई अता-पता नहीं है.

अध्यक्ष महोदय, पिछले साल राजीव गांधी जीवनदायी योजना के लिए २.५ करोड़ रुपये का प्रावधान किया गया था. पूरे साल में एक भी काम नहीं हुआ. पिछले साल ढ़ाई करोड़ रुपये दिए गए थे. इस साल ढ़ाई सौ करोड़ रुपये दे रहे है. लेकिन वह भी राशि आठ जिलों को ही मिल रही है. इस चर्चा के माध्यम से मैं सरकार से विनती करना चाहता हूं कि यह जीवनदायी योजना पूरे राज्य में लागू होनी चाहिए.

अध्यक्ष महोदय, चंद्रपुर, गडचिरोली, भंडारा और गोंदिया जिले में बांबू पर आधारित उद्योग लगाने की बात पिछले बजट में की गई थी. लेकिन इस बारे में भी कुछ काम नहीं हुआ है. मैं इस बात का उल्लेख इसलिए करना चाहता हूं कि वास्तविकता से परे जाकर, बड़ी बड़ी घोषणाएं करने के बजाय, माननीय वित्त मंत्री ने इस बजट में, जो कुछ वह कर सकते है, उसको पूरे विश्वास के साथ, पूरी ईमानदारी के साथ करने का निर्णय लिया है.

अध्यक्ष महोदय, यहां पर उल्लेख किया गया कि गुजरात में उद्योग बढ़ रहे है. उद्योगों में निवेश बढ़ा है. लेकिन हमारे पास च्आर्थिक पाहणीछ का जो चित्र आया है, उससे ऐसा दिखायी देता है कि भले ही गुजरात में उद्योग बढ़े हुए हो लेकिन रोजगार के साधन गुजरात से ज्यादा महाराष्ट्र में बढ़े है, इस बात को नकारा नही जा सकता. उद्योग बढ़ाने के साथ साथ लोगों को रोजगार उपलब्ध कराने का हमारा जो मूल उद्देश्य है, उस ओर जरुर ध्यान दिया जा रहा है. इसके लिए मैं राज्य सरकार का स्वागत करना चाहता हूं.

अध्यक्ष महोदय, हमारे माननीय वित्त मंत्री जी ने सम्माननीय सदस्य श्री. रमेश वांजले जी के गॉगल को देखकर, गॉगल पर साढ़े बारह प्रतिशत टॅक्स लगाने का निर्णय लिया है. हमने अखबारों में पढ़ा कि श्री. वांजलेसाहब का गॉगल २५ लाख रुपये का है. इसलिए माननीय वित्त मंत्री जी ने गॉगल पर साढ़े बारह प्रतिशत टॅक्स लगा दिया. मेरा गॉगल तो एक हजार रुपये का है. मैं जानता नहीं कि कोई

[ श्री. गोपालदास अग्रवाल ]

गॉगल पॉच-दस हजार रुपये का होता है. गॉगल सर्वसामान्य लोगों को राहत देने वाला है. इसलिए दस हजार रुपये तक के तमाम गॉगल की खरीदी पर टॅक्स में पूर्ण माफी देने का निर्णय जरुर माननीय वित्त मंत्री लेंगे, ऐसी मैं उनसे विनती करना चाहता हूं.

अध्यक्ष महोदय, मुंबई में बढ़ती हुई गुन्हेगारी को ध्यान में रखते हुए पांच हजार सीसीटीवी लगाने के संबंध में एक बहुत अच्छा निर्णय राज्य सरकार ने लिया है, उस बात का भी मैं स्वागत करता हूं.

अध्यक्ष महोदय, आंगणवाड़ी के पोषण आहार के संबंध में एक रुपया, प्रति लाभार्थी, प्रति दिन की बढ़ोत्तरी करने का निर्णय लिया गया, जिसके लिए २३१ करोड़ रुपये का प्रावधान किया गया. इसके साथ साथ शहरी क्षेत्रों में, आंगणवाड़ी के लिए किराया देने की भी व्यवस्था की गई है. यह एक अच्छी योजना की शुरुवात है. इसके लिए भी मैं माननीय मंत्री महोदय का मैं स्वागत करता हूं.

अध्यक्ष महोदय, करीब दो लाख हेक्टर की नवीन सिंचन क्षमता, ६३०० करोड़ रुपये खर्च कर के अगले वर्ष स्थापित की जाने वाली है. इसलिए मैं माननीय वित्त मंत्री जी से विनती करता हूं कि जो दो लाख हेक्टर का आपने ध्येय रखा है, उसे पूरा करने के लिए....और यदि जरुरत पड़ी, ६३०० करोड़ रुपये की राशि को बढ़ाना पड़ा तो उसे बढ़ाने का भी आप जरुर निर्णय लेंगे, ऐसी आशा करता हूं. जैसा कि मैंने पहले ही कहा है ५३ प्रतिशत आबादी इस राज्य में नागरी क्षेत्र में रहती है. लेकिन नागरी क्षेत्र के बारे में हमारे सोचने का नजरीया बहुत अलग है.

अध्यक्ष महोदय, नगरोत्थान योजना के अंतर्गत इस साल ढ़ाई सौ करोड़ रुपया उपलब्ध कराया गया है. हाऊसिंग के लिए करीब करीब १४४० करोड़ रुपया उपलब्ध कराया गया है. जेएनएनयुआरएम योजना के अंतर्गत करीब करीब पच्चीस सौ करोड़ रुपये का प्रावधान केंद्र और राज्य सरकार के हिस्सों को मिलाकर बजट में पेश किया गया है. इस बात का भी मैं स्वागत करता हूं. वरली, हाजीअली और नरीमन पॉईंट के प्रकल्प के बारे में कोई भी उल्लेख बजट में नहीं किया गया. इस बारे में माननीय मंत्री महोदय जरुर उल्लेख करेंगे, ऐसी आशा करता हूं. मैं इस चर्चा के माध्यम से कहना चाहता हूं कि माननीय मंत्री महोदय का जो लक्ष्य है कि दिसम्बर २०१२ तक हमारा पूरा राज्य भार नियमन मुक्त होगा. उस दिशा में उन्होंने काम करना भी शुरु कर दिया है. मैं उम्मीद करता हूं कि वे अपने वादे को पूरा करने में वे कोई कसर बाकी नहीं रखेंगे. वे अपने वादे को पूरा करने में कामयाब होंगे, इसके लिए मैं उनको शुभकामनाएं देता हूं.

अध्यक्ष महोदय, इस वर्ष रस्ते विकास के लिए जो निधि दिया गया और कोई भी नया काम नहीं लिया जा सका, उसके लिए मैं मंत्री महोदय से विनती करना चाहता हूं कि रस्ते विकास के लिए और अधिक निधि उपलब्ध करायी जानी चाहिए थी. उसी प्रकार तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रम के अंतर्गत करीब १७५ करोड़ रुपये का जो प्रावधान किया गया है, उसमें हमारे गोंदिया जिले मे महानुभाव पंथ के "डाकरान सुकड़ी" को भी निधि देने का निर्णय लिया गया है. क्योंकि "ब" वर्ग में उसका चयन हुआ है. इस बारे में भी विचार किया जाएगा, ऐसी मैं आशा व्यक्त करता हूं.

अध्यक्ष महोदय, चंद्रपुर शहर को पांच सौ वर्ष पूरे होने के उपलक्ष्य में, चंद्रपुर के विकास के लिए २५० करोड़ रुपये राशि देने का जो निर्णय लिया है, उसके लिए पूरे विदर्भ के और पूरे चंद्रपुर के लोगों की ओर से मैं सरकार का बहुत बहुत अभिनंदन करना चाहता हूं, बहुत बहुत स्वागत करना चाहता हूं.

[ श्री. गोपालदास अग्रवाल ]

अध्यक्ष महोदय, जीवनावश्यक वस्तुओं पर कोई नया कर नहीं लगाया गया है. वड़ा-पाव हो, सुका मेवा हो, इनके टॅक्स में कमी करने का निर्णय सरकार ने लिया है और आम आदमी को राहत देने का काम सरकार ने किया है, इसके लिए हर क्षेत्र में सरकार का स्वागत हो रहा है. यह अभिनंदनीय काम इस अर्थसंकल्प के माध्यम से जो पेश किया गया है, उसके लिए मैं माननीय वित्त मंत्री महोदय का बहुत बहुत स्वागत करता हूं, बहुत बहुत अभिनंदन करता हूं. इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं, धन्यवाद.

**श्री. प्रवीण दरेकर** (मागाठाणे) **:** अध्यक्ष महाराज, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महाराज, सन २०११-१२ या वर्षाचा अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर माझ्याकडे त्या संदर्भातील प्रतिक्रिया विचारण्यात आली असता मी "काळा अर्थसंकल्प" आहे असे सांगितले होते. परंतु त्यानंतर या अर्थसंकल्पावर बारकाईने लक्ष टाकल्यानंतर माझ्या प्रतिक्रिमध्ये बदल झाला. जत्रेतील "गाजर हलव्या" प्रमाणे या अर्थसंकल्पाबाबत माझे मत बनले.

अध्यक्ष महाराज, गावामध्ये जत्रा असल्यावर त्याठिकाणी अनेक प्रकारचे स्टॉल्स उभारण्यात येतात. अशाच एका स्टॉलवर "पाच रुपयांमध्ये गाजर हलवा" असा बोर्ड लावलेला असतो. त्या स्टॉलवर भरपूर गर्दी असते. त्या स्टॉलवर नेमके काय आहे हे जाणून घेण्याची अनेकांची इच्छा होते. एक जण त्या स्टॅालमध्ये जातो. आत फक्त गाजर लटकवलेले असते आणि पुढे लिहिलेले असते "गाजर हलवा आणि पुढे जा." दुसरा एक जण आत जातो. तो देखील आत तेच दृश्य पाहतो. "गाजर हलवा आणि बाहेर व्हा." तेव्हा या अर्थसंकल्पावर नजर टाकल्यास असे दिसून येते की, अशाच प्रकारे महाराष्ट्रातील जनतेला गाजर दाखविण्याचे काम झालेले आहे.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी उशिरा का होईना मानवी विकास निर्देशांकाच्या आधारावर विकास खर्च करण्याचे ठरविले आहे. मानवी विकास निर्देशांकामध्ये महाराष्ट्र राज्य १२ व्या क्रमांकावर होते. ह्युमन डेव्हलपमेंट इंडेक्सच्या अहवालानुसार उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, ओरिसा, बिहार ही राज्ये अनुक्रमे ३२, ३३, ३४ व ३५ व्या क्रमांकावर होते. परंतु आज आपला मानवी विकास निर्देशांक खूप मोठ्या प्रमाणात घसरलेला आहे. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, ओरिसा, बिहार या राज्यांचा अर्थसंकल्प पाहिला तर, त्या राज्यांमध्ये मानवी विकास निर्देशांक वरच्या क्रमांकावर गेला आहे. महोदय, मागासलेली राज्ये मानवी विकास निर्देशांक वरच्या क्रमांकावर आणत असतील तर, आपण जो अर्थसंकल्प सादर करीत आहोत तो चुकीच्या दिशेने तयार करीत आहोत, हा खऱ्या अर्थाने विचार करण्यासारखा प्रश्न आहे. मानवी विकास निर्देशांकाच्या बाबतीत डॉ. अभय बंग, बाबा आमटे यांनी सामाजिक सूचना केल्या होत्या. परंतु त्या सूचनांकडे लक्ष देण्यासाठी या राज्य सरकारकडे वेळ नाही.

महोदय, या वर्षीच्या अर्थसंकल्पातील संक्षित अर्थसंकल्पाच्या पृष्ठ क्रमांक ७ वर नजर टाकली तर त्यामध्ये योजनेअंतर्गत आणि योजनेत्तर खर्च दाखविला आहे. योजनेअंतर्गत २९ टक्के आणि योजनेत्तर ७१ टक्के खर्च करण्यात आलेला आहे. यानुसार योजनेअंतर्गत ४५७९६ कोटी रुपये आणि योजनेत्तर १ कोटी ८ लाख ३२८ कोटी रुपये खर्च दाखविण्यात आलेला आहे. हा खर्च मागील वर्षाच्या तुलनेत १६.६ टक्क्यांनी वाढलेला आहे. मागील वर्षीच्या ९२,९०२ कोटी रुपयांच्या योजनेतर खर्चाच्या तुलनेत

[ श्री. प्रवीण दरेकर ]

या वर्षी १५,४२६ कोटी रुपयांनी खर्च वाढला आहे. या अर्थसंकल्पात योजनेत्तर बाबींना अतिशय महत्त्व दिले आहे. २००९-१० मध्ये दरडोई महसूली जमा १ कोटी १७ लाख २९३ कोटी होते व दरडोई उत्पन्न ८८८९ रुपये होते. म्हणजेच त्या वेळी ॲव्हरेज लोकसंख्या १३.१९ कोटी धरण्यात आली होती. २०११-१२ मध्ये एकूण जमा १ कोटी ५४ लाख १८० कोटी रुपये व दरडोई उत्पन्न १२१८३ रुपये होते. त्या वेळी ॲव्हरेज १२.६५ कोटी लोकसंख्या धरण्यात आली होती. याचाच अर्थ ५४ लाखांनी आपली लोकसंख्या कमी झाली काय, असा माझा अर्थसंकल्पाच्या माध्यमातून प्रश्न आहे.

महोदय, अर्थसंकल्पात अनेक विभागांसाठी तरतुदी केल्या गेल्या. त्यानुसार अष्टविनायक मंदिरासाठी १० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. देव-देवतांचे नाव घेऊन, अष्टविनायकांकडे पाहिले जाते. परंतु अष्टविनायकांच्या ८ मंदिरांसाठी केवळ एक-सव्वा कोटी रुपये तरतूद करण्यात आली आहे. माननीय मंत्र्यांच्या बंगल्याचा खर्च, विजेचा खर्च काढला तर, तो कोट्यवधी रुपयांच्या वर जातो. परंतु आमचे जी धार्मिक मंदिरे आहेत, दैवते आहेत त्यांच्यासाठी सरसकट १० कोटी रुपयांच्या वर तरतूद होत नाही हे दुर्दैवाने सांगावेसे वाटते.

महोदय, महिलांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षण देण्याची राजकीय घोषणा करण्यात आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना स्थान मिळणार आहे. परंतु महिलांना केवळ राजकीय आरक्षण देऊन चालणार नाही. महिलांची आर्थिक उन्नती, सामाजिक उन्नती व्हावयास पाहिजे. या अर्थसंकल्पामध्ये महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी करण्यात आलेल्या तरतुदीचा विचार केला तर, महिलांच्या राजकीय आरक्षणाबरोबर त्यांच्यासाठी आर्थिक तरतूद करण्यासाठी आम्ही कमी पडलो आहोत हे नाकारुन चालणार नाही.

महोदय, अर्थसंकल्पामध्ये विशाल उद्योगांच्या बाबतीत वल्गना करण्यात आली आहे. २००९-१० पर्यंत १६९ मेगा प्रोजेक्टच्या माध्यमातून १ लाख ४४ हजार ५५६ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. या गुंतवणुकीच्या माध्यमातून २.१५ लाख रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट होते.

अध्यक्ष महोदय, सन २०१०-११ या वर्षामधील प्रकल्पांचे काय झाले ? आपण याची माहिती घेतली तर आपल्याला दिसेल की, बहुतेक प्रकल्प गुजरातला गेले आहेत. सन २०१०-११ या वर्षामध्ये महाराष्ट्रामध्ये किती गुंतवणूक झाली ? आपण मोठमोठे आकडे देतो की, एवढे प्रकल्प आले, एवढी गुंतवणूक केली. आता आपण अर्थसंकल्पाच्या भाषणात आकडे द्या की, महाराष्ट्रात किती उद्योग धंदे उभे राहिले ? आणि त्यांच्या माध्यमातून किती बेरोजगार तरुणांच्या हाताला काम मिळाले ? आपण त्याचे आकडे देणे अत्यंत आवश्यक आहे. आपल्या राज्यातील प्रकल्प दुसऱ्या राज्यात का जात आहेत ? आपण कुठे कमी पडत आहोत, याचे आपण आत्मपरीक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. गुजरात राज्यामध्ये गुजरातचे मुख्यमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांनी उद्योग क्षेत्रात भरारी घेतली, त्यांनी उद्योग क्षेत्राचा विकास केला. आपण तो समजून घेऊन महाराष्ट्रामध्येही तशाच प्रकारचे उद्योगधंदे वाढवावे. आपण या दृष्टीने यद्ध पातळीवर प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, रोजगार हमी योजनेच्या बाबतीत यावर्षी ७४५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. गेल्या वेळी या बाबतीत ३६२ कोटी रुपये खर्च करण्यात आले होते. आपण रोजगार हमी योजनेवर खर्च करतो. परंतु, रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून किती लोकांना रोजगार मिळतो ? किती

[ श्री. प्रवीण दरेकर ]

अधिकारी खोटे मस्टर तयार करतात ? आपल्याकडे यावर नियंत्रण राखणारी कोणत्याही प्रकारची यंत्रणा नाही. शेतमजुराला, गरीबाला गावामध्ये रस्त्यांवर शासनाचे काम करून त्याचा उदरनिर्वाह व्हायला पाहिजे हा जो आपला उद्देश आहे, तो उद्देश सफल होत नाही, हे मला या ठिकाणी सांगावेसे वाटते.

अध्यक्ष महोदय, युवा क्रीडा धोरणासाठी २५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. आपण तरतुदी करत आहात. वेगवेगळ्या खेळांना, कोणत्याही असोसिएशनला आपण ५० लाख रुपये देत आहात. परंतु, आपण त्या ठिकाणी डिव्होटेड प्रोग्रॅम करणे अत्यंत आवश्यक आहे. हरयाणा शासनाने टॅलेंट हंट प्रोग्रॅम, प्ले फॉर इंडिया आणि स्पोर्टर्स ॲन्ड फिजिकल ॲक्टिव्हिटी असा स्मार्ट कार्यक्रम राबविला आहे. ८ ते १९ वयोगटातील २० लाख मुलामुलींनी त्यामध्ये सहभाग घेतला आहे. आपण पाहिले तर दिसेल की, त्यांनी हा एक कलमी कार्यक्रम घेतल्यानंतर, आज बॉक्सिंगमध्ये त्यांचे खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचले आहेत. आपण अशाप्रकारे १-२ आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळ निवडले का ? त्या खेळांना भरीव तरतूद करून खेळाडूला चालना देण्यासाठी प्रयत्न केले आहेत का ? तुम्ही फक्त अनुदाने देता. मंडळांना, असोसिएशनला खिरापती वाटता. परंतु, त्यामधून किती खेळाडू निर्माण होतात ? खेळाचा विकास किती होतो ? आपण याचे आत्मपरिक्षण केले तर आपल्या हाताला काहीही लागत नाही.

अध्यक्ष महोदय, आपण विशेष शाळा दिलेल्या आहेत. १५ जिल्ह्यांत ३३५ शाळा अशा सर्व जिल्ह्यांमध्ये शाळा मंजूर करणे आवश्यक आहे. ज्या जिल्ह्यांमध्ये शाळा नाहीत, त्या जिल्ह्यांमध्ये शाळा देणे अत्यंत आवश्यक आहे. अध्यक्ष महोदय, एमटीडीसीवर फक्त जाहिरातींसाठी २५ कोटी रुपयांची तरतूद आहे. जाहिराती करून कोणाला खिरापती वाटायच्या आहेत ? फक्त एवढ्याचसाठी त्या ठिकाणी खर्च केला गेला आहे. एमटीडीसीमधून किती उत्पन्न येणार आहे, काय होणार आहे, याचा कशालाही ताळमेळ नाही.

अध्यक्ष महोदय, आरोग्य संस्थांच्या बांधकामांसाठी २४१ कोटी ९५ लाख रुपयांची तरतूद केली आहे. आज महाराष्ट्रात आरोग्य संस्थांच्या इमारती यासाठी फार भरीव तरतुदीची आवश्यकता आहे. मुंबई शहरात राज्य शासनाचे हॉस्पिटल आहे. पण उपनगरामध्ये राज्य शासनाचे हॉस्पिटल नाही. अनेकदा सभागृहात ही मागणी केली गेली. परंतु, शासनाला मुंबई उपनगरासाठी तरतूद करण्यासाठी वेळ नाही. माझी माननीय अर्थमंत्र्यांकडे मागणी आहे की, दादा, मुंबई उपनगरामध्ये देखील महाराष्ट्र शासनाचे एक सुसज्ज असे हॉसिपटल होणे आवश्यक आहे. आपण त्यासंदर्भात लक्ष घालावे. शासन या संदर्भात कार्यवाही करेल, अशा प्रकारची अपेक्षा मी व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रात कापूस मोठ्या प्रमाणात उत्पादित केला जातो. देशाच्या साधारण २० टक्के कापूस उत्पादन आपल्या महाराष्ट्रात होते. कापसावर प्रक्रिया करण्याबाबतचा उल्लेख अर्थसंकल्पीय भाषणात आहे. या प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांकरिता वस्त्रोद्योग धोरण जाहीर करण्यात येणार आहे आणि त्यासाठी १०० कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. महाराष्ट्राच्या बाबतीत आपण विचार केला तर राज्यामध्ये विदर्भ, मराठवाडा या भागामध्ये मोठ्या प्रमाणात कापूस उत्पादित होतो. त्यामुळे १०० कोटी रुपयांच्या तरतुदीतून काही होणार नाही. त्यामुळे कापूस प्रक्रियेसाठी ठोस अशी तरतूद करणे आवश्यक आहे. राज्यात सहकारी तत्वावरील अनेक सूतगिरण्या बंद आहेत. सूत गिरण्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे.

[ श्री. प्रवीण दरेकर ]

अध्यक्ष महोदय, एका बाजूला कापसावर प्रक्रिया करण्याबाबत आपण बोलत आहोत. पण दुसऱ्या बाजूला कोकणामध्ये काजू व आंबा मोठ्या प्रमाणात पिकतो. महाराष्ट्राच्या काही भागामध्ये सोयाबीन मोठ्या प्रमाणावर होतो. या मालावर प्रक्रिया उद्योग उभारण्यासाठी कोणतीही तरतूद केलेली नाही. मग समान न्याय आपण सगळयांना देत आहोत का ? याचा विचार आपण केला पाहिजे. दुर्देवाने असे विचारावेसे वाटते की, कोकणातील प्रक्रिया उद्योगांसाठी ५०-१०० कोटी रुपयांची तरतूद माननीय अर्थमंत्र्यांना का करावीशी वाटली नाही ?

अध्यक्ष महोदय, या अर्थसंकल्पामध्ये सांगितले आहे की, ५० हजार रुपयांपर्यंतचे कर्ज शून्य टक्क्यांनी देण्यात येणार आहे आणि ३ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज केवळ २ टक्के व्याजाने दिले जाणार आहे. यासाठी शासनाने ८४ कोटी २८ लाख रुपयांची तरतूद केली आहे. या ठिकाणी सांगण्यात आले आहे की, थकहमी घेण्यात येणार आहे. माननीय उपमुख्यमंत्री हे राज्यातील सहकारी बँकांचे नेतृत्व करतात. महाराष्ट्रातील सहकारी कारखान्यांची थकहमी राज्य शासनाने घेतलेली आहे. अनेक संस्था थकहमी न दिल्यामुळे बंद पडत आहेत. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक अडचणीत आल्यामुळे २७० कोटी रुपये राज्य शासनाकडून दिले जातात. पण ज्या अनेक जिल्हा बँकांनी वेगवेगळया सहकारी संस्थांना कर्ज दिलेले आहे व ज्यांची थकहमी राज्य शासनाने धेतलेली आहे त्या बँकांचा विचारही राज्य शासनाने केला पाहिजे. केवळ राज्य बँकेचा विचार करून चालणार नाही.

अध्यक्ष महोदय, राज्याच्या मागील वर्षाच्या आर्थिक पहाणी अहवालामध्ये उल्लेख केला गेला होता की, ३२ लाख लोकसंख्या या मुंबई शहरात आली. यावेळी ही माहिती देण्याचे राज्य शासनाने जाणीवपूर्वक टाळले आहे. मुंबई शहरावर परप्रांतीयांचे लोंढे आदळत आहेत. रोज परप्रांतियांचे लोंढे मुंबईत येऊ थडकत आहेत. परंतु, हे लोकांसमोर येऊ नये, सभागृहासमोर येऊ नये म्हणून कोणत्याही प्रकारचा उल्लेख आर्थिक पहाणी अहवालामध्ये करण्यात आला नाही.

अध्यक्ष महोदय, पर्यावरणाची ओळख होण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. पर्यावरणाची ओळख आता झाली आहे, लोकांमध्ये जागरुकता निर्माण झाली आहे. पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी कोणती यंत्रणा शासन उभी करणार आहे, याचा विचार होण्याची आवश्यकता आहे. पण त्यासाठी कोणतीही तरतूद झालेली नाही.

अध्यक्ष महोदय, मराठी भाषा विभागाबद्दल सांगण्यात आले आहे. पण मराठी भाषा विभागाबाबत बोलत असतांना ३ कोटी रुपयांचा तुकडा सीमावासियांना टाकला. पण आवश्यक ती तरतूद केली नाही. हे शासन अशी हिंमत का करीत नाही की, मराठी माणसांच्या महाराष्ट्रामध्ये आम्ही या मराठी भाषा विभागासाठी त्यांना चांगली यंत्रणा देण्यासाठी काही रकमेची तरतूद करू. कोणत्याही प्रकारची तरतूद या ठिकाणी केलेली नाही. आवश्यक ती तरतूद करू, असा केवळ उल्लेख करण्यात आलेला आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यात मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी आहे. स्वयंरोजगाराच्या माध्यमातून बेरोजगारांच्या हाताला काम देण्यासाठी या ठिकाणी कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही किंवा साधा उल्लेखही करण्यात आलेला नाही. ज्यावेळी आम्ही असे बोलतो की, गोरगरिबांसाठी अर्थसंकल्प आहे. परंतु वस्तुस्थिती पाहिली तर हा गरिबांसाठी अर्थसंकल्प नसून ठराविक लोकांना नजरेसमोर ठेऊन सादर केलेला अर्थसंकल्प आहे, अशा प्रकारची भावना व्यक्त करून या ठिकाणी माझे विचार थांबवितो.

धन्यवाद.

**श्री. बच्चू कडू** (अचलपूर) **:** अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पावर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, या अर्थसंकल्पाचा एकंदरीत विचार करता अर्थसंकल्पाच्या पहिल्या भागात वित्तमंत्री महोदयांनी कृषी खात्यावर जास्त भर दिल्याचे दिसून येते. राज्याचा पहिला अर्थसंकल्प असा आहे की, जास्तीत जास्त तरतूद ही कृषी खात्यावर करण्यात आलेली आहे. यामध्ये कर्जावरील व्याज माफ करण्यात आले आहे, कृषी पपांना अनुदान देण्यात आले आहे. सिंचनाच्या योजनांसाठी निधी दिला आहे. यामध्ये काही योजना केंद्र सरकारच्या आहेत. या माध्यमातून राज्यातील शेवटच्या माणसाला न्याय देण्याचा प्रयत्न मंत्री महोदयांनी केलेला आहे. खऱ्या अर्थाने राज्यातील शेतकरी पिचला आहे, त्याच्या कष्टाला मोल मिळत नाही. या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून त्याकडे लक्ष देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. अर्थसंकल्पाच्या माध्यमातून कर्जमाफी करण्यात आली आहे. सिंचनासाठी आर्थिक तरतूद करण्यात येत आहे. या सर्व गोष्टी करीत असताना शेतकऱ्याच्या हातामध्ये जेव्हा माल असतो, तेव्हा त्याला नाडले जाते. त्याची मोठ्या प्रमाणात कुचंबना केली जाते. त्याच्या शेतमालाला हमी भाव देण्याची खरी गरज आहे. केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या मालाला हमी भाव देत नसेल तर त्याबाबत राज्य सरकारने धोरण तयार करून हमी भाव देण्याची गरज निर्माण झाली आहे. शेतीच्या खर्चाचा विचार केला तर हेक्टरी पाच लाख रुपये सिंचनासाठी खर्च करावे लागत आहेत. सिंचनासाठी अनुदान मिळत असताना एकीकडे कोरडवाहू शेतकऱ्याला काहीच अनुदान मिळत नाही. यामध्ये कापूस, तूर, हरभरा उत्पादक शेतकरी आहेत. या कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी अर्थसंकल्पामध्ये एक विशेष योजना आणण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, मागील वर्षी तुरीचे भाव सात हजार रुपये प्रति क्विंटल इतके होते. यावर्षी तुरीचे भाव चार हजार रुपये प्रति क्विंटल असे आहेत. यासाठी राज्य सरकारने शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदान देण्याची आवश्यकता आहे. कोरडवाहू शेतकऱ्याचे उत्पादन हे पावसाच्या पाण्यावर अवलंबून असते. एक पाऊस आला नाही तरी उभे पीक वाया जाते. यासाठी राज्य सरकारने कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी ठोस पाऊल उचलण्याची आवश्यकता आहे. आता कोरडवाहू व बागायती शेतकरी असे दोन भाग निर्माण झाले आहेत. कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी बजेटमध्ये तरतूद करण्याची आवश्यकता आहे. कापसावर प्रक्रिया करणाऱ्या गिरण्या अहमदाबाद व मुंबई या ठिकाणी आहेत. हा कापूस शेतकऱ्यांकडून गिरणीमध्ये गेला की त्याचा भाव वाढतो. म्हणजे खेड्यातून कापूस शहरात आला की त्याचे भाव वाढतात. या सर्व बाबींचा शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे. विदर्भात मोठ्या प्रमाणात कापूस उत्पादक शेतकरी आहे. संत्रा व कापूस ही पीके विदर्भातील महत्वाची पिके आहेत. अध्यक्ष महोदय, बजेटमध्ये द्राक्ष निर्यातीसाठी संशोधन केंद्र स्थापन करण्यासाठी अनुदान देण्यात आले आहे. कापूस व संत्रा या पिकांसाठी निर्यात संशोधन केंद्र निर्माण करावयास पाहिजेत. असे निर्णय कोणाच्या फायद्यासाठी घेण्यात येत आहेत, याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. अमरावती जिल्हा हा आर्थिक अनुशेष असलेला महत्तम जिल्हा आहे. आर्थिक अनुशेषाची पाहणी केल्यानंतर असे लक्षात आले की, येथील शेतकऱ्यांची सर्वात जास्त कुचंबना करण्यात आलेली आहे. सन १९९५ मध्ये आर्थिक अनुशेषाची पाहणी करण्यात आली त्यावेळी २००० कोटी रुपयांचा अनुशेष होता. आज हा अनुशेष २० हजार कोटी रुपयांवर गेलेला आहे. सिंचनाचा अनुशेष संपला असे

[ श्री. बच्चू कडू ]

सांगण्यात येते. भौतिक अनुशेष संपलेला नाही. सिंचनाचा अनुशेषाचा विचार केला तर अमरावती जिल्ह्यातील ८ लाख ८८ हजार हेक्टर जमीन अजूनही सिंचनापासून वंचित राहिलेली आहे. प्रकल्प बांधण्यासाठी अनेक साईड उपलब्ध असताना प्रकल्पांसाठी निधी देण्यामध्ये अडचणी निर्माण होत आहेत. आमच्या जिल्ह्यात सिंचनाचा अनुषेश असताना सोफिया वीज प्रकल्प तेथे उभारण्यात येत आहे. या सोफिया वीज प्रकल्पाला शेतीचे पाणी देण्यात येते. २३ हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली येईल एवढे पाणी या प्रकल्पाला देण्यात येणार आहे. एका कंपनीला किंवा उद्योगांना शेतीच्या सिंचनाचे पाणी देण्यात येत असल्यामुळे शेतीच्या सिंचनाचा अनुशेष दिवसेंदिवस वाढत जाणार आहे. या बाबत मंत्री महोदयांनी अवश्य विचार करावा असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, या अर्थसंकल्पामध्ये माझ्या मतदारसंघातील ८ प्रकल्पांकरिता पुरेशा निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. मी सांगू इच्छितो की, सन २०१०-११ मध्ये माझ्या मतदारसंघातील प्रकल्पांकरिता ३ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. परंतु प्रत्यक्षात फक्त ३८ लाख रुपयेच मिळालेले आहेत. आमचा जिल्हा महत्तम अनुशेष असलेला जिल्हा आहे. एकीकडे ३ कोटी रुपयांची तरतूद केली जाते आणि प्रत्यक्षात मात्र ३८ लाख रुपयेच दिले जातात. म्हणून अर्थमंत्री महोदयांनी यासंदर्भात लक्ष द्यावे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय राज्यपाल महोदयांनी निदेश देऊन सद्धा आमच्या विभागातील अनुशेष दूर करण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जात नाही. अर्थमंत्री महोदयांनी ज्या जिल्ह्यांमध्ये सिंचनाचा अनुशेष असेल त्या जिल्ह्यांकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. शासन आमच्या जिल्ह्यामध्ये वीज निर्मिती प्रकल्प सुरू करीत आहे. परंतु सर्वात कमी वीज आमच्या अमरावती जिल्ह्याला लागते. राज्यात विजेचे समन्यायी वाटप झाले पाहिजे आणि तसे शासनाचे धोरण असले पाहिजे. घरासाठी किती वीज पाहिजे, शेतीसाठी किती वीज लागते याची माहिती घेऊन ज्या जिल्ह्यामध्ये वीज जास्त लागते त्या जिल्ह्यामध्ये विद्युत प्रकल्प उभे केले पाहिजेत. ज्या जिल्ह्याला जेवढी वीज लागते तेवढी वीज त्या जिल्ह्यामध्ये जर निर्माण करता आली तर या सर्व भानगडी होणार नाहीत. विजेचे समन्यायी वाटप केले तर आज आमच्या जिल्ह्यामध्ये जे भारनियमन केले जाते ते कमी झाल्याशिवाय राहणार नाही. आमच्या जिल्ह्याला वीज कमी लागते. तरी देखील आमच्या जिल्ह्यामध्ये जास्त भारनियमन केले जाते. एकंदरीत पुणे जिल्ह्याचा आणि अमरावती विभागातील ५ जिल्ह्यांचा विचार केला तर पुणे शहरासाठी जेवढी वीज लागते तेवढी वीज आमच्या अमरावती विभागासाठी लागते. म्हणून याचा देखील विचार करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, विदर्भातील उद्योगांचा अनुशेष कायम आहे. आपण राज्यातील उद्योगांची स्थिती बघितली तर आपल्या लक्षात येईल की, उद्योजक पुणे, मुंबई, नागपूर या जिल्ह्याशिवाय इतर जिल्ह्यांमध्ये उद्योग सुरू करीत नाहीत. मी सांगू इच्छितो की, आपण लोकसंख्येच्या आधारावर तालुक्याच्या ठिकाणी उद्योग सुरू केले तर गावातील लोकांना एकीकडे शेती आणि दुसरीकडे उद्योगातून रोजगार मिळेल अशा प्रकारचे सूत्र शासनाने स्वीकारले तर अतिशय चांगले होईल.

अध्यक्ष महोदय, आमच्या जिल्ह्यातील १,३७,८९६ प्रकल्पग्रस्त मागील २० वर्षापासून शासनाकडे अपेक्षेने बघत आहेत. ज्या प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी गेल्या, ज्यांची घरे गेली त्यांच्या जमिनीवर शासनाने

[ श्री. बच्चू कडू ]

सिंचन प्रकल्प उभे केलेले आहेत. त्या प्रकल्पग्रस्तांना काय मिळाले याचा जर आपण विचार केला तर आपल्या लक्षात येईल की, अजूनही त्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन होणे बाकी आहे. जमिनीच्या बदल्यात त्यांना अजून जमीन मिळालेली नाही आणि शासन त्यांना नोकरी सद्धा देऊ शकले नाही. शासनाने फक्त १३ हजार तरुणांना नोकरी दिलेली आहे. मी तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून हा प्रश्न सभागृहात उपस्थित केला होता. त्यावेळी माननीय श्री. अजित पवार साहेबांनी सांगितले होते की, ज्या प्रकल्पग्रस्तांना नोकरी मिळाली नाही त्यांना आपण प्रत्येकी १० लाख रुपये देण्याचे धोरण आखणार आहोत. ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी शासनाने संपादित केलेल्या आहेत, जे लोक रस्त्यावर आलेले आहेत त्यांच्यासाठी वेगळे धोरण तयार करण्याची गरज आहे. राज्य शासनाने केंद्र शासनाचे सन २००७ चे राष्ट्रीय धोरण स्वीकारले पाहिजे. सिंचन प्रकल्पासाठी ज्या शेतकऱ्यांनी जमिनी दिल्या त्यांच्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी ओलिताखाली आलेल्या आहेत. ज्या प्रकल्पग्रस्तांनी प्रकल्पासाठी जमिनी उपलब्ध करून दिल्या त्या प्रकल्पग्रस्तांसाठी येत्या काळामध्ये चांगल्या प्रकारचे धोरण तयार करण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक प्रकल्पग्रस्ता व्यक्तीला ५ लाख रुपये द्यावयाचे म्हटले तर ६ हजार कोटी रुपये आणि १० लाख रुपये द्यावयाचे म्हटले तर १० हजार कोटी रुपये लागतील. माननीय अर्थमंत्र्यांनी यासाठी तरतूद करावी, अशी माझी विनंती आहे. प्रकल्पग्रस्तांना पहिल्या वर्षी २ लाख रुपये द्यावेत आणि पुढील वर्षी २ लाख रुपये द्यावेत. माझी अशी विनंती आहे की, प्रकल्पग्रस्तांसाठी एक विशेष मोहिम आखणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, वाघाने हल्ला केला आणि माणूस मरण पावला तर त्या माणसाच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत दिली जाते. अस्वलाने हल्ला करून जर एखादा माणूस मरण पावला तर त्या माणसाच्या कुटुंबीयांना सद्धा आर्थिक मदत दिली जाते. परंतु मी आपल्याला सांगू इच्छितो की, सर्प दंशामुळे सर्वात जास्त मजूर मरत आहेत. शेतामध्ये खासदार, आमदार, अधिकारी जात नाहीत. शेतामध्ये जाऊन काबाडकष्ट करणारे अनेक मजूर सर्प दंशामुळे मरत आहेत. परंतु सर्प दंशामुळे ज्या व्यक्तीचा मृत्यू होतो त्याच्या कुटुंबीयांना शासन एक रुपया सद्धा आर्थिक मदत करीत नाही. यासाठी सद्धा शासनाने भविष्यामध्ये अर्थसंकल्पात तरतूद करावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द संपवितो.

**श्री. मंगल प्रभात लोढा** (मलबार हिल) **:** अध्यक्ष महोदय, मैं सन २०११-१२ के अर्थसंकल्प पर अपने विचार व्यक्त करने के लिए खड़ा हुआ हूं.

अध्यक्ष महोदय, सरकार का लगातार प्रयास रहता है कि मुंबई के अंदर जितने ज्यादा टॅक्स लगा सकते है, उतने टॅक्स लगाए. प्रॉपर्टी टॅक्स बढ़ाए, स्टॅम्प ड्युटी बढ़ाए, सेल्स टॅक्स बढ़ाए, वॅट बढ़ाए, जितना ज्यादा मुंबई को दुधारु गाय की तरह दोह सकते है, उतना दूध मुंबई से लेने का और उसके बाद उसका जो भी उपयोग करना है, वह करें. कत्तलखाने के संबंध में भी टॅक्स बढ़ाने की बात है.

अध्यक्ष महोदय, टॅक्स बढ़ाने से व्यापार बढ़ता है क्या ? सरकार क्या चाहती है ? सरकार राज्य को किस ओर लेकर जाना चाहती है, उसका धोरण इस अर्थसंकल्प में होता है. हमने जहां कहीं पर टॅक्स बढ़ाया है तो वहाँ पर व्यापार बढ़ा है या कम हुआ है ? हमारे यहां से आई.टी. व्यापार चला

[ श्री. मंगल प्रभात लोढा ]

गया. यहां का व्यापार अहमदाबाद, हैद्राबाद और बेंगलोर में चला गया. हमारे यहां से मेटल मार्केट जाने के लिए तैयार है. हमारे यहां से डायमंड मार्केट चला गया. धीरे धीरे, टॅक्स बढ़ाते बढ़ाते हम महाराष्ट्र को कही बंगाल बनाने की तैयारी तो नहीं कर रहे ? पिछले १५ साल में सब को यहां से भगा दिया. अब उनको हाथ जोड़कर बुलाते है तो कोई वापस आने के लिए तैयार नहीं है. इसलिए मेरा सरकार से निवेदन है कि सरकार का टॅक्स बढ़ाने का जो धोरण है, वह मुलत: गलत धोरण है. सरकार को यह करना चाहिए कि व्यापारी अपना काम करें, ज्यादा से ज्यादा लोगों को रोजगार मिले और सरकार कम से कम उसमें हस्तक्षेप करें. आप जितना टॅक्स का प्रतिशत बढ़ाएंगे, उतना आपका कलेक्शन भी कम होता है. मैं अर्थ मंत्री जी से निवेदन करना चाहता हूं कि महाराष्ट्र में मिडल क्लास के लोग भी रहने वाले है. सरकार इन मिडल क्लास के लिए क्या कर रही है ?

अध्यक्ष महोदय, पिछले सप्ताह जीवनदायी योजना के संबंध में चर्चा हुई. यहां पर बड़े बड़े हॉस्पिटल्स है. इसमें मिडल क्लास का कहीं पर भी जिक्र नहीं है. मेरी विधानसभा क्षेत्र में पांच हॉस्पिटल्स है. उस हॉस्पिटल्स में यदि गलती से कोई आदमी चला जाए, ४० हजार रुपये पर डे का कम से कम बिल है. सात दिन उसको हॉस्पिटल में रखा गया तो उसका बिल तीन लाख रुपये हो गया. वह हॉस्पिटल के अंदर चला गया, उसका बाहर आना अपने हाथ में नहीं है. वह जिंदा बाहर नहीं आ सकता, मरने के बाद ही बाहर आएगा. ऐसे में यदि, मिडल क्लास के लोगों के मेडिकल के बारे में, हॉस्पिटल के बिल के बारे में नहीं सोचेगी तो धीरे धीरे सरकार विषमता का वातावरण निर्माण कर रही है, ऐसा मेरा मानना है. मैं सरकार से कहना चाहता हूं कि सरकार ने युवाओं के विकास के लिए २५ करोड़ रुपये का प्रावधान किया है. महाराष्ट्र का सारा भविष्य युवाओं के हाथ में है. आज आप युवाओं के विकास पर खर्चा नहीं करेंगे, उनको रोजगार नहीं देंगे, उनको शिक्षा का साधन उपलब्ध नहीं कर के देंगे... नक्सलवाद गड़चिरोली और थ्राना से आगे बढ़कर आएगा और इसके जिम्मेदार आप और हम होंगे.

अध्यक्ष महोदय, अभी एक बात मेरे साथी ने कहा और मैं भी कहना चाहता हूं कि सी-लिंक, सी-साईड रोड के बारे में कोई प्रावधान इस बजट में नहीं किया गया है. आप मुंबई से कितना पैसा लेते हो ? इस बारे में कभी विधानसभा में बताया जाना चाहिए. लाखों-करोड़ों रुपये मुंबई से टॅक्स के रुप में कमाते हो और उसका कितना प्रतिशत आप मुंबई के विकास के लिए वापस देते हो ? ७५ प्रतिशत नहीं, ५० प्रतिशत नहीं, २५ प्रतिशत नहीं. कम से कम १५ प्रतिशत राशि तो मुंबई को दी जानी चाहिए. कम से कम लोगों को तो बताओ कि मुंबई के साथ न्याय कर रहे हो. मैं आपके माध्यम से माननीय वित्त मंत्री जी से कहना चाहता हूं कि सी-लिंक के बारे में, सी-साईड रोड़ के बारे में बजट के अंदर प्रावधान किया जाए. ६३ प्रतिशत नागरीकरण इस महाराष्ट्र में हो चुका है. जब नागरीकरण के संबंध में चर्चा थी तो माननीय मुख्यमंत्री जी ने पिछले सप्ताह कहा था कि हम डी-कन्जेक्शन करना चाहते है. बड़े बड़े व्यापारियों को बाहर भेजेंगे, बड़ी बड़ी कॉलोनीज को बाहर भेजेंगे. इस पूरे बजट में डी-सेंट्रलाईजेशन के बारे में कहीं भी प्रावधान नहीं किया गया है. माननीय मुख्यमंत्री जी इस विधानसभा के अंदर कहते है कि हम डी-सेंट्रलाईजेशन करना चाहते है. सारा देश जानता है. सारी दुनिया जानती है कि मुंबई को बचाने के लिए इसका डी-सेंट्रलाईजेशन करना बहुत जरुरी है. लेकिन इस बारे में आपने बजट में कोई प्रावधान नहीं किया है. इस ओर आपने उचित ध्यान देना चाहिए.

**[ श्री. मंगल प्रभात लोढा ]**

अध्यक्ष महोदय, पिछले सप्ताह परेल में एक सम्मेलन हुआ था, उसमें मैं गया था. सीनियर सीटीजन्स के बारे में सम्मेलन था. पांच हजार सीनियर सीटीजन्स, बिना कोई तैयारी किए, वे इकट्ठा हो गए. लोगों की आँखों में आँसू थे. उनके लिए मेडिकल की कोई सुविधा नहीं है. उनके आने-जाने के लिए कोई सुविधा नहीं है. सारी दुनिया के अंदर सीनियर सीटीजन्स का सम्मान होता है और उनकी तरफ ध्यान भी दिया जाता है. फाईनान्शीयली उनका संरक्षण भी होता है. सीनियर सीटीजन्स के संबंध में केंद्र सरकार ने एक धोरण बनाया है. मैं महाराष्ट्र सरकार से निवेदन करना चाहता हूं कि सीनियर सीटीजन्स के बारे में केंद्र सरकार का जो धोरण है, उस धोरण को महाराष्ट्र सरकार तुरंत लागू करें. इसके लिए केंद्र से पैसा भी मिलेगा.

अध्यक्ष महोदय, यहां पर शालेय शिक्षण मंत्री श्री. राजेन्द्र दर्डा जी उपस्थित है. हर समय शालेय शिक्षण के संबंध में मेरा प्रश्न रहता है. लेकिन दुर्भाग्य से मुझे अभी तक न्याय नहीं मिला है. जिस शहर के अंदर, जिस प्रदेश के अंदर एज्युकेशन की तरफ ध्यान नहीं दिया जाएगा, वह देश आगे कैसे बढ़ेगा ? यह बात मेरी समझ में नहीं आती. बच्चे को आज स्कूल में शिक्षा नहीं देंगे, शिक्षा देंगे तो ऐसी शिक्षा देंगे जिससे उसके माँ-बाप फीस नहीं भर सकते. सरकार ने अभी एक नया बिल लाया है. प्रॉपर्टी टॅक्स के हिसाब से एज्युकेशन लेंगे. मैं मुंबई, पूना, थाना की बात करता हूं. यहां पर ऐसी कोई जगह नहीं है जहां दो करोड़ का फ्लॅट न हो, और दो लाख की झोपड़पट्टी न हो. दो लाख की झोपड़पट्टी के बच्चे को आप कह रहे हो, दस लाख के मिडल क्लास के परिवार से आप कह रहे हो कि आप यहां से चले जाओ. मेरा सरकार से निवेदन है कि स्कूल एज्युकेशन के बारे में विशेष प्राथमिकता देकर, सरकार इस बारे में प्रावधान करे. अॅडेड स्कूल है, मराठी स्कूल है. उन स्कूलों के टिचर्स को दस-दस सालों से वेतन नहीं दिया गया है. वे चिट्ठियाँ लिखते लिखते थक जाते है, लेकिन कुछ नहीं होता. किसी ने तो उनके वेतन की तरफ ध्यान देना चाहिए. आप हजारों-करोडों रुपये का बजट बनाते है और शिक्षकों को उनका वेतन नहीं दिया जाता है. मराठी स्कूलों में फीस कितनी मिलती है ? वह स्कूल कैसे चलता है ? स्कूल चलाने वाले जो व्यवस्थापक है, उनको यह बात मालूम है. सरकार का कमिटमेंट है कि हम टिचर्स के वेतन हम देंगे. टिचर्स के वेतन कब से देना बाकी है, इसकी जानकारी सदन के पटल पर रखी जानी चाहिए.

अध्यक्ष महोदय, मैं एक बात आपके माध्यम से, सरकार से कहना चाहता हूं कि जो विभिन्न टॅक्स लगाए गए है. ये सारे टॅक्स लगाने के बजाय सरकार बहुत आसानी से बहुत बड़ा कलेक्शन टॅक्स के माध्यम से कर सकती है. जितनी भी एसआरए योजना मुंबई के अंदर सरकार की जमीन पर चल रही है, उनका आप ऑक्शन कीजिए. पहले साल आपको दो हजार करोड़ रुपये मिलेंगे. मुख्यमंत्री जी अच्छे है, उप मुख्यमंत्री जी काम करना चाहते है. इस बारे में कई बार चर्चा हुई. यह काम आप एक साल कर के देखिए. पब्लिक ऑक्शन कर के देखिए. आप छोटी छोटी चीजों के लिए टेंडर निकालते है. रिटेंडर करते हो, टेंडरींग करना चाहते हो और जहां १०० करोड़, २०० करोड़, एक हजार करोड़ रुपये की जमीन है, उसको आप नहीं लेना चाहते है. सरकार यदि अपने बजट में प्रावधान बढ़ाना चाहती है, एसआरए में सरकार की जितनी जमीन है, उसको पब्लिक टेंडरींग कीजिए. केंद्र सरकार की जमीन है, उसके साथ शेअर करे. आप जमीन का ऑक्शन नहीं करते है. आपके हाथ से जमीन ऐसे ही चली जा रही है.

[ श्री. मंगल प्रभात लोढा ]

अध्यक्ष महोदय, सरकार ने पिछले सेशन में एमआरटीपी ॲक्ट में अमेंडमेंट लाया कि हम .३३ प्रतिशत एफएसआई बढ़ाना चाहते है. आज मैंने आईम्स ऑफ इंडिया और महाराष्ट्र टाईम्स में पढ़ा कि महानगरपालिका का आयुक्त एक बात कह रहा है और यु.डी. वाले अलग बात कह रहे है. इसलिए अब यह नहीं आएगा. आज मुंबई उपनगर और थाना के अंदर ऐसी कौन सी इमारत है जो टीडीआर यूज नहीं करता है. जब वह टीडीआर यूज कर के किसी प्राईवेट आदमी के पास जाता है ओर सरकार को उससे एक साल के हजार-करोड़ रुपये मिलने वाले है तो मैं आपके माध्यम से माननीय मुख्यमंत्री जी से निवेदन करना चाहता हूं कि इस बारे में कानून बना हुआ है, केवल जी.आर. निकालना बाकी है. सरकार को पहले साल ३०० करोड़ रुपये मिलेंगे. मुंबई, मुंबई के उपनगर, थाना, औरंगाबाद, नागपुर, पूना और जहां जहां हमारे बड़े बड़े कॉरपोरेशन्स है, टीडीआर के बारे में जहां जहां आपने प्रोवीजन कर रखी है, वहां सरकार .३३ प्रतिशत सरकार अपनी तरफ से दे. उससे सरकार को पहले साल दो हजार करोड़ रुपये की कमाई होगी. चार हजार करोड़ की कमाई सरकार दूसरे के हाथों में छोड़ रही है. यह बात मैंने आपके माध्यम से सरकार में ध्यान में लाने का प्रयास किया है. मुझे विश्वास है कि सरकार इस बारे में योग्य निर्णय करेगी. यह ईमानदारी का काम है. मुझे पूरा विश्वास है कि इस बारे में सरकार जरुर योग्य निर्णय करेगी.

अध्यक्ष महोदय, मेरे और दो छोटे छोटे विषय है. पिछले विधानसभा के अंदर पुलिस हाऊसिंग के बारे में यहां पर चर्चा हुई थी. सम्माननीय मंत्री श्री सचिन भाऊ अहिर जी के नेतृत्व में एक समिति बनी थी. हम मुंबई के पुलिस हाऊसिंग में गए. वहां लोगों से कहा गया कि हम पुलिस हाऊसिंग के बारे में कोई धोरण लेकर आएंगे. अध्यक्ष महोदय, उस समय की सरकार बदल गई, नयी विधान सभा गठित हो गई और इस बजट को देखकर पता चलता है कि वह बात भी बदल गई. अध्यक्ष महोदय, पुलिस वाला १२-१४-१६ घंटे काम करता है और अपना सारा जीवन पुलिस क्वार्टर में गुजार देता है. वह एम.पी.मिल कंपाऊंड, ताडदेव एवं परेल के पुलिस क्वार्टर में रहता है और जब उसका रिटायरमेंट होता है तो उसको वहां से बाहर निकाल दिया जाता है. वह पुलिस वाला क्या करे. पुलिस वाले के लिए कहा जाता है कि उसने भ्रष्टाचार क्यों किया, उसके ऊपर पैसा लेने का आरोप भी लगाया जाता है. मुझे लगता है कि सरकार इसके लिए उन्हें उकसा रही है. मैं यहां कहना चाहता हूं कि कोई आदमी सरकारी जमीन पर जोर जबर्दस्ती से झोपड़पट्टी बनाकर बैठ गया तो उसको सरकार २५० से ३०० वर्ग फुट का फ्लैट देती है और जिसने अपनी सारी जिन्दगी महाराष्ट्र एवं मुंबई के लोगों की सेवा की उसको उसके रिटायरमेंट के बाद दुत्कार कर कहा जाता है कि तू अपने गांव चला जा. उससे कहा जाता है कि तूने गलती की कि तूने मुंबई में झोपड़पट्टी नहीं बनाई. अध्यक्ष महोदय, सरकार को इस पॉलिसी में परिवर्तन करने की जरुरत है.

अध्यक्ष महोदय, मैं अंतिम सुझाव सरकार को देना चाहता हूं. आदर्श कांड पर सरकार बदल गई. आदर्श कांड की गूंज महाराष्ट्र में एवं देश में अभी भी हो रही है. मैं आदर्श कांड के बारे में कुछ नहीं कहना चाहता हूं परन्तु दो अच्छे उदाहरण कर्नाटक और गुजरात राज्य के बारे में देना चाहता हूं. गुजरात और कर्नाटक सरकार अपने सारे सरकारी अधिकारियों एवं कर्मचारियों को उनकी सीनियरिटी के हिसाब से घर देती है. इसमें चाहे वह क्लास-४ का कर्मचारी हो या क्लास-३ का

[ श्री. मंगल प्रभात लोढा ]

कर्मचारी हो या आईएएस या आईपीएस अधिकारी हो. वहां पर रिटायरमेंट के पहले करीब ८० प्रतिशत अधिकारियों एवं कर्मचारियों को घर मिल जाता है. अध्यक्ष महोदय, यहां पर गांव से सरकारी नौकरी करने के लिए आदमी आता है. वह आदमी चाहे पुणे से आया हो, बारामती से आया हो या इचलकरंजी से आया हो, उसको रिटायरमेंट के पहले सरकार द्वारा घर दिया जाना चाहिए. हमारा कहने का मतलब यह है कि जो लोग सरकारी नौकरी करते हैं, उनका परिवार यहां पर रहता है, उनके बच्चे यहां पर पढ़ते हैं इसलिए उनके रिटायरमेंट के पहले उनको घर मिलने की व्यवस्था होनी चाहिए. सरकार को इसकी योजना बनानी चाहिए और इसके लिए बजट में प्रोवीजन भी किया जाना चाहिए. अध्यक्ष महोदय, मुंबई में गवर्नमेंट कॉलोनी है, मुंबई में धारावी है, वहां पर काफी जगह है. अध्यक्ष महोदय, मैं केवल कहने के लिए कुछ नहीं कहता हूं बल्कि पूरी स्टडी करने के बाद ही मैं कोई सुझाव देता हूं. अध्यक्ष महोदय, मुंबई में धारावी या गवर्नमेंट कॉलोनी में जो जगह उपलब्ध है वहां पर सरकारी अधिकारियों एवं कर्मचारियों के लिए घरों की व्यवस्था होनी चाहिए. सरकारी अधिकारियों और कर्मचारियों को उनके रिटायरमेंट के पहले सरकार द्वारा घर दिये जाने चाहिए. इतना कहते हुए मैं अपनी बात यहीं समाप्त करता हूं. धन्यवाद.

**श्री. सुरेश धस** (आष्टी) : अध्यक्ष महाराज, मी सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महाराज, राज्याचे उप मुख्यमंत्री व अर्थ मंत्री यांनी शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय चांगला व कधीही सादर झालेला नसेल एवढा सुंदर अर्थसंकल्प या ठिकाणी .....

(महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे काही सन्माननीय सदस्य बोलतात )

माझी मनसेच्या सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांचे म्हणणे आम्ही मनसे ऐकून घेतले आता त्यांनीही आमचे म्हणणे ऐकले पाहिजे.

अध्यक्ष महाराज, कालच मी, श्री. मकरंद अनारसपुरे या अभिनेत्याची भूमिका असलेला, "गोष्ट छोटी डोंगराएवढी" या नावाचा चित्रपट पाहिला. या चित्रपटामध्ये विदर्भातील ५-६ जिल्ह्यांतील मागील काही वर्षातील परिस्थितीचे अतिशय वास्तवदर्शी चित्रण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. करंजे गाव विकणे आहे अशा बातम्या आम्हीही वाचल्या होत्या, त्याचेही चित्रण या चित्रपटामध्ये दाखविले आहे. या चित्रपटातील अभिनेता श्री. मकरंद अनारसपुरे जेव्हा कांदा व शेती उत्पादनाच्या भावाबाबत सरकारी अधिकाऱ्यांबरोबर बोलतो की, कांद्याला दर का मिळत नाही ? ते पाहून खरोखरच तसा विचार करण्याची वेळ आलेली आहे असे वाटते.

अध्यक्ष महाराज, मागील काही दिवसांपूर्वी कांद्याचे भाव १०० रुपये किलोवर गेले होते. मला येथे हे सांगावयाचे आहे की, मी येथे कोणावरही टीका करीत नाही, कारण कोणावरही टीका करण्या एवढा मी मोठा नाही. परंतु, त्यावेळेस जेवढी काही टी.व्ही. चॅनेल्स आहेत त्या जवळपास १०० च्या जवळ टी.व्ही. चॅनेल्सवरुन सकाळपासून संध्याकाळ पर्यंत २४ तास कांदा विषयकबातम्याच दाखविल्या जात होत्या. "प्याज ने आँख में पानी लाया", कांद्याचे भाव वाढल्यामुळे महिन्याचे बजेट गडगडल्याचे सांगणारी एखादी कौटुंबिक गृहिणी अशाप्रकारचे चित्रण समाजापुढे सतत दाखविले जात होते. लगेच २-३ दिवसांमध्ये मग त्यावर चर्चा होऊन पणन मंत्री पुढे येऊन सांगतात की, कांद्याचे असे वाटप केले

**[ श्री. सुरेश धस ]**

जाईल, अमुक केले जाईल. काही जणांनी तर कांद्याचे मोफत वाटप करण्याची घोषणा केली, काही लोक कांद्याचे चित्र लावून पंतगसद्धा उडवण्याचे काम करतात.

अध्यक्ष महाराज, हे चित्रण पाहिल्यानंतर आम्हाला वाईट वाटत नाही. मलाईका अरोरा खान नावाची नर्तिका आहे. ३१ डिसेंबरच्या रात्री ॲम्बी व्हॅलीमध्ये डान्स करण्यासाठी तिले तीन कोटी रुपये घेतले. ही बातमी सर्व चॅनेल्सवरून दाखविण्यात आली होती. ही बातमी चॅनलवरून दाखवित असताना आणखी एक गजहब निर्माण झाला होता. तेथे दारूचा एक ग्लास होता. त्याला पेग असे काही तरी म्हणतात. त्यामध्ये एक पांढरा खडा टाकला होता. हा पेग एक-दोन माणसे पित नव्हती. चॅनेलवर अभिमानाने सांगावे अशा प्रकारे सांगत होते की, या एका पेगची किंमत पाच लाख रुपये आहे. हे अभिमानाने सांगितले जात होते. कांदा ६७ रुपये किलो झाला, १०० रुपये किलो झाला की, आमचे महिन्याचे बजेट गडबडते असे लोक सांगतात. शेतकऱ्यांनी उत्पादन करायचे आणि दुसऱ्यासाठीच जगायचे काय ? यंदाचे बजेट पाहिल्यावर मा. वित्त मंत्र्यांनी शेतकऱ्यांचा निश्चितपणे विचार केला आहे हे दिसून येत आहे. ५० हजार पर्यंतचे कर्ज शून्य टक्के व्याजदराने देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. मी शासनाला विनंती करीन की, काही बॅंका शेतकऱ्यांना मदत करीत नाही. या बॅंकाना अशा प्रकारे शेतकऱ्यांना कर्ज देण्यासाठी शासनाने भाग पाडले पाहिजे. तीन लाखा पर्यंतचे कर्ज २ टक्के व्याज दराने देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय या शासनाने घेतला आहे. त्यामुळे मी आघाडी सरकारचे आणि मा. वित्त मंत्र्यांचे अभिनंदन करतो.

अध्यक्ष महाराज, या राज्यामध्ये ३१ लाख कृषी पंप आहेत. यासाठी २५०० कोटी रुपयोंचे अनुदान प्रस्तावित केले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना नवीन वीज जोडणी मिळणार आहे. सन २०१०-२०११ मध्ये ऊर्जा विभागाने महावितरण कंपनीच्या माध्यमातून २ लाख ७५ हजार कृषी पंपांना वीज जोडणी उपलबध करून देण्याचे धोरण राबविले आहे. यासाठी ८० कोटी रुपयोंची तरतूद केली आहे, याबद्दलही मी माननीय वित्त मंत्र्यांचे अभिनंदन करतो.

सन २००३-०४ मध्ये नामदार श्री. दिलीप वळसे पाटील ऊर्जा मंत्री असताना त्यांनी कृषी संजीवनी योजना राज्यामध्ये लागू केली होती. त्यावेळी ६५ टक्के सूट दिली होती. नेमक्या त्या कालावधीमध्ये दुष्काळी परिस्थिती राज्यामध्ये होती. अनेक शेतकऱ्यांनी त्या योजनेचा फायदा घेतला होता. परंतु, काही शेतकऱ्यांनी इच्छा असून देखील वीज बिल भरले नव्हते. डिसेंबर २०१० पर्यंत ५९०० कोटी रुपयोंची बिलांची थकबाकी होती. त्यातील २९१० कोटी रुपये मुद्दल होते आणि २९३० कोटी रुपये व्याज होते. मुद्दलापेक्षा व्याज आणि दंड जास्त झाले होते. तसेच विलंब आकार ५९ कोटी रुपयोंचा होता. तेव्हा माननीय वित्त मंत्र्यांनी, ऊर्जा मंत्र्यांनी तसेच राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी अतिशय चांगला निर्णय घेतला की, सन २००३ मध्ये जी कृषी संजीवनी योजना आणली होती ती पुन्हा लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

**ॲड. आशिष जयस्वाल :** अध्यक्ष महाराज, माननीय सदस्य चांगले भाषण करीत आहेत. पण त्यांच्या मुद्याची नोंद कोणीच घेताना दिसत नाही.

**उपाध्यक्ष :** माननीय मंत्री श्री. नितीन राऊत नोंद घेत आहेत.

**श्री. सुरेश धस :** अध्यक्ष महाराज, शेतकऱ्यांचे जवळपास ५५ टक्के वीज बिल माफ होणार आहे. ४५ टक्केच म्हणजे फक्त मुद्दलच शेतकऱ्यांना भरावे लागणार आहे. या योजनेचा तपशील नंतर जाहीर करण्यात येईल अशाप्रकारची घोषणा येथे केलेली आहे. माझी विनंती आहे की, एका टप्प्यामध्ये हे पैसे घेण्यात येऊ नयेत. त्याऐवजी तीन महिन्यांपर्यंत, सहा महिन्यांपर्यंत, नऊ महिन्यांपर्यंत आणि बारा महिन्यांपर्यंत असे चार टप्पे करावेत. सरकारने असे चार टप्पे केले तर शेतकरी खुशीने हे पैसे भरेल.

अध्यक्ष महाराज, मागील वर्षी कापसाला चांगला भाव मिळाला. शेतकऱ्यांनी चार ते साडेचार हजार रुपयांपर्यंत कापूस विकला. आमच्याकडे ७३:५१ नावाची जात आहे. त्या जातीमुळे शेतकऱ्यांचे २८ ते ३० क्विंटल प्रति एकरी उत्पादन झालेले आहे. शेतकऱ्यांना कायांच्या माध्यमातून पैसा मिळालेला आहे तो वीज बिल भरण्यासाठी निश्चितपणे वापरेल. परंतु वीज बिल एका टप्प्यामध्ये न घेता त्याचे चार टप्पे करावेत अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महाराज, वेळ कमी असल्यामुळे मी प्रत्येक मुद्यावर बोलत नाही. मी आरोग्य विभागावर बोलताना माननीय उप मुख्यमंत्री आणि आरोग्य मंत्र्यांना विनंती करतो की, त्यांनी राज्यात राजीव गांधी जीवनदायी योजना राबवावी. सन्माननीय मंत्री श्री. सुरेश शेट्टी यांनी १२ जिल्ह्यांमध्ये ही योजना राबविल्यास जवळपास २५० कोटी रुपये खर्च येईल असे वक्तव्य याठिकाणी केले आहे. राज्यातील गोरगरीब, दीनदुबळे आणि कष्टकरी वर्गासाठी या योजनेची आवश्यकता आहे. माझा मतदारसंघ हा ऊसतोड कामगारांचा आहे. हा ऊसतोड कामगार वर्ग आपले पोट भरण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रभर फिरत असतो. बाजूच्या कर्नाटक, गुजरात, मध्य प्रदेश राज्यामध्ये पोट भरण्यासाठी जात असतो. शासनामार्फत सर्व प्रकारच्या आजारांवर एका योजनेद्वारे उपाय योजना केली जावी. आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री श्री. वायएसआर रेड्डी यांनी अशाप्रकारची योजना राबविली होती. त्याच धर्तीवर सन्माननीय मंत्री श्री.सुरेश शेट्टी साहेब यांनी ही योजना राबविण्याचा निर्णय घेतला. ही योजना राबविल्यास त्याचा अनेकांना फायदा होणार आहे. एखाद्या गरीब कुटुंबातील व्यक्तीला हृदयाचा त्रास असेल आणि त्याला हृदयात वॉल्व्ह बसवावयाचा असेल तर त्यासाठी शासनाची दीड लाख रुपयांपर्यंत योजना आहे. त्याद्वारे त्याला मदत मिळू शकते. परंतु रुग्णालयातील डॉक्टर्सकडून सांगण्यात येते की, रुग्णाला इंडियन वॉल्व्ह बसवून चालणार नाही, त्याला परदेशातून वॉल्व्ह आणावा लागेल. त्यासाठी आणखी एक लाख रुपये द्यावे लागतील अशाप्रकारची मागणी होते. अशावेळी रुग्णाऐवजी त्याच्या नातेवाईकाची अवस्था अतिशय बिकट होते. म्हणून तो विनंती घेऊन आमच्यापर्यंत येतो. तेव्हा अत्यंत गरीब जिल्ह्यामध्ये राजीव गांधी जीवनदायी योजना लागू करावी. आमच्या बीड जिल्हा अतिशय गरीब आहे. तेव्हा या योजनेमध्ये बीड जिल्ह्याचा समावेश करावा. या योजनेसाठी २५० कोटी रुपये खर्च होत असला तरी त्यापेक्षा जास्त तरतूद करून ही योजना सुरू करावी अशी माझी मागणी आहे. गरीब व्यक्ती जेव्हा रुग्णालयात जाते त्यावेळी त्याला त्याची किंमत कळते. तेव्हा सरकारने राजीव गांधी जीवनदायी योजनेची घोषणा केली आहे त्याची लवकर अंमलबजावणी करावी.

अध्यक्ष महाराज, ३३ जिल्ह्यांमध्ये महाराष्ट्र स्पर्धात्मक कृषी प्रकल्प राबविण्याचा निर्णय सरकारने घेतला, त्यासाठी १५ कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. ही चांगली बाब आहे.

[ श्री. सुरेश धस ]

महोदय, जलसंपदा विभागासाठी अर्थसंकल्पामध्ये ६३०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. जलसंपदा विभागाच्या माध्यमातून चांगल्या योजना आणल्या जात आहेत. कृष्णा-मराठवाडा सिंचन योजनेसाठी बीड आणि उस्मानाबाद जिल्ह्याला १२४ कोटी रुपये मिळालेले आहेत. अनेक वर्षांपासून मराठवाड्याचे स्वप्न होते की, कृष्णेचे पाणी मराठवाड्याला मिळाले पाहिजे. या अर्थसंकल्पात बीड आणि उस्मानाबाद या दोन जिल्ह्यांसाठी भरीव तरतूद करण्यात आल्यामुळे ते स्वप्न पूर्ण होणार आहे.

महोदय, माननीय वित्त व नियोजन मंत्री, माननीय जलसंपदा मंत्री आणि जलसंपदा विभागाचे सचिव श्री. श्रीनिवास यांनी "ॲमेस्टी" नावाची योजना राबविण्याचे ठरविले आहे. या चर्चेच्या अनुषंगाने माझी विनंती आहे की, लवकरात लवकर ॲमेस्टी नावाची योजना सुरू करावी. तसेच त्या योजने अंतर्गत दोन विभागांना जोडणारे मोठमोठे प्रकल्प हाती घ्यावेत, एवढीच विनंती या माध्यमातून करतो.

महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले मनापासून, आभार मानतो व माझे दोन शब्द संपवितो.

**उपाध्यक्ष** : सभागृहाची वेळ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत होती. सभागृहाची वेळ कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

**श्री. चिमणराव पाटील** (एरंडोल) : अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेऊन, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, माननीय अर्थमंत्र्यांनी या वर्षीचा अर्थसंकल्प सादर केलेला आहे. या अर्थसंकल्पावर नजर टाकली असता माझ्या असे निदर्शनास आले की, हा एक उपचार आहे. राज्याची एकंदर परिस्थिती पाहता कोणतेही माननीय अर्थमंत्री किंवा सरकार प्राप्त परिस्थितीतून फार काही चांगला मार्ग काढू शकतील असे मला प्रामाणिकपणे वाटत नाही. अर्थसंकल्प सादर करीत असताना, एकूण उत्पन्नापैकी उत्पादक कामावर किती खर्च करणार आहोत आणि अनुत्पादक कामावर किती खर्च करणार आहोत, याचा गंभीरपणे विचार करावयास पाहिजे होता. उदा. आपल्याजवळ असलेल्या १०० रुपयांपैकी ८० रुपये घेतलेल्या कर्जावरील व्याज देण्यासाठी, वेतनावर, भविष्य निर्वाह निधीवर आणि भत्ते देण्यासाठी खर्च होणार असून, उर्वरित २० रुपये उत्पादक कामांसाठी खर्च होणार आहेत. या राज्याचे उत्पन्न १ लाख ७१ हजार कोटी रुपये आहे. यातील रक्कम उत्पादक कामांवर खर्च करावयाची असेल तर ती रक्कम ५०-६० हजार कोटी रुपयांच्या पुढे जात नाही. सभागृहात काही वेळापूर्वी माननीय वित्त मंत्री बसलेले होते. परंतु ते आता येथे नाहीत. आता माननीय श्री.आर.आर.पाटील बसलेले आहेत. ते संवेदनक्षम राजकारणी आहेत. मी त्यांना विचारु इच्छितो की, राज्याच्या अर्थसंकल्पातील ८० टक्के रक्कम अनुत्पादक कामावर आणि २० टक्के रक्कम उत्पादक कामावर खर्च होणार असेल तर, अनुत्पादक खर्च आपण कमी करणार आहात की नाही, हा खर्च कमी करण्याची राजकीय इच्छाशक्ती आपल्याजवळ आहे काय ? महोदय, जोपर्यंत ८० टक्के अनुत्पादक खर्च कमी करण्यात येणार नाही तो पर्यंत या ठिकाणी कितीही राणा भीमदेवी थाटात घोषणा केल्या तरी, आपल्याला विकास आणि प्रगतींवर मर्यादा येणार आहेत. मला प्रामाणिकपणे वाटते की, या विषयी थोडीशी राजकीय इच्छाशक्ती ठेवून, कठोर आणि कडक उपाययोजना जोपर्यंत केल्या जात नाहीत तो पर्यंत राज्याच्या विकासाचा आणि प्रगतीचा दर उंचावू शकणार नाही.

**[ श्री. चिमणराव पाटील ]**

महोदय, अर्थसंकल्प हा केवळ आकड्यांचा खेळ नसतो. अर्थसंकल्प सादर करीत असताना, राज्याच्या विकासाचे चित्र, नियोजन, साधनसामुग्री, रिसोर्सेस कशा प्रकारे उभे करणार आहोत आणि मागच्या काळातील योजनांची फलनिष्पत्ती काय झाली हे पाहिले पाहिजे. पूर्वी ज्या योजनांच्या माध्यमातून साधनसामुग्री आणि पैसा निर्माण केला होता ती साधनसामुग्री आणि पैसा मागच्या काळातील योजनांवर खर्च झाला की नाही, या संदर्भातील विचार या अर्थसंकल्पात व्हावयास हवा होता. परंतु दुर्दैवाने तो विचार या अर्थसंकल्पातच नव्हे तर यापूर्वीच्याही अर्थसंकल्पांत करण्यात आल्याचे दिसत नाही.

गेल्या ६०-६५ वर्षामध्ये राज्यासाठी जाहीर केलेल्या योजनांच्या माध्यमातून या राज्याचे, राज्यातील ग्रामीण भागाचे, कृषी क्षेत्राचे, उद्योग क्षेत्राचे काय भले झाले, याचे थोडेसे सिंहावलोकन आपल्या अर्थसंकल्पात आले असते तर भविष्यातील काही तरतुदी करताना आपल्याला ते उपयोगी पडले असते. ग्रामीण भागातील कृषी क्षेत्राच्या विकासाच्या आपण गप्पा करतो, सिंचनाच्या गप्पा करतो. मला दुर्दैवाने सांगावेसे वाटते की, आपण या योजनांमध्ये पैसा अडकविलेला आहे. मला राज्याचे चित्र माहीत नाही. अर्थसंकल्प म्हणजे काय ? आपण जी योजना आखतो, ती योजना विशिष्ट पैशांमध्ये, विशिष्ट कालावधीमध्ये टाईम बाऊंड प्रोग्रॅम तयार करून पूर्ण झाली पाहिजे. आपण या राज्याचा बारीक आणि गंभीरपणे विचार केला तर आपल्याला दिसेल की, माझ्या एकट्या जळगाव जिल्ह्यातील ७ सिंचन प्रकल्पांची मूळ किंमत आणि आज असणारी किंमत यामध्ये ४ हजार कोटी रुपयांचा फरक पडलेला आहे. ते प्रकल्प वेळेवर पूर्ण झाले असते तर शासनाचे ४ हजार कोटी रुपये वाचले असते. अध्यक्ष महोदय, एका जळगाव जिल्ह्यात ७ सिंचन प्रकल्प वेळेवर पूर्ण न झाल्यामुळे शासनाच्या तिजोरीवर ४ हजार कोटी रुपयांचा भार पडत आहे. अध्यक्ष महोदय, ३०-३५ जिल्ह्यांमध्ये जर कोट्यवधी रुपयांचा भार पडला असेल तर त्याला कोण जबाबदार आहे ? याचे उत्तरदायित्व कोण घेणार आहे ? उत्तरदायित्व घेऊन आपण कोणाला व काय शिक्षा देणार आहे ? आपण या संदर्भात कोणावर जबाबदारी टाकणार आहात ? राज्यातील योजना अशाप्रकारे चालल्या तर मला वाटत नाही की, हे राज्य प्रगतीपथावर जाऊ शकेल.

अध्यक्ष महोदय, आपण कृषीच्या संदर्भात विचार करतो, उद्योगासंदर्भात विचार करतो. कृषीमध्ये भरभराट व्हावी, ग्रामीण भागामध्ये भरभराट व्हावी, असे म्हणतो. परंतु, स्वातत्र्यानंतरच्या अनेक वर्षांच्या काळातनंतर देखील आज १६ तासांचे भारनियमन आहे. आपण सर्व राज्यकर्ते ग्रामीण भागाचे प्रतिनिधीत्व करतो. स्वातंत्र्यांनंतर शेतकऱ्यांचे पूत्र सत्तेवर आले. परंतु, गेल्या ६५ वर्षांमध्ये शेतीसाठी जे इन्फ्रास्ट्रक्चर आपल्याला तयार करायचे होते, ते आपण तयार करू शकलो नाही. आज शेती करणे म्हणजे मागील १० जन्माचे पाप आहे की काय, अशाप्रकारची शेतीची अवस्था झाली आहे. १६ तासांचे भारनियमन केल्यानंतर ती शेती कशी पुढे जाईल, हे मला काही समजत नाही. शेतीचा, ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी आपण सहकारी चळवळी निर्माण केल्या, सहकारी संस्था काढल्या. परंतु, आज सहकारी चळवळीची काय परिस्थिती आहे ?

अध्यक्ष महोदय, साखर कारखान्यांची काय परिस्थिती आहे ? सूत गिरण्यांची काय परिस्थिती आहे ? आपण साखर कारखाने वाचवायचे कसे ? सूत गिरण्या वाचवायच्या कशा ? शेतकरी सहकारी संघ वाचवायचे कसे ? या संदर्भात कोणाची जबाबदारी आहे ? या संदर्भात काय करायचे ?

[ **श्री. चिमणराव पाटील** ]

अर्थसंकल्पात या संदर्भात काहीही तरतूद नाही. त्यामुळे गेल्या ६० वर्षांत केलेल्या योजनांचा विचका झाला आहे. अध्यक्ष महोदय, गेल्या ६५ वर्षांमधील गोष्टीचे वर्णन आपल्याला करता येणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. सुरेश धस साहेब बोलले, अनेक सन्माननीय सदस्य बोलले की, ५० हजार रुपयांच्या कर्जावरील व्याज माफ केले आहे. मागील अर्थसंकल्पामध्ये घोषणा झाली होती. मला या संदर्भात खेदाने नमूद करावेसे वाटते. मला माहीत नाही की, सन्माननीय सदस्य श्री. सुरेश धससाहेबांच्या बँकेने व्याज माफ केले की नाही. परंतु, आमच्या बँकेने, माझ्या माहितीतील बँकांनी या क्षणापर्यंत मागील वर्षी केलेल्या घोषणेप्रमाणे कर्जावरील व्याज माफ केलेले नाही. शेतकऱ्यांकडून हे व्याज कापले गेलेले आहे. अर्थसंकल्पात केलेल्या घोषणेप्रमाणे ५० हजार रुपयांच्या कर्जावरील व्याज तुम्ही माफ करू शकलेला नाहीत. आपण आजही तीच घोषणा या ठिकाणी करीत आहात. आपण सांगत आहात की, आम्ही ५० हजार रुपयांच्या कर्जावरील व्याज माफ केले आहे. शेतकऱ्यांच्या हिताच्या योजनांची अंमलबजावणी १-१ वर्ष होत नसेल तर गतिमान शासन, गतिमान नेतृत्व, असे म्हणावयास सद्धा आम्हाला कुठेतरी खेद वाटतो. ज्या योजनांची घोषणा शासनाने केली आहे त्यांची त्वरित अंमलबाजवणी झाली पाहिजे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी अर्थसंकल्पावर भाषण केले. त्यांनी अर्थसंकल्पावर भाषण केले की, राजकारणावर, हे मला समजले नाही. त्यांच्या भाषणाबाबत माझा आक्षेप नाही. परंतु, एक मुद्दा वारंवार आपण गेल्या ५०-६० वर्षांपासून मांडत आहोत की, भुईमूगाच्या शेंगा जमिनीखाली लागतात की, जमिनीवर लागतात, याची माहिती काही लोकांना नसते. आपण कोणत्या जमान्यातील गोष्टी करीत आहात ? भुईमुगाच्या शेंगांची अंबानींना देखील माहिती नव्हती. पण तेच आता कोथिंबीर, बटाटा, कांदा मुंबईमध्ये आणून विकावयास लागले आहेत आणि आम्ही शासनाच्या माध्यमातून काय करीत आहोत ? या देशाला, या समाजाला आणि या क्षेत्राला आपण कोठे नेत आहोत, याचा देखील आपण विचार केला पाहिजे. नेहमी टाळ्या मिळविणारी भाषणे आणि लोकानुनय करणाऱ्या गोष्टी आपण किती दिवस करायच्या, किती दिवस लोकांना अंधारात ठेवायचे, याचा विचार देखील सर्व लोकप्रतिनिधींनी केला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, कोणत्याही अर्थव्यवस्थेचे एक उद्दिष्ट असते की, पर कॅपिटा इन्कम किती वाढले आहे. आज या ठिकाणी सांगताना खेद वाटतो की, या देशाची दारिद्रय रेषेखालील लोकांची जी टक्केवारी आहे त्यामध्ये महाराष्ट्राची टक्केवारी वाढते आहे. हे चांगले लक्षण नाही. यामध्ये जर दुरुस्ती करावयाची असेल तर कुठेतरी गांभीर्याने विचार करून या राज्याच्या प्रगतीचा, जगन्नाथाचा रथ आपण पुढे रेटला पाहिजे, एवढेच नमूद करतो आणि आपल्या सर्वांचे आभार मानून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

**श्री. मधु चव्हाण** (भायखळा) **:** अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पावर माझे विचार मांडण्यासाठी तसेच माननीय उप मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री श्री. अजित दादा पवार यांनी सादर केलेल्या राज्याच्या अर्थसंकल्पाला पाठींबा देण्यासाठी आणि त्यांचे अभिनंदन करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आघाडी सरकारचा, आदरणीय उपमुख्यमंत्री श्री. अजित दादा पवार यांनी सादर केलेला हा पहिलाच अर्थसंकल्प आहे.

[ श्री. मधु चव्हाण ]

अध्यक्ष महोदय, या अर्थसंकल्पाचे वर्णन मी काव्यपंक्तीतून करणार आहे.

अनेक चांगल्या योजना, अनेक चांगल्या सुविधा,
आम आदमीचा चेहरा, बजेट दादांचा न्यारा.
कोणाला भावला, कोणाला पावला,
जनतेला बजेट पटला आणि कष्टकरी प्रथमच हसला.

(गोंधळ)

अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षाला अर्थसंकल्प पटला नाही, त्याला आम्ही काय करणार ?

अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ चा अर्थसंकल्प जनतेपर्यन्त जाऊ नये, जनतेला कळू नये म्हणून आमच्या समोरच्या बाकावरील सन्माननीय सदस्यांनी गोंधळाला सुरूवात केली. एकदा गोंधळ सुरू झाला आणि जनतेला कळायला लागले की, हा अर्थसंकल्प आपल्यासाठी सादर होत आहे.

अध्यक्ष महोदय, समोरच्या बाकावरील सन्माननीय सदस्यांनी गोंधळ घातला आणि दुसऱ्या दिवशी त्यामधील काही सन्माननीय सदस्यांना निलंबित केल्यानंतर विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य विधानभवनाच्या पायऱ्यांवर जाऊन बसले. ज्यांना पायरीवर बसायचे होते त्यांना दादांनी पायरीवर बसविले आणि जे सभागृहात बसले होते त्यांना विकासात्मकदृष्टया दादांनी आत घेतले.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रातील जनतेला खऱ्या अर्थाने या बजेटमधून न्याय देऊन त्यांच्या विकास कामांचा गाडा पुढे चालविण्याचे काम माननीय उपमुख्यमंत्र्यांनी केले आहे. मला खात्री आहे की, या बजेटमधून अनेक संकल्पना माननीय उपमुख्यमंत्र्यांनी या महाराष्ट्रासाठी मांडलेल्या आहेत. मग त्या शेतकऱ्यांसाठी, कष्टकऱ्यांसाठी, बेरोजगारांसाठी, आम आदमीसाठी, मुंबईतील झोपडपट्टीधारकांसाठी किंवा जुन्या इमारतींमध्ये राहणाऱ्या माणसांसाठी असतील, परंतु त्यांच्या सर्वांगीण विकासाचे चक्र घेऊन सभागृहात सादर केलेला हा अर्थसंकल्प खऱ्या अर्थाने लोकाभिमुख आहे. म्हणून मी या अर्थसंकल्पाचे स्वागत करतो आणि माननीय उपमुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, राज्याचा अर्थसंकल्प हा साधारणत: ४१५०० कोटीचा आहे. मुंबई शहरातील पायाभूत सुविधा असतील, झोपडपट्टी पुनर्वसनाचा कार्यक्रम असेल, किल्ल्यांचे जतन, संवर्धन असेल, विधिमंडळाचा सुवर्ण महोत्सव असेल, किंवा जेएनएनयुआरए योजनेचा कार्यक्रम असेल, विमानतळाचा विकास असेल, मेट्रो रेल असेल, किंवा अन्य शहरांचा किंवा गावांचा विकास करावयाचा असेल, या सर्व बाबींसाठी तरतूद करण्याचा प्रयत्न मंत्री महोदयांनी बजेटमध्ये केलेला आहे. माननीय श्री. अजित पवार, वित्तमंत्री महोदय हे महाराष्ट्रातील कुस्ती, कबड्डी, खो-खो व हॉलीबॉलच्या असोसिएशनचे अध्यक्ष आहेत. क्रीडा क्षेत्रात महाराष्ट्रातील युवकांनी पुढे यावयास पाहिजे. त्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरातील मोकळे मैदाने कमी होत आहेत. काही मैदानावर झोपडपट्टी वसलेली आहे. अशा ठिकाणी एसआरएची योजना राबविणे आवश्यक आहे. ज्या ठिकाणी खेळाची मैदाने आहेत, ती मुंबईतील मुलांना खेळण्यासाठी मोकळी करून दिल्यास अर्थसंकल्पात खेळाडूसांठी मांडण्यात आलेली योजना खऱ्या अर्थाने चांगली होईल, असे मला वाटते.

[ श्री. मधु चव्हाण ]

अध्यक्ष महोदय, नागरी पाणी पुरवठा, मोफत शालेय शिक्षण असेल, विशेषत: अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीक पूर्व शिष्यवृत्ती असेल, तसेच मुलींच्या शिक्षणासाठी बजेटमध्ये विशेष तरतूद करण्यात आलेली आहे. रोजगार व तंत्रशिक्षण या विभागाला उभारणी देण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली आहे. हा अर्थसंकल्प आम आदमीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

अध्यक्ष महोदय, वित्तमंत्री महोदयांनी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नवबौद्ध या प्रवर्गाच्या लोकांना घरे उपलब्ध करून देण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद केली आहे. मला शासनाला अशी विनंती करावयाची आहे की, मुंबई शहरात महात्मा गांधी पथक्रांती योजना राबविताना फूट पाथवरील झोपडीत राहणाऱ्या माणसासाठी पक्के घर देण्यात येते. मुंबई शहरात पूर्वी सन १९९५ पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण देण्यात आले होते. आता सन २००० पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण देण्याबाबत राज्य सरकारने ठराव केला. परंतु या संदर्भातील प्रकरण कोर्टात गेले आहे. धारावी सारखी झोपडपट्टी किंवा जे प्रकल्प बाधित लोक आहेत अशा झोपड्यांना २००० पर्यंत संरक्षण देण्यात येत आहे. परंतु फूटपाथवरील लोकांना घर देण्याचा विचार करण्यात येत नाही. त्या झोपडीत सन १९९५ पूर्वीपासून राहणारी व्यक्ती असेल तरच त्यालाच घर उपलब्ध करून दिले जाते. १९९५ पासून आता १२ वर्षे झाली आहेत. १९९५ पर्यंत राहणाऱ्या माणसाने एखाद्या फूटपाथवर राहणाऱ्या माणसाला झोपडी विकली असेल तर त्या माणसाला घर मिळत नाही. माझी सरकारला विनंती आहे की, ही योजना गरिबांसाठी राबविण्यात येत आहे. त्या गरिबाची झोपडी सन १९९५ पूर्वीची असेल तर त्या स्ट्रक्चरला मान्यता देऊन त्या झोपडीत राहणाऱ्या माणसाला घर मिळाले पाहिजे. मुंबई शहरात अनेक योजना राबविण्यात येत आहे. मुंबई शहरात घर दुरुस्ती मंडळ आहे, मुंबईत १९ हजार जुन्या इमारती आहेत. त्या इमारतींची दुरुस्ती व पुनर्बांधनीसाठी गेल्या ४० वर्षापासून १०० कोटी रुपयांचा कार्यक्रम राज्य सरकार सातत्याने राबवित आहे. अनेकांना मुंबई घर दुरुस्ती मंडळाच्या माध्यमातून मोफत घरे देण्यात आली आहेत. गेल्या अनेक वर्षापासून निधी वाढविण्याची मागणी आम्ही करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, यावेळी अर्थसंकल्पाच्या अगोदर मी पत्राद्वारे वित्तमंत्री महोदयांकडे मागणी केली होती की, गेल्या ४० वर्षात १०० कोटी रुपयांच्यावर एकही रुपया वाढविलेला नाही. यावर्षी १०० कोटी रुपयांवरुन २०० कोटी रुपये करावयास पाहिजेत. मुंबईत १६ हजार जुन्या इमारतीत लोक राहत आहेत, त्यांना अनुदान वाढवून देऊन हा कार्यक्रम अतिशय गतीमान करावयास पाहिजे. मला खात्री आहे की, आमची मागणी वित्तमंत्री महोदय नक्कीच मान्य करतील. मुंबई शहरातील १६ हजार जुन्या इमारतीत राहणाऱ्या भाडेकरुंना न्याय दिल्याशिवाय ते राहणार नाहीत. मुंबई शहरात जशा जुन्या इमारती आहेत. त्याचप्रमाणे मुंबई शहरात उपकर प्राप्त नसलेल्या हजार दीड हजार किंवा दोन हजार इमारती सन १९४० पूर्वी बांधण्यात आल्या आहेत. या इमारतींना मुंबई इमारत दुरुस्ती मंडळाचा कायदा लागू होत नाही. त्यामुळे त्या इमारतींची दुरुस्ती होत नाही. मी सरकारकडे अशी मागणी केली आहे की, या इमारतींची दुरुस्ती करण्यासाठी बजेटमध्ये २५ ते ३० कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी. एखादी इमारत पडून त्या इमारतीमध्ये जर २-४ लोक मृत्युमूखी पडले तर

[ श्री. मधु चव्हाण ]

त्यांच्या कुटुंबीयांना शासनाकडून २ लाख, ५ लाख रुपये आर्थिक मदत दिली जाते. १५-२० लाख रुपये अनुदान देऊन जर त्या इमारतीची दुरुस्ती केली तर त्या इमारतीमध्ये राहणाऱ्या लोकांचा जीव वाचल्याशिवाय राहणार नाही. मुंबई शहरामध्ये ज्या उपकर प्राप्त इमारती नाहीत त्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी माननीय अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पामध्ये २५-३० कोटी रुपयांची तरतूद करावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरामध्ये सन १९८५ मध्ये कॉंग्रेस पक्षाची शताब्दी साजरी झाली होती. त्यावेळी मुंबई शहरामध्ये राजीव गांधी निवारा प्रकल्पाच्या माध्यमातून ६६ इमारती बांधण्यात आल्या होत्या. त्या इमारतीमध्ये ६ ते ७ हजार भाडेकरू राहतात. त्या इमारतींना मुंबई इमारत दुरुस्ती मंडळाचा कायदा लागू होत नाही. म्हणून मी अर्थमंत्र्यांकडे मागणी केलेली आहे की, या ६६ इमारतींच्या दुरुस्तीसाठी २५-३० कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पामध्ये करण्यात यावी.

अध्यक्ष महोदय, शासन स्लम डिक्लेअर करते. स्लम डिक्लेअर करतांना एखाद्या २-३ हजार स्क्वेअर मीटरच्या प्लॉटवर १५०-२०० झोपड्या असतील आणि त्याच प्लॉटवर एखादा कारखाना असेल, बेकरी असेल किंवा छोटा उद्योग असेल तरी सद्धा जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी त्या उद्योगासह तो प्लॉट स्लम म्हणून डिक्लेअर करतात. त्या प्लॉटवरील १५० ते २०० झोपडपट्टी धारकांबरोबर तेथील कारखान्यामध्ये काम करणाऱ्या ४०-५० कामगारांना कामापासून वंचित व्हावे लागते, ते लोक रस्त्यावर येतात. त्या प्लॉटवर राहणाऱ्या झोपडपट्टीतील लोकांना घरे मिळतात आणि तेथील विकासकाला विकासातून मोठा फायदा होतो. म्हणून माझी अशी विनंती आहे की, त्या प्लॉटवर जर एखादा १५०-२०० स्क्वेअर मीटरमध्ये छोटा कारखाना असेल तर ती जागा स्लममधून वगळली पाहिजे आणि ज्या जागेवर झोपड्या आहेत ती जागा स्लम म्हणून डिक्लेअर केली पाहिजे. जेणेकरून त्या कारखान्यामध्ये काम करणारे कामगार कामापासून वंचित होणार नाहीत, कारखानदार कारखान्यापासून वंचित होणार नाहीत. म्हणून शासनाने स्लम डिक्लेअर करण्यासंदर्भात कायद्यामध्ये योग्य ती दुरुस्ती करावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, संजय गांधी निराधार अनुदान योजनेसाठी ३८० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासन विधवा महिला, परितक्त्या महिलांसाठी एक चांगली योजना राबवित आहे. या योजनेचे सर्वांनी कौतुक केले पाहिजे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. मंगलप्रभात लोढा यांनी उल्लेख केला की, मुंबई शहरामध्ये अनेक पोलीस क्वॉटर्स आहेत. त्या पोलीस क्वॉटर्सची अतिशय दयनीय अवस्था झालेली आहे. माझ्या भायखळा मतदारसंघामध्ये आगरी पाडा पोलीस लाईन, भायखळा पोलीस लाईन, नागपाडा पोलीस लाईन अशा विविध ७ पोलीस लाईन्स् आहेत. तेथील पोलीस क्वॉटर्समध्ये १२० ते १६० स्क्वेअर फुटाची घरे आहेत. त्या घरांची अतिशय दयनीय अवस्था झालेली असल्यामुळे त्या पोलिसांना घरामध्ये सुखाने राहता सुद्धा येत नाही. माननीय गृहमंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. शासन पोलिसांकरिता ६ हजार घरे बांधणार आहे. त्या ६ हजार घरांबरोबरच मुंबई शहरातील जुन्या पोलीस क्वॉटर्सची दुरुस्ती करण्यात यावी किंवा पुनर्रचना करण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये अनेक छोटे मोठे उद्योग आहेत. त्यामध्ये बेकरीचा उद्योग सर्वात मोठा उद्योग आहे.

[ श्री. मधु चव्हाण ]

(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष ॲड दिलीप सोपल)

अध्यक्ष महोदय, बेकरीच्या उद्योगामध्ये व्हॅट आकारला जात आहे. १००० किंवा १२०० रुपयांची मिठाई खरेदी केली तर त्यावर ४ टक्के व्हॅट आकारला जातो. परंतु बेकरीमध्ये मावा केक किंवा एखादे गोड बिस्कीट तयार होत असेल...

**तालिका सभाध्यक्ष** : आता सन्माननीय सदस्य श्री. जयकुमार गोरे अर्थसंकल्पावर भाषण सुरू करतील.

**श्री. मधु चव्हाण :** अध्यक्ष महोदय.....

**तालका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री. मधु चव्हाण यांनी त्यांचे भाषण लवकरात लवकर संपवावे.

**श्री. मधु चव्हाण :** अध्यक्ष महोदय, गोरगरिबांचा अर्थसंकल्प साजरा केला जात आहे. महाराष्ट्रातील अनेक तीर्थक्षेत्रांसाठी अर्थसंकल्पामध्ये आवश्यक ती तरतूद करण्यात आलेली आहे. मुंबई शहरामध्ये सद्धा अनेक तीर्थक्षेत्र आहेत. माझ्या विभागात माझगावच्या डोंगरावर एका गावदेवी मातेचे पेशवेकालीन मंदीर आहे. त्यासाठी तत्कालीन वित्तमंत्री श्री. सुनील तटकरे साहेबांनी पुढील अर्थसंकल्पात तरतूद केली जाईल अशा प्रकारचे आश्वासन दिले होते. सन २०११-१२ चा अर्थसंकल्प माननीय श्री. अजितदादा पवार यांनी अतिशय चांगल्या तऱ्हेने सादर केलेला आहे. त्याबद्दल मी शासनाचे आभार मानतो. अध्यक्ष महोदय, वेळेअभावी मी माझे भाषण या ठिकाणी संपवितो.

**श्री. जयकुमार गोरे** (माण) **:** अध्यक्ष महोदय, सन २०१०-११ चा अर्थसंकल्प माननीय श्री. अजितदादा पवार यांनी मांडलेला आहे. त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय श्री. अजितदादा पवार यांनी कृषी, सिंचन, उद्योग, क्रीडा अशा सर्वच क्षेत्राला न्याय देण्याची भूमिका अर्थसंकल्पात घेतलेली आहे. महाराष्ट्र राज्य शेतीप्रधान राज्य आहे. या राज्यामध्ये शेतकऱ्यांसाठी ५० हजार रुपयांचे कर्ज शून्य टक्के व्याज दराने आणि तीन लाखांचे कर्ज २ टक्के व्याज दराने देण्याचा निर्णय या अर्थसंकल्पामध्ये घेण्यात आलेला आहे. शेतकऱ्यांना कृषी पंपाचे वाटप आणि वीजेमध्ये सवलत देण्याची योजना शासनाने जाहीर केलेली आहे. राज्यात केंद्र शासनाच्या मदतीने राष्ट्रीय विमा योजना राबविण्याचा प्रयत्न केला जात आहे. पणनच्या माध्यमातून राहता किंवा जळगांव जिल्ह्यात अनेक प्रकल्पाचा समावेश अर्थसंकल्पामध्ये केलेला आहे. माझ्यासारख्या नवीन सदस्यांना अर्थसंकल्प वाचत असताना असे दिसून येत आहे की, ज्यांचे प्राबल्य या शासनामध्ये आहे, जे लोक शासनामध्ये मंत्री म्हणून काम करीत आहेत अशा मान्यवर लोकांच्या भागामध्ये कामाचा ओघ अर्थसंकल्पामध्ये दिसून येत आहे.

अध्यक्ष महोदय, पुण्यातील ससून रुग्णालयासाठी २० कोटी रुपयांची तरतुद उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. नांदेडमधील रुग्णालसासाठी ८ कोटी रुपयांची तरतूद उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. माननीय श्री. राजेंद्र दर्डासाहेबांच्या औरंगाबाद जिल्ह्यातील रुग्णालयांसाठी २५ कोटी रुपयांची तरतूद उपलब्ध करून दिली आहे. परंतु कराड आणि सातारा येथील सिव्हील रुगणालयांसाठी शून्य तरतूद आहे. प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय शासकीय महाविद्यालये आहेत. परंतु सातारा जिल्ह्यात

[ श्री. जयकुमार गोरे ]

एकाही वैद्यकीय महाविद्यालयाचा प्रस्ताव दिसून येत नाही. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेच्या माध्यमातून कोट्यावधी रुपयांचा निधी किंवा गावागावाला पाणी देण्याची योजना केंद्र शासनाने अर्थसंकल्पात घेतल्याचे दिसून येत आहे. पाण्याच्या योजना मार्गी लागल्या पाहिजेत अशी सर्वांचीच अपेक्षा असते. गोरगरिबांना पिण्याचे पाणी मिळाले पाहिजे अशी भावना शासनाची आहे. या योजना कायम स्वरुपी चालू राहिल्या पाहिजेत, या करिता शासनाने प्रयत्न केले पाहिजेत. आजपर्यंत शासनाने ज्या योजना आखल्या, त्यापैकी किती योजना सध्या सुरू आहेत, याचा सर्व्हे होणे आवश्यक आहे. शेतीला १ टक्के दराने वीज दिली जाते. मात्र पाणी योजनेकरिता ५ रुपये प्रति युनिट या दराने वीज दिली जाते. यामुळे वीज बिलाच्या थकबाकीमुळे व विजेचे कनेक्शन कापल्यामुळे बऱ्याचशा पाणी योजना बंद पडल्या आहेत. माझी विनंती आहे की, ज्या प्रमाणे शेतीला १ टक्का युनिट या प्रमाणे वीज दिली जाते, त्याच प्रमाणे पाणी योजनेकरिता देखील १ टक्का दराने वीज देण्यात यावी.

अध्यक्ष महोदय, युवा क्रीडा धोरण जाहीर करीत असताना शासनाने अभिनंदनपर अनेक निर्णय घेतले आहेत. कबड्डी, खो-खो, कुस्ती हॉलीबॉल इत्यादी खेळांकरिता ५० लाख रुपयांचे अनुदान जाहीर केले आहे. माजी खासदार हिंदकेसरी मारुती माने यांचे स्मारक उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्याकरिता मी शासनाचे अभिनंदन करू इच्छितो. मागासलेल्या भागातील लोकांसाठी, गरीब लोकांसाठी घरकुल योजना तयार केली असून त्याकरिता ८०० कोटी रुपये दिले आहेत. तसेच यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना राबविण्याचा शासनाचा मानस आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहे बांधण्यात येणार आहे. इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना या प्रमाणे अनेक योजना शासनाने जाहीर केलेल्या आहेत. मात्र या योजना अंमलात आणणे आवश्यक आहे. माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार असल्यामुळे या योजना राबविण्यामध्ये कोणतीही अडचण येणार नाही, असे मला वाटते. जाहीर केलेल्या योजना अंमलात आणण्याकरिता शासनाने प्रयत्न केले पाहिजेत.

अध्यक्ष महोदय, रस्त्याच्या संदर्भात मी आपणास सांगू इच्छितो की, अर्थसंकल्पामध्ये कोणत्याही नवीन रस्त्यांना मंजुरी दिलेली नाही. नवीन रस्त्यांना मंजुरी दिली नाही तरी देखील पूर्वी मंजुरी दिलेल्या जुन्या रस्त्यांची कामे शासनाने पूर्ण केली पाहिजेत. अनेकदा अर्थसंकल्पामध्ये नवीन कामे प्रस्तावित केली जातात व त्याकरिता नगण्य तरतूद केली जाते. अनेकदा अर्थसंकल्पमध्ये मांडल्यानंतर गावोगावी बोर्ड लावले जातात की, अमुक रस्त्याच्या कामाला मंजुरी देण्यात आली, तमुक रस्त्याच्या कामाला मंजुरी देण्यात आली. मात्र ती कामे लवकर पूर्ण केली जात नाहीत. दीड वर्ष होऊनही रस्त्याच्या कामाची टेंडर प्रोसेस पूर्ण केली जात नाही. त्याकरिता निधी उपलब्ध करून दिला जात नाही. त्यामुळे नवीन रस्त्यांना मंजुरी देण्याऐवजी जुन्या रस्त्यांची कामे पूर्ण करण्याबद्दल शासनाने चांगला निर्णय घेतला आहे, त्या बद्दल मी त्यांचे अभिनंदन करू इच्छितो. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, काही ठराविक भागातील रस्त्याच्या कामासाठी अधिक निधीची तरतूद झालेली आहे. असे घडले आहे की नाही, हे आपण आपल्या अंतर्मनाला विचारावे. मी या संदर्भात अधिक काही बोलणार नाही. निधीचे सर्वांना समान वाटप झाले पाहिजे. अध्यक्ष महोदय, माझ्या माण मतदारसंघामध्ये प्रशासकीय इमारतीला मागील वर्षी मंजुरी मिळाली होती. त्या वेळी ५० लाख रुपयांची तरतूद केली होती. यंदाच्या वर्षी २ कोटी रुपये तरतूद केलेली आहे. मागील वेळी मंजूर झालेल्या कामांना कमी रक्कम व या वर्षी

[ श्री. जयकुमार गोरे ]

मंजूर झालेल्या कामांना जास्त रक्कम मंजूर झाल्याचे दिसून येत आहे. शासनाने निधीच्या समान वाटपाची भूमिका घेतली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, ग्रामीण भागामध्ये मागील अडीच ते तीन वर्षामधील विजेचा प्रश्न बऱ्यापैकी मार्गी लागत असल्याचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. ग्रामीण भागामध्ये विजेच्या पुरवठयाच्या दृष्टीने चांगले काम झालेले आहे. या करिता शासनाला व उर्जा मंत्री श्री. अजित पवार यांना मी धन्यवाद देऊ इच्छितो. बरेचसे लोक सांगतात की, ग्रामीण भागामध्ये विजेची काहीही कामे होत नाहीत. मात्र मी या ठिकाणी माझ्या मतदारसंघातील अनुभव सांगू इच्छितो. तेथील लोड शेडींगचे काम पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाचे प्रयत्न सुरू असल्याचे दिसून येत आहे. जलसंधारणाच्या कामाकरिता शासनाने अर्थसंकल्पामध्ये भरीव तरतूद केलेली आहे. पावणे दोन लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणल्याचा शासनाचा दावा आहे. ही योजना अंमलात आणली गेली असेल तर त्याकरिता मी शासनाचे अभिनंदन करू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, मी ग्रामीण भागातील दुष्काळी भागातील लोकप्रतिनिधी आहे. मघाशी उल्लेख केल्याप्रमाणे, मी सांगू इच्छितो की, मोठे लोकप्रतिनिधी किंवा मंत्री यांच्या भागामध्ये जलसंधारणाच्या कामांकरिता मोठ्या प्रमाणात निधी दिला जातो. तेथे अनेक कामे हाती घेतली जातात. बारामती, पुणे, सांगली या ठिकाणी अनेक कामे हाती घेण्यात आलेली आहेत. ताकारी म्हैसाळ, सांगली येथे पाणी दिले जाते. सातारा जिल्ह्यात नदीचा उगम असून येथूनच पाणी पुढे जाते. मात्र तरी देखील सातारा जिल्ह्याला पाण्यापासून वंचित ठेवण्याचे पाप राज्यकर्त्यांनी केले आहे. हे या शासनाला शोभत नाही असे मला या ठिकाणी खेदाने सांगावेसे वाटते. शासना सोबत काम करीत असताना ग्रामीण किंवा दुष्काळी भागाला पाण्यापासून वंचित ठेवण्याची झारीतील शुक्राचार्याची भूमिका काही लोक घेतात असे मला खेदाने सांगावेसे वाटते. माझ्यासारखा तळागाळातून, ग्रामीण भागातून आलेला कार्यकर्ता तळमळीने काम करीत असतो. आतासद्धा आमच्या भागातील पाणी योजनांना पैसे मिळावेत यासाठी मी टोकाचे प्रयत्न केले. परंतु, यावेळीही आमच्या वाट्याला वाटाण्याच्या अक्षताच आल्या असे म्हणावेसे वाटते. याबाबतीत अशाप्रकारे तरतूद करावयाची की, ती कामगारांच्या पगारात किंवा मागच्या देण्यामध्ये जाईल परंतु, कोणतेही काम पुढे जाता कामा नये असे चित्र दिसते. परंतु, माझे असे म्हणणे आहे की, जयकुमार गोरे निवडून आला किंवा एखादा नवीन लोकप्रतिनिधी निवडून आला त्यानंतर ही कामे मार्गी लागतात अशा प्रकारची भावना लोकांमध्ये निर्माण होऊ नये म्हणून शासनाने योग्य ती भूमिका घेतली पाहिजे. शासनामध्ये आल्यानंतर प्रामाणिक भूमिका घेऊन महाराष्ट्रातील जनतेच्या किंवा दुष्काळी भागातील लोकांच्या हिताचा प्रश्न हातात घेऊन काम केले पाहिजे. परंतु, ही भूमिका अलीकडच्या काळामध्ये लयाला गेली आहे असे माझे मत आहे. या अर्थसंकल्पामध्ये अनेक चांगल्या तरतुदी झालेल्या आहेत ......

(माननीय तालिका सभाध्यक्ष वेळ संपल्याची बेल वाजवतात)

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य, श्री. जयकुमार गोरे आपण बोलण्यास सुरुवात करून १० मिनिटे इतका वेळ झालेला आहे आपण आपले मुद्दे लवकर मांडावेत अशी मी आपणांस विनंती करतो.

**श्री. जयकुमार गोरे :** अध्यक्ष महाराज, निदान अपक्ष सदस्य अपक्षांची बाजू घेतील अशी आमची अपेक्षा आहे. अध्यक्ष महाराज, माझ्या सव्वा वर्षाच्या कारकिर्दीमध्ये या सभागृहात मला नवीन सदस्यांच्या बाबतीत असा दृष्टिकोन दिसतो की, नवीन सदस्य बोलत असतील, एखादा वेगळा विषय मांडत असतील तर, माननीय मंत्री उठतात ते म्हणतात की, हे नवीन सदस्य आहेत, त्यांना या विषयाची माहिती नाही. अशाप्रकारे अनेक लोकप्रतिनिधींचा आवाज दाबण्याचे काम येथे होताना दिसून येते.

अध्यक्ष महाराज, परवा अर्थसंकल्प मांडला जात असताना त्या वेळेची परिस्थिती पाहिल्यावर माझ्या सारख्या नवीन सदस्याला असे खेदाने म्हणावेसे वाटते की, अशी परिस्थिती का निर्माण झाली ? नेमक्या अर्थसंकल्पाच्या वेळीच या गोष्टी का घडल्या ? गेल्या २-३ अधिवेशनापासून या गोष्टी चाललेल्या आहेत. या गोष्टींवर जर त्याच वेळी मार्ग काढला असता तर, हा प्रसंग टळला असता असे माझ्यासारख्या नवीन सदस्याला प्रामाणिकपणे वाटते. त्यामुळे असे प्रश्न रेंगाळत न ठेवता त्यावर मार्ग काढले पाहिजे.

अध्यक्ष महाराज, राज्यातील प्रत्येक भागातून या सभागृहात लोकप्रतिनिधी येतात त्यांचा व या सभागृहाचा सन्मान ठेवणे ही या सभागृहाची जबाबदारी आहे असे माझ्या सारख्या नवीन सदस्याला वाटते. तो ठेवला जातो आहे की नाही, याबाबत बाहेर काय चित्र जाते आहे याचा आज विचार करण्याची गरज आहे. या अनुषंगाने मला सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करावयाची आहे की, महाराष्ट्राचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत असताना आज जनतेपुढे जे काही चित्र जाते आहे ते काही चांगले नाही. त्यामुळे प्रत्येकाने जबाबदारी घेऊन आपला सर्वांचा व या सभागृहाचा सन्मान ठेवण्याची भूमिका घ्यावी, एवढीच विनंती करतो व माझे दोन शब्द संपवतो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

**ॲड. उत्तमराव ढिकले** (नाशिक पूर्व) **:** अध्यक्ष महाराज, मी सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी उभा आहे व मी हे आपणांस सांगू इच्छितो की, मी घड्याळाचे भान ठेवूनच बोलणार आहे.

अध्यक्ष महाराज, या वर्षीच्या अर्थसंकल्पाबाबत हा शिलकी अर्थसंकल्प आहे असे म्हटले गेले. त्यामध्ये अपेक्षित महसूल १ लाख २१ हजार ५०३ कोटी रुपये इतका दाखविला आहे. तर खर्च १ लाख २१ हजार, ४४५ कोटी दाखविलेला आहे. परंतु, माझ्या इतक्या वर्षाच्या अनुभवा वरुन मला असे वाटते की, अपेक्षित महसूली जमा जी दाखविली आहे ती प्रत्यक्षात होईल की नाही ही शंका आहे. पण महसुलामध्ये जो खर्च आहे तो कदाचित वाढेलसद्धा आणि म्हणून हा अर्थसंकल्प फसवा आहे असे माझे मत आहे.

माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री. चिमणराव आबा पाटील यांनी या अर्थसंकल्पावर बोलताना फार चांगला मुद्दा मांडला की, राज्यावरील कर्जाचा बोजा दिवसेंदिवस वाढत चालला आहे. सन २०११-१२ मध्ये २ लाख २६ हजार ९२६ कोटी ४८ लाख एवढे कर्ज या राज्यावर आहे. मी वाचले आहे की, याबाबत उत्तरप्रदेशच्या खालोखाल महाराष्ट्राचा नंबर लागतो. आज वर्षाला जवळपास १६ हजार कोटी रुपये आपल्याला व्याजापोटी भरावे लागत आहेत. आबांनी सांगितल्या प्रमाणे १०० रुपयांतील ८० रुपये हे पेन्शन, वेतन, व्याज यासाठी खर्च होतात. तर, केवळ २० रुपये हे विकास कामांवर खर्च होतात. त्यामुळेच जर आपण हे चित्र पाहिले तर ते अतिशय विदारक असे चित्र आहे. अर्थव्यवस्थेचा गाडा रूळावरून हाकत असताना, गाडा जोरात नेत असताना खड्ड्यातून काढणे महत्त्वाचे आहे.

**[ ॲड. उत्तमराव ढिकले ]**

महाराष्ट्र राज्य दिवसेंदिवस दिवाळखोरीमध्ये चालले आहे. त्यातून राज्याला बाहेर काढणे फार महत्त्वाचे आहे.

आपला देश व पर्यायाने महाराष्ट्र कृषी प्रधान असल्यामुळे मी शेती या विषयावर बोलण्यासाठी आपला थोडासा वेळ घेतो. अर्थसंकल्पामध्ये एक चित्र निर्माण केले आहे की, शेतीकडे फार लक्ष दिले आहे. फार आर्थिक तरतूद केली आहे. पण जेव्हा अर्थसंकल्प वाचला तेव्हा मला स्वत:ला धक्का बसला. जगाच्या पाठीवर महाराष्ट्र राज्याची उत्पादन क्षमता सर्वात कमी आहे. भारतातील राज्यातील उत्पादन क्षमता सोडून द्यावी. जगातील सर्व राज्यांमध्ये महाराष्ट्राची उत्पादन क्षमता अत्यंत कमी आहे. महाराष्ट्राची उत्पादन क्षमता वाढवायची असेल तर अर्थसंकल्पामध्ये संशोधनावर अधिक तरतूद होणे महत्त्वाचे आहे. नवनवीन तंत्रज्ञानावर आधारित तरतूद होणे महत्त्वाचे आहे. आपल्या बाजूला हैद्राबाद आहे. तेथे कमी पावसात उमदी पिके कशी घ्यावीत याचे संशोधन होत आहे. देशातील सर्व राज्ये हैद्राबादचा सल्ला घेत आहेत. अमेरिका सारखे प्रगत राष्ट्र देखील हैद्राबादचा सल्ला घेत आहे. परंतु, महाराष्ट्र राज्य उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी हैद्राबादसह कोणाचाही सल्ला घेत नाही आणि संशोधनासाठी कुठल्याही प्रकारची मोठी तरतूद करीत नाही हे दुर्दैव आहे. मी येथे सांगेन की, शेतीवर अनेक लोकसंख्या अवलंबून आहे. तसेच, त्याच्याशी संबंधित असलेल्या उद्योगांवर देखील बरीच लोकसंख्या अवलंबून आहे. शेतीची आकडेवारी आपण पहावी. खरीपाचे क्षेत्र पहावे. आजही ज्वारीच्या उत्पादनामध्ये घट झाली आहे. मक्याचे उत्पादन घटले आहे. २००९ मध्ये २६.१५ क्विंटल सुधारित बियाण्यांचे वाटप करण्यात आले. यावेळेस मात्र १७ लाख क्विंटल बियाण्यांचे वाटप केले आहे. तृण धान्यामध्ये देखील महाराष्ट्र राज्याला दुसऱ्यावर अवलंबून रहावे लागते ही परिस्थिती आहे.

कृषी संजीवनी हे नाव अर्थसंकल्पामध्ये पाहिले. या योजनेचा मी बारकाईने अभ्यास केला आहे. या योजनेतून शेतकऱ्यांना दिलासा मिळणार नाही. त्यांच्याकडे जी थकबाकी आहे, ती वसूल करण्यासाठी ही संजीवनी आहे. फक्त नावा पुरतीच संजीवनी योजना आहे. प्रत्यक्षात शेतकऱ्यांना दिलासा देणारी ही योजना नाही.

अध्यक्ष महोदय, खतासाठी ५१ कोटीची तरतूद आहे. मला याचे आश्चर्य वाटले. याचे कारण मागच्या अधिवेशनामध्ये खतांवर भरपूर चर्चा झाली. एवढी तरतूद करून देखील आजही शेतकऱ्याला खतासाठी वणवण फिरावे लागणार आहे ही काळ्या दगडावरची रेघ आहे.

आपल्या येथे अजूनही भार नियमन होत आहे. मागच्या वर्षी मी जी गोष्ट विचारली होती, ती या वर्षी कागदावर आहे. त्यामुळे मी असे विचारतो की, आडात नाही तर पोहऱ्यात कुठून येणार. वीज आपण कुठून देणार आहात. आजही आपण परराज्यातून वीज घेत आहोत. त्यामुळे ही कल्पना देखील कागदावरच राहील असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.

मी एके ठिकाणी वाचले की, वाईन उत्पादनामध्ये महाराष्ट्र आघाडीवर आहे. त्यात नमूद केले होते की, नाशिक जिल्हा हा सर्वाधिक आघाडीवर आहे. वाईन उद्योगातील उद्योजक रोज शासनाकडे खेटा मारत आहेत. आज हे सर्व उद्योग धोक्यात आले आहेत. असे असताना आम्हाला अभिमान आहे की, वाईन उद्योगात आपण आघाडीवर आहोत. मी त्याच जिल्ह्यातील आहे. या उद्योजकांचे आपण किती प्रश्न सोडविले,किती दिलासा दिला, किती तरतूद केली, घेतलेले कर्ज सुद्धा हे उद्योजक फेडू शकत नाही. कर्जापायी वायनरी त्यांना विकावी लागेल ही वस्तुस्थिती आहे.

अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

[ ॲड. उत्तमराव ढिकले ]



[ ॲड. उत्तमराव ढिकले ]

अध्यक्ष महाराज, शेतकऱ्यांना पीक योजनेचा काही फायदा होत नाही. तेव्हा या गोष्टीकडे आपण गांभीर्याने पाहिले पाहिजे. शेतकऱ्यांचे असे म्हणणे आहे की, विम्यासाठी एक महामंडळ काढले पाहिजे. विमा योजनेद्वारे १०० टक्के जोखीम स्वीकारली गेली पाहिजे. अतिवृष्टी, गारपीट, दुष्काळ यामध्ये नुकसान झालेल्या सर्व पिकांचा विमा मिळावा आणि ती योजना सर्वसमावेश असावी. द्राक्ष पिकाचा तसेच इतर फळ पिकांचा विमा घेण्यासाठी मी विमा कंपन्यांकडे अनेक वर्षे पाठपुरावा करीत आहे. परंतु त्या विमा कंपन्या तसा विमा घेण्यास तयार होत नाहीत. ज्यामध्ये विमा कंपनीचा फायदा आहे, कंपनीच्या खिशातून पैसे जाणार नाहीत अशा स्वरुपाच्या योजना विमा कंपन्यांकडून राबविल्या जातात. आपण अमेरिकेसारखी पद्धत अवलंबिली पाहिजे. अमेरिकेमध्ये शेतकऱ्यांना बोलावून सांगितले जाते की, यावर्षी कोणते पीक घ्यावे याची माहिती दिली जाते. जर त्यामध्ये नुकसान झाले तर पीक विमा योजनेद्वारे त्यांना २०० पटीने नुकसान भरपाई मिळते. अशा पद्धतीची व्यवस्था आपल्या येथे करणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महाराज, याठिकाणी सांगण्यात आले की, शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंतच्या कर्जावर शून्य टक्के दराने व्याज माफ करण्यात आलेले आहे. परंतु जे शेतकरी मुदतीमध्ये कर्जाची परतफेड करतील त्यांना या योजनेचा लाभ होणार आहे. परंतु शेतकऱ्यांच्या पाचवीला गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी नेहमीच पुजलेल्या आहेत. निसर्गाच्या लहरीवर शेती अवलंबून असते. तेव्हा या योजनेचा लाभ किती शेतकऱ्यांना होईल हा देखील प्रश्न आहे.

अध्यक्ष महाराज,अन्नधान्याच्या बाबतीत महाराष्ट्र अजूनही परावलंबी आहे. आपणास २० टक्के धान्य परदेशातून वा परराज्यातून आयात करावे लागते. हा महाराष्ट्राला एक कलंक आहे. राज्याला १३० लाख टन धान्याची आवश्यकता आहे आणि तेवढे धान्य आपण महाराष्ट्रात पिकवू शकत नाही, ही शोकांतिका आहे. मी फार वेळ घेणार नाही. फक्त एक-दोन मुद्दे मांडतो. मी आपणास घंटी वाजविण्याची संधी देणार नाही.

अध्यक्ष महाराज, आज महाराष्ट्रात पाण्याची वाटपाची काय स्थिती आहे ? आपण पाणी वाटपाचे धोरण ठरविले आहे. त्यानुसार प्रथम पिण्याच्या पाण्याला प्राधान्य, नंतर उद्योगधंदे आणि त्यानंतर शेतीला पाणी असे धोरण स्वीकारलेले आहे. आपण उद्योगधंद्यांना प्राधान्याने पाणी देऊनही आज राज्यातील ९०० उद्योगधंदे बंद आहेत. तसेच महाराष्ट्र उद्योगधंद्यामध्ये पिछाडीवर आहे. शेतीचे पाणी कमी करून उद्योगधंद्याना प्राधान्य दिले, त्या उद्योगधंद्यामध्ये महाराष्ट्र दुसऱ्या स्थानावर आहे. एकीकडे शेतीला पाणी न दिल्यामुळे शेतीच्या उत्पादनात घट झाली तर दुसरीकडे उद्योगधंद्याना प्राधान्याने पाणी देऊनही जवळपास ९०० उद्योगधंदे बंद आहेत. त्यामुळे बेरोजगारी वाढली आहे आणि त्यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात आलेली नाही.

अध्यक्ष महाराज, सन २००३-०४ मध्ये महाराष्ट्र राज्याचे एकूण उत्पन्न खर्चाच्या ३१.५८ टक्के होते. परंतु आज ते प्रमाण घसरत जाऊन २०.६९ टक्क्यांवर आलेले आहे. हे घसरते प्रमाण महाराष्ट्राची शोकांतिका आहे. आज महाराष्ट्राचे चित्र पाहिले तर असे दिसते की, पिकाचे उत्पादन घटले आहे, काही भागात स्वच्छ पिण्याचे पाणी मिळत नाही, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवालात सरकारची लक्तरे वेशीवर टांगलेली आहेत.

[ ॲड. उत्तमराव ढिकले ]

अध्यक्ष महाराज, आज कायदा आणि सुव्यवस्थेची काय परिस्थिती आहे ? महाराष्ट्रापेक्षा बिहार बरा अशी परिस्थिती झालेली आहे. माननीय गृहमंत्री सभागृहात उपस्थित आहेत.

अध्यक्ष महाराज, ग्रामीण भागात ६० टक्के लोकांकडे शौचालये नाहीत. पिण्याच्या पाण्याची परिस्थिती अत्यंत वाईट आहे.

आरोग्याच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर १ लाख लोकसंख्येमागे फक्त ८ रुग्णालये आहेत. ग्रामीण रुग्णालयासाठी फक्त १८ हजार ८०० रुपयांची तरतूद केलेली आहे. परंतु पुणे, नागपूर, औरंगाबाद शहरातील रुग्णालयांसाठी ६६ कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. यात किती विरोधाभास आहे ? ग्रामीण भागातील रुग्णालये आणि काही शहरांसाठी १८ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. पंरतु यात नाशिक शहराचा नामनिर्देशही नाही.

महोदय, नाशिक शहरामध्ये शासनाने सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल मंजूर केले. त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. नाशिक शहरातील सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलचे बांधकाम झाले आहे. परंतु त्या ठिकाणी मशिनरी नाही, पुरेसा निधी नाही. त्या ठिकाणी कामे करण्यास कोणी पुढे येत नाही. नाशिक शहरात च्आांधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंयछ अशी परिस्थिती ह्या सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलची निर्माण झाली आहे.

महोदय, मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्यासंदर्भात राज्य सरकारने चांगली घोषणा केली आहे. परंतु यासाठी राज्य सरकारने आर्थिक तरतूद किती केली आहे ? माझ्या माहितीनुसार राज्य सरकारने या कामी कोणतीही आर्थिक तरतूद केलेली नाही. ही सुद्धा घोषणा कागदावर आहे.

महोदय, राज्य सरकारने या अर्थसंकल्पात तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी १७५ कोटी रुपये तरतूद केली आहे. परंतु त्यामध्ये कोणत्या तीर्थक्षेत्रांचा समावेश होतो ? देहू, आळंदी, पंढरपूर, शेगांव आणि कोल्हापूर या चार तीर्थक्षेत्रांसाठी ही तरतूद आहे. महोदय, नाशिक येथे १२ वर्षानंतर कुंभमेळा भरतो. नाशिकमध्ये चार तीर्थक्षेत्रे आहेत. या वर्षीच्या अर्थसंकल्पात नाशिक येथील रामकुंड, राम मंदिर, तपोवन या तीर्थक्षेत्रांकरिता कसल्याही प्रकारची तरतूद केली नाही.

महोदय, सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये नाशिकचा राज्यात चौथा क्रमांक आणि देशात २६ वा क्रमांक लागतो. असे असताना या शहराच्या तीर्थक्षेत्रांसाठी, आरोग्यासाठी तरतूद करण्यात आली नाही. या निमित्ताने मी राज्य सरकारला विचारु इच्छितो की, राज्य सरकारला महाराष्ट्राच्या नकाशावरुन नाशिक शहर पुसायचे आहे काय ?

महोदय, आपण भाषण संपविण्यासाठी बेल न वाजविल्यामुळे आपल्याला मनापासून धन्यवाद देतो व माझे भाषण संपवितो.

**श्री. अशोक जाधव** (अंधेरी पश्चिम) : महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेऊन, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, या वर्षाच्या अर्थसंकल्पावर माझे विचार व्यक्त करीत असताना, मी सर्व प्रथम माननीय उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री श्री. अजित पवार यांचे अभिनंदन करतो. त्यांनी या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून कृषी, दुर्बल घटक, सिंचन इत्यादी सारख्या अनेक बाबींवर पुरेशी तरतूद केली आहे.

[ श्री. अशोक जाधव ]

२००९-१० च्या अर्थसंकल्पामध्ये जी तरतूद करण्यात आली होत्या, त्या तरतुदींमध्ये या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये वाढ करण्यात आली आहे.

महोदय, या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये ५० हजार रुपयांपर्यंतचे कर्ज बिनव्याजी स्वरुपात आणि ३ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज केवळ २ टक्के व्याज दराने देण्याची घोषणा करण्यात आली आहे. राज्य सरकार शेतकऱ्यांच्या हितासाठी कशा पद्धतीने पुढे पाऊल टाकत आहे, हे आपण बारकाईने बघितले पाहिजे.

महोदय, शेतकऱ्यांना वेळेवर पाणी, चांगल्या पद्धतीची बियाणे, खते उपलब्ध करून दिली पाहिजेत. तसेच शेतकऱ्याने पिकविलेले धान्य बाजारापर्यंत पोहोचविले पाहिजे आणि त्याच्या मालाला शेतीमध्येच दर द्यावयास पाहिजे. महोदय, असे केले तर शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होणार नाही, किंबहुना शासनावर आत्महत्या केलेल्या कुटुंबीयांना मदत करण्याची वेळ येणार नाही.

महोदय, नद्या जोडणी तसेच कालवे तयार करून पाण्याची योजना राबविण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारची योजना राबविली तर ७० टक्के शेतकऱ्यांना फायदा होईल.

महोदय, आज मोठ्या प्रमाणावर शहरांचा विकास होत आहे. प्रत्येक जिल्ह्यात शहरे निर्माण होत आहेत. या कडे सद्धा लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

महोदय, विजेची निर्मिती करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. आज प्रत्येक सदस्य बोलताना विजेवर येऊन थांबतो, भारनियमनावर येऊन थांबतो. राज्यात उद्योजक यावेत असे जर आपल्याला वाटत असेल, राज्याची प्रगती व्हावी असेल वाटत असेल तर, राज्यात येणाऱ्या उद्योजकांना पुरेशी वीज उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. उद्योजकांना वीज, पाणी उपलब्ध करून दिले नाही तर उद्योजक महाराष्ट्रात येणार नाहीत. त्यामुळे या दृष्टिकोनातून सद्धा राज्य सरकारने विचार केला पाहिजे.

महोदय, जैतापूर प्रकल्प होण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी खूप प्रयत्न केले आहेत. या चर्चेच्या माध्यमातून मी विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांचा महाराष्ट्राकडे बघण्याचा दृष्टिकोन चांगला असेल तर, जैतापूर प्रकल्पाला विरोध करण्याऐवजी मदत केली पाहिजे. जेणेकरून, राज्यातील विजेची समस्या कमी होऊन, आपले राज्य प्रगतीच्या वाटेकडे जाईल. मुंबई शहराची परिस्थिती फार अटीतटीची झाली आहे. १ कोटी लोकसंख्या असलेले मुंबई शहर ५ वर्षांत दीड कोटी वर पोहोचले आहे. तेथील परिस्थिती अशी आहे की, आज प्रत्येक भागामध्ये पाण्याची कमतरता आहे, वीजेची सद्धा मारामारी आहे. रिलायन्स आपल्या मर्जीने विजेचे बील लावत आहे, टाटा आपल्या मर्जीने विजेचे बील लावत आहे, बेस्ट आपल्या मर्जीने विजेचे बील लावत आहे. विजेच्या दरामध्ये कुठेतरी समानता आली पाहिजे. आपल्याकडे ट्रान्सपोर्टसाठी रोड आहेत, ब्रिज आहेत. एमएमआरडीए फार मोठ्या प्रमाणात काम करीत होते. परंतु, आज एमएमआरडीएने मुंबईतून आपला हात काढून घेतला आहे. फक्त मोनो रेल, मेट्रो रेल एवढ्यापुरते एमएमआरडीए मर्यादित राहिली आहे. त्यामुळे महानगरपालिकेकडे केंद्र शासनाचा येणाऱ्या पैशाचा उपयोग योग्य रितीने झाला पाहिजे आणि असे झाले नाही तर आज परत सायकल वरुन जाणारा माणूस हा गाडीतून जाणाऱ्या माणसापेक्षा एक तास अगोदर मुंबईला पोहचू शकतो, हे मी तुम्हाला आजच सांगू शकतो. आपण प्रत्येक वेळी जलवाहतुकीचा विचार करतो. परंतु, एक गोष्ट आपल्या लक्षात येत नाही. आपण

[ श्री. अशोक जाधव ]

ज्यावेळी या संदर्भात विचार करतो, त्यावेळी सर्व परीने विचार केला पाहिजे. जलवाहतूक सुरू करायची असेल तर जेथे आपण स्टेशन बनविणार आहात, ज्या पद्धतीने मेट्रोची स्टेशन बनविले आहे, त्या ठिकाणी तुम्हाला पार्किंगसाठी वेगवेगळ्या सुविधा केल्या पाहिजेत. मग त्या जमिनीच्या खाली ३ माळे असो किंवा जमिनीच्या वर ६ माळे असो. तुम्ही जोपर्यंत त्या संदर्भात तरतूद करणार नाही, तोपर्यंत जलवाहतुकीचा उपयोग होणार नाही. जो कोणी आपल्या घरातून नरिमन पॉईंटला जाण्यासाठी निघेल, मग तो बोरीवलीहून निघो वा अंधेरीहून निघो, तो तेथे गाडी पार्क करून लाँचमध्ये बसून मुंबईला येऊ शकतो.

अध्यक्ष महोदय, मला आपल्या माध्यमातून काही बाबी सांगायच्या आहेत. शासन प्रगतीच्या दिशेने पावले टाकत आहे. विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य म्हणाले की, शासन हे कर्जात आहे. पण मला माझ्या मित्रांना एका गोष्टीची आठवण करून द्यायची आहेत की, आज जगात टॉप बिझनेसमन आहेत, त्या प्रत्येकाच्या डोक्यावर बँकेचे लोन आहे. बँकेचे लोन घेतल्याशिवाय ते धंदा करू शकत नाहीत आणि त्याचपद्धतीने आपण इतकेमोठे महाराष्ट्र राज्य चालवित आहोत. आपण प्रगतीच्या दिशेने एक-एक पाऊल पुढे टाकत आहोत. त्यामुळे लोन असणे हा काही गुन्हा नाही. परंतु, लोन घेतल्यानंतर त्याची परतफेड वेळच्या वेळी झाली पाहिजे, हा फार महत्त्वाचा प्रश्न आहे.

अध्यक्ष महोदय, आज मुंबईमध्ये सगळ्यात मोठा प्रश्न झोपडपट्ट्यांचा आहे. शासनाने झोपडपट्ट्यांसंदर्भात एसआरए नावाची एक चांगली योजना आणली आहे. माझी शासनाला विनंती आहे की, आपल्याला एसआरए योजनेमध्ये खूप फरक केला पाहिजे. एखादी संघटित कमिटी येते आणि एखाद्या बिल्डरला आणते. पुन्हा दुसरी संघटित कमिटी येते आणि दुसऱ्या बिल्डरला आणते, कोर्टकचेऱ्या होतात आणि ते प्रयोजन अडकून पडते. अध्यक्ष महोदय, तसे होता कामा नये. शासनाची ही फार सुंदर योजना आहे. शासनाने या योजनेसाठी कडक धोरण अवलंबिले पाहिजे. जेणेकरून एसआरए योजना चांगल्याप्रकारे राबविता येईल. अध्यक्ष महोदय, ही योजना राबविताना शासनाने अजून एक काम केले पाहिजे की, बिल्डरवर नियंत्रण असले पाहिजे. बिल्डरने योजना राबविताना चांगल्याप्रकारे काम केले पाहिजे. कारण आता इमारत दुसऱ्याला हॅन्डओव्हर करण्यापूर्वी गळती सुरू होत आहे. आपण त्यांना त्या संदर्भात क्षमा करता कामा नये. आपण असे केले तर जमिनीवर आडवी असलेली झोपडपट्टी उभी निर्माण करीत आहोत असे होईल. आपले असे करणे चुकीचे आहे असे माझे प्रांजळ मत आहे.

अध्यक्ष महोदय, मला दुसरी एक विनंती करायची आहे. मुंबईमध्ये राहणाऱ्या एखाद्याने एखाद्याचे झोपडे, घर विकत घेतले आणि तो १५ वर्षांचा पुरावा देत असेल तर त्याने घेतलेल्या झोपड्याला, घराला आपण मान्यता दिली पाहिजे. कारण तो माणूस शेवटी कुठे जाणार ? सरकारी नोकरीत देखील बरेच लोक आहेत. पोलीस खात्यामार्फत सांगण्यात येते की, आम्ही पोलिसांसाठी ६००० घरे बांधत आहोत. परंतु, आपण हे आता करीत आहात. या अगोदर पोलीस खात्यात, मंत्रालयात काम करणारे लोक क्वॉर्टर्समध्ये राहत होते. अध्यक्ष महोदय, त्यांच्याकडे इतका पैसा नाही की ते जाऊन एखादा फ्लॅट घेऊ शकतील. ते कुठेतरी चाळीत रहायला जातात. महाराष्ट्रात मुंबईत राहत असेल तर तो त्यांचा हक्क आहे. एखाद्याने झोपडे विकत घेतले तर आपण त्याला मान्यता दिली पाहिजे.

[ श्री. अशोक जाधव ]

आपण असा विचार करताना एखाद्या बिल्डरला किंवा दलालाला फायदा होणार नाही या संदर्भात जर कोणते कायदे करता आले तर ते केले पाहिजेत. आपण त्या संदर्भात मागे पुढे होता कामा नये, असे माझे प्रांजळ मत आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरामध्ये फार मोठ्या प्रमाणात म्हाडाच्या जमिनी आहेत. यासंदर्भातील अनेक बातम्या रोज वर्तमानपत्रामध्ये आपण वाचत असतो. म्हाडाने या जमिनींवर घरे बांधलेली आहेत. लॉटरीच्या माध्यमातून ही घरे कधी मिळतील, याची लोक वाट पहात आहेत. म्हाडाकडे मोठ्या प्रमाणावर जमिनी असतांना या जमिनी विकसित करण्यासाठी खाजगी विकासकांना का देण्यात येतात आणि त्यांना २.५ एफएसआय का देण्यात येतो ? असा प्रश्न आमच्या मनामध्ये निर्माण होतो. या जमिनींवर २.५ एफएसआय वापरुन म्हाडाने स्वत: विकास केला तर लोकांना आणखी स्वस्तात घरे मिळतील व ही घरे सामान्यांना परवडतील, असा मला विश्वास आहे. आज विकासक जी घरे बांधतात ती ४ बेडरुम, ५ बेडरुमची असतात. सामान्यांना ही घरे परवडत नाहीत व त्यामुळे त्यांना घरे मिळत नाहीत. मुंबईतील हा सर्वसामान्य माणूस मिरा-भाईंदर किंवा विरार येथे न जाता मुंबईमध्येच राहिला पाहिजे, यासाठी म्हाडाने स्वत: पुढाकार घेऊन त्यांच्या जमिनींचा विकास करणे गरजेचे आहे, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरामध्ये फार मोठा समुद्र किनारा आहे. या समुद्र किनाऱ्यांचा जर चांगल्या प्रकारे विकास केला तर पर्यटनाच्या दृष्टीने त्याचा फार मोठा उपयोग होऊ शकतो. आज आपण पाहिले तर समुद्र किनारा लाभलेले गोवा राज्य जगामध्ये पर्यटनाच्या दृष्टीने ओळखले जात आहे. मुंबई शहराला फार मोठा समुद्र किनारा लाभला आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील कोकण पट्टयाला देखील फार मोठा समुद्र किनारा लाभला आहे. त्यामुळे मला असे वाटते की, आपण आपल्या दृष्टीकोनात बदल केला पाहिजे आणि पर्यटनासाठी या समुद्र किनाऱ्यांचा उपयोग करून घेतला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, राजीव गांधी जीवनदायी योजना आहे. या योजनेची खरी परिस्थिती पहावयाची असेल तर मुंबईतील आमदारांच्या परिस्थितीकडे पहावे. दररोज १० ते १५ माणसे मुंबईतील आमदारांच्या कार्यालयाच्या बाहेर बसलेली असतात. त्यामुळे माझी अशी आग्रहाची विनंती आहे की, शासनाने न चुकता ही योजना पहिल्यांदा मुंबई शहरात राबवावी.

अध्यक्ष महोदय, शिक्षणाच्या संदर्भात मी गेल्या वर्षी देखील मुद्दा मांडला होता. आजही मी याबाबत विनंती करणार आहे. आज मुंबई शहरामध्ये महापालिकेच्या ताब्यात मोठ्या संख्येने शाळा आहेत. या शाळा मराठी माध्यमाच्या आहेत. मराठी भाषेला प्राधान्य मिळाले पाहिजे, अशी भाषा करणाऱ्या नेत्यांची मुलेही आज इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकत आहेत. आज महापालिकेच्या शाळांची अशी परिस्थिती आहे की, या शाळांमध्ये पटसंख्या पूर्ण भरत नाही. पुरेशी विद्यार्थी संख्या त्या ठिकाणी नाही. म्हणून माझी अशी विनंती आहे की, मुंबईतील महापालिकेच्या सर्व शाळा इंग्रजी माध्यमातून सुरू करण्यात याव्यात. फक्त या शाळांमध्ये मराठी हा सक्तीचा विषय असला पाहिजे, अशी अट घालण्यात यावी.

अध्यक्ष महोदय, आणखी एक विनंती मला करावयाची आहे. मुंबई शहरामध्ये एसआरएची योजना आपण राबवित आहोत आणि या माध्यमातून हजारो लोकांना घरे देत आहोत. परंतु, एसआरएच्या संदर्भात चांगला कायदा तयार केला पाहिजे, असे मला वाटते. आज असे घडते की, जी उरलीसुरली

**[ श्री. अशोक जाधव ]**

जागा आहे त्या ठिकाणी रातोरात झोपड्या बांधल्या जातात. त्यामुळे मुंबई शहरासाठी एक कडक कायदा तयार केला पाहिजे. राजकीय पुढारी असो किंवा आणखी कोणी असो, जे कोणी झोपड्या बांधतील त्याच्यावर कडक कारवाई करणारा कायदा तयार केला पाहिजे. अन्यथा, अगोदरच या झोपड्यांनी मुंबई शहराला भकास केले आहे. त्यामुळे यापुढे अशा झोपड्या होणार नाहीत, याची काळजी आपण घेतली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, संजय गांधी निराधार योजनेच्या बाबतीत फार वाईट परिस्थिती मुंबईमध्ये आहे. या योजनेसाठी ज्या अटी घालण्यात आलेल्या आहेत त्या संपूर्ण महाराष्ट्राचा विचार करून घालण्यात आल्या आहेत. आज मुंबईची परिस्थिती बघितली तर धुणीभांडी करणारी स्त्री सद्धा महिन्याला ३ हजार रुपये कमाविते. त्यामुळे अशा स्त्रियांना या योजनेचा लाभ मिळत नाही. माझी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती आहे की, मुंबईसाठी आणि महाराष्ट्रासाठी वेगवेगळ्या अटी निश्चित करण्यात याव्यात.

अध्यक्ष महोदय, केंद्र शासनाने मुंबई शहरासाठी मोठ्या प्रमाणावर निधी दिला असला तरी मुंबईची परिस्थिती आज वाईट आहे. आज मुंबईतील अनेक विभागांमध्ये पिण्याचे पाणी मिळत नाही. जे १५-२० मजल्यांचे टॉवर्स आहेत त्यांना पाण्याच्या लाईनची परवानगी दिली जाते. परंतु, ज्या जुन्या चाळी आहेत, ४-५ मजल्यांच्या इमारती आहेत त्यांना पाण्याच्या लाईनची परवानगी मिळत नाही. त्यामुळे टाक्या बांधून, पंपिंग करून पाणी घेतले जाते. केंद्र शासनाने महानगरपालिकेला मोठ्या प्रमाणावर निधी दिलेला आहे. त्या निधीबाबत आवश्यक ते लक्ष ठेऊन पाण्याबाबतचे काम शासनाने तातडीने करून घेणे गरजेचे आहे. पिण्याच्या पाण्याची समस्या मुंबई शहरात मोठ्या प्रमाणात वाढत चालली आहे. त्याचप्रमाणे मुंबई शहरातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचा विचार करण्यात आलेला नाही. कचऱ्याच्या विल्हेवाटीचा निर्णय घेतला नाही, तर भविष्यकाळात मोठी समस्या निर्माण झाल्यास मुंबईत लोकांना राहणे कठीण होणार आहे. कचऱ्यापासून वीज निर्मिती व्हावी, जेणेकरून कचऱ्याची विल्हेवाट होईल व विजेचा प्रश्न सुटेल. महाराष्ट्र शासनाने अपारंपारिक ऊर्जा निर्मितीकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. गोबर गॅस प्रकल्प राबवून वीज तयार करण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक खेडे गावांत जर गोबर गॅस प्रकल्प राबविला तर एकही खेडे विजेविना राहणार नाही असा माझा ठाम विश्वास आहे. मी स्वत: माझ्या फार्म हाऊसवर गोबर गॅस प्रकल्प राबविला असून त्या पासून तयार होणाऱ्या विजेवर दोन हॉर्सपॉवरचा पंप चालविण्यात येत आहे. गोबर गॅस प्रकल्पाचा बारकाईने अभ्यास करून हा प्रकल्प प्रत्येक खेड्यात, वाड्या वस्त्यांवर राबविणे अत्यंत आवश्यक आहे. याकडे मंत्री महोदयांनी लक्ष देणे आवश्यक आहे. यासंदर्भात योग्य ते नियोजन करण्याची आवश्यकता आता निर्माण झालेली आहे.

अध्यक्ष महोदय, या बजेटमध्ये नळ पाणी पुरवठा योजनांना निधी देण्याचे ठरविण्यात आले आहे. ग्रामीण भागातील सर्व सामान्य गरीब माणसांपर्यंत या योजनेचा लाभ मिळाला पाहिजे. आज महाराष्ट्र राज्याला ५० वर्षे होऊन गेली तरी सामान्य माणसाला पिण्याचे पाणी व वीज मिळण्यासाठी वाट पहावी लागत आहे. सामान्य माणसाला वीज व पिण्याचे पाणी मिळाले पाहिजे याची काळजी करण्याची आवश्यकता आहे. या सर्व गोष्टींकडे बारकाईने लक्ष देण्याची गरज आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

**श्री. सुरेश हाळवणकर** (इचलकरंजी) **:** अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी व माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्राचा हा सुवर्ण महोत्सवी अर्थसंकल्प आहे असे वर्णन सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्यांनी भाषण करताना केले आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी या अर्थसंकल्पाचे स्वागत केले आहे. वित्तमंत्री महोदयानी महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प मांडल्यानंतर विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना विधान भवनाच्या पायावर बसावे लागले आहे.

**तालिका सभाध्यक्ष (ॲड दिलीप सोपल )** : सन्माननीय सदस्यांनी अर्थसंकल्पावर बोलावे, अर्थसंकल्पाची आकडेवारी काय आहे, त्यासंदर्भात भाषण करावे.

**श्री. सुरेश हाळवणकर :** अध्यक्ष महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी आकडेवारी सांगितलेली आहे, मी अर्थसंकल्पावरच बोलणार आहे. ११ वर्षानंतर पहिल्यांदा विरोधी पक्षाच्या आमदारांना विधान भवनाच्या पायऱ्यांवर बसावे लागले आहे. ज्या प्रमाणे रामाने १४ वर्षे वनवास भोगला, पांडव ११ वर्षे अज्ञातवासात गेले होते. रामाने १४ वर्षे वनवास भोगल्यानंतर रामराज्य स्थापित केले. पायऱ्यांवर बसतांना आम्ही असा संकल्प केला की, महाराष्ट्राच्या जनतेने हे चित्र पाहिले आहे. येणाऱ्या काळात या महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने रामराज्य स्थापित करण्याची वेळ पुन्हा आली आहे.

अध्यक्ष महोदय, आम्ही सभागृहामध्ये आल्यानंतर माननीय विरोधी पक्षनेत्यांचे अर्थसंकल्पावरील भाषण ऐकले. माननीय अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पामध्ये शेतकऱ्यांसाठी एका अतिशय चांगल्या योजनेचा उल्लेख केलेला आहे. शेतकऱ्यांनी ५० हजार रुपयापर्यंतचे कर्ज घेतले तर शून्य टक्के व्याज आणि ३ लाख रुपयापर्यंतचे कर्ज घेतले तर २ टक्के व्याज आकारण्यात येणार आहे. त्यासाठी ८४ कोटी रुपयांची तरतूद सद्धा करण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.चिमणराव पाटील यांनी त्यांच्या भाषणामध्ये सांगितले की, ही योजना कागदावर राहता कामा नये. या योजनेचा शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळाला पाहिजे. मी माननीय अर्थमंत्र्यांचे एका गोष्टीकडे लक्ष वेधू इच्छितो की, शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यामुळे महाराष्ट्र शासनाचे डोळे उघडले आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सावकाराच्या कर्जातून मुक्त करण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये या योजनेचा उल्लेख करण्यात आला. हीच परिस्थिती महाराष्ट्रातील बेरोजगार तरुणांच्या बाबतीत आहे. माननीय अर्थमंत्र्यांनी अशाच पद्धतीचे धोरण बेरोजगार तरुणांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यासाठी स्वीकारले पाहिजे. राज्यातील बेरोजगार तरुणांना ५० हजार रुपयापर्यंतचे कर्ज शून्य टक्के व्याज दराने उपलब्ध करून दिले तर ते वडापाव किंवा इतर छोटे उद्योग सुरू करू शकतील. तरुणांना ३ लाख रुपयापर्यंत २ टक्के व्याज दराने कर्ज उपलब्ध करून दिले आणि त्याने तयार केलेल्या मालाला पुढील ७ वर्षासाठी करमुक्त केले तर महाराष्ट्रातील बेरोजगार तरुणाला या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये स्वयंरोजगार उपलब्ध करून देता येईल. म्हणून माननीय अर्थमंत्री महोदयांनी अशा प्रकारचे धोरण स्वीकारावे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, काल शेतकरी आझाद मैदानावर आले होते. मघाशी एका सन्माननीय सदस्याने भाषणामध्ये उल्लेख केला की, माननीय अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पातील दोन पाने शेतकऱ्यांसाठी खर्च केलेली आहेत. परंतु अर्थसंकल्पातील दोन पाने शेतकऱ्यांसाठी खर्च करून सद्धा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची खरी मागणी काय आहे हे माननीय अर्थमंत्र्यांच्या लक्षात येत नसेल तर यापेक्षा दुसरे दुर्दैव कोणते आहे ? शेतकऱ्यांची एकच मागणी आहे की, शेतीसाठी दिवसातून १० तास वीज उपलब्ध

**[ श्री. सुरेश हाळवणकर ]**

करून द्यावी. परंतु मागील दोन वर्षापासून महाराष्ट्रातील शेतकरी कर्जबाजारी होत आहे. महाराष्ट्र शासनाला विजेच्या विक्रीतून फायदा झालेला आहे. वीज नियामक आयोगाने १२,५७४ दशलक्ष युनिट वीज महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी द्यावी, असे सांगितले होते. त्यावेळी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना १० तास वीज मिळत होती. माननीय अर्थमंत्री सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. परंतु ते त्यांच्या दालनामध्ये माझे भाषण ऐकत असतील. यावर्षी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी वीज नियामक आयोगाने १४,०५७ दशलक्ष युनिट वीज द्यावी असे सांगितलेले आहे. मागील वर्षी शेतकऱ्यांसाठी १२,५७४ दशलक्ष युनिट वीज द्यावी असे सांगितलेले असतांना शेतकऱ्यांना १० तास वीज मिळत होती. यावर्षी शेतकऱ्यांना १४,०५७ दशलक्ष युनिटमधून ११ तास वीज उपलब्ध करून देता येईल. परंतु मागील वर्षी वीज वितरण कंपनीने उद्योजकांना वीज विकली आणि त्यातून ८०० कोटी रुपये नफा कमविलेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. माननीय अर्थमंत्र्यांनी या अर्थसंकल्पातील दोन पाने शेतकऱ्यांकरिता खर्च केलेली आहेत. शेतकऱ्यांसाठी ज्या सवलती जाहीर केल्या जातात त्या फक्त कागदावरच राहतात. शेतकऱ्यांना पिकाची भूक भागविण्यासाठी वीज उपलब्ध करून दिली तर महाराष्ट्रातील शेतकरी सक्षमपणे त्याच्या पायावर उभा राहू शकेल. म्हणून माननीय अर्थमंत्र्यांना यासंदर्भात घोषणा करावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, आपण देशाचा विचार केला हरियाणा, पंजाब, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, तामिळनाडू, राजस्थान, कर्नाटक राज्यांमध्ये शेतकऱ्यांना ८ ते १० तास विजेचा पुरवठा केला जातो. छत्तीसगड, बिहार, झारखंड आणि उत्तराखंड या राज्यांमध्ये शेतकऱ्यांना १८ ते २० तास विजेचा पुरवठा केला जातो. चंदीगढ, दिल्ली, हिमाचल प्रदेश, गोवा, केरळ, गुजरात, पॉंडेचरी, ओरीसा आणि पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये शेतकऱ्यांना २४ तास विजेचा पुरवठा केला जातो. ही माहिती वेबसाईटवर उपलब्ध आहे. देशातील काही राज्ये शेतकऱ्यांना २० तास, २४ तास वीज उपलब्ध करून देतात. परंतु महाराष्ट्रामध्ये वीज नियामक आयोगाने शेतकऱ्यांसाठी किती वीज उपलब्ध करून द्यावयाची हे ठरवून दिलेले असतांना सद्धा शेतकऱ्यांच्या हक्काची वीज उद्योजकांना विकली जाते. त्यामुळे शेतकऱ्यांना वीज उपलब्ध होऊ शकत नाही. माननीय अर्थमंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये याचा खुलासा करावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मी वस्त्रोद्योग विभागाच्या संदर्भात सांगू इच्छितो की, महनीय राज्यपाल महोदयांनी त्यांच्या अभिभाषणात महाराष्ट्राला वस्त्रोद्योग धोरण प्रदान करू असे सांगितले होते. त्या अनुषंगाने माननीय अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणात असे सांगितले होते की, लवकरच राज्याचे नवीन वस्त्रोद्योग धोरण जाहीर करण्यात येणार आहे. त्यासाठी १०० कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे असे सांगितले. अध्यक्ष महोदय, मी सभागृहाला या संदर्भात वेळोवेळी आकडेवारी दिलेली आहे. पुन्हा ती आकडेवारी देऊन मी सभागृहाचा वेळ वाया घालविणार नाही. संपूर्ण देशात असलेल्या उद्योगापैकी निम्मे उद्योग या राज्यात असताना गेल्या ४ वर्षापासून एखाद्या उद्योगाला धोरण नसणे, ही बाब शासनाच्या दृष्टीने अतिशय अक्षम्य आहे. सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने राज्याचे हे सर्वात मोठे अपयश आहे. ४००० कोटी रुपयांचा महसूल देणाऱ्या उद्योगासाठी अर्थसंकल्पात १०० कोटी रुपयांची तरतूद करून राज्यातील यंत्रमाग उद्योगाच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम शासनाने केलेले आहे. अशा प्रकारे शासनाने राज्यातील यंत्रमाग उद्योगांना निराश केले आहे.

**[ श्री. सुरेश हाळवणकर ]**

अध्यक्ष महोदय, तामिळनाडू व आंध्र प्रदेश येथील १५० सूत गिरण्यांमधून महाराष्ट्र राज्यात सूत येते. त्यावर २ टक्के टॅक्स आकारुन त्याची विक्री केली जाते. परंतु राज्यातल्या सूताची विक्री करीत असताना त्यावर ४ टक्के टॅक्सची आकारणी केली जाते. परिणामी राज्यात परप्रांतीयाची सूताची बाजारपेठ निर्माण झाली आहे. परिणामी राज्याचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत आहे. आम्ही माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवारसाहेब यांच्याकडे मागणी केली होती की, केंद्राप्रमाणे राज्यातील सूतावर २ टक्के कराची आकारणी करावी. परंतु माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी वस्त्रोद्योग उद्योगावर ५ टक्के व्हॅट आकारुन, वस्त्रोद्योग व यंत्रमाग उद्योगाला पुन्हा अडचणीत टाकण्याचे काम केले आहे. म्हणून माननीय अर्थ मंत्री महोदयांनी सदरहू दरवाढ कमी करण्याची आवश्यकता आहे.

महोदय, गेल्या ४ वर्षापासून शासनाकडून आम्हाला सांगितले जात होते की, आम्ही नवीन वस्त्रोद्योग धोरण जाहीर करू. मी वस्त्रोद्योग धोरणाच्या अनुषंगाने सभागृहाला आकडेवारी न सांगता एकाच मिनिटात त्या बाबतची एक लहान गोष्ट सांगून माझे भाषण संपविणार आहे.

एका गावात १२ बलुतेदार असतात, त्यात काही डोंबारी व कुंभार असतात. त्यांच्याकडे ४-५ गाढवे असतात. दिवसभर काबाडकष्ट करून ही गाढव घरी आल्यानंतर त्यांचा मालक त्यांना वैरण घालीत नसे. त्या गाढवांच्या पाठीवर रपाटा मारल्यानंतर ती उकीरडी फुकायला जायची. सकाळी गाढवांचा मालक उकीरड्यावर येऊन त्या गाढवांना हुसकावत असे. तोपर्यंत एकही गाढव घरी जात नसे. परंतु त्यापैकी एक गाढव अतिशय प्रामाणिक होता. आपला मालक येण्यापूर्वीच, तांबड फुटण्याच्या अगोदरच ते गाढव मालकाच्या दारात जाऊन उभे रहायचे. आपला मालक इतका बदमाश आहे, आपल्याकडून मोठ्या प्रमाणात काम करून घेतो व आपल्याला वैरण देखील घालत नाही. असे असताना हे गाढव सकाळी उठल्या उठल्या मालकाच्या दारी कसे जाते, या बाबत बाकीच्या गाढवांनी शोध घेण्याचा प्रयत्न केला. सदर गाढव डोंबाऱ्याचा होता. डोंबारी गावोगावी खेळ करायचा. त्याला गंगू नावाची मुलगी होती. डोंबारी खेळ दाखवित असताना दोरी बांधायचा व ढोल वाजवत त्या मुलीला असे सांगायचा की, "गंगू या दोरीवरुन चल, तू या दोरीवरुन पडली तर, मी तुझे लग्न या गाढवाशी करीन." त्यामुळे या गाढवाला असे वाटायचे की, गंगू कधी तरी दोरीवरुन पडेल व तिचे माझ्यासोबत लग्न होईल."

दादा, आपल्या राज्यात वस्त्रोद्योग धोरणाची हीच परिस्थिती आहे. गेल्या ४ वर्षापासून सर्व जण आश्वासन देत आहेत. दादा, आता आपण सभागृहात वस्त्रोद्योग धोरणासंबंधी घोषणा केली असल्यामुळे मला आपले अभिनंदन केलेच पाहिजे. परंतु त्यासंबंधी अर्थसंकल्पात असलेल्या तरतूदीमध्ये वाढ करणे अत्यावश्यक आहे. त्यात आपण वाढ केली पाहिजे. तसेच वस्त्रोद्योग मंत्री महोदयांनी सभागृहात लवकरात लवकर वस्त्रोद्योग धोरण आणून, त्याची घोषणा करावी जेणेकरून एप्रिल महिन्यापासून नव्या उद्योजकांना नवी दिशा मिळण्यास मदत होईल. अशी मी वस्त्रोद्योग विभागाच्या ३ कोटी लोकांमार्फत प्रामाणिक मागणी करतो व माझे दोन शब्द संपवितो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !

---

## औचित्याच्या मुद्याबाबत

**श्री. शिशिर शिंदे :** अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. महाराष्ट्र राज्य आज सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरा करीत आहे. शनिवार दिनांक २ एप्रिल, २०११ रोजी वानखेडे स्टेडियममध्ये क्रिकेटचा अंतिम सामना आयोजित केला जाणार आहे. त्या ठिकाणी फक्त इंग्रजी आणि हिंदी भाषेतून क्रिकेटचे समालोचन केले जाते. यासंदर्भात माझी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री महोदयांकडे मागणी आहे की, वानखेडे स्टेडियमवर मराठीतून समालोचन झाले पाहिजे. याकरिता त्यांनी दोन दिवसात आवश्यक ते प्रयत्न करण्याची जरुरी आहे. शनिवार दिनांक २ एप्रिल, २०११ रोजी वानखेडे स्टेडियममध्ये क्रिकेटचे समालोचन मराठीतून व्हावे याकरिता माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी आवश्यक ती पावले उचलली पाहिजेत. वानखेडे स्टेडियममध्ये मराठीतून समालोचन करण्यास संबंधितांना आदेश देण्याबाबत योग्य ती कार्यवाही केली पाहिजे. आज अनेक माजी क्रिकेटपटू मराठीतून चांगले समालोचन करीत आहेत. यासंदर्भातील जबाबदारी माननीय मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री महोदयांनी पार पाडली पाहिजे.

**तालिका सभाध्यक्ष (ॲड दिलीप सोपल) :** ठीक आहे. माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी त्यांची नोंद घेतेली आहे. आता सन्माननीय सदस्य कृषीभूषण श्री. साहेबराव पाटील अर्थसंकल्पावर भाषण करतील.

---

## सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

(चर्चा पुढे सुरू...)

**कृषीभूषण साहेबराव पाटील** (अंमळनेर) **:** अध्यक्ष महोदय, माननीय श्री. अजितदादा पवार यांनी न भुतो न भविष्यती ऐतिहासिक अर्थसंकल्प सभागृहात सादर केलेला आहे. यासंदर्भात मी त्यांच्याकडे एक विनंती करणार आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी आपल्या विभागातील कामे मार्गी लागावीत याकरिता माननीय श्री. अजितदादा पवार यांच्याकडे मागणी केलेली आहे.

अध्यक्ष महोदय, नाशिक जिल्ह्यात मागील दोन ते तीन महिन्यापूर्वी एक वाईट दु:खद घटना घडली होती. नाशिक जिल्ह्याचे अतिरिक्त जिल्हाधिकारी श्री. सोनवणे यांना रॉकेल माफियांकडून जीवंत जाळले गेले होते. सदर अधिकाऱ्याच्या कुटुंबीयास शासनाकडून २५ लाख रुपयांची मदत जाहीर केली. तसेच निवृत्त होईपर्यंतचे वेतन त्यांच्या कुटुंबाला देण्याचे मान्य केले आहे. त्यानंतर सेवानिवृत्तीचे वेतन त्याच्या कुटुंबाला मिळणार आहे. त्याच्या कुटुंबाला एक घर सद्धा देण्यात येणार आहे. तसेच त्याच्या कुटुंबातील एकाला नोकरी देण्याचे आश्वासन सद्धा देण्यात आलेले आहे. अशा प्रकारे जवळ जवळ त्याला १ कोटी रुपयांची मदत शासनाने जाहीर केली आहे.

अध्यक्ष महोदय, जळगाव जिल्ह्यातील एका शेतकऱ्याचा परीक्षेच्या संदर्भात पोलीस अधिकाऱ्याच्या मारहाणीत दुर्देवी मृत्यू झाला होता. संबंधित शेतकऱ्याला शासनाकडून फक्त १ लाखाचीच मदत जाहीर केलेली होती. अध्यक्ष महोदय, उपरोक्त दोन्ही घटनांमध्ये दोघांच्या मृत्यूनंतर दिल्या जाणाऱ्या मदतीमध्ये प्रचंड तफावत आहे. तरी संबंधित शेतकऱ्याला २५ लाख रुपयांची मदत देण्याबाबत माननीय श्री. अजितदादांनी भूमिका जाहीर केली पाहिजे, अशी प्रकारची विनंती करून मी माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

**श्री. विजय शिवतारे** (पुरंदर) **:** अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ चा अर्थसंकल्प दोन दिवसापूर्वी माननीय श्री. अजित पवार यांनी सभागृहात सादर केला होता. सदर अर्थसंकल्पास नापसंती व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, गेल्या २० वर्षापासून वेगवेगळे विभाग सांभाळणारे माननीय श्री. अजित पवार विशेष असा सन २०११-१२ चा अर्थसंकल्प सादर करतील अशी अपेक्षा होती. परंतु माझा पूर्णपणे भ्रमनिरास झालेला आहे. अर्थसंकल्पाच्या परिच्छेद दोनमध्ये असे नमूद केले आहे की, कृषी व उद्योग क्षेत्राची उन्नती व्हावी आणि सर्वसाधारण माणूस डोळ्यापुढे ठेऊन...

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री. विजय शिवतारे यांनी भाषण वाचलेले आहे ऐकलेले नाही.

**श्री. विजय शिवतारे :** अध्यक्ष महोदय, मी अर्थसंकल्पाच्या पुस्तकातून वाचूनच बोलत आहे. यामध्ये अर्थसंकल्प सादर करतो आहे असे म्हटले आहे. त्याचे कारण मी सांगणार आहे. आदरणीय कृषी मंत्री श्री. शरदचंद्र पवार साहेबांनी २००७ मध्ये National Policy for Farmers राष्ट्रीय शेतकी धोरण मंजूर केले होते. यासंदर्भात मी त्यांच्याकडे जी विचारणा करणार आहे त्याचे उत्तर माननीय श्री. अजितदादा पवार यांनी मला दिले पाहिजे. शेतकऱ्यांसाठी राष्ट्रीय शेतकी धोरण मंजूर केले होते. अर्थसंकल्पात गप्पा मारण्यापेक्षा त्याची किती अंमलबजावणी केली याचे उत्तर दिले तर खऱ्या अर्थाने आपली भूमिका स्पष्ट होईल असे मला वाटते. या संदर्भात निश्चितपणे भूमिका स्पष्ट केली पाहिजे. शासनाने जाहीर केलेल्या योजनांची अंमलबजावणी होणे शेतकऱ्यांच्या दृष्टीने हीताचे आहे. मात्र या धोरणांची अंमलबजावणी होत असल्याचे दिसून येत नाही. स्वामिनाथन समितीने केलेल्या शिफारशींना शासनाने केराची टोपली दाखवली असे म्हटले तर ते अयोग्य होणार नाही. माननीय वित्त मंत्र्यांना मी विनंती करू इच्छितो की, या धांरणांच्या संदर्भात शासनाने श्वेतपत्रिका जाहीर करावी. शासन खरोखर शेतकऱ्यांचे कनवाळू असेल तर तशा प्रकारची भूमिका श्वेतपत्रिकेच्या माध्यमातून जाहीर करावी. शेतकऱ्यांच्या कर्ज माफीच्या संदर्भात शासनाने सांगितले आहे की, ५० हजार रुपयांपर्यंत बिनव्याजी कर्ज व ३ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जावर २ टक्के दराने कर्ज दिले जाणार आहे. शेतकऱ्यांना अडचणीतून बाहेर काढण्यासाठी शासनाकडून शेतकऱ्यांच्या शेती मालाला योग्य हमी भाव मिळाला पाहिजे. शेतकऱ्यांना शेत मालाच्या खर्चावर आधारीत हमी भाव मिळाला पाहिजे. याकरिता निश्चित धोरण माननीय मंत्री श्री. अजित पवार यांच्याकडून अपेक्षित होते. मात्र तशा प्रकारचे कोणतेही धोरण जाहीर करण्यात आलेले नाही. तुम्हीच शेतकऱ्यांना भिकारी बनवणार व पुन्हा तुम्हीच कर्ज माफी जाहीर करणार. हे योग्य नाही. असे मला या ठिकाणी सांगावयाचे आहे.

अध्यक्ष महोदय, कॅगचा रिपोर्ट व राज्याच्या सन २०१०-११ च्या आर्थिक पाहणी अहवालामध्ये असे सांगितले जाते की, राज्यातील शेतीची परिस्थिती चांगली आहे. मात्र राज्यातील शेती लागवडीचे क्षेत्र कमी होत आहे. ही अतिशय चिंताजनक बाब आहे. राज्यामध्ये सिंचनाकरिता अर्थसंकल्पामध्ये ६३०० कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. मागील वर्षीचा कॅगच्या रिपोर्ट मी पाहिला. त्या नुसार शासनाने ५७ हजार कोटी रुपये खर्च करून ५० टक्के उद्दीष्ट देखील गाठता आले नाही. राज्यात आतापर्यंत केवळ १८ टक्के क्षेत्रावर सिंचन झाले आहे. हे मी सांगत नसून शासनाच्या अहवालात नमूद केलेले आहे. ६३०० कोटी रुपयांचे आपण काय करणार आहात ? हा निधी शेतकरी व सामान्य जनतेला

[ श्री. विजय शिवतारे ]

मिळण्याऐवजी भ्रष्टाचाराच्या माध्यमातून चुकीच्या ठिकाणी विनियोग होणार आहे, असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. ६३०० कोटी रुपयांच्या नवीन योजना राबविल्या जाणार आहे, ते ठीक आहे. मात्र सन १९७२ पासून संपूर्ण राज्यामध्ये पाझर तलाव, कोल्हापूर बंधारे तयार केलेले आहेत. ते आता नादुरुस्त आहेत. त्यांचा वापर करता येत नाही. आता पाझर तलावाची नवीन कामे हाती घेण्याकरिता शेतकरी एक इंच जमीन देण्यास देखील तयार होत नाहीत. कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, शेततळे, गावतळे, वळण बंधारे, शिवकालीन तलाव, पाझर तलाव यांचा वापर जास्तीत जास्त करण्यासाठी ६३०० कोटी रुपयांपैकी एक हजार कोटी रुपये दिले असते तर त्याचा चांगला परिणाम झाल्याचे आपल्याला दिसून आले असते. मात्र या संदर्भात शासनाची दूरदृष्टी दिसून येत नाही. अध्यक्ष महोदय, माननीय वित्त मंत्र्यांनी उत्तराच्या भाषणामध्ये जाहीर केल्याप्रमाणे डीपीडीसी मधील ४.५ टक्के निधीमधून कामे हाती घेण्याची योजना आहे. मात्र तेवढा निधी पुरेसा नाही. पाझर तलाव, कोल्हापूर बंधारे, इ.च्या कामाकरिता शेतकऱ्यांकडून जमीन संपादित केली आहे. त्या शेतकऱ्यांना जास्तीत जास्त निधी दिला पाहिजे. यामुळे डोंगराळ भागातील लोकांना, शेतकऱ्यांना, गोरगरीब जनतेला निश्चितपणे लाभ मिळू शकेल. शासनाने अर्थसंकल्पामध्ये नवीन प्रकल्प जाहीर करावयास हवा होता.

अध्यक्ष महोदय, एक हुशार व्यक्ती म्हणून माननीय वित्त मंत्री महोदयांकडून आम्हाला अपेक्षा होती. राज्यातील पडीक जमिनीच्या संदर्भात शासनाने काय निर्णय घेतलेला आहे ? आसाममध्ये डोंगर उतारावर चहाचे मळे फुलतात. तेथील शेतकरी करोडो रुपये कमावतात. मात्र आपल्या राज्यामधील डोंगराळ भागातील जमीन नापीक आहे. आपल्या राज्यामध्ये तशा प्रकारची कोणतीही योजना हाती घेतलेली नाही. केवळ वांझोटे प्रकल्प का हाती घेतले जातात ? डोंगर उतारावर सिताफळे, आवळे, बांबू या सारखी जंगली झाडे लावली पाहिजेत. मात्र इतर राज्यांनी ज्या प्रकारची कल्पकता वापरली, तशी कल्पकता या ठिकाणी वापरात आल्याचे दिसून येत नाही. यामुळे माझा भ्रमनिरास झालेला आहे.

अध्यक्ष महोदय, 'मागेल त्याला वीज' देण्याची शासनाची योजना आहे. ही अतिशय चांगली योजना आहे. एका बाजूला योजना तयार करावयाची व दुसऱ्या बाजूला त्या योजनेच्या दृष्टीने नकारात्मक गोष्टी करावयाच्या, असे सध्या होत आहे. सन २००१ साली भूजल पातळीचे सर्व्हेक्षण झाले होते. त्या नंतर आजतागायत हे सर्व्हेक्षण झालेले नाही. माझ्या पुरंदर तालुक्या मधील ६० गावे डार्क झोनमध्ये आहेत. सन २००२ साली शासनाने परिपत्रक काढले होते. भूजल पातळीचे सर्व्हेक्षण न झाल्यामुळे राज्यातील सर्व शेतकरी मंडळी आज पाण्यावाचून वंचित आहेत. भूजल पातळीच्या सर्वेक्षणासाठी दादांनी निश्चितपणे आदेश दिले पाहिजेत. हा प्रश्न केवळ पुरंदर पुरता मर्यादित नाही तर त्याची व्याप्ती संपूर्ण महाराष्ट्रामध्येही पसरलेली आहे. भूजल पातळीचे सर्वेक्षण तातडीने महिन्या दोन महिन्यांत करून या योजनेचा लाभ शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने देण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महाराज, कृषी संजीवनी नावाची आणखी एक योजना दादांनी जाहीर केली आहे. त्यायोगे शेतकऱ्यांच्या वीज बिलातील दंड व व्याज माफ करण्यात येणार आहे. परंतु, दादांना मी माझ्या

[ श्री. विजय शिवतारे ]

तालुक्यातील केवळ एक उदाहरण देऊ इच्छितो, सन २००४ साली माननीय श्री. शरद पवार यांनी माननीय राज्यपालां समवेत ज्यावेळेस धरणामध्ये आपले हेलिकॉप्टर उतरवले होते, त्यावेळेची शेतकऱ्यांची विजेची बिले पाहिली तर, धरणामध्ये, विहिरींमध्ये पाणी नसताना, त्यांनी वीज व पाण्याचा वापर केलेला नसताना हजारो, लाखो रुपयांची विजेची बिले पुरंदर मधील अनेक शेतकऱ्यांना आकारल्याची उदाहरणे माझ्याकडे आहेत. यासाठी खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना जर न्याय द्यायचा असेल तर फक्त वीज बिलातील दंड आणि इतर माफी देण्यापेक्षा सन २००४ मध्ये जो दुष्काळी पिरीयड होता, त्या काळामध्ये शेतकऱ्यांवर जी विजेची बिले चुकीच्या पद्धतीने आकारण्यात आली त्यांचा विचार करून ती रद्द करावी असे मला वाटते.

अध्यक्ष महाराज, अर्थसंकल्पामध्ये मागासवर्गीय भागामध्ये १११ विशाल प्रकल्प नेण्यात आले असे सांगितले आहे. परंतु, मला आपल्या माध्यमातून माननीय श्री. अजित दादांना हे विचारावयाचे आहे की, माझा पुरंदर हा देखील मागासवर्गीयच भाग आहे तेथे कोणता विशाल प्रकल्प आणलेला आहे ? दुसरी गोष्ट म्हणजे २००५ ते २०११ या कालावधीमध्ये १ लाख ४४ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक या राज्यामध्ये झाली आणि यातून २ लाख १५ हजार तरुणांना नोकरी मिळेल असे सांगितले गेले. परंतु, माझे असे म्हणणे आहे की, केवळ हवेतील आकडेवारी सांगू नका तर सन २००४ ते सन २०१० या काळात किती बेरोजगारांची नोंदणीकृत आकडेवारी आपल्याकडे आहे ती पाहून यामुळे खरोखरच बेकारी कमी झाली आहे का हे पाहिले पाहिजे.

अध्यक्ष महाराज, आपल्याकडे १ लाख ४४ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक ६ वर्षांमध्ये करण्यात आली आणि गुजरातमध्ये २० लाख कोटींची गुंतवणूक दोन दिवसांमध्ये मोदी करीत आहेत. आपण याबाबत नक्की कोठे आहोत याचा विचार करण्याची गरज आहे. निव्वळ स्तुती करण्यापेक्षा आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महाराज, या अर्थसंकल्पामध्ये किल्ल्यांच्या सरंक्षणासाठी २० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असे सांगण्यात आले आहे. पुरंदर किल्ल्याच्या डागडुगीसाठी ५ कोटी रुपयांचा खर्च मंजूर झाला आणि त्यापैकी २ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. परंतु, पुढचे ३ कोटी रुपये खर्च होऊ शकत नाहीत कारण तो किल्ला संरक्षण विभागाच्या अंतर्गत आहे. त्यामुळे त्याच्या गेट पासून पुढचे काम होऊ शकत नाही. जर खऱ्या अर्थाने याला न्याय द्यावयाचा असेल तर, किल्ल्यांच्या संवर्धनासाठी निव्वळ घोषणा न देता खऱ्या अर्थाने त्यासाठी योजना झाल्या पाहिजेत व त्यातून असे प्रश्न सोडवले पाहिजेत.

(माननीय **तालिका सभाध्यक्ष** सदस्यांची बोलण्याची वेळ संपल्याबाबतची बेल वाजवतात)

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य, श्री. विजय शिवतारे आपले भाषण सुरू होऊन दहा मिनिटे झालेली आहात. आपण आपले मुद्दे थोडक्यात मांडावेत.

**श्री. विजय शिवतारे :** अध्यक्ष महाराज, जवाहरलाल नेहरु नागरी पुर्ननिर्माण अभियानांतर्गत हजार बाराशे कोटी रुपयांच्या योजना राबविल्या गेल्या म्हणून सांगितले जाते. परंतु, ज्या जेजुरीला संपूर्ण महाराष्ट्राचे कुलदैवत बोलले जाते त्या मल्हारी मार्तडच्या जेजुरी गावामध्ये सांडपाणी,

[ श्री. विजय शिवतारे ]

गटाराची व्यवस्था नसावी, सासवडला सांडपाण्याची व्यवस्था नसावी, बारामती मतदारसंघातील या पुरंदरमध्येही ही व्यवस्था नसावी याचे मला वाईट वाटते. अध्यक्ष महाराज, आपल्या माध्यमातून मला माननीय दादांना विनंती करावयाची आहे की, खऱ्या अर्थाने समन्याय आपण द्यायला पाहिजे. एका बाजूला पुणे जिल्ह्यामध्ये काय काय काम होताना दिसतात. पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यामध्ये ७ मंडल अधिकारी निवासस्थान होत आहेत, २२ तलाठी कार्यालये होत आहेत. पुणे जिल्ह्यामध्ये इतर तालुके नाहीत का ? याबाबतीत निश्चितपणे समन्याय दिला पाहिजे, अशी माझी विनंती आहे.

(सन्माननीय सदस्य सर्वश्री, बबनराव शिदे, सुरेश धस व कृषिभूषण श्री. साहेबराव पाटील माननीय श्री. अजित पवार यांच्या बसण्याच्या जागेजवळ जाऊन त्यांच्याशी बोलत असतात.)

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य सर्वश्री, बबनराव शिंदे, सुरेश धस व कृषिभूषण श्री. साहेबराव पाटील यांना मी सांगू इच्छितो की, त्यांनी आपल्या जागेवर बसावे व माननीय अर्थ मंत्र्यांना सन्माननीय सदस्यांच्या भाषणावर लक्ष केंद्रित करू द्यावे आपण त्यांना डिस्टर्ब करू नये.

**श्री. विजय शिवतारे :** अध्यक्ष महाराज, एकच मुद्दा आहे तो मी मांडतो. प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी २४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. याचे जर संपूर्ण राज्यासाठीचे गणित केले तर एका प्राथमिक आरोग्य केंद्राला फक्त १८ हजार कोटी रुपये मिळतात. ग्रामीण भागाचे आरोग्य ही महत्त्वाची गोष्ट असताना त्यासाठी केवळ २४ कोटी रुपयांची तरतूद करणे ही थट्टा आहे. जेजुरीच्या ग्रामीण रुग्णालयास प्रशासकीय मान्यता मिळून ५ वर्षे झालेली आहेत. अध्यक्ष महाराज, आपल्या माध्यमातून माननीय श्री. अजित दादांना मला हे विचारावयाचे आहे की, आपल्याच जिल्ह्यातील हे ग्रामीण रुग्णालय प्रशासकीय मान्यता मिळाल्याच्या पाच वर्षांनतरही का सुरू होत नाही ? याचे उत्तर मिळाले पाहिजे. आपण मला बोलण्याची संधी दिली याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द संपवतो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

**श्री.नाना पटोले :** अध्यक्ष महाराज, सदर चर्चा आज किती वाजेपर्यंत चालणार आहे ? कारण आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये शासकीय विधेयके आणि अर्धा तास चर्चा देखील दाखविण्यात आल्या आहेत. सदर कामकाज आपण पुढे ढकलणार आहात काय ?

**तालिका सभाध्यक्ष :** आपण ८ वाजेपर्यंत अर्थसंकल्पावर चर्चा करणार आहोत. हे यापूर्वीच सभागृहाला अवगत केले आहे.

**श्री. प्रशांत बंब** (गंगापूर) : अध्यक्ष महाराज, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

या वर्षाचा अर्थसंकल्प हा राज्यातील सर्व व्यवस्थेला पूरक असून एवढा चांगला अर्थसंकल्प असूच शकत नाही. वेगवेगळ्या गोष्टीतून जो प्रयत्न करण्यात आला आहे तो खरोखरच चांगला आहे. एक वेगळी गोष्ट सुरू करण्यासाठी सदर सुरूवात केली आहे असे मला वाटते. यात फक्त अंमलबजावणीचा प्रश्न आहे. आपण मागचे बरेच अर्थसंकल्प वाचले तर असे दिसून येते की, अंमलबजावणीचा अभाव असल्यामुळे ते परिपूर्ण होऊ शकले नाहीत. त्यामुळे ते अर्थसंकल्प पुढे-पुढे फाटत गेले. ज्या विचाराने हा अर्थसंकल्प मांडण्यात आला आहे त्या विचाराने अंमलबजावणी झाली, सर्वांनी सहकार्य केले तर

**[ श्री. प्रशांत बंब ]**

पुढच्या तीन वर्षामध्ये भारतात आपल्या महाराष्ट्राचा अर्थसंकल्प सर्वात चांगला राहील, याबाबत मला शंका वाटत नाही. काही काही गोष्टीं आपल्याला गांभीर्याने बघाव्या लागतील. आपल्याला आपल्या राज्यातील इन्कम सोर्सेस पहावे लागतील. आपले इन्कम सोर्सेस १ लाख २१ कोटीचे असले तरी इन्डायरेक्टली ३ ते ४ लाख कोटीच्या प्रॉपर्टीज दरवर्षी महाराष्ट्रामध्ये विकल्या जातात. हा पैसा आपल्या खजिन्यामध्ये येत नाही. त्यापैकी फक्त मुंबईत ७५ ते ८० हजार कोटींच्या प्रॉपर्टीज विकल्या जातात. आपल्याकडे म्हाडा, एसआरए अशा यंत्रणा असून देखील हा निधी आपल्याकडे येत नाही. असे का होते ? यासंबंधी कोणताही मंत्री उत्तर देऊ शकत नाही. म्हाडा स्वत: बांधकाम क्षेत्रात असून देखील इमारती का बांधत नाही. प्रायव्हेट बिल्डर्सना इमारती बांधण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येते. त्यामुळे मला हेतू बद्दल शंका येते. आपण जर योग्यरितीने व्यवस्थापन केले तर आपल्या तिजोरीमध्ये एक ते सव्वा लाख कोटी रुपये प्रत्येक वर्षी जमा होतील. हे पैसे एक हजार लोकांना जातात. ते जर आपल्या तिजोरीत आले तर त्याचा फायदा राज्यातील सर्व गोरगरीब जनतेला होईल, असे माझे मत आहे.

सोर्सेस वाढविण्यासाठी आपण एक नवीन खाते निर्माण केले पाहिजे. कित्येक वर्षापासून डेड प्रॉपर्टीज पडून आहेत. काही ठिकाणी पाईप पडलेले आहेत, सिंचनाच्या मशिनरी सडत आहेत. या सर्व अरबो-खरबो रुपयोंच्या डेड प्रापर्टीज आहेत त्याचा लिलाव करण्यासाठी एक खाते तयार केले पाहिजे. कारण या प्रॉपर्टीजची तेथेच चोरी होत असते किंवा वेगवेगळ्या माध्यमातून हा माल विकला जातो. त्यामुळे या डेड प्रापर्टीज निकालात काढण्यासाठी व त्यांचे चांगल्या पद्धतीने व्यवस्थापन करण्यासाठी एक खाते निर्माण केले पाहिजे.

तसेच फास्ट ट्रॅक कोर्ट देखील आपल्या राज्यात महत्वाचे आहे. राज्य सरकारचे सर्वात महत्त्वाचे काम जनतेला संरक्षण देणे हे आहे. परवा देखील मी बोललो होतो आणि आज देखील बोलतो की, ५ ते ७ वर्षांच्या मुलींवर बलात्कार करून त्यांचा खून करण्यात येतो. असे कृत्य करणारे आरोपी पकडले जातात. त्यांना जामीन देखील मिळतो. पण त्या प्रकरणांचा निकाल वर्षानुवर्षे लागत नाही. त्यामुळे दोन प्रकारचे फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन केले पाहिजेत. एक म्हणजे अल्पवयीन लहान मुलींवर बलात्कार करतात त्या प्रकरणांचा निकाल तीन महिन्यामध्ये लागला पाहिजे. त्यातील आरोपींना फाशीच्या शिक्षेची तरतूद ठेवली पाहिजे जेणेकरून असे प्रकार वाढीला लागणार नाहीत.

अध्यक्ष महाराज, आपण मागील काही वर्षाचा इतिहास पाहिला तर ५ हजार कोटी, ५० हजार कोटी वा आणखी मोठ्या रकमेचा भ्रष्टाचार केलेल्या व्यक्तींना शिक्षा झाल्याचे आपणास ऐकिवात येत नाही. तेव्हा लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी यांच्या संदर्भात फास्ट ट्रॅक कोर्ट निर्माण करण्यात यावेत आणि त्याचा निकाल एक वर्षाच्या आत लागेल असा नियम केला तर भ्रष्टाचारास त्वरित आळा बसेल.

अध्यक्ष महाराज, शासनामार्फत शाळांसाठी, कॉलेजांसाठी १ रुपया अशा नाममात्र दराने किंवा फ्री ऑफ कॉस्टवर जमीन दिली जाते. परंतु कालांतराने त्या सर्व डीम्ड युनिव्हर्सिटी होतात. मग या युनिव्हर्सिटी गोरगरिबांना कोणत्याही प्रकारच्या सुविधा देत नाहीत. त्यांना मनाला येईल त्याप्रमाणे फी आकारतात. मेडिकलसाठी ७०-८० लाख रुपये दिल्याशिवाय ॲडमिशन मिळत नाही. तेव्हा शाळांसाठी वा कॉलेजेससाठी अशा नाममात्र दराने दिलेल्या जमिनी परत घेतल्या पाहिजेत किंवा त्यांच्याकडून

[ श्री. प्रशांत बंब ]

रेडीरेकनर प्रमाणे पैस घेतले पाहिजेत. आपला अशाप्रकारचा कायदा असताना सद्धा आपल्या तिजोरीमध्ये पैसा जमा होत नाही. तेव्हा याबाबत विचार झाला पाहिजे.

अध्यक्ष महाराज, आज मोठ्या प्रमाणावर सट्टा लावण्यात येतो. मग तो क्रिकेट खेळावरील असेल किंव अन्य खेळावरील असेल. असे सट्टे शासनाने बंद करावेत किंवा ते अधिकृत करून त्यावर १० टक्के टॅक्स लावावा. आपण अशाप्रकारे टॅक्स लावल्यास कोट्यावधी रुपये शासनाच्या तिजोरीमध्ये जमा होतील. मी येथे सट्ट्याचे समर्थन करीत नाही. तो बंद केला पाहिजे असे माझे मत आहे. परंतु तो बंद होत नाही. म्हणून तो अधिकृत केला तर निदान त्यावर लावलेल्या टॅक्समुळे शासनाच्या तिजोरीमध्ये काही निधी जमा होईल.

अध्यक्ष महाराज, स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण देण्याची घोषणा झाली. आपण महिलांना ५० टक्के आरक्षण दिलेच पाहिजे. परंतु त्यांना आतापासूनच पोलिटीकल प्रशिक्षण दिले पाहिजे. त्याचा त्यांना नक्कीच फायदा होऊ शकेल. ज्या ठिकाणी महिलांना आरक्षण दिलेले आहे त्याठिकाणी परिस्थिती आपण पाहत आहोत. तेव्हा महिलांना चांगले् प्रशिक्षण देण्यासाठी शाळा कॉलेजेस उघडली पाहिजेत.

अध्यक्ष महाराज, याठिकाणी आरोग्याच्या बाबतीत अनेकवेळा चर्चा होते असते. त्यावेळी आपण एक मुद्दा उपस्थित करत असतो तो म्हणजे शासन ज्या ट्रस्टना नाममात्र भाड्याने रुग्णालयासाठी जागा देते, त्या रुग्णालयामध्ये नियमाप्रमाणे १०-२० टक्के गोरगरिबांवर उपचार करणे त्यांना बंधनकारक आहे. त्यांच्यासाठी काही खाटा आरक्षित ठेवणे आवश्यक आहे. परंतु रुग्णालयाकडून अशाप्रकारे खाटा आरक्षित ठेवण्यात येत नाहीत. या संदर्भात माझी अशी सूचना आहे की, अशा रुग्णालयाकडून प्रत्येक आठवड्याला किती जणांना सेवा दिली याची यादी देण्याचे बंधनकारक करावे. त्या यादीमध्ये आम्ही इतक्या रुग्णांना सेवा दिली त्यापैकी नियमाप्रमाणे असलेल्या २० टक्के लोकांना सवलतीच्या दरामध्ये सेवा दिली त्याची अमुक अमुक यादी अशाप्रकारचे बंधन त्यांच्यावर घातले तर त्याचा निश्चितपणे सर्वसामान्य लोकांना फायदा होईल.

अध्यक्ष महाराज, आपण हे वर्ष पर्यटन म्हणून साजरा करीत आहोत. महाराष्ट्रातील एलोरा, खुलदाबाद आणि म्हैसमाळ ही जागतिक पर्यटन स्थळे असून देखील त्याठिकाणी शासनाने प्राधिकरण निर्माण केलेले नाही. तेव्हा एलोरा, खुलदाबाद आणि म्हैसमाळ याठिकाणी प्राधिकरण करावे. माननीय मुख्यमंत्री एलोरा येथे भेट देऊन गेले. श्री. राहुल गांधी यांनी एलोरा म्हणजे आठवे आश्चर्य आहे असे म्हटलेले आहे. तरी देखील शासनाने या पर्यटन स्थळांकडे म्हणावे तसे लक्ष दिलेले नाही. म्हैसमाळ हे थंड हवेचे ठिकाण आहे. तेव्हा त्याठिकाणी प्राधिकरण व्हावे अशी माझी विनंती आहे.

महोदय, एका ठिकाणी धाड टाकावयास गेलेल्या अधिकाऱ्याची हत्या केल्यानंतर, राज्यात ९ दिवसांत जितक्या धाडी टाकल्या गेल्या त्यातील ८० टक्के धाडींमध्ये काही ना काही बाबी निदर्शनास आल्या. याचा अर्थ काही तरी घटना घडावी आणि त्यातून चांगले व्हावे, अशी भावना निर्माण झाली आहे. स्थानिक अधिकारी, स्थानिक पोलीस यांना या बाबतची माहिती असते. एखादी मोठी घटना घडल्यानंतर, धाडी टाकल्या जातात आणि त्या गोष्टींवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला जातो.

[ श्री. प्रशांत बंब ]

महोदय, आपल्या राज्यात प्रत्येक गोष्टीमध्ये जितके व्यवस्थापन असावयास पाहिजे तितके होत नाही. यासाठी काही काही गोष्टींवर थेट नियंत्रण ठेवावयास पाहिजे. रस्ते, सिंचन, इमारतींचे बांधकाम उत्कृष्ट दर्जाचे होण्यासाठी बेरोजगार तरुणांना कॅमेरे पुरवून होणाऱ्या कामांचे चित्रीकरण करावयास सांगावे. असे केले तर डायरेक्ट कंट्रोलिंग होईल. १५-५० लाख रुपये किंमतीच्या रस्त्याच्या कामाचे चित्रीकरण करण्यासाठी केवळ १ हजार रुपये खर्च येईल. कामाचे चित्रीकरण केल्यास त्या रस्त्यासाठी किंवा सिंचन प्रकल्पासाठी किती डांबर, सिमेंट, खडी वापरली हे समजून येईल. जर त्या कामाच्या बाबतीत तक्रारी आल्या तर, आपल्याकडे चित्रीकरण हे प्रूफ राहील. आज क्वॉलिटी कंट्रोलकडून २-३ टक्के रक्कम दिल्यानंतर प्रमाणपत्र मिळते. त्यामुळे थेट नियंत्रण ठेवण्यासाठी मी कॅमेऱ्याद्वारे चित्रीकरण करण्याची जी योजना सांगितली आहे, ती प्रत्यक्षात राबविली तर मोठ्या प्रमाणावर या गोष्टींना आळा बसेल. शिवाय बेरोजगारांना सद्धा रोजगार मिळेल.

महोदय, मला अजून खूप काही बोलावयाचे होते. परंतु आपण वारंवार बेल वाजवित असल्यामुळे, मी माझे भाषण येथेच थांबवितो.

**श्री. प्रशांत ठाकूर** (पनवेल) **:** अध्यक्ष महोदय, राज्याचे उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पाला पाठिंबा देऊन, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, या राज्याच्या कृषी विकासाचा दर १२ टक्क्यांनी वाढला आहे. अशा परिस्थितीत ग्रामीण महाराष्ट्राचे अर्थकारण शेती आणि शेतीवर आधारित असलेल्या उद्योगांवर अवलंबून आहे. या वर्षीच्या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रासाठी १०,५०० कोटी रुपयांची तरतूद केल्याबद्दल मी माननीय वित्त मंत्र्यांचे अभिनंदन करतो. महोदय, राज्याच्या कृषी क्षेत्राचा विचार करीत असताना एका बाजूला राज्यातील शेतकऱ्यांचे हित जपायचे असून, दुसऱ्या बाजूला ग्राहकाला तोशीस पडता कामा नये, अशा प्रकारे तारेवरची कसरत शासनाला करावी लागत आहे. कांदा, साखर या वस्तू कधी महाग होतात आणि कधी स्वस्त होतात. या मुळे जनतेच्या डोळ्यांमध्ये अश्रू येऊ नये आणि रक्तातील साखर कमी होऊ नये म्हणून शासनाच्या माध्यमातून प्रयत्न केले पाहिजेत. तसेच शेती मालाला योग्य भाव मिळण्यासाठी योग्य ती व्यवस्था निर्माण केली पाहिजे.

महोदय, शेती मालांच्या गोदामांची संख्या वाढविण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद केल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. राज्याच्या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्याचे आव्हान सरकार समोर आहे. त्याच बरोबर जो नागरी भाग मोठ्या प्रमाणावर वाढतो आहे, त्या नागरी भागात शेतकरी जसा विकासाचा केंद्रबिंदू आहे तसाच केंद्रबिंदू समजून, तेथील जीवनमान सद्धा तितकेच चांगल्या पद्धतीने सुधारले पाहिजे, तोलामोलाचे राहिले पाहिजे, या दृष्टिकोनातून अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे

महोदय, मुंबई ही राज्याची नव्हे तर देशाची आर्थिक राजधानी आहे. सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून राज्यातील आणि मुंबईतील जनतेचे जीवनमान उंचावले पाहिजे. राज्यात ५ हजार सीसीटिव्ही कॅमेरे लावण्याच्या दृष्टीकोनातून अर्थसंकल्पामध्ये तरतूद केलेली आहे. मी त्याबद्दल शासनाचे अभिनंदन करतो. सीसीटिएम म्हणजे क्राईम ॲन्ड क्रिमिनल ट्रॅकिंग नेटवर्क सिस्टिम या केंद्र शासनाच्या योजनेमध्ये भाग घेण्याचे राज्य शासनाने ठरविले आहे. सर्व नागरी भागांमध्ये गुन्हेगारांच्या संख्येमध्ये

[ श्री. प्रशांत ठाकूर ]

वाढ होत आहे, त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस यंत्रणा सद्धा अद्ययावत असली पाहिजे. पोलीस यंत्रणेला अद्ययावत संसाधनांची साथ मिळाली पाहिजे. त्या दृष्टीने याची आवश्यकता आहे. त्यामुळे शासनाने यावर भर दिला पाहिजे, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, शहरांची निर्मिती करणाऱ्या यंत्रणा आहेत, मग ते सिडको असेल, एमएमआरडीए असेल, म्हाडा असेल, त्यांच्या माध्यमातून होणाऱ्या विकासावर शासनाचे चांगल्या पद्धतीने नियंत्रण करण्याची गरज आहे. एमएमआरडीएच्या माध्यमातून मुंबई शहरात विकास होत आहे, त्याच पद्धतीने मुंबई शहराच्या सभोतली जे एमएमआरडीए क्षेत्र आहे, त्या क्षेत्रामधील ग्रामीण भागांच्या विकासावर सद्धा तितकेच लक्ष देण्याची गरज आहे. फक्त मुंबई शहरापुरते न पहाता, सभोवतालचा भागाकडे देखील पाहिले पाहिजे. आज संपूर्ण राज्याचा विकास होत आहे. रेंटल हाउसिंग येत आहे. रेंटल हाऊसिंगच्या माध्यमातून शासनाच्या एमएमआरडीएला निधी मिळणार आहे. ज्या क्षेत्रांमध्ये रेंटल हाऊसिंग येत आहे, त्या क्षेत्रांतील पायाभूत सुविधांच्या विकासावर भर दिला पाहिजे. मुंबई असेल किंवा कोणतेही शहर असो, मोठ्या शहराच्या घनकचऱ्याचे व्यवस्थापन ज्या ठिकाणी होणार आहे, प्रकल्प येणार आहेत, मग ठाणे असो, रायगड असो, त्या भागातील पायाभूत सुविधांवर भर दिला पाहिजे. जेणेकरून तेथील लोकांची नाराजी येणार नाही. आपण यावर लक्ष देण्याची आवश्यकता आहे. शासनाकडून यासाठी मोठ्या प्रमाणात निधी दिला गेला पाहिजे, हेही पाहिले जाण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, सिडकोच्या माध्यमातून नवी मुंबईतील प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणात जमिनी घेतल्या गेल्या आहेत. सिडकोच्या माध्यमातून आता विमानतळ होणार आहे. नवी मुंबई एसईझेड प्रकल्प आजवर सुरू झालेला नाही. सदर प्रकल्पासाठी, प्रकल्पाच्या हिताच्या दृष्टीकोनातून ज्या ग्रामस्थांनी, गावठानांनी आपल्या जमिनी दिल्या, त्या गावठाणांच्या पायाभूत विकासांवर अद्यापही म्हणावा तितका भर दिला गेलेला नाही. तेथील पायाभूत सुविधांवर, सामाजिक सुविधांवर देखील तितकाच भर दिला जाण्याची आवश्यकता आहे. ग्रामीण भागातील रस्ते मग ते रायगड जिल्ह्यातील असो, ठाणे जिल्ह्यातील असो वा इतर एमएमआरडीए क्षेत्रातील असो आज पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून १० व्या योजनेतून आम्हाला ग्रँट मिळत नाही. तसेच, राज्य शासनाच्या माध्यमातून मिळणारा निधी देखील अपूरा आहे. एमएमआरडीए किंवा ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून निधी मिळणार नसेल तर ते योग्य नाही. एमएमआरडीएच्या माध्यमातून रस्त्यांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी देण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, मी आता परिवहन सेवेसंबंधी बोलतो. नव्या नागरी वसाहती जोडण्यासाठी आमच्याकडे सार्वजनिक बस व्यवस्था मोठ्या प्रमाणात झाल्या पाहिजेत. नव्याने निर्माण होणारी शहरे आहेत, पनवेलपासून नवी मुंबईपर्यंतचा सर्व परिसर आहे, तो जोडला जाणे आवश्यक आहे आणि त्याकरिता एमएमआरडीएने स्वत:ची परिवहन व्यवस्था सुरू करण्याचे ठरविले आहे पण ती स्वत:ची परिवहन व्यवस्था अद्याप सुरू होत नाही. नगरपालिकांना, स्वत:ची परिवहन व्यवस्था सुरू करण्यासाठी कुठेतरी बाध्य केले जाण्याची आवश्यकता आहे. परंतु, त्यावर जोर दिला जात नाही. अध्यक्ष महोदय, हे चित्र कुठेतरी असमाधानकारक आहे. त्यामुळे या बाबतीत योग्य पद्धतीचे धोरण घेतले जाण्याची आवश्यकता आहे. आमच्या भागातील, मग ते रायगड जिल्ह्याचे किनारे असो वा मुंबई जिल्ह्याचे

**[ श्री. प्रशांत ठाकूर ]**

किनारे असो ते जोडले जाण्याच्या दृष्टीने जेट्टीच्या विकासासाठी निधीची तरतूद केली आहे. परिवहन व्यवस्था लवकरात लवकर सुरू झाली तर बरे होईल. आज आम्हाला सगळे रस्ते जॅम झालेले दिसतात. आपण कोणत्याही भागामधून निघा. आपण जेथे अर्ध्या तासात पोहचत होतो, तेथे २ तास लागत आहेत. हे चित्र काही फारसे समाधानकारक नाही. त्यामुळे परिवहन व्यवस्थेत जलवाहतुकीला प्राधान्य दिले जाण्याची आवश्यकता आहे. अर्थसंकल्पाच्या माध्यमातून शहरी भागाच्या विकासासाठी अधिकाधिक लक्ष दिले पाहिजे. एमएमआरडीए, सिडको, काही ठिकाणी जिल्हाधिकारी या विकास करणाऱ्या संस्थांच्या माध्यमातून वाढती शहरे, ग्रामीण भागामध्ये उभी राहणारी शहरे येथे विकासाच्या संदर्भात योग्य पद्धतीने नियंत्रण ठेवले नाही तर अनेक समस्यांना तोंड देण्याची वेळ येईल. विकास संस्थांवर देखील नियंत्रण ठेवले पाहिजे.

**(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष)**

यादृष्टीकोनातून या बाबीवर पुढील कालावधीमध्ये भर दिला जावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पाच्या माध्यमातून राज्यात ज्या शासकीय यंत्रणा आहेत, ज्यामध्ये कोर्ट असतील, शासकीय महाविद्यालये असतील त्यांच्या इमारतींच्या दुरुस्तीच्या दृष्टीकोनातून चांगल्या इमारती, सुसज्ज इमारती तयार करण्यासाठी भरीव तरतूद आज केलेली नाही. ही तरतूद वाढविणे आवश्यक आहे, एवढेच सांगतो. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद. जय महाराष्ट्र.

**ॲड. चिंतामण वनगा** (विक्रमगड) **:** अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सर्वप्रथम आपण मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल आपले आभार मानतो आणि आपल्याला धन्यवाद देतो.

अध्यक्ष महोदय, हे राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. माननीय उपमुख्यमंत्री तथा अर्थ मंत्री यांनी सन २०११-१२ चा अर्थसंकल्प सभागृहाला सादर केला आहे. या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने अर्थसंकल्पामध्ये भरीव तरतूद होईल, अशी त्यांच्याकडून अपेक्षा होती.

अध्यक्ष महोदय, संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचे एक साक्षीदार माननीय श्री. दिनू रणदिवे यांचा "उजाडले, पण सूर्य कोठे", या शीर्षाखालील एक लेख वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाला आहे. हे वर्णन आदिवासींच्या बाबतीत पूर्णपणे सुसंगत आहे. आज आदिवासींना सूर्याचे दर्शन कोठे झाले आहे ? आजही आदिवासी रोजगाराकरिता स्थलांतरित होत आहेत. गावी राहून, घरी राहून पोट भरत नाही म्हणून जगण्याकरिता त्यांना बाहेर पडावे लागते. ठाणे जिल्ह्यामध्ये आदिवासी स्थलांतर करतात, त्यासाठी "जगायला जाणे" असा शब्दप्रयोग केला जातो. आदिवासींना रोजगारासाठी स्थलांतरित व्हावे लागू नये, म्हणून भरीव तरतूद अर्थसंकल्पात करणे आवश्यक होते.

अध्यक्ष महोदय, रोजगार हमी योजनेबाबतचा उल्लेख माननीय उप मुख्यमंत्री यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात आहे. या भाषणाच्या परिच्छेद १४ मध्ये "रोजगार हमी योजनेसाठी भरीव तरतूद केली

[ ॲड. चिंतामण वनगा ]

आहे", अशा प्रकारचे त्यांचे वक्तव्य आहे. गेल्या वर्षीची तरतूद आपण पाहिली तर ती ३६२ कोटी रुपये होती. या वर्षी ती ७४५ कोटी रुपये करून भरीव तरतूद केल्याचा आभास निर्माण केला गेला आहे. यापैकी २२१ कोटी रुपये जवाहर विहिरीचे, १३४ कोटी रुपये फलोद्यानाचे आणि ३४ कोटी ३२ लाख रुपये शेततळ्यांचे आहेत. २२१ कोटी रुपये, १३४ कोटी रुपये आणि ३४ कोटी ३२ लाख रुपये उणे केले तर गेल्या वर्षीच्या तरतुदीमध्ये फक्त ३ कोटी रुपयांची वाढ केली आहे. आपण जर रोजगार हमी योजनेचा आढावा घेतला तर आजही पुरेसा रोजगार या सरकारने उपलब्ध करून दिलेला नाही. त्यामुळे लोकांकडून कर रुपाने जमा केलेला निधी आजही शासनाच्या तिजोरीत पडून आहे.

अध्यक्ष महोदय, मी ज्या भागातून निवडून आलो त्या भागाचा विचार केला तर जव्हार, मोखाडा या भागामध्ये एमआयडीसीची मागणी अनेक वर्षापासून केली जात आहे. जव्हार व मोखाडा येथे एमआयडीसी मंजूर करण्यात आलेली आहे. परंतु, सरकार आता असे म्हणते की, त्या ठिकाणी पाणी उपलब्ध नसल्यामुळे एमआयडीसी होऊ शकत नाही. ठाणे जिल्ह्याचा विचार करताना सूर्या प्रकल्पाचे पाणी शहरी भागाला म्हणजे वसई व मिरा-भाईंदर या शहरांना देण्याचा विचार करण्यात येत आहे. ग्रामीण भागाला या धरणाचे पाणी दिले जात नाही. सूर्या प्रकल्पापासून १५ ते २० किलोमीटर अंतरावर पाणी दिले जात आहे. त्याचप्रमाणे सूर्या प्रकल्पाचे पाणी १०० किलोमीटर अंतरावरील वसई शहराला व १५० किलोमीटर अंतरावरील मिरा-भाईंदर शहराला पाईप लाईन टाकून देण्याचा विचार करण्यात येत आहे. आदिवासी भागातील लोकांचे स्थलांतर थांबवावयाचे असेल तर या भागात एमआयडीसी सुरू करण्याची आवश्यकता आहे, त्यासाठी बजेटमध्ये तरतूद करणे गरजेचे आहे. सूर्या धरणाचे पाणी या भागातच मिळाले पाहिजे असे मला वाटते. अर्थसंकल्पामध्ये सिंचनासाठी ६३०० कोटी रुपयांची भरीव तरतूद केल्याचे वित्त मंत्री महोदयांनी भाषणात सांगितले आहे. या तरतुदीतून कदाचित काही धरणाचे प्रकल्प पूर्ण होतील व सिंचनाची क्षमता वाढेल. सूर्या प्रकल्प हा आदिवासी उप योजनेतून तयार करण्यात आलेला आहे. भविष्यात विक्रमगड तालुक्यात देहरजा हा प्रकल्प आदिवासी उप योजनेतून करण्यात येणार आहे. या धरणाचे पाणी स्थानिक भागाला म्हणजे विक्रमगड तालुक्यालाच मिळाले पाहिजे. आदिवासी उप योजनेतून धरणाचे प्रकल्प होत असल्यामुळे त्या तालुक्यातील लोकांना पिण्यासाठी व शेतीसाठी लागणारे पाणी त्यातून दिले गेले पाहिजे. त्यासाठी या तालुक्यांना भरीव तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, अंगणवाड्यांसाठी भरीव तरतूद करण्यात आल्याचे वित्तमंत्री महोदयांनी भाषणात सांगितले आहे. त्याचप्रमाणे पोषण आहाराचा उल्लेख करण्यात आलेला आहे. एका मुलाकरीता फक्त एक रुपया तरतूद करण्यात आलेली आहे, असे जाहीर करण्यात आले आहे. आदिवासी लोकांना जो पोषण आहार दिला जातो, त्यासाठी मागील वर्षी दीड ते दोन रुपये तरतूद करण्यात आली होती. अशा प्रकारे एका मुलासाठी प्रतिदीन एकूण दोन रुपये साठ पैसे मिळत होते. यामध्ये फक्त आता एक रुपयाची वाढ करण्यात आलेली आहे. आता ही तरतूद तीन रुपये साठ पैसे प्रतिदीन इतकी करण्यात आलेली आहे.

अध्यक्ष महोदय, आज कोणत्याही उपहार गृहामध्ये १५ रुपयांना बिसलेरीची पाण्याची बॉटल मिळते. १५ रुपयांना चहा मिळत आहे. असे असताना आपण केवळ एका मुलाकरिता तीन रुपये साठ पैसे प्रतिदीन देत आहोत, ही तरतूद कमी आहे. निम्म्यापेक्षा अधिक अंगणवाड्या झोपडपट्टीत भरत

[ ॲड. चिंतामण वनगा ]

आहेत. महाराष्ट्रातील आदिवासी भागात सर्व्हे केला तर असे चित्र समोर आले आहे की, अनेक अंगणवाड्यांना इमारती नाहीत, अनेक अंगणवाड्या झोपडीत भरत आहेत. या तरतुदीमध्ये वाढ केली पाहिजे. सरकारने पोषण आहारासंदर्भात परवा एक परिपत्रक काढले आहे. या तरतुदीमध्ये भरीव वाढ करीत आहे, असे सांगत असताना अंगणवाड्यांना धान्याचा पुरवठा कंत्राटदरामार्फत करण्यात येत आहे. धान्य शिजविण्याचा रेट ५० पैशावरुन ५२ पैसे करण्यात आलेला आहे. अशा प्रकारे परिपत्रक काढण्यात आले आहे. ५२ पैसे केंद्र सरकारने जाहीर केले आहे. २५ पैसे व त्या खालील नाणे चलनातून काढून टाकण्याचा निर्णय शासनाने केलेला आहे. असे असताना शासन ५२ पैसे अशा प्रकारे पैशांमध्ये तरतुदी करीत आहेत.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र राज्याला ७०० किलोमीटरचा समुद्र किनारा लाभलेला आहे. कोकण प्रदेश अतिशय समृद्ध आणि सौंदर्याने नटलेला आहे. कोकणामध्ये मोठ्या प्रमाणावर पर्यटन होऊ शकते. म्हणून शासनाने कोकणामध्ये पर्यटन विकासाला चालना द्यावी, अशी माझी विंनती आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरामध्ये मत्स्य महोत्स्व आयोजित करण्यात आला होता. मला असे वाटले होते की, मच्छिमार लोकांसाठी अर्थसंकल्पामध्ये भरीव तरतूद करण्यात येईल. परंतु या अर्थसंकल्पामध्ये मत्स्य व्यवसाय करणाऱ्या लोकांसाठी कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. माननीय अर्थमंत्र्यांनी मच्छिमार लोकांसाठी तरतूद करावी अशी विनंती करून मी माझे दोन शब्द संपवितो.

**श्री. शंकरराव गडाख** (नेवासा) : अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, विशिष्ट व्हिजन डोळयासमोर ठेऊन अर्थसंकल्प सादर केला जातो. ग्रामीण भागाच्या उन्नतीसाठी हा अर्थसंकल्प मांडण्यात आलेला आहे. कृषी आणि उद्योग या क्षेत्राची उन्नती करून त्यामाध्यमातून बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट या अर्थसंकल्पामध्ये ठेवण्यात आलेले आहे. राज्यातील सर्व घटकांना आणि सर्व विभागांना समान न्याय देण्याचा प्रयत्न सद्धा या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आल्याचे दिसून येते. बाल कामगारांपासून बॉलीवूडपर्यंत, शेतकऱ्यांपासून उद्योगपतींपर्यंत सर्वांना बरोबर घेऊन विकास साधण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेला आहे. जो सर्वसामान्य माणूस आहे त्याच्यावर कराचे ओझे न टाकता, त्याला अर्थिक झळ न बसू देता सर्वांना समान न्याय देण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेला आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यातील जो मागासलेला समाज आहे, दुर्लक्षित समाज आहे त्याला सद्धा सामाजिक न्याय देण्याचा दृष्टीकोन या अर्थसंकल्पामध्ये ठेवण्यात आलेला आहे. शेतीवर अवलंबून असणाऱ्या ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी केंद्र शासन, राज्य शासन अनेक वर्षापासून मोठ्या प्रमाणावर आर्थिक तरतूद करीत आहे. आपण जर महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल बधितला तर सन १९६०-६१ मध्ये ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण ७१.७८ टक्के होते. सन २००१ च्या जनगणनेमध्ये हे प्रमाण ५७.५७ टक्क्यापर्यंत आलेले आहे. याचा अर्थ ४० वर्षामध्ये जवळपास १ कोटी ४० लाख लोक ग्रामीण भागातून शहरामध्ये स्थलांतरित झालेले आहेत. हे स्थलांतर झाल्यामुळे शहरावर मोठ्या प्रमाणात ताण पडत आहे. ग्रामीण भागातील लोक शहरामध्ये स्थलांतरित होत असल्यामुळे ग्रामीण भागामध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झालेले आहे. म्हणून केंद्र शासनाने शेतकऱ्यांचे कर्ज माफ केलेले

[ श्री. शंकरराव गडाख ]

आहे, शेतकऱ्यांना खताचा पुरवठा करण्याच्या संदर्भात निर्णय घेतलेला आहे, शेतकऱ्यांना कमी व्याज दराने कर्ज पुरवठा करण्याचा निर्णय घेतलेला आहे. अशा प्रकारचे अनेक निर्णय केंद्र शासनाने घेतलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, राज्य शासनाने शेतकऱ्यांना ५० हजार रुपयापर्यंतचे कर्ज शून्य टक्के व्याज दराने आणि ३ लाख रुपयापर्यंतचे कर्ज २ टक्के व्याज दराने उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतलेला आहे. यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्याला त्याचा पायावर उभे राहण्यास मोठा हातभार लागणार आहे. त्याच बरोबर, २२ लाख शेतकऱ्यांसाठी कृषी संजीवनी योजना जाहीर करण्यात आलेली आहे. त्यामध्ये ३ हजार कोटी रुपयापर्यंतचे व्याज माफ करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे, हा सद्धा अतिशय क्रांतिकारी निर्णय घेण्यात आलेला आहे.

अध्यक्ष महोदय, मागेल त्याला विजेची जोडणी, भारनियमन मुक्त महाराष्ट्र हे दोन महत्वाचे निर्णय घेण्यात आलेले आहेत आणि त्याचाशेतीसाठी चांगला फायदा होणार आहे. माननीय अर्थमंत्र्यांनी शेतकऱ्यांना व्याजातून सूट दिलेली आहे. परंतु मी सांगू इच्छितो की, ज्या शेतकऱ्यांना उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातून पाणी उचलून शेती करावी लागते त्या शेतकऱ्यांना वीज महाग पडते. त्याचा सद्धा व्याज माफीमध्ये समावेश असावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, या अर्थसंकल्पात कृषी व ऊर्जा विभागाच्या संदर्भात अनेक तरतुदी केल्या आहेत. त्यात कृषीचे उत्पन्न वाढविण्यासाठी अतिशय पोषक ठरणाऱ्या तरतुदी आहेत. गेल्या ४० वर्षांपासून कृषी क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नामधील वाटा ३१ टक्क्यांवरुन ११ टक्क्यांपर्यंत खाली घसरलेला आहे. ही अतिशय चिंतेची बाब आहे. केंद्र शासनाचा कृषी विकासाचा दर साडेपाच टक्के आहे. राज्य शासनाने कृषी तसेच वीज क्षेत्राच्या संदर्भात अनेक महत्वाचे निर्णय घेतलेले आहेत. जेणेकरून केंद्र शासनाचा असलेला कृषी विकासाचा दर गाठण्यासाठी राज्याकडून सक्षमपणे काम केले जाईल अशी मी आशा व्यक्त करतो.

महोदय, केंद्रातील लोकशाही आघाडी शासनाने अन्नदान व सुरक्षिततेसाठी १००० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्याच बरोबर १५ फूड पार्क सद्धा उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. माझी शासनाला विनंती आहे की, नेवासा तालुक्यातील पांढरीपूल एमआयडीसी येथे फूड पार्क मंजूर झाले आहे. राज्यात ज्या ज्या ठिकाणी फूड पार्क मंजूर झाले असतील किंवा ज्या ज्या ठिकाणी फूड पार्क प्रस्तावित असतील, त्यासंबंधी शासनाने टाईमबाऊंड कार्यक्रम ठरवून, लवकरात लवकर निर्णय घेतल्यास ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या मालाला चांगला भाव मिळण्यासाठी त्याचा फायदा होऊ शकतो.

अध्यक्ष महोदय, सन १९६० मध्ये राज्यात ६.५ टक्के इतके क्षेत्र सिंचनाखाली होते. सध्या राज्यात १८ टक्क्यांपर्यंत सिंचनाखालील क्षेत्र आहे. राज्याला पूर्ण क्षमतेने सिंचन वाढविण्यासाठी ७७ कोटी रुपयांची आवश्यकता आहे. राज्यातील सिंचन क्षमतेचे प्रमाण वाढविण्यासाठी या अर्थसंकल्पात ६३०० कोटी रुपयांची जास्तीत जास्त तरतूद करण्यात आली. त्यामुळे गेल्या वर्षी राज्यात ३०० प्रकल्प पूर्ण झाले असून, येणाऱ्या वर्षात १५० प्रकल्प पूर्ण केले जाणार आहेत. तसेच जवळपास २ लक्ष हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणायचे आहे. ही बाब ग्रामीण भागाच्या दृष्टीने अतिशय स्तूत्य आहे. परंतु गेल्या ४० वर्षांपासून जायकवाडी धरणाच्या प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न प्रलंबित आहेत, त्यात त्यांना नोकऱ्या देणे किंवा त्यांचे पुनर्वसन करणे इत्यादी बाबी असू शकतील. या बाबत शासनाने तातडीने निर्णय घेणे गरजेचे आहे.

[ श्री. शंकरराव गडाख ]

अध्यक्ष महोदय, राज्यात सूक्ष्म सिंचन केल्यास जवळपास ४० टक्के पाण्याची बचत होऊ शकते. सध्या राज्यात अंदाजे ८ लक्ष हेक्टरवर सूक्ष्म सिंचन झालेले आहे. त्यासाठी राज्याकडून ५० टक्के सबसिडी दिली जाते. यावर न थांबता राज्य शासनाने सूक्ष्म सिंचनासाठी ७५ टक्के सबसिडी दिल्यास राज्यातील शेतकरी चांगल्या जोमाने शेती करू शकेल.

अध्यक्ष महोदय, मी माननीय अर्थ मंत्रीमहोदयांकडे एक महत्वाची मागणी करू इच्छितो की, शेत तळ्यांची योजना ही अतिशय चांगली व उपयुक्त आहे. या योजनेचा उद्देश साध्य करण्यासाठी, राज्य शासनाने केंद्र शासनाकडे प्लॅस्टीक कागदाच्या अनुदानासाठी आग्रह धरावा.

महोदय, नगर जिल्ह्यातील मूळा धरण २६ टीएमसी क्षमतेचे आहे. शासनाने त्याची क्षमता ६० टीएमसी पर्यंत वाढविल्यास, पावसाच्या वाहून जाणाऱ्या अतिरिक्त पाण्याचा साठा करून त्याचा उपयोग जिरायती शेतीसाठी करता येऊ शकेल.

अध्यक्ष महोदय, मी सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पाला पाठिंबा देतो व आपण मला या ठिकाणी बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो व माझे दोन शब्द संपवितो.

**श्री. हरिदास भदे** (अकोला पूर्व) **:** अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पाच्या सर्वसाधारण चर्चेवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

माननीय उपमुख्यमंत्री व अर्थ मंत्री श्री. अजित पवार साहेब यांनी सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पामध्ये अनेक चांगल्या गोष्टींचा समावेश केला त्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो. या अर्थसंकल्पात शासनाने विमान तळाचा विकास करण्यासाठी निर्णय घेऊन त्यासाठी तरतूद केली आहे. त्यात अमरावती, जळगाव, सोलापूर, गडचिरोली, कराड, धुळे, राजगुरुनगर... त्याचबरोबर नागपूरमध्ये मिहान प्रकल्पासाठी फार मोठी तरतूद केली आहे. अकोल जिल्ह्यातील शिवणी येथे पूर्वीचे एक विमानतळ आहे. अनेक वर्षांपासून त्या परिसरातील लोकांची विमानतळ विकसित व्हावे अशी मागणी आहे. अकोला जिल्ह्याची लोकसंख्या आजमितीला १८ ते १९ लक्ष आहे. त्या ठिकाणी महानगरपालिकेची लोकसंख्या ६ लाखपर्यंत आहे. अमरावती विभागात मध्यवर्ती ठिकाणी अकोला शहर वसलेले आहे. अकोला शहरात डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ त्याचबरोबर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची औद्योगिक वसाहत आहे. तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे महाबीजचे मुख्य कार्यायल आहे. नर्नाळा सारखे एक महत्वाचा पर्यटनस्थळ आहे. तसेच मेळघाटला लागून शेगावचे एक महत्वाचे तीर्थक्षेत्र आहे. अशा प्रकारे या शहराची अवस्था आहे. त्या ठिकाणी विमानतळाचा विस्तार व्हावा अशी अनेक लोकांची मागणी आहे. एटीआर-४२ अशा प्रकारची विमाने उतरण्याची व्यवस्था २००७ मध्ये केली असून धावपट्टीची लांबी सुमारे १४०० मिटर आहे. भारतीय विमानपतन प्राधिकरणाने प्रस्तुत धावपट्टीत आवश्यक त्या सुधारणा करण्याचे ठरविले आहे. त्यानुसार १४०० मिटरची धावपट्टी आणखी ४०० मिटरने वाढवावी लागणार आहे. म्हणजेच धावपट्टीची लांबी १८०० मिटर करावी लागणार आहे. माननीय श्री. विजय प्रकाश अग्रवाल, सदस्य, भारतीय विमान पतन प्राधिकरण नवी दिल्ली यांनी दिनांक २५ जुलै २००८ रोजी पत्राद्वारे कळविले आहे की, एटीआर-७२ अशा प्रकारची विमाने उतरविण्यासाठी धावपट्टीचा विकास करण्याची गरज आहे. धावपट्टीचा विकास करीत असताना १७५ एकर जमीन उपलब्ध करून देण्याबाबत प्रस्तुत पत्रात नमूद केलेले आहे. राज्य शासनाने भारतीय विमान पतन प्राधिकरण विभागास जमीन संपादित करून द्यावे असे पत्रात नमूद केलेले आहे.

[ श्री. हरिदास भदे ]

अध्यक्ष महोदय, मला या ठिकाणी स्पष्ट सांगावयाचे आहे की, ही जमीन पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची आहे. तसेच त्या ठिकाणी काही थोड्याफार प्रमाणात खाजगी लोकांची जमीन सद्धा आहे. ही जमीन शासनाच्या वतीने उपलब्ध करून दिली तर एटीआर-७२ विमानांची सोय होण्यास मदत होणार आहे. परिणामी परिसरातील लोकांना वाहतुकीची सोय होण्यास मदत होणार आहे. जोपर्यंत वाहतुकीची सोय होत नाही तोपर्यंत कोणताही विकास होणार नाही हे सर्वसामान्य लोकांना कळून चुकलेले आहे. विमानसेवा सुरू झाली तर त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात उद्योगधंदे येतील. मोठमोठे उद्योजक त्या ठिकाणी उद्योगधंदे सुरू करतील. इतर विकास होण्यास मदत होणार आहे. याकरिता डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठाची आणि काही खाजगी जमीन अधिग्रहण केली तर विमानतळ होण्यास मदत होणार आहे. याचा सर्व खर्च ११ कोटी ८ लाख इतका असणार आहे. राज्य शासनाने या प्रकल्पात लक्ष घातले तर विमानतळ होण्यास सहज मदत होईल. आज नवी मुंबईत आंतरराष्ट्रीय विमानतळ होत आहे. याकरिता अनेक लोकांच्या जमिनी ताब्यात घेण्याची प्रक्रिया नवी मुंबईत सुरू आहे. शिवणी येथे विमानतळ आणि धावपट्टी असून त्याची ४०० मिटरने धावपट्टी वाढविण्याची गरज आहे. यासंदर्भातील प्रस्ताव गेल्या तीन वर्षापासून शासनाकडे प्रलंबित आहे. याच्यापेक्षा दुसरे तिसरे दुर्भाग्य असू शकत नाही. या विषयाच्या संदर्भात दिनांक २५ जुलै २००८ रोजी भारतीय विमान पतन प्राधिकरणाने पत्र दिलेले आहे. अकोला जिल्हाधिकाऱ्यांना देखील शासनाकडे ऑक्टोबर २०१० मध्ये प्रस्ताव पाठविला आहे. हा प्रस्ताव शासनाच्या माहितीकरिता मी पाठवतो. या संदर्भात शासनाने तातडीने लक्ष घालून प्रस्ताव मंजूर करावा व अकोला जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने ठोस निर्णय घ्यावा अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या संदर्भात मी या ठिकाणी बोलू इच्छितो. अनुसूचित जाती व जमातीच्या लोकसंख्येच्या टक्केवारीनुसार, सामाजिक न्याय विभागाला ४हजार २३३ कोटी रुपयांची तरतूद देणे आवश्यक होते. मात्र प्रत्यक्षात ३ हजार २०१ कोटी रुपयांची तरतूद शासनाने केलेली आहे. म्हणजेच १ हजार ३२ कोटी रुपयांची तरतूद कमी केलेली आहे. हा अन्यायकारी निर्णय आहे. या संदर्भात पुनर्विचार करून १०३२ कोटी रुपये सामाजिक न्याय विभागाला देण्यात यावेत. शासनाने मागासवर्गीय व्यक्तींच्या विकासाकरिता तरतूद करावी, अशी मी विनंती करतो. आदिवासी विभागाला लोकसंख्येच्या टक्केवारीनुसार १८७ कोटी रुपये अधिक दिलेले आहेत. तसेच अल्पसंख्यांकांच्या विकासासाठी २७५ कोटी रुपये दिलेले आहेत. त्या बद्दल मी शासनाचे व माननीय वित्त मंत्री श्री. अजित पवार यांचे आभार मानू इच्छितो. भटक्या विमुक्त जाती व जमातीच्या प्रवर्गाची लोकसंख्या जवळपास १३ टक्के आहे. त्यांच्या विकासाकरिता शासनाने ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे. या लोकांचा विकास करण्यासाठी शासनाने अर्थसंकल्पामध्ये निधीची तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, अकोला, अमरावती, बुलढाणा जिल्ह्यातील खारपाण पट्टयातील जमीन विकासाच्या दृष्टीने अनेक वर्षापासून मागणी केली जात आहे. खारपाण पट्टयाचा विकास करण्यासाठी सन २००३ मध्ये खारपाण पट्टा सुधार समिती स्थापन करण्यात आली होती. त्यांनी अहवाल दिलेला आहे. मात्र त्यासंदर्भात कोणतीही कारवाई झालेली नाही. या करिता ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. उपाययोजना केल्यास यामुळे क्षार जमिनींचा विकास होईल, जमिनीचा पोत सुधारू शकेल. तसेच शेतकऱ्यांना दिलासा मिळून आत्महत्येचे प्रमाण कमी होऊ शकेल.

**[ श्री. हरिदास भदे ]**

अध्यक्ष महोदय, अकोला जिल्ह्यामध्ये ब्रिटीशकालीन तहसील कार्यालय, उपविभागीय कार्यालय, न्यायालयीन इमारत व पंचायत समितीचे कार्यालय आहे. या सर्व जुन्या इमारती पाडून तेथे नवीन इमारतीचे बांधकाम करण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने निधी द्यावा ही कळकळीची विनंती मी या ठिकाणी करू इच्छितो. तसेच अकोला जिल्ह्यामधील मेडीकल कॉलेजकरिता अर्थसंकल्पामध्ये एक रुपयाची देखील तरतूद केलेली नाही. यामुळे तेथील लोकांवर अन्याय होत आहे. माझी मागणी आहे की, सदर मेडीकल कॉलेजकरिता शासनाने मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून द्यावा. मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आभार मानतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

**श्री. शिरीष कोतवाल** (चांदवड) **:** अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उपस्थित आहे.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पावर समाधान व्यक्त करीत असताना मी शासनाला धन्यवाद देऊ इच्छितो. शासनाने शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे कर्ज बिनव्याजी व ३ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जाकरिता २ टक्के दराने कर्ज उपलब्ध करून देण्याची घोषणा केलेली आहे. मात्र शेतकऱ्यांनी केवळ ५० हजार रुपयांमध्ये शेती कशी करावी ? माझ्या भागामध्ये कांदा, द्राक्ष, डाळिंब, ऊस ही पिके प्रामुख्याने घेतली जातात. शेतकऱ्यांना कांदयाकरिता ३२ हजार रुपये पीक कर्ज दिले जाते. द्राक्षाकरिता ८० हजार रुपये पीक कर्ज मिळते. व्याज दरामधील तफावत लक्षात घेता शेतकऱ्यांना शेतीकरिता आपल्या खिशातून पैसे घालावे लागतील. ३ एकर शेती असणारा शेतकरी व अलप भू धारक शेतकरी डोळयासमोर ठेवून राज्यातील शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज बिनव्याजी व ५ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज २ टक्के या दराने दिले पाहिजे, अशी माझी विनंती आहे. त्याच पद्धतीने विजेच्या बाबतीतही कामे झाली पाहिजेत. आज देखील राज्यामध्ये सिंगल फेजच्या बाबतीत फार गरज असताना बहुतांश ठिकाणी सिंगल फेजची कामे विशेषत: नाशिक जिल्ह्यामध्ये अपूर्ण राहिलेली आहेत, ती पूर्ण करणे गरजेचे आहे. कारण ग्रामीण भागामध्ये जवळ-जवळ १८-१८ तास लाईट नसते. त्यातच जर ट्रान्सफॉर्मर जळाला तर १-१ महिना लाईट नसते अशी परिस्थिती असते. या ग्रामीण भागातील विद्यार्थ्याला यामुळे संध्याकाळच्या वेळेला अभ्यास करता येत नाही. शेतात काम करून दमून आलेल्या नवराबायकोला दोन मिनिटे टी.व्ही. पहायला मिळत नाही अशी परिस्थिती आहे. त्यामुळे सिंगल फेज राज्यभर सुरू झाले पाहिजेत. त्याबाबतीत देखील माझी विनंती आहे की, ते करण्याच्या दृष्टीने ऊर्जा खात्याने धडक मोहीम सुरू केली पाहिजे. तसेच, सिंगल फेज बसविले जात असताना ते डीपीवर बसविण्या ऐवजी सिंगल फेजचा ट्रान्सफॉर्मर सबस्टेशनवर बसविला पाहिजे. असे जर केले नाही तर प्रत्येक वेळेला डीपी बंद करावयाचा, त्यावर एक छडा टाकावयाचा असा एक उद्योग होऊन बसतो व त्याच्या दुरुस्तीच्या वेळी जर वायरमन मिळाला नाही, तर शेतकरी ते स्वत: दुरुस्त करण्याच्या प्रयत्नात संकटात सापडतो.

अध्यक्ष महाराज, पाण्याच्या बाबतीत धरणे, कालवे, साठवण बंधारे बांधले, विहिरी, ठिंबक सिंचनाच्या योजना दिल्या जात आहेत. परंतु, बराचसा भाग विशेषत: माझ्या मतदारसंघातील भाग हा पाण्यापासून वंचित आहे. माझ्या भागातील काही भागापर्यंत कॅनॉलचे पाणी आलेले आहे, कॅनॉलच्या पुढच्या कामासाठी पैसे मिळाले पाहिजेत. विशेषत: ठिंबक सिंचनाच्या योजनांसाठी मघाशी सन्माननीय

[ श्री. शिरीष कोतवाल ]

सदस्य, श्री. शंकरराव गडाखही तेच म्हणाले की, ठिंबक सिंचनाच्या बाबतीत सरकारने एक पायलट प्रोजेक्ट राबवून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना त्याचा वापर करण्याकडे वळविले पाहिजे. त्यामुळे पाण्याची बचत होऊन राज्याच्या उत्पन्नामध्येही भर पडणार आहे व इरिगेशनही वाढणार आहे.

अध्यक्ष महाराज, माझ्या मतदारसंघामध्ये उमराण येथे जवळजवळ १५ वर्षे झाली ग्रामीण रुग्णालय झाले परंतु, त्याची इमारत होऊ शकलेली नाही. या रुग्णालयाच्या इमारतीसाठी मागणी केली असता, कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थान देण्यात आले आहे. त्यापेक्षाही ग्रामीण रुग्णालयाची अद्ययावत इमारत होण्याची गरज आहे. माननीय आरोग्य मंत्र्यांना ही रुग्णालयाची इमारत देण्यासाठी मी विनंती करतो.

अध्यक्ष महाराज, धुळ्यापासून पिंपळगाव शिरवड्यापर्यंतचा हा बीओटीतून चौपदरी रस्ता झाला. परंतु, परिस्थिती अशी आहे की, नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव हे बाजारपेठेचे मुख्य केंद्र आहे. त्या बाजूने जर आम्हाला नाशिककडे यावयाचे असेल तर संध्याकाळी २-२ तास ट्रॅफिक जास्त असते. ज्या बीओटी धारकाला याचे काम दिले आहे त्यांनी पोलीस किंवा त्यांचे स्वतंत्र गार्ड तेथे ठेऊन तेथील ट्रॅफिकची समस्या सोडविण्याबाबत प्रयत्न केला पाहिजे. टोलच्याबाबतीत माझी खास करून विनंती आहे की, राज्यभरासाठी ट्रॅक्टर आणि पीकअप करणाऱ्या वाहनांवर ज्यामधून शेती माल जातो त्यावर टोल आकारला जाऊ नये अशी शेतकऱ्यांची महत्त्वाची मागणी आहे. त्यावर बारकाईने विचार होण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महाराज, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून दोन मोठ्या स्किम माझ्या मतदारसंघात करण्यात आल्या. त्यापैकी एक स्किम पूर्ण झाली तर दुसरी नांदगाव आणि चांदवड येथील स्किम सुरू आहे. पाणी असूनही संबंधित गावांतील लोकांना पिण्यासाठी पाणी मिळत नाही एवढी वाईट अवस्था त्या स्किमची झालेली आहे. या स्किमची चौकशी झाली पाहिजे. या स्किम व्हायेबल होणार आहेत की, नाही याची जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणावर निश्चित केली पाहिजे. तसेच, या स्कीम्सची वाईट अवस्था झाल्याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित केली पाहिजे.

अध्यक्ष महाराज, माझ्या मतदारसंघामध्ये धोडप, राजंणवाडी, बालेकिल्ला, इंद्रेव व चंद्रेश्वर असे चार मोठे किल्ले आहेत. परंतु, या किल्ल्यांच्या नूतनीकरणासाठी एक नया पैसाही मिळालेला नाही. त्यांच्या नूतनीकरणाची जर संधी मिळाली तर खऱ्या अर्थाने माझ्या मतदारसंघातील या चारही ठिकाणी पर्यटनासाठी फार मोठा स्कोप आहे. परंतु, पर्यटनासाठी आम्हाला निधी मिळालेला नाही.

अध्यक्ष महाराज, देवळा व चांदवड या दोन्ही तालुक्यांतील पोलिसांची संख्या अत्यंत कमी आहे. जर एखाद्या ठिकाणी काही भांडण झाले आणि एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जावयाचे झाले तर, पोलिसांना जवळजवळ १००-१०० कि.मी. एवढी धावपळ करावी लागते. त्यामुळे पोलिसांची संख्या वाढविणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महाराज, माझ्या मतदारसंघामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये कांदा, डाळिंब व द्राक्षे यांची पिके होतात. परंतु, खतांच्या पुरवठ्याबाबत पहावयाचे झाले तर, अत्यंत अपुरा खत पुरवठा होतो. त्यामुळे या पिकांना भरपूर खत पुरवठा झाला पाहिजे.

**[ श्री. शिरीष कोतवाल ]**

अध्यक्ष महाराज, मघाशी एका सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, ज्यावेळेस कांदा १०० रुपये किलो भावाने विकला जात होता, त्यावेळेस टीव्ही चॅनेल्सवरुन सातत्याने सकाळपासून संध्याकाळ पर्यंत कांदा व त्यासंबंधीची बातमी सतत दाखविली जात होती. त्यावेळी असे चित्र निर्माण करण्यात आले होते की, मध्यमवर्गीय स्त्री कांदा घेताना ढसा-ढसा रडत होती. एखादी व्यक्ती मृत पावल्यानंतर ज्याप्रमाणे रडतात त्याप्रमाणे ती स्त्री रडत होती. आता शेतकऱ्याच्या घरातील स्त्री रडत आहे. आज त्या शेतकऱ्याच्या कांद्याला भाव मिळत नाही. एक रुपयोने कांदा विकला जात आहे. यावेळी मिडिया आणि शासन समोर का येत नाही ? आता ही यंत्रणा शेतकऱ्यांना मदत का करीत नाही ? मागच्या वेळी शासनाने कांदा उत्पादक शेतकऱ्याला ५० रुपये अनुदान दिले होते. यावर्षी देखील १०० रुपये अनुदान कांदा उत्पादक शेतकऱ्यांना द्यावे अशी माझी विनंती आहे. द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांची देखील हीच अवस्था आहे. मागच्या वर्षी द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे २००० कंटेनर परदेशात गेले. परंतु, वेळीच ज्या सूचना शेतकऱ्यांना देणे अपेक्षित होत्या त्या दिल्या गेल्या नाहीत. त्यामुळे त्या शेतकऱ्यांचे दोन हजार कंटेनर पुन्हा वापस आलेत. हे शेतकरी आता टाहो फोडत आहेत. त्यांनी रस्त्यावर उतरून आंदोलन केले. सरकारला जागे करण्याचा प्रयत्न केला. तरी आपण शेतकऱ्यांना अद्यापि मदत देऊ शकलो नाही. हीच अवस्था वाईन इंडस्ट्रीजची आहे. मोठ्या प्रमाणावर कंपन्यांनी करार केले. आजही वाईनची द्राक्षे शेतकऱ्यांकडून घेतली जात नाहीत. आज त्या द्राक्षांवर कुऱ्हाड चालविण्याची वेळ आलेली आहे. तेव्हा या शेतकऱ्यांना देखील मदत करणे गरजेचे आहे. माझ्याकडे डाळींब उत्पादक शेतकरी देखील मोठ्या प्रमाणावर आहे. डाळींब पिकाला तेल्या रोगाचा फार फटका बसला. त्याची नुकसान भरपाई आता करण्यात आली आहे. कृषि खात्याने लिहिले की, आता ज्यांच्या डाळिंबाच्या बागा असतील त्यांची तपासणी करण्यात यावी व त्यांना हे अनुदान देण्यात यावे. तीन वर्षापूर्वीचे अनुदान आता येत आहे. त्या काळात ज्यांच्याकडे डाळिंबाच्या बागा होत्या, ज्यांचे पंचनामे झाले असतील, उतारा वर नोंद करण्यात आली असेल त्यांचा विचार करून त्यांना मदत केली पाहिजे.

दुष्काळी भागाला शेततळे ही संजीवनी आहे. या शेततळ्यांची संख्या वाढविली पाहिजे. या शेततळ्यांसाठी शासनाने प्लास्टीक दिले पाहिजे. ते प्लास्टीक आपण दिले तर शेती व्यवसायामध्ये आमूलाग्र बदल झाल्याशिवाय राहणार नाही. तसेच यातील जे नॉर्म्स आहेत ते बदलले पहिजे. मी येथे ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्या आमच्या येथील शेतकऱ्यांच्या भावना आहेत, त्याचा आपण आदर करावा व शेतकऱ्यांना मदत करावी अशी मी विनंती करतो आणि येथेच थांबतो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

**श्री. सुनील केदार** (सावनेर) **:** अध्यक्ष महाराज, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. राज्याच्या माननीय उप मुख्यमंत्र्यांनी हा अर्थसंकल्प मांडला आहे. त्यावर माझे मत मांडण्यासाठी मी उभा आहे.

सर्वप्रथम मी आपल्या मार्फत विचारू इच्छितो की, आम्ही येथे जी मते मांडत आहोत त्याची नोंद कोण करत आहे. या अर्थसंकल्पामध्ये मा.उप मुख्यमंत्र्यांनी सिंचन विभागासाठी मोठी तरतूद केली आहे. तशी नोंद आम्हाला अर्थसंकल्पाच्या पुस्तकात देखील पहायला मिळाली. माझ्या मतदार संघामध्ये एक मध्यम प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे. हा दोन राज्यांमधील प्रकल्प आहे. मध्यप्रदेश आणि नागपूर याला लागून हा प्रकल्प आहे. सदर प्रकल्पाला प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे.

[ श्री. सुनील केदार ]

या प्रकल्पाच्या धरणाची किंमत ३०० कोटी रुपये आहे. या धरणासाठी मंजूर झालेला निधी २८ कोटी रुपये इतका आहे. त्यामुळे हा ३०० कोटीचा प्रकल्प किती वर्षात पूर्ण होईल असा प्रश्न माझ्या समोर उभा राहतो. या २८ कोटीमधून पुनर्वसनासाठी किती निधी देण्यात येणार आहे, वन विभागाला किती निधी देण्यात येणार आहे. याचा हिशोब काढला तर महाराष्ट्र राज्य आणि मध्य प्रदेश राज्याला वन विभागाकडे ४० कोटी रुपये भरणे गरजेचे आहे. परंतु तितकी तरतूद देखील करण्यात आलेली नाही. आपणाला या प्रकल्पासाठी तरतूद करता येत नसेल तर किमान हा प्रकल्प केंद्र सरकारच्या ए.आय.बी.पी.कडे पाठविण्याबाबत तातडीने उपाय योजना करावी अशी मी आपल्या मार्फत माननीय उपमुख्यमंत्र्यांना विनंती करतो आणि त्यांच्याकडे आग्रह देखील धरतो.

अध्यक्ष महाराज, माननीय उपमुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पांत अनेक देवस्थानांना निधीचे वाटप केलेले आहे. अष्टविनायक देवस्थानासाठी तरतूद केलेली आहे. शेगाव देवस्थानासाठी तरतूद केलेली आहे. नागपूर येथील आदासा येथे गणपतीचे देऊळ आहे. हे जागृत देवस्थान म्हणून सुपरिचित आहे. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी पश्चिम महाराष्ट्रातील अष्टविनायक देवस्थानाची दहा कोटी रुपयांची तरतूद केली असेल तर आमच्या नागपूर येथील आदासा गणपती देवस्थानासाठी किमान एक-दोन कोटी रुपयांची तरतूद करावी अशी मी त्यांना विनंती करतो. ते राज्याचो उप मुख्यमंत्री असल्यामुळे त्यांनी सर्वांना समान न्याय द्यावा अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महाराज, वस्त्रोद्योगाबद्दल बोलावयाचे झाले तर शासनाने वस्त्रोद्योगाबद्दल एक नवीन धोरण जाहीर केलेले आहे. त्यासाठी १०० कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. वस्त्रोद्योग धोरणामध्ये सूत गिरण्यांना निधी देतो. राज्य शासनामध्ये वस्त्रोद्योग नावाचा एक विभाग होता. महाराष्ट्र स्टेट टेक्साईल कॉर्पोरेशन. या महाराष्ट्र स्टेट टेक्साईल कॉर्पोरेशनच्या जेवढ्या सूत गिरण्या होत्या त्या संपूर्ण गिरण्या अधिकाऱ्यांच्या माध्यमातून चालत होत्या. आज त्या गिरण्यांची काय अवस्था झालेली आहे ? माझ्या माहिती प्रमाणे या सर्व सूत गिरण्या बंद झालेल्या आहेत. वस्त्रोद्योगाच्या बाबतीत सहकार क्षेत्राच्या माध्यमातून जेथे काम होते आहे त्याठिकाणी सरकार नवीन नियम लावत आहे. माझे असे म्हणणे आहे की, हा उद्योग आहे. आपण सत्यनारायणाच्या प्रसादाप्रमाणे त्याचे वाटप करू नका. आपणास उद्योग करायचा असेल तर तो पूर्णपणे् चांगल्या पद्धतीने केला पाहिजे. वस्त्रोद्योग विभागाच्या ज्या सूतगिरण्या आहेत त्यासाठी भरीव तरतूद केली पाहिजे. आता असे निदर्शनास येते की, असलेली तरतूद आणि सूतगिरण्या यामध्ये तफावत दिसून येते. आपणास सूत गिरण्या सुरू करायच्या आहेत की बंद करायचे आहेत याचा प्रथम विचार झाला पाहिजे.

अध्यक्ष महाराज, जो कापूस उत्पादक भाग आहे त्याठिकाणी जास्त झुकते माप दिले पाहिजे. ज्या भागात जास्त कापूस पिकतो त्याठिकाणी भरीव तरतूद केली पाहिजे. आपण जर छोटी छोटी तरतूद केली तर ती डेड इन्व्हेस्टमेंट होते. त्याचा काहीही लाभ होत नाही आणि शासनाचे देखील नुकसान होते. तेव्हा माझी माननीय वित्त मंत्र्यांना विनंती आहे की, त्यांनी वस्त्रोद्योग विभागाकडे जास्त लक्ष देणे गरजेचे आहे आणि डेड इन्व्हेस्टमेंट होऊ नये म्हणून चांगली भरीव तरतूद करावी. तसेच ज्या सूत गिरण्या चांगल्या पद्धतीने चालू आहेत त्यांना मदतीचे धोरण स्वीकारले पाहिजे अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

[ श्री. सुनील केदार ]

अध्यक्ष महाराज, विधि व न्याय विभाग हा माननीय मुख्यमंत्र्यांच्या अखत्यारितील आहे. आज राज्यात चॅरिटी कमिशनरचा मोठा विषय झालेला आहे. चॅरिट कमिशनरच्या संदर्भातील कायदा ब्रिटीश कालीन आहे. ब्रिटीश निघून गेले तरी त्यांनी केलेला कायदा आपण आजपर्यंत चालवित आहोत. माझ्या माहितीप्रमाणे तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी हा प्रश्न निकाली काढण्याचा प्रयत्न केला होता. परंतु तो प्रयत्न अजूनही अधुरा राहिलेला आहे. आपण चॅरिटी कमिशनर म्हणतो, परंतु त्याठिकाणी जी माणसे निकाल देण्यासाठी बसलेली आहेत ती ज्युडिशिअरीमधून येतात. हे चॅरिटी ज्युडिशियरी नसून, चॅरिटी कमिशनर आहेत. परंतु या संदर्भात नेमका चुकीचा अर्थ लावून, फायदा घेतला जात आहे. माझी मागणी आहे की, त्या ठिकाणी कमिशनर म्हणून आयएएस अधिकारी नेमले पाहिजेत. २०-२५ वर्षे झाली तरी, अनेक प्रकरणांचा निकाल लागत नाही. तारखांवर तारखा दिल्या जातात. दिवसेंदिवस प्रलंबित प्रकरणांची संख्या वाढत आहे. या चर्चेच्या माध्यमातून माझी मागणी आहे की, या अधिवेशनात किंवा पुढील अधिवेशनात कायद्यामध्ये दुरुस्ती करून, चॅरिटी कमिशनरचा प्रश्न निकाली काढावा.

महोदय, शेवटी पुन्हा एकदा मागणी करतो की, अष्टविनायक तीर्थक्षेत्रांसाठी अर्थसंकल्पात ज्या प्रमाणे निधीची तरतूद केलेली आहे, त्या प्रमाणेच नागपूर जिल्ह्यातील आदासा तीर्थक्षेत्राला सद्धा माननीय उप मुख्यमंत्री निधी देतील अशी खात्री बाळगतो.

महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले मनापासून आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

**श्री. राजीव देशमुख** (चाळीसगाव) : अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ चा अर्थसंकल्प मांडल्याबद्दल मी माननीय उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री श्री. अजित पवार यांचे अभिनंदन करण्यासाठी आणि त्या अर्थसंकल्पाला पाठिंबा देण्यासाठी उभा आहे.

महोदय, या राज्यामध्ये राज्यातील कृषी आणि उद्योग क्षेत्राची उन्नती व्हावी, त्याच बरोबर रोजगाराच्या संधी प्रामुख्याने उपलब्ध व्हाव्यात, यासाठी अर्थसंकल्पामध्ये भरीव तरतूद करण्यात आलेली आहे. राज्यातील मागास, दुर्बल किंबहुना सर्व घटकांचा विकास योजनांमध्ये वाटा असावा या दृष्टीने अर्थसंकल्प मांडण्यात आलेला आहे. राज्याच्या प्रगतीमध्ये कृषी क्षेत्राचे योगदान महत्त्वाचे आहे. हे लक्षात घेऊन ५० हजारापर्यंत कर्ज शून्य टक्के व्याज दराने आणि ३ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज २ टक्के व्याज दराने देण्याचे धोरण स्वीकारल्याबद्दल मी माननीय अर्थमंत्र्यांना धन्यवाद देतो.

महोदय, कृषी पंपावरील वीज अनुदानासाठी २५०० कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. कृषी संजीवनी योजनेच्या माध्यमातून जवळजवळ २२ लाख शेतकऱ्यांना कशा प्रकारे फायदा देता येईल या दृष्टिकोनातून प्रयत्न करण्यात आला आहे. राज्यातील ग्रामीण भागातील जनतेचे राहणीमान खऱ्या अर्थाने उंचाविण्यासाठी, त्याच बरोबर शहरी भागातील जनतेचे राहणीमान उंचाविण्यासाठी, अर्थसंकल्पाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात आलेले आहेत.

महोदय, जेएनएनयुआरएमच्या माध्यमातून लहान/मोठ्या शहरांसाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देत असताना, झोपडपट्टी विकास योजनांसाठी मोठ्या प्रमाणावर तरतूद करण्यात आली आहे.

**[ श्री. राजीव देशमुख ]**

त्याच बरोबर लहान/मोठ्या शहरांसाठी योजना सुरू करण्यात आलेल्या आहेत. या योजनांना मोठ्या प्रमाणावर अनुदान उपलब्ध करून देत असताना, साहित्यांच्या किंमतीमध्ये जी वाढ झालेली आहे ती लक्षात घेता, राज्य व केंद्र सरकारने नगरपालिका/महानगरपालिकांच्या माध्यमातून आपल्या हिश्शामध्ये वाढ केली पाहिजे.

महोदय, कृषी धोरणांच्या बाबतीत २५ कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पामध्ये करण्यात आली आहे.

'हिंद केसरी', 'महाराष्ट्र केसरी' यांच्या सन्मानासाठी, ज्यांनी कुस्ती क्षेत्रामध्ये महत्त्वाचे योगदान दिले आहे, त्यांच्या मानधनात वाढ करण्याचे प्रस्तावित केले आहे, त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. आपण विशेष सहाय्य योजना राज्यातील काही शहरांत लागू करीत आहोत, त्यात जळगाव जिल्ह्याचा देखील प्रामुख्याने समावेश व्हावा. सन २०१२ हे वर्ष भारनियमनमुक्त करण्याचा शासनाचा प्रयत्न सुरू आहे. मला आनंद होत आहे की, भुसावळ सारख्या शहरातून देखील जवळपास १५०० मे. वॅ. वीजनिर्मिती होणार आहे.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पाच्या माध्यमातून जळगाव जिल्ह्यात केळी निर्यातीसाठी योजना प्रस्तावित केली आहे, त्याबद्दल पुन्हा एकदा धन्यवाद देतो आणि आपण बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून माझे दोन शब्द संपवितो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

**श्री. सुरेश जेथलिया** (परतूर) : अध्यक्ष महोदय, मी माननीय अर्थमंत्री श्री. अजित दादा पवार यांनी मांडलेल्या सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पाला समर्थन देण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांच्या वतीने त्यांना सर्वप्रथम धन्यवाद देईन की, त्यांनी सन २०१२ मध्ये संपूर्ण महाराष्ट्र भारनियमनमुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. आम्हाला खात्री आहे की, दादा बोलतात ते करतात. संपूर्ण महाराष्ट्राला ते माहीत आहे. त्यामुळे निश्चितपणे सन २०१२ मध्ये महाराष्ट्र भारनियमनमुक्त होईल.

अध्यक्ष महोदय, आज शेतकऱ्यांना अत्यंत आवश्यकता असताना देखील सिंचनासाठी वीज उपलब्ध होत नाही. शेतकऱ्यांना वीज उपलब्ध झाली तर निश्चितपणे त्यांना फार मोठा फायदा होईल आणि त्यांच्या उत्पन्नात देखील वाढ होईल. आपण बँकेच्या बाबतीत निर्णय घेतला आहे की, ५० हजार रुपयांपर्यंतच्या कर्जावरील व्याज माफ आणि ३ लाख रुपयांपर्यंत २ टक्के व्याज राहील. आताच बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला की, गेल्या वर्षी कोणत्याही बँकांनी हा नियम लागू केलेला नाही. आता आम्ही बँकेला विचारले, त्यावेळी ते म्हणाले की, आमच्यापर्यंत हा शासन निर्णय आलेला नाही. माझी या संदर्भात आपणास विनंती राहील. गेल्या वर्षी देखील हा निर्णय घेतला होता. पण बँकांना अद्याप ती माहिती मिळालेली नाही. आज त्यांनी शेतकऱ्यांकडून ६ टक्के नाही तर ७ टक्क्यांनी वसुली केलेली आहे. मी प्रत्यक्ष शेतकऱ्यांना हे विचारले आहे.

अध्यक्ष महोदय, मी विशेष करून सांगू इच्छितो की, आज मराठवाड्यातील जिल्हा मध्यवर्ती बँका पूर्णपणे डबघाईला आलेल्या आहेत. माजी मुख्यमंत्री श्री. अशोकरावजी चव्हाण यांनी नांदेड जिल्हा सहकारी बँकेला शंभर कोटी रुपये देऊन बँकेचे पुनर्जीवन केले आहे. कारण शेतकऱ्यांची खरी बँक

**[ श्री. सुरेश जेथलिया ]**

ही जिल्हा मध्यवर्ती बँक आहे. माझी विनंती आहे की, मराठवाड्यातील सगळ्याच बँका डबघाईला आल्या आहेत, त्यांचे पुनर्जीवन करावे. शेतकऱ्यांना कर्ज मिळण्यासाठी ही फार सोयीस्कर बँक आहे. त्यामुळे या संदर्भात काही मार्ग काढून बँकांचे पुनर्जीवन करणे फार गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, मी सांगू इच्छितो की, सर्व शेतकऱ्यांसाठी सर्वात महत्त्वाचे म्हणजे खत, बी-बियाणे वेळेवर मिळणे हे आहे. शेतकऱ्यांना हे वेळेवर मिळाले पाहिजे. शेतकरी खत १ वर्ष अगोदर घेऊन ठेवत आहेत. गेल्या वर्षी कापसाचे उत्पन्न जास्त झाल्यामुळे प्रत्येक शेतकऱ्यांचा कापसाकडे कल वाढलेला आहे. त्यामुळे खतांची व्यवस्था वेळेवर झाली तर शेतकऱ्यांसाठी फार सोयीचे होईल.

अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांना शेती रस्त्यांची फार आवश्यकता आहे. शेतकऱ्यांना शेतात जायला रस्ते झाले तर फार बरे होईल. माझी या संदर्भात आपणास विनंती आहे. सदर बाबतीत विचार झाला तर फार आनंदाची गोष्ट राहील.

अध्यक्ष महोदय, बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी आरोग्याच्या बाबतीत समस्या मांडल्या आहेत. आपण आरोग्या संदर्भात भरपूर तरतूद केली आहे आपणाला दिसेल की, बऱ्याच ठिकाणी बऱ्याच रुग्णालयात, मग ते प्राथमिक आरोग्य केंद्र असो वा ग्रामीण रुग्णालय असो, त्या ठिकाणी मशिनरी येऊन पडल्या आहेत. परंतु, तज्ज्ञ डॉक्टर्स नाहीत. आज आपण प्राथमिक आरोग्य केंद्राची परिस्थिती बघितली तर त्या ठिकाणी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध नाहीत. प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये स्टाफची कमतरता आहे. आपल्याला याची कल्पना आहे की, एमबीबीएस झाल्यानंतर ३ वर्षे शासकीय सेवा करणे डॉक्टरांना बंधनकारक करण्यात आले आहे. तथापि, आजही ग्रामीण भागात डॉक्टरांची पदे रिक्त आहेत. मी माननीय आरोग्य मंत्र्यांना विनंती करणार आहे की, याबाबत त्यांनी तातडीने उपाययोजना करावी.

अध्यक्ष महोदय, मी विशेष करून माननीय उपमुख्यमंत्री तथा अर्थ मंत्री यांचे अभिनंदन करणार आहे. माझ्या मतदारसंघातील के.टी.वेअरचे रुपांतर बॅरेजेसमध्ये करण्याच्या प्रकल्पाला त्यांनी तत्वत: मान्यता दिली आहे. माझ्या मतदारसंघात सिंचनाचा फार मोठा प्रश्न होता. त्याचप्रमाणे लोअर दुधना प्रकल्पाचे काम देखील प्रगतीपथावर आहे. त्यामुळे सिंचन क्षेत्रात फार मोठी वाढ होणार आहे.

अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांकडून विजेच्या बिलाची वसुली सुरू करण्यात आलेली आहे. मागील काळातील २९१० कोटी रुपये मुद्दल आणि २९३० कोटी रुपये व्याज याबाबत कृषी संजिवनी योजना राबविली आहे. माझी अशी विनंती आहे की, शेतकरी पूर्वी पासून वीज बिल भरणा करीत होते. परंतु, आपण राजकीय लोकांनी प्रत्येक निवडणुकीच्या वेळी मोफत वीज बिलाच्या घोषणा दिलेल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांकडे थकबाकी राहिलेली आहे. पाठीमागचे सर्व बिल माफ करून येथून पुढे सर्व शेतकऱ्यांकडून विजेचे बिल भरणा करून घेण्याची कार्यवाही केली तर शेतकऱ्यांसाठी तो फार चांगला उपक्रम होऊ शकेल. वीज बिल भरा नाही तर लाईन कट करण्यात येईल, असे शेतकऱ्यांना सांगण्यात येते. त्यामुळे २९१० कोटी रुपये सरकारसाठी जास्त नाहीत. एखादा प्रकल्प लांबला तर ४ हजार कोटी रुपये खर्च वाढतो. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी वीज माफीची योजना राबविली तर निश्चितपणे शेतकरी सरकारला धन्यवाद देतील.

[ **श्री. सुरेश जेथलिया** ]

अध्यक्ष महोदय, आणखी बरेच मुद्दे आहेत. परंतु, माझ्या अनेक सहकाऱ्यांना अर्थसंकल्पावर बोलावयाचे आहे. त्यामुळे वेळेची मर्यादा पाळून मी माझे भाषण आटोपते घेतो. आपले मनापासून आभार मानतो. धन्यवाद.

**डॉ. नामदेव उसेंडी** (गडचिरोली) : अध्यक्ष महोदय, या राज्याचे खंबीर, उच्च विद्याविभूषित माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली राज्याचे आदरणीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री श्री.अजित दादा पवार यांनी राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या पार्श्वभूमीवर या राज्याचा सन २०११-१२ चा अर्थसंकल्प सभागृहात मांडला आहे. या अर्थसंकल्पाला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, या अर्थसंकल्पाचा बारकाईने अभ्यास केला तर असे दिसून येईल की, आदरणीय उपमुख्यमंत्री श्री. अजित दादा पवार यांनी सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये त्यांना अर्थसंकल्प मांडण्याच्या मिळालेल्या संधीचे सोने केले आहे.

**श्री. गिरीष बापट** (बसून) : आम्हाला तांबे, पितळे आणि तुम्हाला सोने मिळाले आहे.

**डॉ. नामदेव उसेंडी :** अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षाने अर्थसंकल्पाचे भाषण ऐकले नाही म्हणून त्यांना अर्थसंकल्प समजला नाही.

अध्यक्ष महोदय, शेतकरी हा महाराष्ट्राचा कणा आहे. ग्रामीण भागामध्ये राहणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये दोन प्रकारची तफावत निर्माण झाल्याचे आपल्याला दिसून येईल. ग्रामीण भागातील शेतकरी आणि शेतमजूर आणि शहरी भागामध्ये जाणारे लोंढे, अशी ही तफावत आहे. याचे मुख्य कारण हे आहे की, ग्रामीण भागाचे आर्थिक नियोजन झालेले नाही. महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये नागरी आणि ग्रामीण भागाचे अंतर कमी करण्याचे काम आदरणीय उपमुख्यमंत्री श्री. अजित दादा पवार यांनी केले आहे.

अध्यक्ष महोदय, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतीसाठी ५० हजार रुपयांपर्यन्तचे कर्ज शून्य टक्के व्याजदराने आणि ३ लाख रुपयांपर्यन्तचे कर्ज केवळ २ टक्के व्याज दराने देण्यात येणार आहे.

अध्यक्ष महोदय मी आपणास विनंती करीन की, खतांच्या पुरवठ्याचा तुटवडा दरवर्षी महाराष्ट्रात निर्माण होतो. हंगाम सुरू होत असताना रासायनिक खतांचा पुरवठा सेवा सहकारी संस्था, कृषी उत्पन्न बाजार समित्या, आदिवासी सेवा सहकारी संस्था यांच्याकडे उपलब्ध करून द्यावा व त्यांच्यामार्फत त्यांचे वाटप करावयास पाहिजे. अशा प्रकारे खतांचा पुरवठा उपलब्ध करून दिला नाही तर त्यामध्ये मोठ्या प्रमाणात काळा बाजार होतो. त्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी आंदोलने झाली आहेत. शेतकऱ्यांवर लाठीचार्ज करण्याची वेळ सरकार आली होती. कृषी मंत्री महोदय व अर्थमंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, शेतकऱ्यांच्या सेवा सहकारी संस्थांकडे मुबलक खतांचा पुरवठा उपलब्ध करून दिल्यास शेतकऱ्यांना रायायनिक खते योग्य वेळेत उपलब्ध होतील.

अध्यक्ष महोदय, कृषीच्या संदर्भात बजेटमध्ये फार मोठ्या योजना सादर केल्या आहेत. द्राक्ष व केळी संशोधन तसेच फळबागांच्या संदर्भात योजना सादर करण्यात आल्या आहेत. अर्थमंत्री महोदयांना मी विनंती करीन की, विदर्भातील पूर्व विदर्भात धान पिकविणे हा तेथील शेतकऱ्यांचा मुख्य व्यवसाय आहे. पश्चिम विदर्भ असो किंवा पूर्व विदर्भ असो या भागातील शेतकरी फक्त एकच पीक घेतो. यामध्ये कापूस, तूर सोयाबीन किंवा धान असे एकच पीक एका हंगामात घेतले जाते. या शेतकऱ्यांना दुसरा

[ डॉ. नामदेव उसेंडी ]

कोणताही पूरक व्यवसाय नाही. मागच्या वेळी विदर्भातील शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी कार्यक्रम आखला गेला. या भागातील शेतकरी आत्महत्याग्रस्त आहेत. त्यांना पूरक व्यवसाय देणे ही काळाची गरज आहे. यामध्ये मत्स्यव्यवसाय, कुक्कुटपालन, दुग्ध व्यवसाय असे व्यवसाय सुरू करण्याची गरज आहे. मागील वेळी मत्स्यव्यवसायाच्या संदर्भातील निर्णय होईल असे आम्हाला वाटले होते. इन्लॅन्ड फिशरीज आणि मरीन फिशरीज यासंदर्भात विशेष कायदा करण्याची गरज आहे. विदर्भात मत्स्यव्यवसायाला प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे. भंडारा, गडचिरोली किंवा चंद्रपूर जिल्ह्यामध्ये गोड्या पाण्यातील मत्स्य व्यवसायास पोषक वातावरण आहे. यासाठी योग्य अशी तरतूद व नियोजन नसल्यामुळे पूरक व्यवसायापासून मोठ्या प्रमाणात लोकांना वंचित राहावे लागत आहे. आमच्या भागात कोंबडीची अंडी हैद्राबादमधून आयात केली जातात. विदर्भातील काही भाग सोडला तर विदर्भात कुक्कुटपालनाचे नियोजन केल्याचे अर्थसंकल्पातून आढळून येत नाही. शेतकऱ्यांना पूरक उद्योग देण्याच्या दृष्टीने अर्थमंत्री महोदयांनी कुक्कुट पालनाच्या संदर्भात फार मोठे नियोजन करण्याची आवश्यकता आहे. या सर्व गोष्टींचा अंतर्भात त्यामध्ये असावयास पाहिजे अशी माझी विनंती आहे. दुग्धव्यवसायाच्या संदर्भात नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्ड आहे. विदर्भात आत्महत्त्याग्रस्त शेतकरी आहेत, आत्महत्यांचे प्रमाण तेथे वाढले आहे. विदर्भ पॅकेज देण्यात आले याची माहिती आपणा सर्वांना आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात गाई म्हशी व दुधाळ जनावरे वाटण्यात आली होती. त्याचे नियोजन योग्य प्रकारे झाले नाही. योग्य प्रकारे प्रशासकीय यंत्रणा न वापरल्यामुळे फार मोठ्या प्रमाणात यात भ्रष्टाचार झालेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना योग्य प्रकारे पूरक उद्योग मिळालेला नाही. याबाबत योग्य प्रकारे नियोजन करावे अशी माझी वित्तमंत्री महोदयांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, आरोग्याच्या संदर्भात बोलत असताना प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारती बांधण्यासाठी मोठी तरतूद करण्यात आलेली आहे, ही आनंदाची बाब आहे. गडचिरोली जिल्ह्यातील माझ्या तालुक्यात ग्रामीण रुग्णालय आहे. तेथे वैद्यकीय अधिकाऱ्यांना राहण्यासाठी निवासस्थाने नाहीत. त्यांना तंबूमध्ये राहावे लागत आहेत. अशी दुरवस्था निर्माण झालेली आहे, ती दूर करण्याची आवश्यकता आहे. आरोग्य विभागाच्या इमारती बांधण्यासाठी ठोस अशी तरतूद करण्यात आलेली आहे. ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी एनआरएचएम अंतर्गत बऱ्याच तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. मला खेदाने सांगावेसे वाटते की, केंद्र शासनाने या तरतुदी केल्या आहेत, परंतु ग्रामीण भागात ज्यावेळी सुविधा पुरवावयाच्या असतात त्यावेळी हात आखडता घेतला जातो. याबाबत मागील अधिवेशनात मी एक लक्षवेधी सूचनाही मांडली होती. प्राथमिक आरोग्य केंद्रांचा आणि उप केंद्रांचा दर्जा उंचावण्यासाठी एनआरएचएम अंतर्गत गडचिरोलीमध्ये २ कोटी रुपयांच्या वस्तू खरेदी करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये अनावश्यक वस्तूंची देखील खरेदी करण्यात आलेली आहे. ज्या ठिकाणी वीज नाही तेथे एअर कंडिशनर खरेदी करण्यात आलेले आहेत. जेथे पाण्याचा साठा नाही तेथे वॉटर फिल्टरची खरेदी करण्यात आलेली आहे. नियोजन न करता २ कोटी रुपयांची खरेदी करण्यात आलेली आहे. म्हणून माझी अशी विनंती आहे की, शासनाने निधी उपलब्ध करून दिलेला असला तरी त्याचा योग्य विनियोग होण्याच्या दृष्टीने प्रशासकीय यंत्रणांनी योग्य ती खबरदारी घेतली पाहिजे.

[ डॉ. नामदेव उसेंडी ]

अध्यक्ष महोदय, मी माननीय अर्थमंत्र्यांचे अभिनंदन करतो. महाराष्ट्रातील भावी पीढीला महाराष्ट्राच्या इतिहासाची ओळख व्हावी म्हणून महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये शिवनेरी, प्रतापगड, रायगड, सिंधुदुर्ध, विजयदुर्ग या किल्ल्यांच्या संवर्धनासाठी भरीव तरतूद करण्यात आलेली आहे. चंद्रपूर शहर वसवून आता ५०० वर्षे पूर्ण झालेली आहेत. अध्यक्ष महोदय, आपल्याला चंद्रपूर जिल्ह्याचा इतिहास माहिती आहे. आदिवासी राज्याने चंद्रपूर शहराची निर्मिती केलेली आहे. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये किल्ला आहे. चंद्रपूर शहराला एक ऐतिहासिक परंपरा आहे. चंद्रपूर शहराला ५०० वर्षे पूर्ण होत असतांना माननीय अर्थमंत्र्यांनी त्यासाठी २५० कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे, त्याबद्दल मी त्यांचे हार्दिक अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहराच्या सुरक्षिततेसाठी भरीव तरतूद करण्यात आलेली आहे. आपणा सर्वांना माहिती आहे की, मुंबई हादसों का शहर म्हणून प्रचलित आहे. मुंबई शहरामध्ये २६/११ चा दहशतवादी हल्ला झाला. "बड़े-बड़े शहरों में ऐसे छोटे-मोटे हादसे होते रहते हैं," असे बिनधास्तपणे बोलल्यामुळे माननीय गृहमंत्र्यांना आपले पद गमवावे लागले होते. मुंबई शहराच्या सुरक्षिततेसाठी मुंबई शहरात ५ हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, मुंबई शहरातील पोलिसांसाठी ६ हजार घरे बांधणे आणि तंत्रज्ञान विकासासाठी ४० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

अध्यक्ष महोदय, मला मघाशी सांगण्यात आले होते की, अर्थसंकल्पावर बोलत असतांना प्रथम संपूर्ण राज्यासंबंधी बोलावे आणि त्यानंतर आपल्या मतदारसंघातील कामासंदर्भात बोलावे. क्रीडा धोरणाच्या संदर्भात बोलत असतांना मी सांगू इच्छितो की, कुस्ती, कबड्डी, व्हॉलीबॉल, खो-खो यासाठी चांगली तरतूद करण्यात आलेली आहे. आपणा सर्वांना माहिती आहे की, कु. कविता राऊत या आदिवासी मुलीने सुवर्ण पदक पटकावून महाराष्ट्राचा नाव लौकिक वाढविलेला आहे. जे गरजू विद्यार्थी आहेत त्यांना क्रीडा क्षेत्रामध्ये पुढे येण्यासाठी चांगली तरतूद करण्यात आलेली आहे. त्या निधीचे जर योग्य नियोजन केले तर महाराष्ट्राला नाव लौकिक मिळवून देणारे क्रीडापटू आपल्या राज्यामध्ये निर्माण होतील.

अध्यक्ष महोदय, आदिवासी आश्रमशाळेमध्ये दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे. आपल्याला माहिती आहे की, महाराष्ट्रातील आदिवासी आश्रमशाळेतील शिक्षणाचा दर्जा खालावलेला आहे. महाराष्ट्रातील आदिवासी आश्रमशाळांमध्ये आपल्याला फारच विदारक परिस्थिती बघावयास मिळते. जी निधीची तरतूद करण्यात आलेली आहे तो निधी आदिवासींच्या शैक्षणिक धोरणासाठी, त्यांच्या गरजा आणि त्यांना देण्यात येणाऱ्या सोईसुविधांवर योग्य तऱ्हेने खर्च व्हावयास पाहिजे, अशी मी माननीय अर्थमंत्र्यांना विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, तीर्थक्षेत्रासाठी भरीव तरतूद करण्यात आलेली आहे. गडचिरोलीमध्ये दक्षिणेची काशी म्हणून ओळखले जाणारे मार्कंडा नावाचे पर्यटन स्थळ आणि तीर्थक्षेत्र आहे. परंतु त्यासाठी तरतूद करण्यात आल्याचे दिसत नाही. अर्थमंत्र्यांनी इतर तीर्थक्षेत्रासाठी तरतूद केलेली आहे. आमच्या गडचिरोली जिल्ह्यातील तीर्थक्षेत्रासाठी तरतूद करण्यात यावी, अशी माझी विनंती आहे. अध्यक्ष महोदय, पुढील सत्रात गडचिरोली जिल्ह्यात गोंडवाना विद्यापीठ सुरू केले जाणार आहे...

**श्री. गिरीष बापट :** अध्यक्ष महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, सभागृहाची वेळ कामकाज संपेपर्यंत वाढवावी.

**उपाध्यक्ष** : सभागृहाची वेळ रात्रौ ८.०० वाजेपर्यंत होती. सभागृहाची वेळ कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** अध्यक्ष महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये अर्धा-तास चर्चेचा समावेश आहे.

**श्री. गिरीष बापट :** आजच्या कामकाजामध्ये सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पावरील सन्माननीय सदस्यांची भाषणे होऊ द्यावीत असे मघाशी ठरविण्यात आले होते. परंतु अर्धा-तास चर्चा घ्यावयाच्या असल्यास आमची काही हरकत नाही. रात्रौ १२.०० पर्यंत सभागृहाचे कामकाज सुरू ठेवले तरी आमची काही म्हणणे नाही.

**उपाध्यक्ष** : ठीक आहे. आता प्रथम आपण अर्थसंकल्पावरील चर्चा संपवू व त्यानंतर अर्धा-तास चर्चा घेऊ.

**डॉ. नामदेव उसेंडी :** अध्यक्ष महोदय, पुढील सत्रापासून गोंडवाना विद्यापीठ सुरू करायचे आहे. परंतु त्यासाठी आवश्यक असलेली तरतूद या अर्थसंकल्पात केलेली नाही. माझी माननीय अर्थ मंत्री श्री.अजित पवार साहेब व माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांना विनंती आहे की, गोरगरिबांसाठी शिक्षणाची दालने उघडून देणा-या विद्यापीठासाठी शासनाने या अर्थसंकल्पात तरतूद करावी.

अध्यक्ष महोदय, केंद्र शासनाने गडचिरोली जिल्ह्यात वडसा ते गडचिरोली या रेल्वे मार्गाला मंजुरी दिली आहे. परंतु केंद्र शासनाची अशी अट आहे की, त्यात राज्य शासनाचा ५० टक्के हिस्सा असला पाहिजे. सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने गडचिरोली जिल्ह्यात वडसा ते गडचिरोली हा रेल्वे मार्ग तयार करण्याची शासनाला सुवर्णसंधी मिळालेली आहे. गडचिरोली जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने रेल्वे ही अतिशय महत्वाची बाब आहे. माझी माननीय अर्थ मंत्री श्री. अजित पवार साहेब यांना विनंती आहे की, शासनाने सदरहू रेल्वे मार्गाच्या ५० टक्के खर्चासाठी निधी उपलब्ध करून द्यावा.

माननीय अर्थ मंत्री श्री. अजित पवार साहेब यांनी अर्थसंकल्पात विमानतळाच्या विकासाअंतर्गत गडचिरोली जिल्ह्यासाठी तरतूद केली त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, आपण मला या ठिकाणी बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो व माझे दोन शब्द संपवितो.

**श्री. गिरीष बापट** (कसबापेठ) : अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पाच्या सर्वसाधारण चर्चेवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

महोदय, माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार साहेब यांनी सभागृहात सन २०११-१२ चा अर्थसंकल्प मांडला. त्यासंबंधी मी आताच त्यांचे अभिनंदन करणार नाही व निषेधही करणार नाही. या बाबत आम्ही काळ वाट बघू की, आम्हा विरोधी पक्षाला आनंद होईल व आम्हाला काही कामे करता येऊ शकतील, यासाठी त्यांनी अर्थसंकल्पात तरतूद केल्यास आम्ही निश्चितपणे त्यांचे अभिनंदनही करू. अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पात अनेक विभागांचा उल्लेख केला आहे. परंतु मी वेळेअभावी केवळ ५ ते ६ विभांगाच्या संदर्भात शासनाला काही सूचना करणार आहे.

[ श्री. गिरीष बापट ]

अध्यक्ष महोदय, सध्या राज्यात सेवक भरती बंद केलेली आहे. माझी शासनाला अशी सूचना आहे की, ही बंदी सरसकट न उठवता निकष लावून उठवावी. याचे कारण असे आहे की, राज्याला ज्यांच्याकडून महसूल मिळतो, तो जमा करण्यासाठी सेवक नाहीत. मी उदाहरण म्हणून एक बाब सभागृहाला सांगू इच्छितो की, परिवहन विभागातील अनेक लोक सेवानिवृत्त होत आहेत. परंतु त्या विभागातील भरती पूर्णपणे बंद आहे. परिवहन विभागाने असे सांगितले की, अवैध वाहतूक करणाऱ्यांकडून आरटीओंच्या माध्यमातून टॅक्स जमा केला जातो. त्यासाठी सेवकांची आवश्यकता असते. शासनाने आमच्या विभागाला सेवक उपलब्ध करून दिले तर, आम्ही २००० कोटी रुपयांपर्यंतचे महसूली उत्पन्न वाढवून देऊ शकतो.

अध्यक्ष महोदय, एक्साईज विभागात इन्स्पेक्टर व शिपायांची अनेक पदे रिक्त आहेत. मी असे म्हणणार नाही की, बिनकामाच्या लोकांची भरती करा, जेणेकरून शासनावर लोड येईल. अशा परिस्थितीत शासनाने सेवक भरती करताना संबंधित विभागाला अशी अट घालून द्यावी की, १-२ वर्षात आपल्या विभागाकडून एका ठराविक रकमेपर्यंत महसूल न मिळाल्यास, हे लोक घरी जातील. शासनाने अशा प्रकारची अट घालून सेवकांची भरती केल्यास शासनाचे दीड ते दोन हजार कोटी रुपयांपर्यंत उत्पन्न वाढू शकते.

अध्यक्ष महोदय, विक्रीकर खात्याच्या संदर्भात मी सभागृहाला सांगू इच्छितो की, राज्यात व्हॅट सुरू झाल्यामुळे राज्याच्या महसूली उत्पन्नात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. परंतु ग्राहकांचा विक्रीकर बुडविण्याकडे जास्त कल असतो. मी काल रात्री २-४ मित्र व काही पत्रकारांसमवेत जेवणासाठी एका हॉटेलमध्ये गेलो होतो. त्यावेळी तेथे आम्हाला सांगण्यात आले की, आपल्याला जेवणाचे बिल नको असल्यास आपल्या जेवणाची रक्कम इतकी होईल. परंतु आपल्याला जेवणाचे बिल पाहिजे असल्यास, त्यात टॅक्सचा समावेश करून अमुकअमुक रक्कम होईल. अशा प्रकारे शासनाला हजारो कोटी रुपयांच्या महसूलापासून वंचित रहावे लागते. आज कोणत्याही दुकानात गेल्यानंतर दुकानदार म्हणतो की, बील घेणार असेल तर तुझा टॅक्स वाढेल. तू कशाला बिलाचा आग्रह धरतो असे ग्राहकाला सांगितले जाते. ग्राहकाला जगाच्या पाठीवर कोठेही स्वस्त मिळाले तर तो नेहमीच घ्यायला तयार असतो. हजारो कोटी रुपयांचे उत्पन्न विक्रीकरातून शासनाला मिळू शकते. एखादा ग्राहक बाहेर आल्यानंतर त्याच्याकडे बिल आहे की नाही ते चेक करण्याचे काम अन्न निरीक्षक करीत नाही. परिणामी शासलानाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असते. यासंदर्भात धडक कार्यक्रम राबविला तर सहज ५ ते ६ हजार कोटी रुपये शासनाच्या तिजोरीत जमा होऊ शकतील. महसूलमंत्री सभागृहात बसलेले आहेत. मी त्यांचे लक्ष काही गोष्टींकडे वेधणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील करमणूक कराची यंत्रणा अधिक कडक करण्याची गरज आहे. पुणे शहरात दर महिन्याला दूरदर्शनच्या जोडलेल्या कनेक्शनवर खूप मोठ्या प्रमाणात काळा बाजार होत असतो. यामध्ये बेकायदेशीरपणे धंदा करणारे अनेक लोक आज करोडपती झालेले आहेत. पण शासनाला करमणूक कर विभागातील कर्मचाऱ्यांचा पगार देण्यासाठीसद्धा गोळा करता येत नाही, ही खरी वस्तुस्थिती आहे.

अध्यक्ष महोदय, खनीकर्म विभागाचे नागपूर येथे एक कार्यालय आहे. त्यांच्या कार्यालयात वाळू, दगड, मुरुमाच्या संदर्भात दर वर्षाला अंदाज बांधले जातात. हे अंदाज मूळातच चुकीच्या पद्धतीने

[ श्री. गिरीष बापट ]

वर्तविलेले असतात. मिटींगमध्ये जिल्हाधिकारी यांच्याकडून सांगितले जाते की, ठरविलेल्या उद्दीष्टांपेक्षा विभागाने २०० कोटी रुपये जास्त जमा केलेले आहे. त्यांनी खरे तर ५०० कोटी रुपये जमा करण्याची आवश्यकता आहे हेच मला या ठिकाणी सांगावयाचे आहे. जमेच्या बाजूला फक्त १०० ते २०० कोटी रुपये जमणार असे त्याच्याकडून सांगितले जाते. त्यानंतर तो स्वत:ची पाठ थोपटून घेतो. परंतु मूळामध्ये तो ५०० कोटी रुपयाचे उत्पन्न बुडवित असतो. याकडे शासन मात्र लक्ष देत नाही. काही दिवसापूर्वी पुणे शहरात कात्रज घाटात उत्खननाचा प्रकार उघडकीस आला होता. यामध्ये संबंधिताने हसत-हसत दीड ते दोन कोटी रुपयांचा दंड भरला होता. यामध्ये त्तेरी भी चूप आणि मेरी भी चूपछ असा प्रकार घडलेला आहे. यामध्ये त्याने किती माल काढलेला आहे. याचा कुठे तरी शासनाने विचार करण्याची गरज आहे. पुणे शहरात गृह खात्यामार्फत ४ कोटी रुपयांचा दंड वसूल केला होता. आज दारु पिऊन वाहने चालविणे, अवैध वाहतूक करणे या सगळ्यांचा विचार करता अधिक महसूल शासनाच्या तिजोरीत जमा करण्यासाठी गृह खात्यात आणि परिवहन खात्यामध्ये आवश्यक ती भरती करण्याची गरज आहे. मी माननीय वित्तमंत्री महोदयांचे लक्ष एका गोष्टीकडे वेधणार आहे. मी त्यांचे बजेटचे भाषण संपूर्ण वाचलेले आहे. राज्यामध्ये ११ टक्के ज्येष्ठ नागरीक राहतात याची माननीय श्री. अजितदादांनी नोंद घ्यावी. १९९७ पासून केंद्र शासन कायदा करीत आहे....अडथळा...

अध्यक्ष महोदय, मला माननीय मंत्री महोदयांपासून संरक्षण द्यावे. दीड कोटी ज्येष्ठ नागरीक राज्यामध्ये राहत आहेत. शासन त्यांच्यासाठी १० योजना राबविण्याचा प्रयत्न करीत असते. त्याबद्दल मला काहीच म्हणावयाचे नाही. पण आज त्यांच्या दवाखान्याची, औषधाची, बसेसचे पास देण्यासाठी, विरंगुळा केंद्र काढण्यासाठी कोणतीच कार्यवाही करीत नाही. वर्तमानपत्रात ज्येष्ठ नागरिकांच्या हत्या होत असल्याच्या बातम्या अनेक वेळा छापून आलेल्या आहेत. कौटुंबीक कारणास्तव आज अनेक ज्येष्ठ नागरिक एकटे राहत असल्यामुळे त्यांच्या मनात भीतीचे वातावरण आहे. आज अनेक ज्येष्ठ नागरिक गरीब असून अन्नासाठी मोताद आहेत. अर्थसंकल्पात ज्येष्ठ नागरिकांना न्याय मिळालेला आहे असे मला वाटत नाही. याकरिता शासनाने पुरवणी मागण्यांमध्ये त्यांच्यासाठी भरीव तरतुद करून देण्याची आवश्यकता आहे. ज्येष्ठ नागरिकांचे राज्यभर संघ आहेत. ते माननीय मुख्यमंत्र्याची आणि समाज कल्याण मंत्र्यांच्या भेटीची वेळ मागत आहेत. त्यांना वेळ देण्यासाठी संबंधित मंत्र्यांकडे वेळ नाही. ते सर्व ज्येष्ठ नागरिक आज शासनाकडे आशेने पाहत आहेत. याकरिता अशा ज्येष्ठ नागरिकांसाठी अर्थसंकल्पात काही तरी भरीव तरतुद करण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुनील केदार यांनी चॅरिटी कमिशनरच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला होता. धर्मदाय आयुक्त कार्यालयात देवस्थानाची, ट्रस्टची जागा किंवा वकिलांच्या तारखा घेण्यापलीकडे दुसरे कोणतेही काम होते की नाही अशी शंका आमच्या मनामध्ये येत आहे. सध्या न्यायालयांमध्ये..... प्रलंबित प्रकरणांची संख्या हजारो आहे. या संदर्भात शासनाने कधी तरी बेसिक विचार केला पाहिजे. न्यायालयांकरिता वेगळे इन्फ्रास्ट्रक्चर उभे केले पाहिजे. आज न्यायालयाकरिता नवीन इमारती नाहीत. न्यायालयांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. धर्मादायी रुग्णालयांच्या संदर्भात धर्मादाय आयुक्तांनी काम पहावे, असा निर्णय शासनाने घेतला होता. पुण्यातील रुबी हॉस्पिटलचे धिंडवडे या सभागृहात निघाले आहेत. ते काम करू शकत नाहीत, इतकी त्यांच्याकडे प्रकरणे सध्या प्रलंबित आहेत. तेथे वेगळी इमारत बांधली गेली पाहिजे. वेगळा कर्मचारी वर्ग व इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध करून दिले पाहिजे.

[ श्री. गिरीष बापट ]

अध्यक्ष महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या संदर्भात अर्थसंकल्पामध्ये किती तरतूद करण्यात आली, या आकडेवारीचा मी या ठिकाणी उल्लेख करणार नाही. महसूल मंत्री श्री. बाळासाहेब थोरात येथे बसलेले आहेत. माननीय श्री. अनिल देशमुख हे स्मार्ट मंत्री आता या ठिकाणी उपस्थित नाहीत. अन्न व नागरी पुरवठा विभागाकडे स्वत:चा कर्मचारी वर्ग नाही. हा विभाग उंदरांपासून अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांनी पोखरून खाऊन टाकले आहे. सर्वसामान्य माणसाला मिळणाऱ्या अन्नधान्यावर इतके लोक ताव मारतात की, शेवटच्या माणसाला अर्धा हिस्सा देखील मिळत नाही. हा विभाग अत्यंत महत्वाचा आहे. सर्वसामान्य लोकांचे पोट भरण्याचे काम या खात्याकडे आहे. विधवा, सामान्य, अपंग परित्यक्त्या, एपीएल, बीपीएल या सर्व लोकांकरिता या विभागाने योजना सुरू केलेली आहे. मात्र या योजना राबविण्यासाठी त्यांच्याकडे केवळ २०० ते २५० कायम स्वरुपी कर्मचारी आहेत. महसूल विभागाकडून उर्वरित कर्मचारी वर्ग नियुक्त केला जातो. या खात्याच्या बदल्यांमध्ये बराच गैरप्रकार आहे. महसूल विभागातील ज्या कर्मचाऱ्याला शिक्षा द्यावयाची असेल तर त्याची बदली अन्न व नागरी पुरवठा विभागामध्ये केली जाते. महसूल विभागातील कामाचा अनुभव घेऊन असे कर्मचारी या विभागात काम करतात. माझी विनंती आहे की, महसूल विभाग व अन्न व नागरी पुरवठा विभगातील कर्मचारी वर्ग वेगळा करण्यात यावा. अन्न व नागरी पुरवठा विभाग स्वतंत्र झाला पाहिजे. ज्या प्रमाणे सिंचन व आरोग्य खात्यामध्ये वेगळा कर्मचारी वर्ग आहे, त्याप्रमाणे हा विभाग देखील स्वतंत्र करून तेथील कर्मचाऱ्यांची खात्यांतर्गत बदली करावी. महसूल विभागातून एखाद्या कर्मचाऱ्याला काढायचे व त्याची बदली जिल्हाधिकारी कार्यालयात करायची असे प्रकार होऊ नयेत. यामुळे सर्वसामान्य जनतेला न्याय मिळत नाही. या संदर्भात शासनाने लक्ष द्यावे अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, राज्यातील शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत बिनव्याजी कर्ज व ३ लाख रुपयांपर्यंत २ टक्के दराने कर्ज देण्याचा चांगला निर्णय शासनाने घेतला आहे. या करिता शासनाने अंदाजपत्रकात ६४ कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. ही तरतूद वाढवून दिली जाणार असेल तर माझे काहीही म्हणणे नाही. मात्र राज्यातील शेतकऱ्यांची संख्या व बँकेकडून कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या लक्षात घेता ही रक्कम फारच तुटपुंजी आहे. माझा आकडा चुकीचा असेल तर तो मी दुरुस्त करीन. मात्र ही रक्कम मला अतिशय कमी वाटते. ती रक्कम वाढवून दिली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, गृह विभागाकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. सभागृहामध्ये जीवनदायी योजनेचे २५० कोटी रुपये मंजूर करण्यात आले. त्यावेळी माननीय अर्थ मंत्र्यांनी टाळया घेतल्या. आम्हाला असे वाटले की, राज्यातील गोरगरिबांना या योजनेचा फायदा मिळू शकेल. मात्र २५० कोटी रुपये तसेच तिजोरीत पडून राहिले. अनेक विषयांवरील चर्चा, पत्रव्यवहार, योजना कशी अंमलात आणावी या बाबतच्या विचारविनिमयामुळे एक वर्षाचा कालावधी उलटल्यानंतर देखील ही योजना अंमलात येऊ शकली नाही. अध्यक्ष महोदय, मी केवळ २ ते ३ मुद्दे या ठिकाणी मांडणार आहे. अध्यक्ष महोदय, पुण्यातील तत्कालीन गृह राज्यमंत्री श्री. रमेश बागवे यांनी पोलिसांवरील ताण कमी करण्यासाठी २५ कोटी रुपयांची विशेष सुरक्षा दल योजना आणली होती. मी या योजेनेचा पाठपुरावा गृह विभागाकडे व वित्त विभागाकडे केला. मला या ठिकाणी सांगण्यास लाज वाटते की, २५ कोटी रुपयांपैकी एक पैसा देखील खर्च केला नाही. आर्थिक वर्ष संपत आले तरी देखील राज्याच्या तिजोरीतून एक पैसा देऊ शकले नाही. ॲडीशनल डीजी श्री. जैन यांच्याकडे खात्याचा कारभार दिला. मात्र त्यांना

**[ श्री. गिरीष बापट ]**

बसण्यासाठी टेबल व खुर्ची नाही. अशी या विभागाची अवस्था आहे. २५ कोटी रुपयांमधून नवीन पोलीस नियुक्त करावयाचे होते की, आहे त्या पोलिसांवरील ताण कमी करावयाचा होता हे मात्र आम्हाला समजू शकले नाही. या करिता शासनाने एक पैसा देखील खर्च केला नाही. राज्य शासनाच्या अशा किती योजना प्रलंबित आहेत की, ज्या बजेटमध्ये दाखविल्या जातात परंतु, प्रत्यक्षात त्यांची पूर्तता होत नाही. त्या का होऊ शकल्या नाहीत याचा एकदा आढावा घेतला पाहिजे. याचा जर पाठपुरावा केला तर, बजेटमध्ये छापून आलेल्या प्रत्येक हेडखालील प्रत्येक पैशाचा विनियोग या राज्यामध्ये होईल असे मला वाटते. याबाबतीत मी जीवनदायीनी योजनेच्या २५० कोटी रुपयांच्या आणि विशेष गृह रक्षक दलाच्या २५ कोटी रुपयांच्या योजनेकडे आपले लक्ष वेधू इच्छितो.

अध्यक्ष महाराज, आमचे मित्र सन्माननीय सदस्य, डॉ नामदेव उसेंडी यांनी रेल्वेबाबत मुद्दा उपस्थित केला की, त्यांच्या भागामध्ये रेल्वेबाबत मदत केली पाहिजे. त्याबाबत मी सांगू इच्छितो की, मी महाराष्ट्राची आर्थिक पाहणी हे पुस्तक पाहिले आहे तसेच, मी रेल्वेचे बजेटही थोडेफार वाचत असतो. हा जरी, केंद्र शासनाचा विषय असला तरी मी माननीय वित्त मंत्र्यांना विनंती करतो की, शहरीकरण वाढते आहे. वाढत्या शहरीकरणामुळे वाढणाऱ्या वाहनांची व त्यामुळे होणाऱ्या अपघातांची संख्या वाढते आहे. एकट्या महाराष्ट्रामध्ये १२-१२, १५-१५ हजार माणसे रस्त्यावरील अपघातामध्ये मृत्युमुखी पडत आहेत ही दुर्दैवाची गोष्ट आहे. त्यामुळे वस्ती वाढली की माणसे वाढणार, माणसे वाढली की वाहने वाढणार आणि वाहने वाढली की, अपघात वाढणार ही साखळीच आहे. माझ्याकडे याबाबतची सगळी आकडेवारी आहे. पोलिसांचा जो रिपोर्ट आहे त्याप्रमाणे पुणे जिल्ह्यामध्ये अशाप्रकारे रस्त्यावरील अपघातांमध्ये मरणाऱ्या माणसांची संख्या १२५० आहे व १२ ते १४ हजार ही संख्या संपूर्ण महाराष्ट्रातील असून ती संपूर्ण देशामध्ये सर्वात जास्त आहे.

अध्यक्ष महाराज, माझी विनंती आहे की, जुन्या काळामध्ये मुंबईमध्ये ट्रॅम होत्या. मी असे म्हणत नाही की आता ट्रॅम करा किंवा बीआरटी करा. मी त्या वादात जात नाही. पण आज ग्रामीण व शहरी भाग जोडण्यासाठी रेल्वे केली तर योग्य होईल असे मला वाटते. जशी आज कर्जत लोणावळा पुणे लोकल आहे. दौंड बारामती लोकल आहे. तशी जर लोकल झाली तर अनेक लोकांचे मेन रस्त्यावरुन जाणे-येणे वाचेल. लोकल करताना वन टाईम जादा खर्च येतो, परंतु, तेथे मदतीसाठी केंद्र शासन येते. याबाबतीत राज्याने जर आपला वाटा उचलला तर हे काम होऊ शकेल.

अध्यक्ष महाराज, स्वातंत्र्यानंतर केवळ ६० कि.मी. नवीन रेल्वे महाराष्ट्रामध्ये आली. कोकण रेल्वेचा समावेश मी यामध्ये केलेला नाही तो वेगळा प्रोजेक्ट होता. याचा अर्थ दर वर्षाला राज्यामध्ये ५ कि.मी. एवढेच फक्त रेल्वेचे जाळे येते आणि रस्ते दुरुस्तीवर शेकडो कोटी रुपये खर्च केला जातो. या रस्त्यांऐवजी जर रेल्वेचे ट्रॅक झाले, स्थानके झाली तर, रस्त्यावरील अपघात कमी होऊ शकतात. अर्थमंत्री साहेब आपल्याकडे एसटी महामंडळ आहे.

(सन्माननीय सदस्य, श्री. जितेंद्र आव्हाड माननीय अर्थमंत्र्यांशी बोलत असतात)

सन्माननीय सदस्य, श्री. जितेंद्र आव्हाड आपण माननीय अर्थमंत्र्यांशी नेहमीच बोलत असता, त्यांना कधी तरी आमचेही म्हणणे ऐकण्याची संधी द्यावी अशी माझी आपणांस विनंती आहे.

( सन्माननीय सदस्य, श्री. जितेंद्र आव्हाड जागेवर बसून काही बोलतात )

**उपाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य, श्री. जितेंद्र आव्हाड जागेवर बसून काही बोलत असतील तर आपण त्याची दखल घेऊ नये अशी मी सन्माननीय सदस्य, श्री. गिरीष बापट यांना विनंती करतो.

**श्री. गिरीष बापट :** अध्यक्ष महाराज, एसटी ही महाराष्ट्राची रक्त वाहिनी आहे. एसटीच्या अनेक मागण्या प्रलंबित असल्या तरी, मी माननीय अर्थमंत्र्यांशी संबंधित दोनच गोष्टी येथे सांगणार आहे. एसटीतील मागच्या करारातील १३५ कोटी रुपयांची परिपूर्ती व्हावयाची आहे. माझी तर गेल्या अनेक वर्षापासूनची ही मागणी आहे की, आपल्या राज्यामध्ये इतर राज्यांच्या तुलनेत एसटीवर लावला जाणारा टॅक्स जास्त आहे. तो कमी केला तर एसटी अजून फायद्यात चालेल. एसटी महामंडळाचे काम चांगले चालले आहे, याचा मला अभिमान आहे. ती अजून चांगली होण्यासाठी मागच्या कराराची परिपूर्ती व्हायला पाहिजे. एमएसईबी, कृषी, शिक्षक या सर्व क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना ३ वर्षानंतर सेवेत कायम केले जाते. परंतु, एसटीतील कर्मचाऱ्यांना ५ वर्षानंतर सेवेत कायम केले जाते. ५-५ वर्षे तेथील मुले ८००-९०० वेतनावर काम करत असतात. या मुलांना ३ वर्षाच्या सेवेनंतर सेवेत कायम केले पाहिजे तसेच, त्यांचे वेतनही वाढवून दिले पाहिजे.

अध्यक्ष महाराज, पंडित भीमसेन जोशींचे स्मारक व्हायला पाहिजे अशी इच्छा महाराष्ट्रात सर्वानीच व्यक्त केली. त्यांच्या अंत्यविधीच्या वेळी कर्नाटक सरकारने त्यासाठी १० कोटी रुपये मंजूर केले आहेत. त्यातून कर्नाटकमध्ये त्यांचे स्मारक होणार आहे. या सभागृहात त्यांना श्रद्धांजली वाहत असताना मी मुद्दाम उभे राहून माननीय मुख्यमंत्र्यांना आठवण केली होती की, त्यांच्या गायनाची स्मृती कायम रहावी यासाठी या राज्यामध्ये मराठवाडा, विदर्भ, मुंबई, पुणे, नाशिक असेल अशा कोणत्याही ठिकाणी त्यांचे स्मारक उभारले पाहिजे. पंडित भीमसेन जोशीं यांना भारत सरकारने भारत रत्न पुरस्काराने सन्मानित केले होते. ते पुण्याचे होते. त्यांच्या नावाने स्मारक करण्याची योजना या बजेटमध्ये आहे किंवा नाही हे मला माहिती नाही. कारण मी संपूर्ण बजेट पाहिलेले नाही. स्मारक करण्याची तरतूद आपण केली असेल तर मी आपल्याला धन्यवाद देईन. नसेल तर आपण त्याचा विचार करावा अशी मी विनंती करेन.

शेवटचे दोनच मुद्दे मी जाता जाता मांडतो. विषय फार मोठा आहे. शहरी भागामध्ये रोजगार हमी योजना लागू करणे हा विषय आहे. याचा विचार आज ना उद्या करावा लागेल. या योजनाचा विषय मोठा असल्यामुळे मी आता जास्त तपशीलात जात नाही. रोजगार हमी योजनेचा जनक महाराष्ट्र आहे. आज ग्रामीण भागात रोजगार हमी योजनेची कामे हळूहळू कमी होत चालली आहेत. सर्वजण आता शहरी भागाकडे येऊ लागले आहेत. त्यामुळे शहरी भागात रोजगार हमी योजना कशी सुरू करता येऊ शकेल याचा विचार करण्याची वेळ आली आहे. नवीन सेन्सस प्रमाणे शहरीकरणाचा रेशियो ५५ टक्क्याच्या वर जाणार आहे म्हणून यासाठी काही करता आले तर करावे.

या विधान सभेमध्ये नव्याने निवडून येणाऱ्या आमदारांची संख्या खूप आहे. त्यात शहरी भागातील सदस्यांची संख्या जास्त आहे. मला शहरी व ग्रामीण असा भेद करायचा नाही व तो करू पण नये. केंद्र व राज्य शासनाच्या योजनेचे प्रमाण ८० : २० असे आहे. त्या योजना आपण बंद करू नयेत. पण शहरी भागातील आमदारांना आपल्या भागाचा विकास करायचा असेल तर त्यांच्यासाठी स्थानिक विकास निधी वाढवून दिला पाहिजे. आमच्या भागातील नगरसेवक स्थानिक विकास निधी वाढवून घेऊन तशी तरतूद अर्थसंकल्पामध्ये करतात. खासदारांचा स्थानिक निधी पाच कोटी रुपयोंचा झाला

[ श्री. गिरीष बापट ]

आहे. दीड कोटी रुपयोच्या निधीमध्ये आम्ही तीन लाखांच्या मतदार संघामध्ये विकासाची कामे करू शकत नाही. म्हणून शहरी भागातील सर्व पक्षीय आमदारांसाठी नाविण्यपूर्ण योजना हाती घेण्यासाठी ३ ते ५ कोटी रुपयोचा स्थानिक विकास निधी द्यावा अशा प्रकारची मी मागणी करतो.

राज्याचा विकास करत असताना आपण अनेक आकड्यांचे खेळ पाहतो व ते खरे देखील असतात. या वर्षीचा ४१ हजार कोटीचा प्लॅन आहे. डीपीडीसीचा २०० ते ३०० कोटीचा प्लॅन असतो. हे सर्व करत असताना जो शासकीय अधिकारी असतो त्याचे प्रमोशन, ट्रान्स्फर ही प्रशासकीय बाब सुरूच असते. ३१ मार्च या दिवशी मंत्रालय पहाटे पर्यंत सुरू असते. तेथे भ्रष्टाचार होतो असे मी कधीच म्हणत नाही. त्या तारखेच्या आत चेक देऊन नोंद करावी लागते म्हणून रांग लागलेली असते. मेळा भरलेला असतो. वर्षभर मात्र अंदापत्रक बनविण्यासाठी लोकप्रतिनिधी मागे लागले तर अधिकारी त्यास जुमानत नाही. राजकीय मतभेदामुळे, कोर्टाच्या अडचणीमुळे काम झाले नाही तर मी समजू शकतो. पण केवळ अधिकाऱ्याच्या हलगर्जीपणामुळे त्याला पाहिजे तो ठेकदार न मिळाल्यामुळे, राजकीय पक्षाला खुश करण्यासाठी त्याच्याकडे असलेला निधी तो खर्च करत नाही. त्याचे परफॉर्मन्स ऑडिट करणार आहात की नाही. एखाद्या वेळी सगळा निधी खर्च होईल अशातला देखील भाग नाही. डिसेंबर पर्यंतची आकडेवारी पाहिल्यानंतर असे दिसून येते की, आपण ६० टक्क्यापर्यंत निधी खर्च करू शकलेलो आहोत. ही चांगली बाब आहे. याच्यापुढे आपण गेलो पाहिजे. ५ ते १० टक्के खर्च कायदेशीर अडचणीमुळे करू शकलो नाही तर ते समजू शकतो. या राज्यात ५० टक्क्याच्या वर निधी अधिकाऱ्याने खर्च केला नाही तर त्याला कधी तरी आपण जाब विचारणार आहोत की नाही ? त्याने हा निधी खर्च केला नसेल तर त्याचे प्रमोशन न करता डिमोशन करणार आहात की नाही ? त्याची बदली करणार आहात की नाही ? असे जर केले नाही तर त्याच्यावर कुठलीही जबाबदारी राहणार नाही. करोडो रुपयोच्या योजना त्याच्या हातामध्ये दिलेल्या असतात. त्याला पाहिजे त्या योजनाच करायच्या असतात. आपण फक्त कामाचे काय झाले एवढेच विचारतो. काम न झाल्याचे कारण त्या अधिकाऱ्याला विचारत नाही म्हणून या अधिकाऱ्याचे परफॉर्मन्स ऑडिट झाले पाहिजे. त्याचा रिपोर्ट आला पाहिजे. त्याला भीती वाटली पाहिजे की, या खात्याला ५० कोटी रुपयोच्या योजना मिळाल्या आहेत पण माझ्या हटवादीपणामुळे व अन्य कारणांमुळे मी पूर्ण करू शकलो नाही. त्याचे कारण योग्य असेल तर त्याने सचिवांकडून तशी परवानगी काढावी. त्याबद्दल आमचे काहीही म्हणणे नाही. केवळ हलगर्जीपणामुळे, निष्काळजीपणामुळे अनेक पैसे शिल्लक राहतात. त्यामुळे आपण बजेटच्या ८० ते ९० टक्क्यांपर्यंत पोहचू शकत नाही. तेव्हा काम न करणाऱ्या, हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांबद्दल काय करणार आहात हे देखील सभागृहाला सांगावे.

आज सगळे सरकारी उपक्रम तोट्यात चालले आहेत, खाजगी उपक्रम फायद्यात आहेत. सगळ्या हायवेचे टोलनाके फायद्यात आहेत. एसआरएची योजना फायद्यात आहे. बी.ओ.टी.च्या सर्व स्कीम फायद्यामध्ये आहेत. परंतु सरकार जेथे हात घालते त्याठिकाणी तोटा होतो, असे का होते याचा विचार झाला पाहिजे. सरकार स्वत: काम करीत असताना फायदा होत नाही आणि खाजगी उद्योजक मूळ बजेटच्या दुप्पट-तिप्पट पैसे कमावितो. आपण कोणाला श्रीमंत करीत आहोत ? सरकार मात्र गरीब होत चालले आहे. राज्यावर कर्जाचा डोंगर उभा राहिलेला आहे. आपण विकासाच्या कामासाठी कर्ज

**[ श्री. गिरीष बापट ]**

काढत असाल तर त्याला आमची हरकत नाही. परंतु या कर्जाचा सदुपयोग होतो की दुरुपयोग होतो, याचा विचार झाला पाहिजे. या बजेटच्या संदर्भात आमची जी मते होती ती आम्ही मांडलेली आहेत. हे बजेट यशस्वी होवो अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. या बजेटची १०० टक्के अंमलबजावणी होवो आणि माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या कारकिर्दीमध्ये सर्व आमदारांना समान न्याय मिळो अशी अपेक्षा व्यक्त करून मी माझे भाषण पूर्ण करतो.

**श्री. संजय वाघचौरे** (पैठण) : अध्यक्ष महाराज, माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी सन २०११-१२ या वर्षाचा जो अर्थसंकल्प मांडलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महाराज, मी सुरूवातीस माननीय उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांचे अभिनंदन करतो की त्यांनी एक चांगला अर्थसंकल्प मांडलेला आहे. या अर्थसंकल्पामध्ये शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत शून्य टक्के दराने कर्ज पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झालेले आहे. तेव्हा गोरगरिब जनतेचा आशीर्वाद माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांना नक्कीच मिळणार आहे.

अध्यक्ष महाराज, भू-विकास बँक ही राज्यामध्ये लाँग टर्म कर्ज देणारी एकमेव बँक आहे. शेतकऱ्यांसाठी ही अतिशय महत्वाची बँक आहे. ही बँक पुनरुज्जीवित करण्याची आवश्यकता आहे. कर्ज परत फेड करणारी ही एकमेव बँक आहे. या बँकेला निश्चितपणे मदत आणि सहकार्य केले पाहिजे.

अध्यक्ष महाराज, आरोग्य विभागाबाबत बोलावयाचे झाले तर आपल्याकडे एनआरएचएम अंतर्गत करोडो रुपये मिळतात. जिल्हापरिषदेमध्ये ही योजना राबविली जाते. परंतु ही योजना राबविताना जिल्हापरिषदेच्या पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेतले जात नाही. ही योजना जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि त्यांचे इतर अधिकारी चालवितात. त्यामुळे एनआरएचएमच्या संदर्भात पदाधिकाऱ्यांना कोणत्याही प्रकारची माहिती नसते. या योजनेमध्ये कोणत्या आजारांचा अंतर्भाव आहे याची त्यांना माहिती नसते. तेव्हा माझी शासनाला विनंती आहे की, एनआरएचएम संदर्भात जिल्हापरिषदेच्या स्टॅन्डींग कमिटीमध्ये आणि जिल्हापरिषदेच्या विविध समित्यांमध्ये मान्यता घेतली पाहिजे. तसेच भविष्यात या योजनेमध्ये काय केले पाहिजे यासाठी जिल्हापरिषदेच्या व पंचायत समितीच्या सदस्यांना विश्वासात घेण्याची गरज आहे. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे या योजनेमध्ये करोडो रुपये मिळतात. पण अधिकारी ज्याठिकाणी आवश्यकता आहे त्याठिकाणी ही योजना घेत नाहीत. तेव्हा एनआरएचएम संदर्भात पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महाराज, माझ्या जिल्ह्यात जायकवाडी धरण आहे. हे धरण मातीचे आहे. परंतु इको सेन्सेटीव्ह झोनमुळे तेथे गेल्या ८-१० वर्षापासून मत्स्य बीज टाकले जात नसल्यामुळे मत्स्य उत्पादन होत नाही. तेव्हा याबाबीचा विचार व्हावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महाराज, जळगाव-औरंगाबाद-सोलापूर असा रेल्वे मार्गाचा सर्वे झालेला आहे. या मार्गामुळे उत्तर आणि दक्षिण भारत जोडला जाणार आहे. त्याशिवाय चार-पाच जिल्हे चांगल्या पद्धतीने जोडले जाणार आहेत. या मार्गामुळे २०० कि.मी.अंतर वाचणार आहे. हा रेल्वे मार्ग पूर्ण झाला तर त्या भागातील लोकांना निश्चितपणे मदत होणार आहे.

**[ श्री. संजय वाघचौरे ]**

महोदय, 'क' वर्ग महानगरपालिकेला शासनाकडून मोठ्या प्रमाणावर निधी दिला जातो. परंतु या महानगरपालिकांकडे कामे करण्यासाठी ज्युनियर इंजिनियर, डेप्युटी इंजिनियर किंवा अन्य कोणतीही यंत्रणा नसल्यामुळे नगरपालिकांकडून खाजगी ठेकेदाराच्या माध्यमातून काम केले जाते. खाजगी ठेकेदार इंजिनियरच्या माध्यमातून काम करतात. परंतु हे इंजिनियर मनमानी कारभार करतात. या निमित्ताने माझी मागणी आहे की, नगरपालिकांची कामे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून करावीत.

महोदय, पैठणची 'पैठणी' केवळ राज्यातच नव्हे तर देशात प्रसिद्ध आहे. आमच्या भागात पैठणीला चांगली बाजारपेठ मिळवून देण्यासाठी आणि प्रशिक्षण केंद्रासाठी राज्य सरकारने मदत करणे आवश्यक आहे. शिवाय पैठणीला राज्यवैभव मिळवून देण्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत.

महोदय, पैठणमध्ये आपेगाव तीर्थक्षेत्र असून, ती पैठणची दक्षिण काशी म्हणून ओळखली जाते. दशक्रिया विधीसाठी वर्षाला १० लाख भाविक, महिन्याला १ लाख आणि दररोज १० हजार भाविक येत असतात. हे क्षेत्र पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचे असल्यामुळे या तीर्थक्षेत्राचा पर्यटन क्षेत्र म्हणून विकास झाला पाहिजे. तसेच या तीर्थक्षेत्राला निधी उपलब्ध करून देऊन, त्याचा विकास करावयास पाहिजे.

महोदय, आमच्याकडे बाहेरुन येणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. चार-पाच तालुक्यांचा आमचा परिसर आहे. आरोग्य प्रशिक्षण केंद्राच्या नावाखाली आमच्याकडे ३० खाटांचे केंद्र चालविले जाते. या निमित्ताने माझी मागणी आहे की, ते केंद्र १०० खाटांचे करण्यात यावे.

महोदय, पैठण येथे ४० वर्षापासून एमआयडीसी आहे. शिवाय नवीन एमआयडीसी सद्धा झाली आहे. त्या भागात भरपूर बॅरेजेस झाले आहे. म्हणून शेतकरी आनंदात आहेत. औरंगाबाद शहरापासून पैठण शहर ५५ कि.मी. अंतरावर असून, त्या ठिकाणी जाण्यासाठी दोन-अडीच तास लागतात. परिणामी, पर्यटक येण्यासाठी अडचणी निर्माण होतात. या अनुषंगाने माझी विनंती आहे की, या रस्त्याचे चौपदरीकरण करण्यासाठी पुरेशी तरतूद करावी.

महोदय, मी पुन्हा एकदा माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी चांगला अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

**श्री. दीपक केसरकर** (सावंतवाडी) : अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पाला पाठिंबा देऊन, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, मी सभागृहातील नवीन सदस्य आहे. मी सुरूवातीलाच नम्रपणे सांगू इच्छितो की, माझ्या मतदारसंघाला काय मिळाले किंवा विरोधी पक्षातील सदस्यांना काय मिळाले यापेक्षा महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेला या वर्षीच्या अर्थसंकल्पातून काय मिळाले, याची खऱ्या अर्थाने चर्चा झाली पाहिजे. कारण ही अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा आहे आहे.

महोदय, समाजातील विविध घटक मग त्यामध्ये शेतकरी असतील, कामगार असतील, मच्छीमार असतील, मागासवर्गीय असतील, आदिवासी असतील, भटका समाज असेल एवढेच नव्हे तर युवक वर्ग असेल, त्या प्रत्येकाला न्याय देण्याची भूमिका अर्थसंकल्पाच्या माध्यमातून दिली गेली आहे.

[ श्री. दीपक केसरकर ]

अर्थसंकल्पामध्ये ज्या बाबी नमूद करण्यात आल्या आहेत त्याची मी पुनरावृत्ती करणार नाही. या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये शेतकऱ्यांसाठी अनेक योजना नमूद केल्या आहेत. पीक विमा योजनेच्या बाबतीत सांगावेसे वाटते की, कोकण विभागात मोठ्या प्रमाणावर पाऊस पडतो. त्यामुळे गवत सद्धा मोठ्या प्रमाणावर उगवते. परिणामी आगी लागून काजू, आंबा ही पिके आगीच्या भक्ष्यस्थानी सापडतात. शिवाय विविध प्रकारची नैसर्गिक आपत्ती सद्धा येते.

महोदय, नारळ बोर्डाने नारळासाठी पीक विमा योजना लागू केली आहे. आंबा, काजू या पिकांसाठी सद्धा पीक विमा योजना लागू करणे हे शासनाचे कर्तव्य आहे. त्या दृष्टीने पीक विमा योजनेमध्ये आंबा व काजू पिकाचा अंतर्भाव माननीय मंत्री महोदयांनी करावा अशी मी या माध्यमातून विनंती करतो.

महोदय, काढणी पश्चात व्यवस्थापनाचा अर्थसंकल्पामध्ये प्रथमच विचार केला गेला आहे. आंब्यावर मोठ्या प्रमाणात घ्याकाड होतो, अशा आंब्यांची निर्यात झाल्यानंतर भारताचे नाव खराब होते. यासाठी आधुनिक सुविधा निर्माण झाल्या पाहिजेत. कोकणात आणि विशेषत: सिंधुदुर्ग जिल्ह्यात देवगड हापूस नावाचा आंबा तयार होतो. तो आंबा बाजारात येण्यापूर्वीच त्याची पाहणी झाली पाहिजे. या दृष्टिकोनातून सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजेत. असे झाल्यास जो आंबा कमी दर्जाचा असेल त्यावर त्याच ठिकाणी प्रक्रिया करता येईल, जेणेकरून चांगला आंबा मुंबई किंवा परदेशामध्ये जाईल.

अध्यक्ष महोदय, काजूवर लघु प्रक्रिया करण्याच्या युनिटचा उल्लेख करण्यात आला. परंतु, त्यासाठी फक्त साडे तीन कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. एका सिंधुदुर्ग जिल्ह्यात ३०० कोटी रुपयांपेक्षा जास्तीचा काजू उत्पादित होतो आणि या काजूपासून असंख्य महिलांना रोजगार मिळत असतो. केरळसारख्या राज्याने त्यांच्या राज्यात काजू बोर्डाची स्थापना केली आहे. कारण काजू हे हाय व्हॅल्यूचे पीक आहे. सध्या काजूचा किलोचा भाव ५० ते ६० रुपये आहे. एक-दीड वर्षात हा सर्व माल खरेदी करायचा आणि वर्षभर प्रक्रिया करायची ही बाब सर्वसामान्य उद्योजकांच्या मर्यादेच्या पलिकडील आहे. निश्चितपणे यावर विचार झाला पाहिजे. काजूची एका वेळी खरेदी व्हावी, साठवण व्हावी या संदर्भात बँकांना योजना देण्यासठी भाग पाडले पाहिजे. काजू वर्षभर उपलब्ध करून दिला तर संपूर्ण महाराष्ट्राला मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होणार आहे.

अध्यक्ष महोदय, मला माननीय मंत्र्यांचे अभिनंदन करायचे आहे की, जलविद्युत प्रकल्प खाजगीकरणाच्या माध्यमातून करावेत हा नवीन विचार त्यांनी दिलेला आहे. मला एका गोष्टीचा मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो की, आदरणीय श्री. सुरेशजी प्रभू भारताचे वीजमंत्री होते, त्यावेळी या संदर्भात संपूर्ण कोकणचा सर्व्हे झालेला होता. कोकणाला किनाऱ्यांची एक नैसर्गिक देणगी मिळाली आहे, तसेच सह्याद्रीच्या रांगा देखील कोकणपासून सुरू होतात तेथून समुद्रकिनाऱ्यापर्यंत उतार असल्यामुळे मोठ्या प्रमाणात जलविद्युत प्रकल्प कोकणात येऊ शकतात, ही वस्तुस्थिती आहे. केंद्र शासनाने तयार केलेला अहवाल खाजगी उद्योजकांना उपलब्ध करून दिला जावा. जलविद्युत प्रकल्प होत असताना, आपण एका गोष्टीचे निश्चितपणे भान ठेवले पाहिजे की, वेस्टर्न घाटच्या विकासाच्या नावाखाली किंवा तेथील पर्यावरण जपण्याच्या नावाखाली तेथील विकास पूर्णपणे बंद ठेवला जात आहे. जर आपण असे ठरविले की, आपण वर पाण्याची चहाटी करायची आणि त्यावर कोकणात विद्युतनिर्मिती करायची तर

[ श्री. दीपक केसरकर ]

त्याबाबत मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होणार आहेत. कोणत्याही परिस्थितीत विनाकारण इको सेंसिटिव्ह झोन निर्माण केले जाणार नाहीत याची सद्धा शासनाने काळजी घेणे फार आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, वैद्यकीय महाविद्यालयांच्या बांधकामांसाठी जास्तीत जास्त तरतूद उपलब्ध करून केली आहे, त्या संदर्भात मला माननीय अर्थमंत्र्यांचे अभिनंदन करायचे आहे. परंतु, शासनाने या गोष्टीचे सद्धा भान राखले पाहिजे की, महाराष्ट्रात असणारी शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, विशेषत: बीएएमएसचे कॉलेज, त्यामध्ये कौन्सिलच्या नियमानुसार जो स्टाफ दिला पाहिजे, तो उपलब्ध करून दिलेला नाही. आपण पदे निर्माण केली पाहिजेत. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये गरीब विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ती शासकीय वैद्यकीय महाविद्यालये बंद पडण्याची परिस्थिती आज निर्माण झालेली आहे. अध्यक्ष महोदय, मला आपल्यामार्फत माननीय उप मुख्यमंत्र्यांना विनंती करायची आहे की, आपण ज्याप्रमाणे नवीन महाविद्यालयांच्या बांधकामांसाठी निधी उपलब्ध करून दिला आहे, त्याप्रमाणे तेथे नवीन पदे देखील निर्माण करावीत. जेणेकरून, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये सुरू राहतील आणि गरीब मुलांना त्या ठिकाणी शिक्षण मिळेल. आपणाकडून यासाठी सद्धा आर्थिक तरतूद करण्यात यावी.

अध्यक्ष महोदय, मला शेवटचे २ मुद्दे मांडायचे आहेत. मच्छीमारांच्या यांत्रिकीकरणासाठी आपण फार मोठ्या प्रमाणात सोय उपलब्ध करून दिलेली आह. छोट्या नौका रॉकेलवर चालतात. महाराष्ट्र हे एकमेव राज्य असे आहे की, मच्छीमारांना रॉकेलवर सबसिडी मिळत नाही. केरळ, गोवा, कर्नाटक ही राज्ये त्यांच्या मच्छीमारांना रॉकेलवर सबसिडी देते. त्यामुळे महाराष्ट्रात मच्छीमारांना रॉकेलवर सबसिडी का नाही, हा प्रश्न आहे. आपण यासंदर्भात निश्चितपणे काही तरी विचार केला पाहिजे. केंद्र शासनाला या संदर्भात विनंती केली पाहिजे. राज्य शासनाचे देखील या संदर्भातील धोरण ठरविले पाहिजे, अशी मी आपणास विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, मला आपल्याला मुद्दाम महत्त्वाची गोष्ट निदर्शनास आणून द्यायची आहे की, उत्कृष्ट फळ बागायती ही कोकणामध्ये विशेषत: सिंधुदुर्ग जिल्ह्यात होते. कोकण कृषी विद्यापीठ हे एकच रत्नागिरी जिल्ह्यात आहे. आमच्या सुंदर अशा जिल्ह्यात एकही कृषी महाविद्यालय नाही, ज्यामध्ये सर्वाधिक आंबा होतो, सर्वाधिक काजू होतो, सर्वाधिक नारळ होतो. परंतु, त्या ठिकाणी उद्यान महाविद्यालय नाही, कृषी महाविद्यालय सद्धा नाही. मी माननीय अर्थमंत्र्यांना विनंती करतो की, वेंगुर्ला येथे जे कृषी महाविद्यालय प्रस्तावित केले आहे, त्याला आपण निश्चितपणे मान्यता द्यावी अणि त्यासाठी तरतूद करावी.

अध्यक्ष महोदय, कोकण रेल्वेच्या उभारणीमध्ये महाराष्ट्र राज्याचा फार मोठा वाटा आहे. महाराष्ट्र शासनाने सर्व आवश्यक जमीन कोकण रेल्वेला उपलब्ध करून दिली. कोकण रेल्वे हे कॉर्पोरेशन असल्यामुळे ते जमीन खरेदी करत नाहीत. अध्यक्ष महोदय, नुकतीच दादर-सावंतवाडी रेल्वे सुरू झाल्यामुळे कोकणवासियांनी समाधान व्यक्त केले आहे. टर्मिनस उभारण्यासाठी आवश्यक ती आर्थिक तरतूद महाराष्ट्राच्या बजेटमध्ये होण्याची आवश्यकता होती. कोकण रेल्वेने मागणी केल्यानंतर या प्रस्तावास मान्यता देणे आवश्यक होते.

**[ श्री. दीपक केसरकर ]**

अध्यक्ष महोदय, सन १९९७ मध्ये सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर करण्यात आला. आम्ही १४ वर्षे वाट बघितली की, आमचा १४ वर्षांचा वनवास कधी संपणार आहे. एकीकडे पर्यटन जिल्हा जाहीर केल्यामुळे त्या ठिकाणी कोणताही उद्योग येत नाही आणि रोजगार निर्मिती होत नाही, आणि पर्यटनासाठी तरतूद नाही, ही वस्तुस्थिती आहे. मी या ठिकाणी मनापासून, अगदी कळकळीने विनंती करू इच्छितो की, आम्ही एक साधा प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता. २७९ कोटी रुपयांची तरतूद वेगवेगळया पर्यटन बाबीसाठी आहे. परंतु, आम्ही २७ कोटी रुपयांची अल्प तरतूद मागितली होती. त्यामधून मच्छीमारांचा सहभाग पर्यटनामध्ये होईल, शेतकऱ्यांचा सहभाग होईल. वन पर्यटन होऊ शकेल. हेरिटेज टुरिझमही होऊ शकेल. या जिल्ह्याला पर्यटनासाठी जेवढी तरतूद आवश्यक आहे तेवढी करावी अन्यथा पर्यटन जिल्हा म्हणून केलेली घोषणा मागे घ्यावी. या जिल्ह्याचा आपोआप विकास होईल. आता असे होत आहे की, पर्यटनासाठी तरतूद नाही आणि इतर विकासही होत नाही. त्यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्याला पर्यटनासाठी भरघोस तरतूद उपलब्ध करून देण्यात येईल, अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

धन्यवाद.

---

**वनक्षेत्राचे जतन व संवर्धनासाठी करावयाच्या उपाययोजना या विषयावर सर्वश्री. सुनिल केदार, शशिकांत शिंदे, गोपालदास अग्रवाल, जितेंद्र आव्हाड, विजय वडेट्टीवार, डॉ. कल्याण काळे, सर्वश्री. रमेश बागवे, प्रशांत ठाकूर, कालिदास कोळंबकर, वि. स. स. यांचा प्रस्ताव**

**श्री. सुनिल केदार** (सावनेर) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने म. वि. स. नियम २९३ अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"राज्यात दिवसेंदिवस वाढत असलेल्या प्रदुषणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असून याचे प्रमुख कारण वनक्षेत्राचे घटत असलेले प्रमाण, राज्य सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करत असताना राज्यात वनसंपत्ती नष्ट होताना दिसत असणे, प्रत्येक वर्षी अर्थसंकल्पात वन विभागासाठी मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद करण्यात येत असून त्यामानाने वन विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजना व प्रकल्प हाती घेतले जात नसल्याने शासनाचा पैसा वाया जात असल्याचे निदर्शनास येणे, वन विभागातील अधिकारी व कार्यक्रमांवर दरवर्षी कोटयावधी रुपये खर्च होत असूनही जंगलातील वृक्षतोड व सागवानाच्या तस्करी बिनदिक्कतपणे सुरू असणे, वन जमिनीचे रुपांतर रहिवाशी अथवा औद्योगिक क्षेत्रामध्ये होत असताना वनक्षेत्राचे स्थानांतर होत नसल्याने वनक्षेत्र कमी होणे, याकडे शासनाने लक्ष घालून वन विभागाच्या निधीचा उपयोग चांगल्या पद्धतीने करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**उपाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. सुनिल केदार हे ऑनलेग राहतील. ही चर्चा नंतर घेण्यात येईल.

---